श्री

राष्ट्रकथामाला.

४

कार्थेज्.

हें पुस्तक

श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड,

सेनाखासखेल समशेर बहादूर,

यांच्या आज्ञेनें

नागेश आबाजी काथवटे, बी. ए.,

यांनीं मराठींत लिहिलें

तें

मुंबईत

"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

सन १८९३.



जूलिसस् सीझर.



हानिबाल्.

भाषांतर कर्त्याची प्रस्तावना.

कांहीं कांहीं इतिहासज्ञ इतिहासाचे प्राचीन व अर्वाचीन असे दोन भाग करतात व हे दोन भाग अगदीं पृथक् आहेत; ह्या दोहोचें महत्त्व तसेंच उपयोग हेही अगदीं निराळे आहेत असेंही प्रतिपादन करितात. पण हें मत चुकीचें आहे. वास्तविक प्राचीन व अर्वाचीन हे दोन्ही इतिहास कार्यकारणभावानें संबद्ध आहेत. हा त्यांचा संबंध पूर्णपणें समजणें हेंच इतिहासाच्या अभ्यासाचें खरें फल होय व यांतच इतिहासाची खरी उपयुक्तता आहे. अर्थातच हा संबंध लक्ष्यांत येण्यास जितकी अर्वाचीन इतिहासाची तितकीच प्राचीन इतिहासाचीही माहिती आवश्यक आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे या पुस्तकांतील विषय बऱ्याच महत्त्वाचा व उपयोगी आहे असें आढळून येईल.

प्राचीन काळीं ज्या राष्ट्रांनीं बरेंच वैभव भोगिलें, बऱ्याच प्रदेशांवर अंमल चालविला व बऱ्याच लोकांना पादाक्रांत केलें, पण आतां जीं नष्ट किंवा नष्टप्राय झालीं आहेत त्यांपैकींच '**कार्थेज्**' हें एक आहे. सध्यां **ग्रीस्**चे व **रोम्**चे चांगले विस्तृत इतिहास उपलब्ध आहेत. **हिंदुस्थान**चेही कांहीं थोडेबहुत उपलब्ध आहेत. पण दुःखाची गोष्ट ही कीं, **कार्थेज्**चा असा एखादा इतिहास नाहीं व सविस्तर माहितीही फारच थोडी आहे. सध्यां जें **कार्थेज्** नांवाचें शहर **आफ्रिके**त आहे तें हें प्राचीन **कार्थेज्** नव्हे. सध्यां जेथें **ट्युनिस** शहर आहे त्याचे उत्तरेस सुमारें वीस एक मैलांवर हें जुनें **कार्थेज्** होतें. तें शहर व्यापाराला किती सोयस्कर होतें व त्याचे भोंवतालचा प्रदेश किती सुपीक होता हें पुस्तकांत पुढें येणारच आहे.

ह्याच्या स्थापनेविषयीं नानाप्रकारच्या दंतकथा ऐकिवांत आहेत. पैकीं **जस्टिन्** व **व्हर्जिल्** यांनीं दिलेल्या दोन दंतकथा पुस्तकांत आहेत. तिसरी कथा आहे तींत **अझोरस्** अथवा **झोरस्** यानें **टायर्**च्या लोकांना त्या ठिकाणीं नेलें असा उल्लेख आढळतो. एकंदरींत पाहतां शहराच्या स्थापनेचा वास्त-

विक प्रकार असा दिसतो कीं, **यूटिका**च्या व **टायर्**च्या व्यापाऱ्यांनीं मिळून एक वखार प्रथम बांधली. ती जागा विशेषच सोयीची भासल्यामुळें कांहीं व्यापारी स्वत: तेथें राहावयास गेले व होतां होतां तेथें एक शहर झालें. त्याला तेथील लोकांनीं **कार्थेज्** अशी संज्ञा दिली. ही गोष्ट इ० स० पूर्वी ८५०त झाली. पुढील दोनशें वर्षांची माहिती आपल्याला बिलकुल नाहीं व त्यापुढील दोनशें वर्षांची फार तुटक तुटक माहिती आहे, पण तेवढ्या अवधींत तें मोठमोठ्या राष्ट्रांच्या बरोबरीचें झालें; **रोम्** व **ग्रीस्** यांशीं लढाया देऊं लागले. सुमारें चारशेंव्याच्या आरंभापासून **कार्थेज्**चा इतिहास संगतवार लागतो.

कार्थेज्च्या इतिहासाचे मुख्यत्वेंकरून दोन भाग करतां येण्यासारखे आहेत. एक त्यांच्या **ग्रीक्** लोकांशीं लढाया व दुसरा त्यांच्या **रोमन्** लोकांशीं लढाया **ग्रीशियन** लोकांशीं प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग **कार्थेज्**ला एक दोन वेळच आला असेल, त्यांच्या बहुतेक लढाया **सिसिलींत** वसाहती करून राहिलेल्या **ग्रीक्** लोकांशीं झाल्या. नव्या वसाहती करण्याकरितां इकडून **ग्रीस्** व तिकडून **कार्थेज् सिसिलीं**त उतरलें, तेव्हां लढाईला कारण झालें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. **सिसिली** घेण्याची **कार्थेज्**ची खटपट सुमारें दोनशें वर्षें चालू होती. या लढायांचें वर्णन पुस्तकांत सविस्तर येणार आहे. या भागांत **डायोनिसिअस्**चा उत्साह, **अगॉथॉक्लीस्**चें विचित्र चरित्र, **पिर्‍हस्**चे बेत, हे फारच वांचण्याजोगे भाग आहेत. **टाय्मोलिअन्**सारखी निरपेक्ष बुद्धीचीं माणसें सध्याच्या कालांत सुद्धां क्वचितच सांपडतील व पुढेंही फारशी आशा करावयास नको. या सर्व लढायावरून एवढें स्पष्ट झालें कीं कार्थेज्चे दैविक व भौतिक कारणांनीं कितीही नुकसान झालें तरी तें **सिसिलींत ग्रीक्** लोकांशीं लढाई करण्यास नेहेमीं तयार असे. शेवटीं जेव्हां **रोम् सिसिली**च्या मदतीस आलें तेव्हांच **कार्थेज्**नें **सिसिली** सोडलें व तदनंतर तें घेण्याचें त्यांनीं कधींही मनांत आणिलें नाहीं. व अशा रीतीनें **ग्रीक्** लोकांशीं ज्या लढाया झाल्या त्यांचें पर्यवसान झालें.

रोम्ला परदेशीं लढाईला जाण्याची प्रथम अगदीं भीति वाटत होती ती या **सिसिलीं**तील विजयानें अगदीं नाहींशी झाली व त्यांना **कार्थेज्**ही आपणांस घेतां येईल असें वाटूं लागलें. हा हेतु मनांत धरून त्यांनीं **रेग्यूलस्**ला तो हुकूम अमलांत आणण्यासाठीं **आफ्रिकें**त धाडलें. पण **हामिलकार् बार्का**सारखे सरदार पदरीं असल्यामुळें व **रोम्**च्या फाजील हिय्यानें हा पहिला प्रयत्न तर

रोम्च्या गळ्यांत आला व अशा रीतीनें **रोम्** व **कार्थेज्** यांजमधील लढायांस ह्मणजे **कार्थेज्**चे इतिहासाचे दुसरे भागास सुरुवात झाली. या भागांत **ट्रेबिआ-ट्र्यासुमेन्नस् कानी** इत्यादि प्रसिद्ध लढाया झाल्या. **हानिबाल्**चें खरें, साहस व अद्वितीय शौर्य यांचे याच भागांत वर्णन आहे, याच भागांत दोघे **हस्ड्रुबाल् हामिल्कार्, हानो मेगो** इत्यादि प्रसिद्ध पुरुष उदयास आले व अस्तंगतही झाले. ही सर्व मंडळी फारच अचाट बुद्धीची होती, यांनीं जे निरनिराळे पराक्रम केले व ठिकठिकाणीं खरें चातुर्य दाखविलें त्याचें सविस्तर वर्णन या ग्रंथाचे चवथ्या पुस्तकांत आहे. त्यामुळें हें पुस्तक तर फारच मनोवेधक झालें आहे. **रोम्**कडे चौघे **सिपिओ, फेबिअस् लिलिअस्** इत्यादि फारच चतुर माणसें असल्यामुळें **कार्थेज्**चे हें सर्व चातुर्य, हा सर्व पराक्रम व सर्व साहस यांचें कांहींएक चाललें नाहीं व शेवटीं हां हां ह्मणतां **कार्थेज्**चा समूळ नाश झाला. **रोमन्** सरदाराच्या मुत्सद्दीपणाची व शहाणपणाची अखेर सरशी होऊन त्यांनीं **कार्थेज्**ला अगदीं नामशेष करून टाकलें. हें सर्व हृदयंगम कथानक या पुस्तकांत आहे.

आतां कार्थेज्चें **आरमार, सैन्य, मुत्सद्दी** व तेथील लोकांचे **विशिष्ट गुण** ह्यांचें थोडथोडें स्वरूप देऊन ही प्रस्तावना संपवून घेण्याच्या मार्गास लागतों.

आरमार—**सिसिली**तील लढायाच्या अखेरपावेतों **कार्थेजिनिअन्** लोक तीन बाजूंचीं जहाजें वापरीत असत. हीं साधारणतः **सायराक्यूस्**च्या लोकांच्या जहाजासारखींच असत. **प्लीनी**नें अशी एक दंतकथा सांगितली आहे कीं, चार बाजूंचीं जहाजें **कार्थेजिनिअन्** लोकांनीं प्रथम शोधून काढलीं. थोरलीं पांच बाजूंचीं जहाजें **कार्थेज्**नें **ग्रीक्** लोकांकडून घेतलीं ही त्यांना कशी व किती उपयोगीं पडलीं हें पुढें लक्ष्यांत येणारच आहे. ह्या पांच बाजूंच्या दरेक जहाजांत लढाईस खास उपयोगीं पडणाऱ्या चारशें-वीस माणसांचा समावेश होई. सुमारें तीनशें खलाशी वल्हीं मारणारे व एकशेंवीस लढणारे शिपाई. जहाजांवर ज़लदेवतांची पूर्ण सत्ता असते अशी त्यांची समजूत असे आणि ह्मणूनच दरेक जहाजाच्या पुढच्या बाजूस त्यांच्या मूर्ती बसवून ते त्यांची पूजा करीत.

सैन्य—सैन्याची व्यवस्था साधारण अशी असे कीं, वरच्या वरच्या ह्मणजे अधिकाराच्या जागा सर्व **कार्थेज्**चे लोकांच्या ताब्यांत असत. खुद्द **कार्थेज्**चे शिपायाला दरेक लढाई जिंकण्याबद्दल एकेक आंगठी मिळत असे. अगदीं आणी-

बाणीच्या प्रसंगीं मात्र लढाईस पाठवावयाचें असें एक खुद्द **कार्थेज्**चे शिपायांचें पंचवीसहजाराचें पथक कार्थेज् ठेवीत असे. ह्या पथकांतील शिपाई नेहमीं फारच उत्तम लढवय्ये व खरे शूर शिपाई असत. आधींच **कार्थेज्**चा शिपाई ह्मणजे खरा शूर वीर व चलाख असावयाचा, व त्यांतूनही ह्या पथकांतील झटला ह्मणजे उत्तम कसलेला व निर्दोष शिपाई असलाच पाहिजे. बाकीचें कार्थेज्चें सैन्य म्हणजे सर्व देशांतून सर्व तऱ्हांनीं गोळा केलेले शिपाई. ह्याच नमुन्याचें **पर्शियन्** लोकांचें सैन्य असे. जसे पूर्वभागाचे सर्व जातीचे लोक **झर्क्सस्** वगैरेच्या सैन्यांत सांपडावयाचे तसेंच पश्चिमेंतील सर्व प्रदेशचे लोक **कार्थेज्**चे सैन्यांत सांपडत असत. हे असले पगारदार हंगामी शिपाई दूरदेशीं असतां **कार्थेज्**च्या कसे उपयोगी पडले व **कार्थेज्**जवळ आले तव्हां कसे भीतिदायक झाले हें सर्व पुढें लक्ष्यांत येईल.

मुत्सद्दी–आतां **कार्थेज्**चे मंत्री व राज्याधिकारी राज्य करण्यास कितपत योग्य होते हें पाहूं या. ह्या संबंधानें उल्लेख **कार्थेज्**चे इतिहासांत फारच थोडे ठिकाणीं आढळतो. **कार्थेज्**चा इतिहास परकीय ग्रंथकारांनीं लिहिला असल्यामुळें तेथील राज्यपद्धति, राज्यास्थिति, सामाजिकस्थिति वगैरेची फारशी माहिती मिळत नाहीं. पहिल्या भागांत म्हणजे **सिसिली**तील लढायांत राज्य चालविणाराचें किंवा इतर कोणाचेंही राजकारणासंबंधीं चातुर्य फारसें दिसून येत नाहीं. **स्पेन्** व **इटली**तील लढाई सुरू जाहल्यावर मग हें कोठें कोठें दृष्टीस पडतें. **हामिल्कार्** हा जबरदस्त मुत्सद्दी होता. बंडखोरांचें बंड मोडल्यावर, **सिसिली** तर गेलें; तेव्हां आतां कोठें घुसलें तर आपली सरशी होईल व कोठें **रोम्**चा पाडाव करण्यास संधि सांपडेल, हे दोन विचार मुख्यतः त्याच्या मनांत घोळूं लागले. खुद्द **कार्थेज्** येथें लढाईनें अगदीं पिळून गेले असल्यामुळें साधारण लोक कधींही एखाद्या साहसाच्या कृत्यास अनुमोदन देणार नाहींत, तसेंच राजसभेंत बरेच मोठे लोक आपल्याविरुद्ध, तेव्हां तेथेंही आपलें कांहीं चालावयाचें नाहीं; ह्या दोन्ही गोष्टी जाणून व हे दोघेही सैन्याच्या आधीन किती आहेत ह्या गोष्टीचा नुकत्याच झालेल्या बंडावरून घेतलेल्या अनुभवानें विचार करून तो एकदम कोणासही न कळवितां **स्पेन्**मध्यें उतरला. अशीं अनेक चातुर्याचीं कामें त्यानें केलीं. त्याचा जांवई **हस्डूबाल्** हा तर त्याच्याहूनही कांकणभर ज्यास्तच होता. **हानो** ह्मणजे **हामिल्कार्** व **हानिबाल्** याचा प्रतिस्पर्धी हाही मुत्सद्दीपणांत म्हणजे कमी होता असें नाहीं. त्यानें

राजसभेंत वेळोवेळीं केलेले प्रश्न फारच चतुर व मुद्देसूद आहेत. यासारखे अनेक मुत्सद्दी त्यावेळीं **कार्थेज्**मध्यें होऊन गेले. पण वाचकानें हेंही विसरूं नये कीं आतांच्या मुत्सद्दीपणांत व तेव्हांच्या मुत्सद्दीपणांत महदंतर आहे. लढायांत व इतर सर्व कामांत सारखा फेरफार होत चालला आहे. जसें तेव्हांचा शूर सरदार व आतांचा शूर सरदार यांची कोणतेही रीतीनें तुलना करणें रास्त होणार नाहीं; तसेंच तेव्हांचा मुत्सद्दी व आतांचा मुत्सद्दी यांची तुलना करणें बरोबर होणार नाहीं. **हानिबाल्, हामिल्कार्** हे **ग्ल्याडस्टन्, सालस्बरी** वगैरे मुत्सद्यांत कोठें बसूं शकतील हा प्रश्नच अगदीं अप्रशस्त होणार आहे. त्यावेळेच्या मानानें **हामिल्कार्** व **हानिबाल्** मोठे मुत्सद्दी होते असें म्हणण्यास कांहींएक हरकत नाहीं.

विशिष्ट गुण—आतां **कार्थेज्**चे लोकांत साधारणतः काय काय गुण आढळतात एवढ्याचाच विचार करणें राहिलें.

साहस—कार्थेज्चे लोक परमावधीचे साहसी होते यांत बिलकुल संशय नाहीं. व्यापारासाठीं ते कोठें कोठें फिरत असत; कोणकोणत्या प्रदेशांत जात असत; अगदीं परकीय व अनभ्यस्त अशा लोकांत कसे राहत असत, या सर्वांचा विचार केला ह्मणजे त्यांच्या साहसाचें फारच आश्चर्य वाटतें. **हानो** कोठें कोठें गेला होता? त्यावेळच्या त्या अपुरत्या साधनांनींही **आफ्रिके**च्या पश्चिमकिनाऱ्याचा बराच भाग तो फिरला ही गोष्ट बरीच आश्चर्य वाटण्याजोगी नाहीं काय? वास्तविक हे **कार्थेज्**चे लोक ह्मणजे **टायर्**चे, पण त्यांनीं राज्य स्थापिलें कोठें, वाढविलें कोणत्या बाजूस, विजय मिळविले कोणीकडे, या सर्वांचा विचार केला म्हणजे त्यांच्या साहसी स्वभावाबद्दल मुळींच शंका राहत नाहीं. त्यांच्या व्यापारासंबंधीच्या साहसी स्वभावामुळें इतर सर्व बाबतींतही ते फार साहसी होते. **हानिबाल्** तर साहसाचा केवळ पुतळा होता.

उद्योग—दुसरा त्यांचा मुख्य गुण म्हटला ह्मणजे उद्योग. हाही त्यांच्यांत साहसाइतकाच पूर्णपणें वसत होता व हा जसजशीं त्यांजवर संकटें येत तसतसा वाढे. अगदीं **कार्थेज्**वर जेव्हां शेवटची वेळ येऊन बेतली व ज्या वेळेस त्यांनीं आपलीं हत्यारें सुद्धां अगोदरच शत्रूंना देऊन टाकलीं होतीं तेव्हां त्यांनीं रात्रंदिवस बसून पुरुष आणि बायका या सर्वांनीं मिळून तरवारी, ज्याव्हेलिन्, क्याटपुल्ट् वगैरे सर्व तऱ्हेचीं हत्यारें सर्वांना पुरे इतकीं अगदीं थोड्या अवधींत तयार केलीं.

हें वास्तविकच आश्चर्यकारक नव्हे काय ? जेव्हां त्यांचीं आंतील व बाहेरील दोन्हीं बंदरें शत्रूंनीं घेरून टाकलीं तेव्हां पाठीमागच्या पाठीमागें जहाजें बाहेर काढण्यास रात्रीच्या रात्रीं त्यांनीं खणून मार्ग तयार केला. ह्याहून उद्योग तो कसा असावा ?

सौम्यता—तिसरा त्यांचा गुण ह्मटला म्हणजे ते स्वभावतःच फार सौम्य असत. लढाईच्या वेळीं जो त्यांचा क्रूरपणा दिसत असे तो त्यांचा जातिस्वभाव असेलसें वाटत नाहीं. इतराचें पाहून व कांहीं अंशीं त्यांच्या चालीरीतीमुळें कधीं कधीं क्रूरपणा त्यांच्यांत दिसतो, तरीपण जात्या ते सौम्यच होत. ते परकीयांत लवकर मिसळत असत व त्यांच्याशीं लग्नव्यवहारही लागलींच करीत यावरून वाटतें कीं ते जात्या सौम्य असतील. त्यांचा रानटी लोकांशीं व्यापार करण्याचा ह्मणून जो प्रकार वर्णिला आहे त्यावरून ते फारच सौम्य असतील असें वाटतें. **रोमन्** इतिहासकारांनीं हे फार क्रूर होते असें लिहिलें आहे पण तें खरें वाटत नाहीं. त्यांच्यांतील नरयज्ञाची चाल त्यांच्या सौम्यतेस बाध आणणारी आहे खरी; पण ती देवभोळेपणामुळें त्यांच्यांत चालू राहिली असेल असें वाटतें. पुढेंपुढें ही चाल अगदीं कमी कमी होत गेली हेंही आपणास ठाऊकच आहे. आपण हिंदुही देवभोळेपणामुळें कधीं कधीं किती क्रूर दिसतों बरें ? पण एकंदरीनें आपण जसे सौम्य तसेच कार्थेज्चे लोकही फार सौम्य होते. विश्वासघातकीपणा, असत्यता वगैरे कांहीं दुर्गुणही त्यांच्यांत बरेच आढळतात. पण हे दुर्गुण त्यावेळचे बहुतेक लोकांत सांपडतच असत त्यामुळें ते **कार्थेज्**मध्येंच विशेष होते असें म्हणवत नाहीं व त्यामुळें त्यांचीं उदाहरणें वगैरे येथें देण्याचे भरीस पडत नाहीं.

आतां वाचकांस या पुस्तकांत काय येणार त्याची व पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय **कार्थेज्** याविषयीं साधारण माहिती झालीच आहे. **कार्थेज्**चे लोकांची सामाजिक स्थिति, त्यांचें कलाकौशल्य, ज्ञान व ग्रंथसंग्रह इत्यादिविषयीं ह्मणण्याजोगी माहिती उपलब्ध नाहीं त्यामुळें त्याविषयीं खात्रीलायक साधारण अनुमान कांहीं काढतां येण्याजोगें नाहीं. आतां या इतिहासावरून सुचणारा एक विचार सांगून ही प्रस्तावना संपवून घेतों.

प्रस्तावनेच्या आरंभीं सांगितलेंच आहें कीं **टायर्**च्या व्यापाऱ्यांनीं प्रथम व्यापाराच्या सोयीसाठीं एक वखार बांधली व होतां होतां तेथें एक

शहर झालें. ही स्थापनेची पीठिका आपणास विशेष संभवनीय दिसते. कारण अशा प्रकारचें राज्य स्थापन झाल्याचें उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहे. **इंग्रज** सरकारच्या **हिंदुस्थानां**तील राज्यस्थापनेची हीच हकीकत आहे. प्रथमतः **इंग्रज** लोकांनीं व्यापाराचे निमित्तानें इकडे येऊन **सुरत** येथें एक वखार घातली व हलके हलके **हिंदुस्थानां**तील बरींच राज्यें हाताखालीं घातलीं तद्वतच **टायर्**च्या लोकांनीं '**बिर्सा**' येथें जाऊन राज्यस्थापना केली.

कार्थेज्ची स्थापना, उत्कर्ष व ऱ्हास यांच्या इतिहासाचा विचार केला तर **कार्थेज्**च्या व **इंग्रजा**चे राज्याचा सारखेपणा तेव्हांच ध्यानांत येतो. **इंग्रजां**चा स्वतःचा देश अगदींच लहान आहे; त्यांचा **यूरोपां**तील इतर देशाशीं संबंधही फार थोडा आहे; पण त्यांच्या राज्याचा विस्तार अतिशयच मोठा आहे. तद्वतच खुद्द **कार्थेज्**चें संस्थान अथवा शहर फार लहान होतें; त्याचें **आफ्रि-केंतील** संस्थानाशीं दळणवळण अगदीं बेताबाताचें होतें; पण राज्यविस्तार त्या कालाच्या मानानें फारच मोठा होता.

दोन्हीं संस्थानांतील लोकांच्या भरभराटीची भिस्त व्यापारावर; **कार्थेज्**चें राज्य उदयास आलें तें व्यापारानें, **इंग्रज** उदयास आले ते त्याच साधनानें; दोघांनींही राज्यें प्राप्त झालीं तरी व्यापारावर पूर्ण लक्ष्य ठेविलें.

ह्या चमत्कारिक व महत्त्वाच्या सादृश्यामुळें **कार्थेज्**च्याविषयीं विशेष विचार करावासा वाटतो.

दोहोंच्या स्थितीमध्यें जर इतकें सादृश्य आहे तर दोहोंचे परिणाम इतके विसदृश कां असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. **कार्थेज्**चा इतका लवकर नाश कां झाला? व **इंग्रजां**च्या राज्याची घडी इतकी चांगली कां बसली? अर्थातच हा प्रश्न इतका व्यापक आहे कीं दोन्हीं राज्यांची चांगली माहिती करून घेऊन त्यावर बराच विचार केल्याशिवाय या प्रश्नाचें समर्पक उत्तर देतां येणार नाहीं. याकरितां वाचकांपुढें हा प्रश्न प्रथम सादर करून ह्या दोन राष्ट्रांच्या अवस्थांतील दोन तीन ठळक भेदही दर्शवितों त्यावरून इतर भेद सुचण्यास मार्ग होऊन प्रश्नाचें उत्तर सुलभ होईल.

इंग्रज लोक हे **ग्रेटब्रिटन**मध्यें येऊन राहिल्यानंतर त्यांचा व त्या देशाचा अगदीं एकजीव झाला. **ग्रेटब्रिटन्** ह्मणजे **इंग्रजा**ची **विलायत** असें मनांत

आल्याशिवाय राहणेंच नाहीं. **कार्थेजचे** लोक **आफ्रिकेंतील** लोकांशीं कधींच इतके एकजीव झाले नाहींत. त्याचें **आफ्रिकेंत** पुरें ठाणें कधींच बसलें नाहीं. ही एक गोष्ट त्यांना किती अपायकारक झाली हें **म्यासिनिसाच्या** व त्याच्या मुलाच्या वर्तणुकीवरून, तसेंच **न्युमिडिअन्** जातीच्या लोकांनीं **कार्थेजूला** किती त्रास दिला त्यावरून, तसेंच **आफ्रिकेंतील** वेगळाल्या जातीचे लोक **अगॉथॉक्लीसूला** व पगारदार हंगामी शिपायांच्या बंडाला किती लवकर मिळाले यावरून व यासारख्या अनेक इतर गोष्टींवरून सिद्ध होईल.

दुसरा एक भेद असा आहे कीं **इंग्रज** लोक जिंकलेल्या लोकांवर जशी दया करतात तशी **कार्थेजूनें** कधींच केल्याचें आढळत नाहीं. **सिसिलींत** दोनशें वर्षे **कार्थेजूनें** निरनिराळ्या लढाया केल्या, पण दयेमायेचा प्रकार कोठें आहे काय? **आग्रिजेन्टम्** घेतलें; लुटा; **जेला** घेतलें; टाका सगळे लोक मारून, फोडा सगळीं देवळें. **कार्थेजूनें** सर्व कारभार अशा तऱ्हेनें चालविला होता. मग त्याला आयतेवेळेस पुरेशी मदत मिळूं नये यांत आश्चर्य तें कोणतें? **इंग्रजाला हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत** वाटेल तितकी मदत मिळते. **कार्थेजूला** इतर ठिकाणीं राहूं द्या, पण **आफ्रिकेंत** ही पुरेशी मदत मिळत नाहीं. कधीं कधीं त्यांना मिळाली असल्यास **सिसिलींतच** मिळाली असेल व तीही चांगला स्नेहसंबंध राखल्यामुळें. कधीं कधीं **कार्थेजूचे** सरदारांना ही युक्ति करून मदत मिळाल्याचें आढळतें. पण हा नियम त्यांनीं जितका जपून पाळावा तितका पाळला नाहीं; त्याचा भंगच अधिक वेळ केला. त्यामुळें अखेरीस ते फसले असावेंत.

कार्थेज् मांडलिक संस्थानांवर खंडणी जबर बसवीत. कांहीं कांहीं राजांवर अर्ध्या उत्पन्नाइतकी व कांहींकांवर तर त्याहूनही अधिक बसवीत असत. ही खंडणी कधींही माफ होत नसे. शिवाय **कार्थेजूनें** जरूर लागल्यास आणखीही रकमा ह्या राजाकडून काढावयाच्या. ह्यामुळें बरेच मांडलिक राजे **कार्थेजूचें** होईल तितकें नुकसान करीत असत व जुळेल तेव्हां **कार्थेजूवर** शस्त्रही धरीत असत. **इंग्रजाची** खंडणी बहुधा इतकी जबर नसते व कधीं जबर असली तर तो घेण्याचा प्रकार युक्तीचा असतो. ते मांडलिक संस्थानालाच अशा पेचांत आणून सोडतात कीं त्यास नाहीं म्हणण्यास जडच जावें.

आणखी एक असा भेद आहे कीं कार्थेज् नेहेमीं लढाईला वेतन देऊन हंगामी पगारदार शिपाई आणीत असे. जवळ पैसा असला म्हणजे कोणत्याही देशचे शिपाई शूर वीर असले तर लढण्यास कां आणूं नयेत हा प्रश्न सहजच मनांत उत्पन्न होतो. सकृद्दर्शनीं असें वाटतें कीं आपल्या देशाच्या लोकांवर लढण्याची पाळी न येतां परस्पर परक्या शिपायांवर भागलें तर फारच चांगलें. पण सकृद्दर्शनीं हें जितकें सुखप्रद वाटतें तितकेंच परिणामीं कष्टप्रद होतें व **कार्थेज्**ला जे कष्ट सोसावे लागले त्याजवरून हें अगदीं स्पष्ट झालें आहे. **ग्रोट** साहेबांनीं या शिपायांविषयीं असें ह्मटलें आहे "जो पक्ष घेऊन ते लढतात त्या पक्षाची आस्था त्यांस बिलकूल नसते; ज्या सरदाराच्या हाताखालीं ते काम करतात त्याविषयीं त्यांच्या मनांत फारच थोडी पूज्यबुद्धि वागते." बरोबरच आहे. असल्या शिपायांना फक्त मुशाहिऱ्याशीं काम त्यांनीं ऐन लढाईच्या वेळेस सुद्धां पक्ष बदलल्याचे दाखले आहेत. **हिमिल्को** सोडून गेल्याबरोबर त्याच्या हंगामी पगारदार शिपायांनीं **डायोनिअस्**ची नौकरी धरली. त्यांच्या बंडाचें उदाहरण तर स्पष्टच आहे. त्यांना पगार मिळाले नाहीं ह्मणून त्यांनीं बंड केलें; व **कार्थेज्**ची अगदीं उचलबांगडी करण्याचा घाट त्यांनीं घातला. त्यांतून त्याला **हामिलकार्**नें म्हणूनच वांचाविलें. खुद्द **कार्थेज्**चे शिपाई फार बलाढ्य होते खरे; पण त्यांची संख्या फार थोडी होती. ह्या हंगामी शिपायांच्या वहिवाटीनें **कार्थेज्**चें दुहेरी नुकसान होत असे. पैशापरी पैसा जात असे व खऱ्या कळकळीनें लढणारीं माणसेंही मिळत नसत.

खुद्द **कार्थेज्**चे शिपाईही त्याचे अमलाला शेवटीं शेवटीं राजी नव्हते. **आरिस्टाटल्**नें वर्णिल्याप्रमाणें जरी तेथील राज्यपद्धति फार चांगली होती तरी पण मुख्य सभेंत दुही माजल्यामुळें व अमल चालविणारे लोक लांच वगैरे खात असल्यामुळें ती पद्धति लोकांना फार त्रासदायक झाली होती. त्यांना कर फार द्यावे लागत असत. **हानिबाल्**नें **आफ्रिकें**त आपल्या हातांत राज्यसूत्रें घेतलीं तेव्हां निम्मे कर माफ करून बाकीच्यांत सर्व सुधारणा अम्मलांत आणून न्यायपद्धति वगैरे सर्व सुधारलें यावरून त्यापूर्वी तेथील अमलदार किती बिघडले असतील याची कल्पना वाचकांस होईलच.

कार्थेज्च्या व **इंग्रजां**च्या राज्यपद्धतींतील फरक थोडेबहुत वर दाखविले आहेत. त्याप्रमाणेंच आणखीही कितीएक आहेत यावरून असें ध्यानांत येईल

कीं इंग्रजांनीं पुढें सावधगिरीनें व अनुभवानें ज्या तजविजी केल्या त्यापूर्वी कार्थेजच्या हातून झाल्या असत्या तर त्यावर हा असा अनर्थ ओढवला नसता.

हें एथें सांगणें अवश्य आहे कीं ह्या पुस्तकांत जी सालाची संख्या दिली आहे ती इसवीसनापूर्वींची समजावयाची.

भाषांतरकर्ता.

अंतर्गत विषय.

पुस्तक १ लें.

दंतकथा आणि पूर्वेतिहास.

भाग पहिला.

भाग दुसरा.

पुस्तक २ रें.

कार्थेज् आणि ग्रीस्.

भाग पहिला.

भाग दुसरा.

भाग तिसरा.

भाग चवथा.

भाग पांचवा.

भाग सहावा.

पुस्तक ३ रें.

कार्थेज्ची अंतःस्थिति.

भाग पहिला.

भाग दुसरा.

भाग तिसरा.

पुस्तक ४ थें.

कार्थेज् आणि रोम्.

भाग पहिला.

भाग दुसरा.

भाग तिसरा.

भाग चवथा.

भाग पांचवा.

भाग सहावा.

भाग सातवा.

भाग आठवा.

भाग नववा.

भाग दहावा.

भाग अकरावा.

भाग बारावा.

भाग तेरावा.

भाग चौदावा.

भाग पंधरावा.

भाग सोळावा.

भाग सतरावा.

पुस्तक १ लें.

दंतकथा आणि पूर्वेतिहास.

भाग पहिला.

डायडोची दंतकथा.

भाग दुसरा.

कार्थेज्चा उत्कर्ष.

[दुःखाची गोष्ट ही कीं आपल्याला ह्या वेळच्या इतिहासा संबंधानें कांहीं एक माहिती नाहीं; आणि जी थोडी माहिती आहे त्याची देखील सालवार माहिती तर मुळींच नाहीं. ह्या काळचे मुख्य आधारग्रंथ म्हटले ह्मणजे **जस्टिन्** आणि **पालिबिअस्. जस्टिनचा** काळ आपणास मुळींच ठाऊक नाहीं; त्यानें **ट्रोगस् पाम्पीअस्** (८५-१५)च्या ग्रंथाचें सार काढलें आहे. आणि **पालिबिअस्**नें **कार्थेज्** आणि **रोम्**मध्यें झालेल्या तहाच्या शर्ती दिल्या आहेत. **पालिबिअस्**विषयीं आपणास पुनः लिहावयाचें आहे.]

कार्थेज्

पुस्तक पहिलें.

भाग पहिला.

"डायडोची दंतकथा."

टायरचा राजा **म्यालगर्नस्** मेला तेव्हां त्याच्या पाठीमागें काय तीं दोन मुलें होतीं; एक **पिग्मेलियन्** नांवाचा मुलगा आणि दुसरी **एलिसा** अथवा **डायडो** नांवाची मुलगी. **एलिसा** ही स्वरूपानें फार सुंदर होती. **पिग्मेलिअन्** जरी वयानें अगदीं लहान होता तरी त्याला **टायर**च्या लोकांनीं आपला राजा केला आणि **एलिसेनें** आपला मामा **आसर्बस्** ह्याशीं लग्न लाविलें. हा **आसर्बस् हर्क्युलिस्** देवाचा पुजारी (महंत) होता. **टायर**च्या राज्यांत त्या **हर्क्युलिस्**च्या महंताचा मान फार असे. त्याचा दर्जा राजाच्या खालोखाल असे. त्याच्यापाशीं विपुल द्रव्य होतें. तें दडवून ठेवण्याविषयीं तो फार यत्न करी. राजा त्या द्रव्याचा अपहार करील अशी भीति त्याला होती ह्मणून तो तें घरांत देखील वरती ठेवीत नसे; तर जमिनींत पुरून ठेवी. तरीपण शेवटीं ही गोष्ट सगळ्यांला ठाऊक झाली. **पिग्मे-**

लिअन् राजाला त्या द्रव्याविषयीं फार लोभ सुटला. त्यानें त्याला अगदीं घेरलें. निरर्थक लोकांचा जीव घेणें हें मनुष्यस्वभावाला अगदींच उचित नाहीं, तसेंच **आसर्बस्** हा आपला निकट संबंधी आहे हें कांहीं एक त्याला दिसलें नाहीं. त्यानें त्याला ठार केला. वास्तविक पाहतां तो त्याचा स्वतःचा मामा आणि त्याच्या बहिणीचा प्रत्यक्ष नवरा पण धनलोभापुढें त्याला कांहींच दिसलें नाहीं. ह्यामुळें **एलिसे**नें आपल्या भावाचें तोंड सुद्धां कितीएक दिवस पाहिलें नाहीं. पण शेवटीं तिनें प्रसन्न मुद्रा धारण करून आपल्या भावाशीं समेट केला. तिचें असें वागण्याचें कारण तिचा द्वेष कांहीं कमी झाला होता असें नाहीं; तर आपण त्याचें राज्य सोडून जावें असें तिच्या मनांत होतें; ह्या तिच्या संकेतास पुष्कळ सरदार साहाय होत. तेही असेच ह्याला कंटाळून गेले होते. हा बेत मनांत राखून ती एक दिवस **पिग्मेलिअन्**ला म्हणाली, 'दादा, आजवर मीं पुष्कळ दुःखें सोशिलीं आतां मला आपली तुझ्या घरांत येऊन राहूं दे, म्हणजे कांहीं थोडा तरी दुःखाचा विसर पडल्यास पडेल.' राजाला ही गोष्ट फार मानवली; कारण त्याला वाटलें कीं, बहिणीबरोबर **आसर्बस्**ची सर्व संपत्ति ही आपल्याकडेसच येईल. पण त्यानें जेव्हां तिची सर्व चीजवस्त आणण्यास आपले नोकर पाठविले तेव्हां तिनें त्यांना आपणाकडे वळवून घेतलें व तेही पळून जाण्यास सिद्ध झाले. अशा युक्तीनें तिनें आपली सर्व संपत्ति जहाजावर चढविली; आपल्याला अनुकूल असे जे शहरचे लोक त्यांना बरोबर घेतले; आणि आधीं **हर्क्युलिस्** देवाचें होमहवन यथाविधि करून मग ती तेथून निघाली. ती पहिल्यांदा **सायप्रस्** बेटावर गेली. तेथील **जुपिटर**चा महंत देवादिकांकडून झालेल्या पूर्व सूचनेवरून तीस म्हणाला 'मला आणि माझ्या संततीला महंताचा निरंतरचा अधिकार मिळेल तर मी या महत्कृत्यांत आपणास साह्य करतों.' आपल्या बरोबर जे पुरुष होते त्यांचीं लग्नें करण्यासाठीं तिणें त्या बेटांतून पुष्कळ कुमारिकाही धरून नेल्या. इकडे **पिग्मेलिअन्**ला आपली बहीण गेल्याचें समजलें तेव्हां त्याला अतिशय क्रोध आला आणि त्यानें कदाचित् तिचा पाठलाग करून तिला ठार सुद्धां केली असती. पण आईच्या विनवण्या ऐकून आणि देवादिकांच्या क्रोधाची भीति वाटून त्यानें तसें न करितां तिला जाऊं दिली. भविष्यवादी लोकांनीं तर असें भाकित राजास कळविलें होतें कीं, 'हे राजा ही स्त्री ज्या नगराची स्थापना करणार तें शहर सर्व जगतीतलावर निःसंशय फार भाग्यवान् होणार असून त्याला तूं हरकत करशील तर तें तुला फार जड जाईल.'

नंतर **एलिसा** राणी **आफ्रिकें**त गेली. त्या भागाचे लोक परकीयांशीं बऱ्या तऱ्हेनें वागतात व त्यांना क्रयविक्रयाची विशेष हौस आहे असें पाहून तिनें त्यांच्यापासून कांहीं करारानें एका बैलाच्या कातड्या इतकी जागा विकत घेतली. जलप्रवासानें अगदीं थकून गेलेल्या आपल्या लोकांस विश्रांति घेण्यास ही जागा तिला पाहिजे होती. करारांत लिहिलेल्या बैलाच्या कातड्याचे तिनें अरुंद तुकडे केले आणि ह्या युक्तीनें अधीक जमीन लाटली. पुढें ह्या जागेला '**बिर्सा**' असें म्हणत असत. '**बिर्सा**' ह्या शब्दाचा अर्थ कातडें असा सांगतात.

ह्या ठिकाणीं विक्रीकरितां माल आणणारे त्या देशचे बरेच लोक येऊन राहिले आणि थोड्या वेळांत बरेंच मोठें शहर तेथें वसलें. **टायर**च्या लोकांनीं ह्याच्यापूर्वीं स्थापिलेलें जें **युटिका** शहर तेथील रहिवाशांनीं आपला पूर्वसंबंध दाखविण्याकरितां आणि आपल्याकडेसच ह्या नव्या लोकांना राहण्याची प्रार्थना करण्याकरितां वकील पाठविले. पण त्याठिकाणच्या रानटी लोकांच्या मनांत ह्यांनीं आपणांस सोडून जावें असें नव्हतें. शेवटीं सर्वानुमतें एक सुंदर शहर बांधविण्याचें ठरलें. बांधणारांनीं त्या शहराला **कार्थेज्** असें नांव दिलें. जागेचें भाडें म्हणून अमूक एक रक्कम वर्षाची देण्याचें **एलिसा** आणि मूळचे लोक ह्या दोघांत ठरलें. प्रथम जेथें शहराचा पाया घालण्याचा त्यांनीं निश्चय केला त्याठिकाणीं बैलाचें डोकें सांपडलें. ह्या शकुनाचा भविष्यवादी लोकांनीं असा अर्थ केला कीं, 'ही जमीन मोठी सुपीक निघेल. पण ती तयार करण्यास मेहेनत फार पडेल आणि ह्याठिकाणीं ज्या शहराची स्थापना होईल तें शहर नेहमीं दास्यत्वांत राहील.' तेव्हां अर्थातच ती जागा बदलण्यांत आली आणि दुसरीकडे पाया खणण्याचा निश्चय झाला. तेथें खणतांना एक घोड्याचें डोकें सांपडलें. त्याचा अर्थ त्या लोकांनीं असा सांगितला कीं, 'ह्या ठिकाणचें राष्ट्र मोठें बलाढ्य होईल व मोठमोठ्या लढाया जिंकील; असल्या ठिकाणीं घातलेला पाया हें जयाचें सूचक होय.'

हें सर्व झाल्यावर तें शहर मोठ्या भरभराटीस आलें आणि **एलिसा** राणीच्या सौंदर्याची कीर्तीही चहूंकडे पसरली (ती खरोखरच फार सुंदर होती). ती ऐकून **मूर** लोकांचा राजा **इयर्बस्** यानें **कार्थेज्**च्या मोठमोठ्या सरदारांस बोलावूं पाठविलें. ते आल्यावर तो त्यांस म्हणाला कीं, 'राणीकडे परत जा आणि तिला सांगा कीं, मी तिची मागणी करतों. जर ती त्यास कबूल नसेल तर मी तिच्याशीं लढाई करीन आणि तिचें शहर जिंकून घेईन.' राणीला हें

स्पष्ट कळविण्यास त्यांना भीति वाटल्यामुळें त्यांनीं एक लबाडीची युक्ति काढली. त्यांनीं तिला असें सांगितलें कीं, 'आपल्या लोकांना सौम्य वर्तणूक शिकवील असा कोणींतरी आपल्याइकडील माणूस राजा **इयर्बस्** मागत आहे. पण आपलें घर-दार आणि मायेचीं माणसें सोडून त्या पशुतुल्य रानटी लोकांत जाऊन राहण्यास कोण बरें तयार होईल?' राणीनें त्यांची निर्भत्सना करून त्यांस म्हटलें कीं, 'आपल्या देशाचें जर हित होत आहे तर त्यासाठीं कोणतेही कष्ट पडले तरी ते सोसण्यास दरएक माणूस तयार असलें पाहिजे, कोणीही नाकबूल असूं नये. त्यानें जरूर पडल्यास जीव सुद्धां वेंचण्यास सिद्ध असलें पाहिजे.' तेव्हां ते म्हणाले कीं, 'हे राणी तुझ्या तोंडानेंच न्याय झाला म्हणून बरें झालें. जर तुझ्या मनांत देशाचें हित करण्याचें असेल, तर जें तूं लोकांना करण्यास सांगतेस तें स्वतःच कर म्हणजे झालें.' त्या युक्तीनें ती पेंचांत आली खरी. पण जेव्हां तिला तें समजलें तेव्हां आपला नवरा **आसर्बस्** ह्याच्या नांवानें रडून रडून तिनें आकांत केला व पुष्कळ रीतीनें शोक केला आणि शपथपूर्वक त्यांना कळविलें कीं, 'ईश्वराच्या इच्छेनें जो प्रसंग मजवर आला आहे तो मी सहन करण्यास तयार आहें. पण मला एक तीन महिन्यांची मुदत द्या म्हणजे त्या अवधींत मी आपल्या पूर्वस्थितीचा शोक पूर्ण करून घेईन.' ती मुदत मिळाल्यावर शहरांतल्या अगदीं एका दूरच्या भागांत तिनें एक मोठी चिता तयार करविली. दुसरा नवरा वरण्यापूर्वीं पहिला नवरा जो **आसर्बस्** त्याच्या आत्म्याची तृप्ति करण्यासाठीं आणि मृतांना पशूंचें हवन अर्पण करण्यासाठीं म्हणून ही मोठी चिता तिनें करविली होती. बकऱ्यांचे आणि बैलांचे प्रथम पुष्कळ बळी देऊन आपण स्वतः एक तलवार हातांत घेऊन ती त्या चितेवर चढली; नंतर चितेसभोंवतीं जे लोक जमले होते, त्यांकडे दृष्टि फेंकून ती म्हणाली, 'तुम्ही मला नवऱ्याकडेस जाण्यास सांगतां! ही पहा मी चाललें!' असें म्हणून तिनें आपल्या काळजांत तरवार भोंसकून जीव दिला.

कार्थेज्च्या संबंधाची ही दंतकथा **व्हर्जिल्** कवीनें **ईनियड** नांवाचें काव्य लिहिलें तेव्हां त्यास माहीत होती. हीच मूळ धरून त्यानें आपल्या काव्याला साजेल अशा तऱ्हेचे फेरफार त्यांत केले, ते इतके कीं त्यामुळें तिला निराळेंच स्वरूप आलें. **व्हर्जिल्**च्या कथानकाचा सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

"**रोम** शहराची स्थापना करण्याकरितां **ट्रॉय**च्या कत्तलींतून देवांनीं वांचविलेला **ईनिअस्** भटकत भटकत **सिसिली** बेटांत आला आणि तेथून त्याला

नेमून दिलेली जागा जी **इटली** तिकडे जाण्यास गलबतांत बसला. पण इकडे काय झालें कीं **ट्राय**च्या लोकांविषयींचा जिचा क्रोधाग्नि अद्यापि शांत झाला नव्हता अशी जी **जूनो** देवता तिनें समुद्रांत एक मोठें तुफान उत्पन्न केलें, त्यांत याचें आरमार सांपडून तें सर्व जिकडेतिकडे अस्ताव्यस्त झालें. त्यांत कित्येक जहाजें तर अजी समुद्रांतच बुडालीं आणि कित्येक **एलिसा** अथवा **डायडो** इनें नुकतेंच स्थापलेल्या **कार्थेज्**च्या आसपास **आफ्रिके**च्या किनाऱ्यास लागलीं, तेथें **ईनिअस्** आणि त्याच्या बरोबरचे लोक ह्यांचें **एलिसे**नें फार चांगलें आदरातिथ्य केलें, पण त्याची आई **व्हीनस्** हिची तेवढ्यानें तृप्ति झाली नाहीं. कारण तिनें मनांत विचार केला कीं कदाचित् राणी आणि तिची प्रजा ह्यांचीं मनें फिरतील आणि ते माझ्या मुलाला आणि **ट्रायच्या** लोकांना अपाय करतील; तेव्हां ह्याला एक युक्ति काढली पाहिजे. असें ह्मणून तिनें खालील युक्ति रचली. आपला मुलगा **क्युपिड्** यास **ईनिअस्**चा धाकटा मुलगा जो **अस्केनिअस्** त्याचें स्वरूप धारण करण्यास सांगितलें आणि खऱ्या **अस्केनिअस्**ला तिनें **सायप्रस्** येथें आपल्या मंदिरांत नेलें आणि तेथें त्याला निजविलें. इकडे काय झालें कीं राणी **ईनिअस्**ला एक मोठी मेजवानी देत होती आणि त्या मेजवानींत तो **ट्राय**च्या नाशाचा आणि आपल्या भटकण्याचा इतिहास सांगत होता. इतक्यांतच त्या खोट्या **अस्केनिअस्**नें राणीच्या घोळांत जाऊन बसून तिच्या हृदयांत प्रीतीचा संचार केला. पुढें **जूनो** देवता **व्हीनस्**कडे आली आणि ह्मणाली कीं,—"तुझ्या माझ्यामध्यें वैर कशाला पाहिजे? मला **कार्थेज्**चे लोक प्रिय आहेत आणि तुला **ट्राय**चेही तसेच आहेत. तेव्हां ह्या दोघांनीं एकाच शहरांत राहावें अशा तऱ्हेनें जुळवूं या. याला **एलिसा** आणि **ईनिअस्** ह्यांचें लग्न लागल्यास फार बरें" ह्या तिच्या म्हणण्याला **व्हीनस्**नें रुकार दिला आणि तसें करण्याचा घाटही ठरला.

पण **ईनिअस्**ला जें महत्कार्य करण्याकरितां वांचविलें होतें तें त्यानें अशा रीतीनें विसरावें हें **ज्युपिटर**ला आवडलें नाहीं, तेव्हां त्यानें आपला जासूद **मरक्युरी** याला बोलावून आणलें आणि सांगितलें, "**ट्रोजन्** सरदाराकडे जा, तो तेथें **कार्थेज्**कडे फुकट वेळ गमावीत बसला आहे, तो आपलें **रोम** शहर स्थापण्याचें काम अगदीं विसरला आहे. त्याला सांग कीं त्यानें एकदम तेथून निघण्याची तयारी केली पाहिजे." **मरक्युरीनें** तो निरोप **ईनिअस्**ला येऊन सांगितला. देवादिकांची इच्छा आपण निघावें अशी आहे असें त्याला समजल्या-

बरोबर त्यानें आपल्या परिजनास एकदम निघण्याची तयारी करण्यास सांगितलें. ती सर्व तयारी झाली; निघण्याची वेळ अगदीं समीप येऊन ठेपली. **ईनिअस्** तेथून निघण्याला अगदीं नाखुष होता. पण देवादिकांच्या मर्जीपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें जाणून तो शेवटीं कसा तरी निघाला. **ईनिअस्** गेला असें जेव्हां **डायडो**नें पाहिलें तेव्हां एक लांकडाची मोठी थोरली चिता तिनें तयार करविली आणि तिच्यावर चढून **ईनिअस्** जी तरवार खोलींत विसरून गेला होता त्याच्च तरवारीनें आपला आपण अंत केला."

भाग दुसरा.

कार्थेज्चा उत्कर्ष.

मागें सांगितलेंच आहे कीं **एलिसा** अथवा **डायडो** इची दंतकथा **व्हर्जिल्**नें वाटेल तशी आपल्या काव्याला बरी दिसण्यासाठीं बदलली. त्याचे फेरफार अगदीं महत्त्वाच्या व मुद्याच्या भागांतच होते. **कार्थेज्**ची राणी आणि **ट्रॉय**चा महापुरुष हे त्यानें आपल्या काव्यांत समकालीन केले आहेत. पण त्या दोघांमध्यें निदान तरी दोनशें वर्षांचें अंतर आहे. **ईनिअड**मध्यें सांगितलें आहे कीं **अस्कॅनिअस्** हा **आल्बा**ची स्थापना करणार होता. तें **आल्बा**चें राज्य तीनशें वर्षेपर्यंत चालणार होतें. **मार्स्**पासून **वेस्टा**च्या पूजारिणीला मुलगा होईपर्यंत त्या संस्थानाची मुदत होती. कारण तो मुलगा **रोम** शहराची स्थापना करणार होता. यावरून **ईनिअस्** **इटलींत** येऊन **रोम** शहराची स्थापना होण्यास सुमारें तीनशें वर्षांचें अंतर असावें. पण हेंहीं सर्वानुमतें ठरलेलेंच आहे कीं **कार्थेज् रोम**हून शंभर वर्षांपेक्षां अधिक जुनें नाहीं.

पूर्वभागांत सांगितलेली दंतकथा ज्याच्या ग्रंथावरून घेतली आहे त्या **जस्टिन्**वर जर कांहीं विश्वास ठेवणें असेल तर **कार्थेज्**ची स्थापना इ. स. पूर्वीं आठशें पन्नासाच्या आंतबाहेर झाली असावी.

दंतकथेवरून पाहतां **कार्थेज्**ची स्थापना करणारे लोक **टायर**हून आले, व ही गोष्ट बहुतकरून खरी आहे. एवढें मात्र खातरीनें सांगतां येईल कीं, हे लोक **फिनिशीअन्** राज्यांतील होते आणि **फिनिशिअन्** लोकांची राज-

धानी **टायर** शहर होतें. हे **फिनिशिअन्** लोक **भूमध्यसमुद्राच्या** किनाऱ्याच्या आग्नेयदिशेस जो **पालेस्टाईन** नांवाचा जमीनीचा लहानसा भाग आहे, त्यांत राहत असत. ह्यांच्याच जातीचे पण आंतील बाजूस राहणाऱ्या लोकांना **बायबल्**च्या इतिहासांत **क्याननाईट्स्** म्हणत असत. **ख्रिस्ति**शकाच्या सुमारें चवदाशें वर्षांपूर्वी **इजिप्त**मधून मुक्त जाहल्यावर **हिब्रू** लोकांनीं त्यांचा पुष्कळ वेळ पराभव केला आणि बहुतेक समूळ नाश केला असें म्हटलें तरी चालेल. पण किनाऱ्यावरचे लोक कांहीं जिंकले गेले नव्हते. दक्षिणेंत **फिलिस्टाईन्** लोक राहत असत. त्यांचीं पांच शहरें* तर सुप्रसिद्ध आहेत. ते नेहमी त्यांचे शेजारील **हिब्रू** लोकांशीं तंटेबखेडे करीत असत; कधीं कधीं त्यांना जिंकीत असत व कधीं कधीं म्हणजे **डेविड** आणि **सालोमन** यांच्या कारकिर्दीत खंडणीही देत असत. उत्तरेच्या बाजूस **टायर** आणि **सिडन्** हीं मोठीं शहरें होतीं. ह्यांचें बहुतकरून **हिब्रू** लोकांशीं सख्य असे. ते (**फिनिशियन्स्**) मोठे दर्यावर्दी व उत्तम व्यापारी लोक असत. त्यांना धान्य वगैरे परदेशांतून आणावें लागत असे, कारण त्यांना शेतंभातें करण्याची इच्छा नसे किंवा तीं त्यांस करतां येत नसत. ते धान्याच्या मोबदला आपल्या हस्तकौशल्याच्या व कसबाच्या जिनसा देत असत. **लेबनॉन्**च्या अरण्यांतील सिडरचें चांगलें इमारती लांकूड अथवा लोखंड आणि कांसें यांच्यावर केलेलें काम, उंची जांभळे रंग अथवा त्यांनीं स्वतः अन्य देशांतून आणलेलें सामान हे त्यांच्या मोबदल्याचे पदार्थ होत. ते व्यापारासाठीं फार दूर प्रदेशीं जात असत. क्रयविक्रयासाठीं नव्या नव्या बाजारांचा शोध करतांना ते बरेच भाग शोधून काढीत असत. कित्येकांच्या सांगण्यांत ते **केप् ऑफ् गुड् होप्**पर्यंत गेले होते. पण **सिअरालिओन**पर्यंत तर ते लोक खात्रीनें गेले होते. उत्तर दिशेस ते **ब्रिटन्**पावेतों जात असत असें वाटतें कारण ते तेथून जस्त आणि तांबें आणीत असत. ह्याविषयीं पुढें एका भागांत लिहावयाचेंच आहे. पण त्यांचा नेहमीचा व्यापार म्हटला म्हणजे **भूमध्यसमुद्राच्या** किनाऱ्यावरील व्यापाऱ्यांशीं होत असे. त्या किनाऱ्याशीं त्यांची नेहमीं येजा असे. त्यांनीं आपल्या व्यापाराच्या वखारी ठिकठिकाणीं स्थापन केल्या होत्या. ह्यांतल्याच एका अति मोठ्या ठिकाणाविषयीं आतां सांगावयाचें आहे.

कार्थेज्—ल्याटिन् कार्थेगो—ग्रीक् कार्चेडोन् यांत कर्जथ् या शब्दाचा

* **आशडाड, अस्केलान, गाझा, गाथ, इक्रॉन** हीं वरील शहरें होत.

कोणत्या तरी रूपानें समावेश होतो. **बायबल्**मध्यें कर्जथ् हा शब्द कर्जथ् अर्बा कर्जथ् जिरिम् इत्यादि शब्दांत दिसण्यांत येतो आणि **कार्थेज्** हें तेथील रहिवाशांना कर्जथ् हाडिश्वथ् या नांवानें ठाऊक होतें. त्याचा अर्थ ' नवें शहर ' असा आहे. नवें म्हणण्याचें कारण जुन्या **टायर** शहराहून तें भिन्न आहे असें दाखविण्याकरितां अथवा ह्या नव्या शहराच्या पूर्वी सुमारें तीनशें वर्षें स्थापन झालेल्या अगदीं जवळच्या नैर्ऋत्यबाजूस पंधरा एक मैलांवर असणाऱ्या **युटिका** शहराहून तें भिन्न आहे असें दाखविण्याकरितां असेल असें वाटतें.

न्युटाउन अथवा नवें शहर हें एका लहानशा उपसागराचे किनाऱ्यावर बांधलें होतें. स्वभावतःच तें अति विस्तीर्ण आणि सुंदर बंदर होतें. सगळ्या **आफ्रिके**च्या उत्तरेच्या किनाऱ्यावर असलें चांगलें बंदर दुसरें एकही नव्हतें. हल्लीं ह्या उपसागराला **ट्युनिस**चा उपसागर म्हणतात. कर्मधर्मसंयोगानें ती जागा फार चांगली अशी शोधली गेली होती. **बेग्रेडास्** सध्यां जिला **मेजेर्डा** म्हणतात ती नदी अगदीं जवळ होती. तेथील जमिनीला पाण्याचा पुरवठा भरपूर होता आणि जमीनही जात्या फार सुपीक होती. तेथें धान्य, दारू आणि तेल ह्यांची अगदीं विपुलता असे. त्याचा अगदीं समूळ नाश झाल्यावर सुद्धां दोनच शतकांत राष्ट्रांतील तें तिसरें शहर होऊन बसलें हेंच त्याच्या स्वाभाविक संपत्तिमत्तेचें मुख्य प्रमाण होय. आणि सध्याचें शहर सुद्धां **महमदन** शहरांत अतिशय विस्तीर्ण आणि मोठ्या भरभराटीचें आहे.

शहराच्या पूर्व इतिहासाविषयीं आपल्यास अगदींच थोडी माहिती आहे; किंबहुना कांहीं नाहीं म्हटलें तर सुद्धां चालेल. पहिलीं दोन शतकें तर अगदींच शून्य. ह्या अवधींतील **कार्थेज्** आणि त्याच्या खटपटी ह्याविषयीं आपणांस कांहींच माहिती नाहीं. एवढें फक्त सांगतां येतें, कीं त्यांचा व्यापार मोठ्या जारीनें सुरू होता; आणि ते मधून मधून **आफ्रिके**च्या किनाऱ्याचे लोक, **स्पेन** आणि **सिसिली**चे लोक आणि आपल्या शेजारचीं संस्थानें यांशीं लढाया करीत असत. सहाव्या शतकाचे मध्याचे सुमारास कोणी **माल्कस्** नांवाचा राजा अथवा मुख्य सरदार ऐकण्यांत येतो. **माल्कस्** यानें भोंवतालच्या **आफ्रिकन्** जातींशीं लढाया करून त्यांना जिंकलें. **आफ्रिकें**तून तो **सिसिलीं**त आला; **सिसिली**चाही कांहीं भाग त्यानें जिंकला. हा बहुत करून पश्चिमभाग असावा; तेथून तो **सार्डिनिआ**कडे गेला. तेथें त्याचा एका मोठ्या लढाईत अगदीं मोड झाला. **कार्थेजिनिअन्** लोक जे बहुधा आपल्या पराभव पावलेल्या सर-

2

दारांस फार निर्दयणानें व अन्यायानें वागवीत असत त्यांनीं त्याला एकदम हद्दपार करण्याची शिक्षा दिली. त्यानें ही शिक्षा न जुमानतां आपली फौज आपल्याच देशावर घातली. शहरच्या अधिकाऱ्यांनीं त्याचा मुलगा **कारथालो** याला मध्यस्थी करण्यास पाठविलें. पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. **माल्कस्**नें आपल्या मुलाला पकडलें आणि त्याच्या आंगांत खिळे ठोकून शहरकोटाच्या समोर त्याचा प्राण घेतला. कांहीं वेळानें शहराला हार खाऊन त्याच्या हस्तगत व्हावें लागलें. त्यानें फक्त आपल्या मुख्य शत्रूंपैकीं दहा असामी मारले आणि शहर सोडून दिलें. ज्या लोकांना त्यानें वांचविलें त्यांनीं त्याच्यावर आरोप ठेऊन चौकशी करण्यास सोडलें नाहीं, व चौकशी केली एव-ढेंच नव्हे तर त्याला फांशीची शिक्षा दिली.

माल्कस् नंतर **म्यागो** आला. त्यानें राज्याची फौज आणि सत्ता बरीच वाढविली. त्याचें राज्य अथवा अधिकार (कारण कांहींवेळ **कार्थेज्**मध्यें 'राजा' होता. पण तो केव्हां होता हें सांगणें फार जड आहे. शेवटपर्यंत हा किताब शहरचा मुख्य न्यायाधिकारी यास देत असत.) ख्रिस्तीशकापूर्वी सहाव्या शत-काच्या अखेरच्या भागांत होता आणि ह्यावेळेपासून देशाची थोडीबहूत जुळून माहिती सांगतां येते. **एशियामायनर** मधील **ग्रीक** लोकांच्या ताब्यां-तील संस्थानें **पर्शिअन्** लोकांनीं घेतलीं, तेव्हां त्यांच्या अमलाला कंटाळून **फोशिआ**चे रहिवाशी यांनीं जुलूम सोसण्यापेक्षां देश सोडून जाण्याचें पत्करिलें. त्यांनीं जातांना एक लोखंडाचा गोळा घेऊन समुद्रांत टाकला आणि अशी शपथ घेतली कीं, तो गोळा वर येई पावेतों कधींही देशाचें तोंड पाहवायाचें नाहीं. पण त्यांना जाऊन फार दिवस झाले नाहींत तोंच त्यांची घराविषयींची उत्कंठा शपथेहून अधिक प्रबळ झाल्यामुळें त्यांतून अर्धे अधिक लोक परत आले. बाकीच्या लोकांनीं आपल्या बायकापोरांसहित तसाच प्रवास चालविला. व **कार्सिका** बेटांतील **अलेलिआ** प्रांतांत येऊन राहिले. **ग्रीक** लोकांनीं अगोदरच त्या ठिकाणीं वसाहती केल्या होत्या. त्यांनीं तेथें चांचेपणाचा धंदा चालविला. हा धंदा तेव्हां सध्यां इतका नीच समजला जात नव्हता. पांच वर्षांनंतर ज्यांचें त्यावेळीं स्वतंत्र व बलाढ्य राष्ट्र होतें असे **रोम**च्या जवळच उत्तरेच्या बाजूस राहणारे **एट्रूस्कन्स्** आणि **कार्थेजिनियन्स्** यांनीं मिळून त्यांच्या विरुद्ध कट केला. एक मोठी थोरली समुद्रावरची लढाई झाली. **फोशिअन्** लोकांचीं सगळीं साठ जहाजें होतीं. तेवढींच त्यांनीं जेव्हां ते निघाले तेव्हां

बरोबर आणिलीं होतीं. शत्रूंचीं दोघांचीं मिळून सुमारें ह्याच्या दुप्पट होतीं; अर्धीं **कार्थेज**हून आलीं होतीं व अर्धीं **एट्रूस्कन्** लोकांच्या बंदरांतून आलीं होतीं. लढाईंत **ग्रीक** लोकांचा जय झाला. पण तो जय झाला आणि न झाला सारखाच. कारण, त्यांच्या साठ जहाजांपैकीं चाळीस जहाजें गेलीं आणि त्यामुळें त्यांना हें ठिकाण सोडून देऊन दुसरीकडे विश्रांतिस्थान पाहण्याचें भाग पडलें. ही लढाई ख्रिस्तीशकापूर्वीं ५३६ सालीं झाली; पुढें सत्तावीस वर्षांनंतर पुन: **कार्थेज्**चें नांव ऐकण्यांत येतें. **पोलिबिअस्** ह्मणतो कीं **रोम** शहरीं **कार्थेज्** आणि **रोम** यांच्यामध्यें जाहलेल्या तीन तहांच्या निरनिराळ्या प्रती आपण-स्वत: पाहिल्या होत्या. ह्यांतील सर्वांत जुनी ती इतक्या विचित्र भाषेंत लिहिली होती कीं, मोठ्या विद्वानांना सुद्धां तिची भाषा मुळींच समजत नव्हती. तो तह ५०९ सालीं जाहला. त्या तहाच्या जरा अगोदर **रोम**मधून राजांना हाकून दिलें होतें. ह्या तहाच्या शर्ती मोठ्या विचित्र होत्या "**रोमन्स** किंवा त्यांच्याशीं स्नेहभा-वानें असणाऱ्यांपैकीं कोणीही **फेअर प्रॉमॉन्टरी** पलीकडे जहाजें नेऊं नयेत". **लिटल् सर्टिस्** ह्मणून जो एक अगदीं सोन्याच्या तुकड्यासारखा अतिश्रीमान् प्रदेश होता आणि त्यासाठीं ज्याला पेठ अशी संज्ञा होती, (सध्यांचें **गल्फ् आफ् केबास्**) तिकडे दक्षिणेच्या बाजूस **रोमन** लोकांनीं जाऊं नये ह्मणूनही शर्त घातली होती, असें **पोलिबिअस**चें ह्मणणें आहे. पण **रोमन** लोकांनीं '**फेअर प्रोमान्टरी**च्या पश्चिमेच्या बाजूस जाऊं नये आणि **कार्थे-जिनिअन्** लोकांकडेसच सगळा **स्पेन** देशाचा व्यापार राहावा ह्मणून ही शर्त घातली होती असें विशेष संभवनीय दिसतें. "**सार्डिनिआंत** आणि **आफ्रि-केंत** माल विकणाऱ्यांना नोंदणी करणारा आणि दवंडी पिटणारा यांस जे पैसे द्यावे लागतील त्याशिवाय इतर कांहीं दाण किंवा कर द्यावे लागणार नाहींत." ह्यावरून असें दिसतें कीं, येथपावेतों तरी **कार्थेजिनिअन्** लोक 'निष्प्रतिबंध व्यापारी' होते. शेवटचें कलम असें होतें कीं "**कार्थेजिनिअन्** लोकांनीं कोणत्याही **ल्याटिन** शहरास पीडा न करण्याविषयीं आपणास बांधून घ्यावें, मग तें **रोम**च्या ताब्यांत असो व नसो." कांहीं वर्षांनंतर—बाकी किती तें आपणास निश्चितपणें सांगतां येणार नाहीं—दुसरा एक तह झाल्याचें ऐकण्यांत येतें. ह्या तहाच्या शर्ती **रोमन** लोकांस अधिक प्रतिकूळ अशा होत्या. **फेअर प्रॉमॉन्टरी**शिवाय आणखी दोन हद्दी **रोमन** व्यापाऱ्यांना बांधून दिल्या होत्या. ह्या दुसऱ्या तहानें त्यांना **सार्डिनिआ** अथवा **आफ्रिका** ह्यांशीं व्यापार करण्याची

मनाई झाली. धान्याची तूट पडल्यास तें मिळविण्याकरितां अथवा जहाजांची डागडुजी करण्याकरितां फक्त त्यांनीं त्या देशांस जावें. इतर प्रसंगीं त्यांनीं त्या देशीं जाणें सुद्धां कामा नये. **सिसिली** आणि **कार्थेज्** हीं **रोम**च्या व्यापाऱ्यांना मोकळीं होतीं. **रोम**च्या ताब्याबाहेरील कोणत्याही **ल्याटिन** शहरांतून कैदी करण्यास आणि लूट नेण्यास **कार्थेज्**च्या लोकांना अधिकार राखिला होता; पण शहर कबज्यांत ठेवण्याचा अधिकार नव्हता. तें त्यांनीं लागलेंच परत दिलें पाहिजे होतें; पण ह्याचा अर्थ इतकाच, कीं **कार्थेज्**च्या लोकांना **इटलीं**त पाय शिरकावयास मिळूं नये. ह्या शेवटच्या तहावरून स्पष्ट होतें, कीं मध्यंतरीं **कार्थेज्**ची सत्ता वाढली आणि **रोम**ची कमी झाली. राजांना काढून लावल्यावर सुमारें शंभर वर्षांत **रोम**ची बरेच ठिकाणीं पिछेहाट झाली. हें **रोमन** इतिहासकारांच्या फुगवून लिहिलेल्या वृत्तांतावरून सुद्धां स्पष्ट दिसतें.

ह्यावरून **कार्थेज्**चीं संस्थानें आणि त्यांची सत्ता ह्यांविषयीं थोडासा तर्क बांधतां येतो. जरी आपल्या राजधानीच्या जागेबद्दल **कार्थेज्**ला भाडें द्यावें लागत असे तरीपण बहुतेक **आफ्रिके**चा किनारा त्याच्या ताब्यांत होता. **मेगो**चीं मुलें आणि त्याच्या पाठीमागून येणारे **हस्ड्रुबल** व **हामिल्कार** ह्यांच्या कारकीर्दींत हे भाड्याचे पैसे न दिल्याचें व त्यासाठीं **आफ्रिकन्** लोकांनीं लढाया केल्याचें आणि ते पैसे **कार्थेज्**ला द्यावयास लावल्याचें आपल्या ऐकण्यांत येतें. **सार्डिनिआ** तर पूर्णपणें त्याच्या सत्तेखालीं होतें. हें बेट वर सांगितलेल्या **हस्ड्रुबल** आणि **हामिल्कार** यांनीं मिळविलें. **हस्ड्रुबल** तें मिळवितां मिळवितां जखमा लागून मेला. **सिसिली**चा थोडासा भाग त्यांच्या ताब्यांत होता त्याविषयीं पुढें सांगण्यांत येणार आहे. **माल्टा** बहुतकरून त्यांचेंच होतें. **स्पेन** देश जो पुढें राज्याचा अति महत्त्वाचा भाग होऊन बसणार होता त्याचें बरीक ह्यावेळेस अगदीं नांव सुद्धां ऐकूं येत नाहीं. जेव्हां **कार्थेज्** आपली सत्ता आणि अधिकार सर्व बाजूनें वाढविण्यांत गुंग होतें तेव्हां पृथ्वीतलावर अतिबलाढ्य अशा एका राष्ट्राच्या तावडींत सापडतां सांपडतां तें राहिलें. **पर्शिआ**चा दुसरा राजा **क्यांम्बिसस** यानें ५२५ त **इजिप्त** घेतलें. तें घेण्यास त्याला मुळींच प्रयास पडले नाहींत तेव्हां अर्थातच तो दुसरे देश जिंकण्याचा विचार करूं लागला. **नाइल**च्या मुखाच्या पश्चिमेच्या बाजूस सुमारें पांचशें मैलांवर असणारीं **सायरीन्** आणि **बार्को** हीं मोठीं शहरें त्याच्या हस्तगत आपल्या आपण झालीं. तेव्हां त्याच्या मनांत विचार

आला कीं असेंच पश्चिमेच्या बाजूस जिंकीत जावें आणि **कार्थेज्**वर हल्ला करून तें आपल्या ताब्यांत घ्यावें; पण स्थलमार्गानें तें करणें अशक्य होतें. कारण दोन हजार मैलांचें अंतर त्याच्या फौजेला कसलें झेंपतें! तेव्हां अर्थातच तें आरमाराकडूनच झालें तर करावयाचें होतें; पण त्यांत त्याला अतिशय चमत्कारिक अडचण आली. आरमारांतील बहुतेक जहाजें **फिनिशियन्** लोकांचीं होतीं, आणि त्यांनीं मोहिमेवर येण्याचें नाकारलें. ते ह्मणाले 'आमच्या आणि **कार्थेजिनिअन्** लोकांच्या आणा शपथा झाल्या आहेत. तीं आमचींच मुलें लेंकरें आहेत तेव्हां त्याच्यावर चालून जाणें हें अगदीं दुष्टपणाचें कृत्य होणार आहे.' राजाला हें उत्तर निमूटपणें ऐकून घ्यावें लागलें व आपला सर्व व्यूह सोडून द्यावा लागला.

पुस्तक दुसरें.

कार्थेज् आणि ग्रीस

भाग १ ला.

हामिल्कार आणि हानिबाल.

भाग २ रा.

कार्थेज् आणि डायोनिसिअस् (४०६–४०५).

भाग ३ रा.

कार्थेज् आणि डायोनिसिअस् (३९७).

भाग ४ था.

डायोनिअस्शीं शेवटची झटपट.

भाग ५ वा.

कार्थेज् आणि टाय्मोलिअन्.

भाग ६ वा.

कार्थेज्, अगॉथॉक्लीस् आणि पिऱ्हस्.

[ख्रिस्ती शकाच्या आरंभीं झालेला **ग्रीक** ग्रंथकर्ता **डायडोरस सिक्युलस्** याचाच ग्रंथ या भागास मुख्यत्वेंकरून आधारभूत आहे. तो मूळ **सिसिलीचा** रहिवाशी होता. त्यानें आपल्या **सार्वत्रिक इतिहासांत** (ह्या ग्रंथास त्यानें '**इतिहाससंग्रह**' असें नांव दिलें होतें असें दिसतें.) जगाच्या आरंभापासून तों तहत आपल्या वेळेपावेतों इतिहास लिहिला आहे. हा ग्रंथ लिहिण्यासाठीं त्यानें अत्यंत परिश्रम केले. ज्या ज्या देशाचा ह्मणून इतिहास लिहावयाचा होता त्या त्या देशांत स्वतः सर्व ठिकाणीं जाऊन जेवढे जेवढे इतिहासाचे ग्रंथ उपलब्ध होते तेवढे गोळा केले. त्याच्या इतिहासाचा बहुतेक भाग नष्ट झालेला आहे, फक्त अकरापासून वीस पावेतों पुस्तकें मात्र उपलब्ध आहेत. त्याच्या स्वतःच्या जन्मभूमीच्या बेटाविषयीं त्याला अतिशय कळकळ स्वभावतःच होती ह्मणून त्यानें आपल्या ग्रंथाचा हा भाग तर विशेष काळजीपूर्वक लिहिलेला आहे व दुसऱ्या **पर्शिअन्** लढाईपासून ह्मणजे ४८० सालापासून ते ३०५ सालापावेतों त्यानें इतिहास लिहिला आहे. त्याजजवळ चांगला इतिहास लिहिण्याचीं अतिउत्तम साधनें तयार होतीं. त्याजजवळ **टायमिअसचा** ग्रंथ होता. त्यानें अगदीं आरंभापासून ते २६४ सालापावेतों इतिहास लिहिलेला आहे. (तो स्वतः २५६ सालीं आपल्या वयाचे ९६ व्या वर्षी मेला.) पण **डायडोरसला** आपल्या साधनांचा चांगल्या तऱ्हेनें उपयोग करून घेण्याइतकी बुद्धि नव्हती. तथापि आपल्या कथानकाच्या ह्या भागाला ह्या ग्रंथाचा अतिशयच उपयोग झालेला आहे. विसाव्या पुढच्या नष्ट झालेल्या पुस्तकांचेही कांहीं भाग जपून ठेवण्यांत आले आहेत. **जस्टिननें** ह्या प्रसंगाविषयीं कांहीं थोडें थोडें लिहिलेलें आहे. एकंदरीनें ह्या वेळची कथा लिहिण्यास आधारभूत माहिती बरीच विश्वसनीय आहे.]

पुस्तक दुसरें.

भाग पहिला.

हामिल्कार आणि हानिबाल्.

कार्थेज्नें आपला अंमल परराज्यावर बसविण्याचा संकल्प केला कीं लागलीच प्रथम **सिसिलीवर** चालून जावें हें अगदीं स्वाभाविक आहे. कारण **सिसिलीचा** अगदीं जवळचा जो भाग तो **कार्थेज्**हून सारा ५० मैल दूर होता. शिवाय तेथील जमीन फार सुपीक; तेथील हवा माफक; आणि तेथें व्यापाराच्या बऱ्याच मौल्यवान् जिनसांची पूर्ण विपुलता होती. मागें सांगितलेंच आहे कीं **रोम** आणि **कार्थेज्** ह्यांच्यामध्यें सहाव्या शतकाच्या अखेर जो तह झाला त्यांत **कार्थेज्**कडे **सिसिलीचा** कांहीं भाग रहावा असें होतें. त्यावेळीं ते मागत होते त्यापेक्षां तो एव्हां कमी होता असें वाटतें. सुमारें दोन शतकें **ग्रीक** लोक आपला अंमल सर्व देशांत फैलावीत चालले होते. ते **फिनिशिअन्** लोकांचे मोठे शत्रु होते. ते जरा व्यापारांत ह्यांच्याहून कमी होते एवढेंच काय तें. कारण **आथेन्स्**मध्यें आणि कांहीं अंशीं **कॉरिन्थ्**मध्यें सुद्धां व्यापाराला, **टायर** व **कार्थेज्** यांत जो मान असे त्याहून फार कमी असे. पण ते ह्यांच्याहून कमी चतुर आणि कमी शूर खलाशी होते असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. **ग्रीक**चें अगदीं पहिलें **सिसिलीं**तील संस्थान म्हटलें म्हणजे **नेक्सॉस**. तें पूर्व किनाऱ्यावर होतें. आणि त्याची स्थापना ७३५ त झाली. जसजशी दुसऱ्या **ग्रीक** शहरांची वस्ती

वाढत चालली तसतसे ते लोक इकडे वळले आणि इकडील संस्थानांनीं ही आपलीं नवीं संस्थानें वसवलीं. ह्या प्रकारचें शेवटचें संस्थान **आग्रिजेन्टम्** नांवाचें होतें तें **रोड्स्** आणि **क्रीटा**च्या लोकांनीं स्थापिलेलें **जेला** ह्मणून एक संस्थान होतें तेथील लोकांनीं वसविलेलें होतें. **ग्रीक** लोक आपला अंमल जों जों पश्चिमेच्या बाजूस वाढवीत गेले तों तों **कार्थेज्**चे लोक हटत गेले. शेवटीं कांहीं थोडीं व्यापाराचीं ठाणीं एवढाच काय तो पश्चिम किनाऱ्यावर त्यांचा मुलूख म्हणून राहिला. **कार्थेज्**च्या लोकांच्या व्यापाराला जोंपर्यंत कांहीं धक्का बसत नव्हता तोंपर्यंत ते ह्या नव्या लोकांशीं कोणत्याही तऱ्हेनें बाकून वागत नसत व मोठ्या संतोषानें राहत असत. ते इतक्या स्नेहभावानें ह्या त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशीं वागत असत कीं ते त्यांतील कांहीं शहरांच्या लोकांशीं लग्नव्यवहार सुद्धां करीत असत.

पण वास्तविक पाहतां **कार्थेज्**चे लोक चांगलीशी संधि पाहत होते. आणि **पर्शिअन्** लोकांनीं जेव्हां **ग्रीक** लोकांवर हल्ला केला तेव्हां अर्थातच ह्यांना चांगलीच संधि सांपडली. आणि कित्येक इतिहासकार तर असें ह्मणतात कीं ह्या दोन राष्ट्रांमध्यें पूर्वींच जुळून प्रयत्न करण्याचें ठरलें होतें. **ग्रीक** लोकांच्या मूळ देशावर जों **पर्शिअन्स्** हल्ला करीत होते तोंपावेतोंच **कार्थेज्**च्या लोकांनीं संस्थानावर हल्ला करावा. पण इतर तर असें निक्षून सांगतात कीं असल्या कांहीं ठरावाचा कोठेंच पुरावा दिसत नाहीं; आतां कोणच्या तऱ्हेचा पुरावा पाहिजे हें कांहीं सांगवत नाहीं. पण त्यांत मोठेंसें अशक्य असें कांहीं दिसत नाहीं. ज्या **फिनिशिअन्** कप्तानांनीं **क्यॉबिसस्**ला आपल्या बांधवावर हल्ला करण्याचें नाहीं ह्मणून सांगितलें होतें, त्यांना अशी कांहीं तरी खटपट करून व्यवस्था सहज करतां आली असती आणि त्यांनीं केली असेल ही. एवढें तर स्पष्ट आहे कीं **कार्थेज्**ला संधि आलेली समजली होती आणि ती त्यांनीं साधलीही. **मेगो**च्या वंशांतला **हामिल्कार** नांवाचा सेनापति नेमला गेला तो **कार्थेज्**हून एक मोठेंसें सैन्य घेऊन निघाला. **सिसिली**हून व इतर ठिकाणाहून त्याला मिळालेली कुमक व त्याची स्वतःची फौज मिळून तीन लाख सैन्य होतें. त्याचे रथ आणि घोडेस्वार ज्या जहाजांवर चढविलें होते तीं जहाजें बुडालीं नसतीं तर ह्याहून ही अधिक फौज असती. पण ही संख्या फुगवलेली असेल असें वाटतें. प्राचीन इतिहासांतल्या बहुतेक संख्या विश्वसनीय नसतात ही गोष्ट येथें सांगणें अवश्य वाटते. पण ज्या ज्या देशांतन

कुमक आली त्यांचीं नांवें विश्वसनीय आहेत असें वाटतें. जमिनीवर लढणारे सैन्यांत **फिनिशिअन्स्, लिबिअन्स्, सार्डिनिअन्स्, कार्सिकन्स्, आयबिरिअन्स्, लिगाईस्** आणि **हेलिसिकाय्** इतके लोक होते. पहिलीं चार नांवें तर अगदींच स्पष्ट आहेत. **फिनिशिअन्स्** ह्मणजे **फिनिशि-आं**तून आलेलें **कार्थेजिनिअन्**च्या आणि त्यासारख्याच जातीचे इतर लोक; त्यांतच **सायप्रस्** आणि **मेडिटरेनिअन्**च्या किनाऱ्यावर असलेल्या संस्थानां-कडून आलेली कुमक मोजावयाची. **सार्डिनिआ** तर **कार्थेज्**च्याच ताब्यांतलें होतें. हें ५०९ च्या तहावरून स्पष्ट आहे. **कार्सिका** त्यांनीं मिळविलेलें असेल असें दिसतें. **आयूबिरिअन्स्** ह्मणजे **स्पेन्**चे लोक; त्यांच्यावर हलके हलके **कार्थेज्**चें वजन पडत चाललें होतें. **लिगाईस्** म्हटले ह्मणजे **इटली**च्या नैर्ऋत्य भागांतून आलेले **लिगुरिअन्** लोक; आणि **हेलिसिकाय्** हे **रोम**चे आग्नेय दिशेचे शेजारी **व्होल्सीअन्** लोक होत. हे **रोम**चेही एके काळीं शत्रु होते.

आपल्या आरमाराचा बहुतेक भाग घेऊन सुरक्षितपणें **प्यानोर्मस्** (सध्याचें **पालर्मो**) येथें **हामिल्कार** येऊन पोहोंचला. एवढ्या मोठ्या सैन्या-निशीं **सिसिली** घेणें ह्मणजे त्याला कांहींच वाटत नव्हतें. त्याला काय तो धाक होता समुद्राचा. समुद्रांत तुफान होऊन जर सर्वच सैन्य गडप झालें तर काय? जेव्हां तो वर सांगितल्याप्रमाणें येऊन पोहोंचला तेव्हां लढाई आतां झालीच असें त्यानें म्हटल्याचें सांगतात. त्याला वाटत होतें कीं, आतां **सिसि-ली**ला बहुतेक सुटण्याची आशा कमीच. आपल्या सर्व सैन्याला त्यानें तीन दिवसांची विश्रांति **प्यानोर्मस्** येथें दिली आणि तेवढ्यांत आपलीं जहाजें वगैरे दुरुस्त करण्याचीं होतीं तीं करून घेतलीं; मग तो **हायमेरा**कडे चालून गेला. तेथें आपलीं सर्व जहाजें कांठावर ओढून काढलीं. त्यांच्या भोंवती एक मोठा खोल खंदक खणला आणि संरक्षणासाठीं म्हणून एक लांकडाचा कोट रचला आणि नंतर आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक जहाजांवरच्या खलाशांचा व दुसरा त्याच्या शिपायांचा. दोन मिळून शहराची पश्चिम बाजू सर्व घेरून टाकली. त्याच्या अघाडीशीं सामना करण्यास आलेल्या शत्रूच्या सैन्याची पिछेहाट झाली हें पाहून **थेरान्** ज्याला **सायराक्यूस्**च्या **जेलन**नें आधिपत्य घेण्यास सांगितलें होतें त्यानें आपल्या धन्यापाशीं कुमक जलदीनें पाठविण्यासाठीं जासूद पाठविला. **जेलन** हा अगदीं तयारच होता. कोण-

च्याही **ग्रीक** शहराला किंवा सरदाराला गोळा करतां आलें नसतें असें पन्नास हजार पायदळ व पांच हजार घोडा घेऊन तो तडक चालून आला. शहराच्या जवळ जी छावणी दिली होती तिच्या संरक्षणाचा कडेकोट बंदोबस्त करून त्यानें आपला रिसाला **कार्थेजिनिअन्** लोकांच्या लुटारू टोळ्यांवर पाठवून दिला. **कार्थेजिनिअन्** टोळ्यांचा अगदीं बीमोड झाला; पण ह्यामुळें **हायमेरा**च्या लोकांना इतकें धैर्य आलें कीं, त्यांनीं निकरानें सामना करण्यासाठीं म्हणून जे आपले दरवाजे विटांनीं चिणून टाकले होते ते आतां निःशंकपणें खुले केले.

निश्चयाची लढाईही मग फार लांबणीवर टाकली नाहीं. आणि **जेलन**नें ती फार चतुर युक्तीनें जिंकली असें सांगतात. त्याच्या हेरांनीं **सेलिनस्**च्या लोकांनीं **हामिल्कार**ला पाठविलेलें पत्र पकडलें. त्यांतला आशय असा होता कीं, अमक्या तारखेस अमक्या घोडेस्वारांची कुमक आम्ही पाठवूं. **जेलन**नें आपल्यापैकींच कांहीं घोडेस्वार **सेलिनस्**चे असें दाखविण्यासाठीं तयार केले. त्यांनीं **कार्थेजिनिअन्** लोकांच्या छावणींत दोस्त म्हणून शिरावें व मग तुटून पडावें असा त्यानें संकेत ठरविला. हे घोडेस्वार आंत शिरून तुटून पडण्यास तयार झाले म्हणजे त्यांनीं कांहीं तरी निशाणी दाखवावी असें ठरलें होतें. आणि ही निशाणी दिसावी म्हणून भोंवतालच्या सर्व टेकड्यांवरून त्यानें आपले हेर ठेविले. ह्या हेरांनीं निशाणी पाहतांच तळसैन्याला वर्दी द्यावयाची असें ठरविलें. लढाई फारवेळ चालली आणि दोन्हीही बाजू मोठ्या निकरानें लढल्या, रक्तपातही अतिशय झाला. लढाई सूर्योदयापासून अस्तमानपावेतों सारखी चालली होती, पण कशानेंही म्हणा **कार्थेजिनिअन्** लोकांचें धैर्य खचत चाललें होतें आणि **ग्रीक** लोकांना जय मिळेल अशी खातरी वाटे, तरी पण दोन्ही बाजूंनीं सारखी लढाई चालली होती. कोणीही माघार घेईना. रात्रीपावेतों दीड लाख (संख्या अगदीं असंभाव्य दिसते) माणूस पडलें. बाकीचे डोंगरांत वगैरे पळून गेले पण सरतेशेवटीं पाणी न मिळाल्यामुळें त्यांना **आग्रिजेन्टम्**च्या स्वाधीन व्हावें लागलें. **हामिल्कार**चें पुढें काय झालें ह्याविषयीं खातरीलायक कांहींच समजलें नाहीं. कोणी म्हणतात कीं, **सेलिनस्**च्या लोकांनीं त्याला ठार मारलें. कोणी म्हणतात कीं, तो जिवंत मनुष्याचा बळी देण्याचा एक मोठा थोरला यज्ञसमारंभ करण्याच्या कामांत अगदीं गर्क होता इतक्यांत त्याला त्याच्या पराजयाची बातमी

कळली तेव्हांच त्याला दिवस आपल्या उलट जातो असें दिसतांच त्यानें आपला देह अग्निनारायणास अर्पण केला आणि अशा रीतीनें या जगांतून नाहींसा झाला. त्याचें प्रेत कोठेंहीं दिसलें नाहीं; तरी पण **ग्रीक** लोकांनीं रणभूमीवर तत्प्रीत्यर्थ म्हणून एक स्मारक बांधलें. **कार्थेजिनिअन्** लोकांनीं सुद्धां त्यांच्या पराजित सेनानायकाला कधींही दया दाखविण्याची वहिवाट नसतांना त्याच्या पश्चात् त्याला बहुत सन्मान दिला आणि तो प्रतिवर्षीं देण्याची वहिवाटही पाडली. बाकीची कथा तर काय शोकावहच आहे. सर्व आरमार लढाईसाठीं जय्यत तयार होऊन खडे राहिलें ह्मणजे गरज पडल्यास वापरण्यास सांपडावीत ह्मणून जीं वीस जहाजें **हामिल्कार**नें मुद्दाम ठेविलीं होतीं तींच फक्त बचावलीं. व्यापाराचीं आणि लढाईचीं मिळून जीं सुमारें तीन हजार जहाजें आणलीं होतीं तीं सर्व पार कोणीकडच्या कोणीकडे नाश पावलीं; जीं वीस बचावलीं तीं सुद्धां सुरक्षित गेलीं नाहींत; त्यांना वाटेंत तुफान झालें त्यामुळें तींही निजधामास गेलीं. फक्त एक लहान होडगें **कार्थेज्**ला जाऊन पोंचलें. त्यावरून त्यांचें सर्व सैन्य नाश पावलें असें **कार्थेजिनिअन्** लोकांला समजलें. ही बातमी गांवांत पसरतांच दुःख आणि निराशा हीं दरेकाच्या तोंडावर दिसूं लागलीं. तह करण्यासाठीं ह्मणून **जेलन**कडे एक वकील पाठविण्यांत आला. तह ठरला पण तहाच्या शर्ती फार कडक होत्या. (१) **कार्थेज्**नें एक हजार ट्यालेन्ट् दंडाखातर द्यावेत. (२) ह्या प्रसंगाचें स्मारक ह्मणून दोन देवळें बांधावीत आणि नरयज्ञाची अति नीच चाल बंद पाडावी. ही शेवटील शर्त एकाच ग्रंथकारानें दिली आहे. जर ही खरोखरच घातली असली तर ती **कार्थेज्**नें पाळली नाहीं.

कित्येक लोक असें म्हणतात कीं **हायमेरा**ची मोठी लढाई होऊन **सिसिलीं**तील **ग्रीक** लोकांची मुक्तता **कार्थेज्**च्या त्रासापासून झाली त्याच दिवशीं **पर्शिअन्** लोकांचाही ***सालामिस्** येथें पराभव झाला.

कार्थेज्ला हें नुकसान भरून काढण्यास फार दिवस लागले नसतील. कारण त्या लढाईनंतर थोडेच दिवसांनीं त्यानें **रोम**ला जेरीस आणून तह करण्यास लावलें. पण **सिसिली**च्या कारभारांत बरेच दिवस **कार्थेज्** पडलें नाहीं. शेवटीं ४१० त **एजिस्टा** शहरानें **सेलिनस्**शीं लढण्याकरितां ह्मणून

* ही प्रसिद्ध लढाई इसवी शकाच्या पूर्वीं ४८० सालांत **पर्शिअन्** व **ग्रीक** लोक यांच्या मध्यें झाली. या लढाईत **पर्शिअन्** लोकांचा मोठा पराभव झाला व तेव्हांपासून त्यांना उतरती कळा लागली.

ह्यांचीं मदत मागितली. दोन्ही ही शहरें **कार्थेज्**च्या वसाहतींच्या अगदीं जवळ होतीं. आणि जर **सेलिनस्**ची सत्ता वाढूं दिली असती तर ती कदाचित् **कार्थेज्**ला अपायकारक झाली असती म्हणून अथवा सत्तर वर्षांपूर्वी झालेल्या पराभवाचा वचपा काढण्याचें त्याचे मनांत एकसारखें जळत होतें ह्मणून बहुतकरून मागितल्याबरोबर **कार्थेज्**नें मदत दिली. शिवाय त्या संधीस शहरच्या मुख्य दोन अधिकाऱ्यांपैकीं **हायमेरा**च्या लढाईंत मेलेल्या **हामिल्कार**चा नातू **हानिबाल्** हा श्रेष्ठ होता. हा विदेशींच जन्मलेला होता कारण ह्याचा बाप **गिस्को** यास हद्दपार केल्यामुळें तो **सेलिनस्** येथें येऊन राहिला होता. हा मूळपासूनच **ग्रीक** लोकांचा कट्टा दुस्मान होता आणि त्यानें लोकांचीं मनें लढाईस अनुकूल करण्यासाठीं होईल ती खटपट केली असें एका इतिहासकाराचें म्हणणें आहे.

सामोपचाराचें कांहीं बोलणें चाललें; पण त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां **हानिबाल्**नें एकदम ५००० सैन्य पाठविलें आणि ८०० **इटली**चे भाड्यानें घेतलेले शिपाईही पाठवून दिले. **सेलिनस्**ची फौज जी शत्रूचा प्रदेश लुटण्यांत अगदीं गुंग होऊन गेली होती ती तर या अचानक छाप्यामुळें घाबरून गेली. तींतील सुमारें हजारावर लोक पडले आणि जी कांहीं लूट वगैरे मिळविली होती तीही सर्व गेली. हें पाहून **सेलिनस्**नें **सायराक्यूस्**ची मदत मागितली आणि **एजिस्टा**नेंही **कार्थेज्**ला आणखी कुमक पाठविण्याविषयीं विनंति केली. ही विनंति **कार्थेज्**नें अशा तऱ्हेनें मान्य केली कीं, त्यामुळें **सिलिअन्** लोकांना आश्चर्यच वाटलें. **हानिबाल्**नें **स्प्यानिअर्डस्** आणि **आफ्रिकनस्** मिळून एक बरीच मोठी फौज गोळा केली; ही फौज नेण्यासाठीं त्याला सुमारें १५०० जहाजें लागलीं. त्यांच्या संरक्षणार्थ ६० लढाऊ जहाजेंही त्यानें ठेविलीं होतीं. सुमारें एक लाख लोक फौजेंत होते असा अदमास केलेला आहे. वेढा वगैरेस उपयोगी पडणारीं एंजिनें वगैरे सर्व साधनें त्या लोकांपाशीं होतीं. त्यांचा सेनाधिपति एक क्षण सुद्धां फुकट न घालवितां **सेलिनस्**वर चाल करून आला आणि लागलीच त्याला वेढा घालून माऱ्यास सुरुवात केली. सहा लांकडाचे बुरूज, कोट पाडण्यासाठीं कोटासरसे आणले आणि लढाईच्या कामीं पडणाऱ्या मोठमोठ्या लोखंडी घणांचाही मारा त्यांनीं सुरू केला. इकडे हें चालू होतें तों दुसरीकडे तिरंदाज लोक आणि गोफणे यांनीं तटाच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या शिपायांवर तिरांचा आणि दगडांचा वर्षाव

सारखा चालू ठेवला होता. बराच काळपावेतों लढाईचा प्रसंग न आल्यामुळें शहरकोट बरेंच ठिकाणीं पडिक झालेला होता. तरीही कोणी दुरुस्त केला नव्हता, त्यामुळें **इटालिअन्** भाडोत्री शिपायांस आंत प्रवेश करण्यास फारसे आयास पडले नाहींत. परंतु ते आंत गेले नाहींत तोंच त्यांचा बराच नाश होऊन त्यांना माघार घ्यावी लागली. त्यामुळें माऱ्याचें काम थोडावेळ बंद पडल्यासारखें झालें. वेढलेल्या लोकांनीं **सायराक्यूस्, जेला** आणि **आग्रि-जेन्टम्** येथून त्वरेनें मदत मागविण्यासाठीं अति चपल असे घोडेस्वार धाडले. मदत देण्याचें त्यांनीं कबूलही केलें. पण त्यांची निघण्याची तयारी होत होती त्यापूर्वींच **हानिबाल्**नें मारा अगदीं नेटानें सुरू केला. इकडे त्या मोठमोठ्या घणांनीं बहुतेक कोट पाडून टाकला, तरी पण **सेलिनस्**चे लोक अगदीं न डगमगतां निर्वाणीच्या धैर्यानें लढत होते. नऊ रात्री आणि नऊ दिवस सारखी लढाई चालली होती. दरेक रस्ता तर काय पण घर सुद्धां अगदीं निकराच्या लढाईशिवाय ते जाऊं देत नव्हते. तरी शेवटीं शत्रूंची संख्या फार अधिक असल्यामुळें ह्यांचें कांहींएक चाललें नाहीं. जवळजवळ दोन तीन हजार शिपाई लोकांना पळून जावयास सांपडलें असेल; बायका आणि पुरुष मिळून चार सहा हजार लोक कैद केले गेले. बाकी सर्व लोक निर्दयपणानें मारले गेले. असें ह्मणतात कीं सुमारें सोळा हजार मुडदा प्रत्यक्ष मोजला गेला. बाकी, जे सांपडले नाहींत ते निराळेच. **कार्थे-ज्**च्या फौजेनें **सेलिनस्** घेतलें तोंच **सायराक्यूस्**च्या फौजेची अघाडीची टोळी **आग्रिजेन्टम्**ला येऊन पोहोंचली. त्यांनीं या विजयी लोकांशीं कांहीं शर्तीवर तह करण्याचा प्रयत्न केला.

आपले कैदी परत द्यावे आणि देवादिकांचा योग्य मान राखावा अशी विनंति करण्याकरितां त्यांच्याकडे प्रणिधी पाठविण्यांत आला. **हानिबाल्**नें उत्तर पाठविलें कीं "**सेलिनस्**च्या लोकांना जर स्वतःची स्वतंत्रता राखतां आली नाहीं तर त्यांनीं गुलामगिरीचा अनुभव घेतलाच पाहिजे. आणि देवा-दिकांसंबंधीं विचाराल तर ते **सेलिनस्**च्या लोकांवर कधींच रुष्ट होऊन **सेलिनस्** सोडून गेले आहेत." **कार्थेज्**शीं नेहेमीं स्नेहभावानें असणाऱ्या दुसऱ्या एका प्रणिधी बरोबर दुसरा एक निरोप पाठविला त्याला कांहींसें सौम्य असें उत्तर **हानिबाल्**नें पाठविलें. त्यानें सांगितलें कीं "राहिलेल्या लोकांनीं खुशाल शहरांत परत यावें, तेथें राहावें आणि आपल्या जमीनी वगैरे नांगरून

स्वस्थ असावें, व **कार्थेज्**ला नियमित खंडणी द्यावी." **हानिबाल्**च्या लोकांनीं शहरकोट सर्व उध्वस्त करून टाकला. कांहींचें म्हणणें तर असें आहे कीं, त्यानें सर्व शहराचा समूळ नाश करून टाकला. अद्यापपावेतों सुद्धां देवळांच्या पडिक भागांतून खांबच्याखांब उपटून टाकण्यासाठीं घातलेल्या पहारांच्या खुणा कांहीं कांहीं ठिकाणीं शिल्लक आहेत.

पण **हानिबाल्**च्या ह्या मोहिमेचा मुख्य रोंख **सेलिनस्** शहरावर मुळींच नव्हता. सत्तर वर्षांपूर्वीं त्याचा आजा ज्या रणभूमीवर पडला होता त्या **हायमेरा** शहरावरच त्याचा मुख्यत्वेंकरून डोळा होता. त्यामुळें त्यानें आपला मोर्चा लागलाच **हायमेरा** शहराकडे वळविला (तें **सेलिनस्**च्या अगदीं समोर ह्मणजे बेटाच्या उत्तरेच्या किनाऱ्यावर होतें). मोर्चा फिरवितांना इतर **ग्रीक** शहरांकडून **सेलिनस्**ला येणाऱ्या कुमकेची विल्हेवाट लावण्यासाठीं शहराच्या बाहेरच्या बाजूस थोड्या अंतरावर चाळीस हजार सैन्य ठेऊन दिलें. बाकीचें आपलें सैन्य आणि **सिसिली**च्या मूळ रहिवाशांकडून आलेली वीस-हजारांची कुमक या दोहोंनिशीं त्यानें कोटाभोंवतीं गराडा घातला.

पण वेढ्याच्या सावकाश होणाऱ्या परिणामावर अवलंबून राहण्याचा त्याचा हेतु मुळींच नव्हता आणि ह्मणून त्यानें **सेलिनस्**सारखाच ह्या शहरावरही एकदम हल्ला सुरू केला. शहरकोटावर वरूनही मारा सुरू होताच व खालूनही कोट कोसळून पाडण्याचे प्रयत्न चालू होते. आणि एक दोन भोंकेंही त्यांनीं भिंतीला पाडलीं होतीं, तरी पण प्रथमतः त्यांना माघार घ्यावी लागली. **हायमेरा**चे लोक आपल्या जातीला अनुरूप अशा अत्युत्कट शौर्यानें लढत होते व त्यांना चार एक हजार लोकांची कुमकही **सायराक्यूस्** व इतर शहरांकडून मिळाली होती. त्यांनीं **कार्थेज्**च्या लोकांना हटविलें आणि कोटाचीं भोंकें सांधून घेतलीं. ह्या त्यांच्या सरशीमुळें वेढा घालणाऱ्यांवर चालून जाण्याची हिंमत त्यांना आली. कोटाच्या संरक्षणार्थ पुरेशी फौज ठेऊन बाकीचे पुढें निघाले आणि शत्रूच्या सैन्यावर तुटून पडले. **कार्थेजिनिअन्** लोकांना ह्या कृत्याचें अतिशयच आश्चर्य वाटलें आणि त्यामुळें त्यांची अगदीं दाणादाण झाली. त्यांचें सैन्य जरी फार मोठें होतें तरी यासमयीं तेंच त्यांच्या आड आलें. कारण दाटी अतिशय झाल्यामुळें त्यांना जोराचा मारा करण्यास खुली जागाच सांपडेना. आणि एका इतिहासकारानें ह्मटलें आहे कीं, त्यांचें जें एवढें मोठें नुकसान झालें तें शत्रूमुळें नव्हे तर स्वतःमुळेंच. अनाथ बायकापोरें,

वृद्ध मातापितरें आणि इतर आप्तजन जे मोठ्या उत्कंठेनें कोटावरून लढाई पहात होते त्यांच्याकडे पाहून **हायमेरा**चे लोक जरी थोडे ह्मणजे सारे दहा-हजार होते तरी मोठ्या त्वेषानें लढले. पहिल्यांदा तर असेंच वाटलें कीं, **हायमेरा** ह्मणजे दुसरी **म्यारेथान्*** खास होते. अगदीं सरासरीचा आणि काटकसरीचा हिशोब धरला तरी, वेढा घालणारांपैकीं सहा हजारांवर लोक मेले. पण चूक अशी झाली कीं, त्यांनीं पाठलाग फार वेळ सुरू ठेवला. त्यामुळें झालें काय कीं **हानिबाल्**नें आपली टेंकडीवर ठेवलेली शिल्लक फौज एकदम **ग्रीक** लोकांच्या फौजेवर घातली व मोठें तुंबळ युद्ध सुरू झालें. पण अखेरीस **हायमेरा**चे लोक आणि त्यांचे साथीदार ह्यांचा पराभव झाला. सैन्याचा बराच भाग शहरांत पळून गेला. तथापि तीन हजार लोक आपल्या खुषीनें ह्मणा किंवा नाइलाजानें ह्मणा तेथल्या तेथेंच समरांगणीं राहिले, आणि नाना तऱ्हेचीं शौर्याचीं आणि पराक्रमाचीं अचाट कृत्यें करून तेथल्या तेथेंच त्यांनीं आपले देह ठेविले.

ह्याच समयास **आथेन्स्** आणि **स्पार्टा**च्या लढाईंत गुंतलेलीं **सायराक्यूस्**चीं पंचवीस लढाऊ जहाजें तेथें आलीं. ह्यामुळें पहिल्यांदा शहरवासी लोकांना फार मोठा धीर आला. गांवांत अशी सुद्धां वदंता उठली कीं, जहाजें-चर्शी कार्यं पण **सायराक्यूस्**चे लोकही मोठी थोरली फौज गोळा करून मदतीस येत आहेत; पण त्या पाठोपाठच दुसरी एक अत्यंत निराशाजनक अशी वदंता आली; ती अशी कीं **हानिबाल्**ही आपलीं जहाजें आपल्या सैन्यांतील निवडक शिपायांनीं भरीत आहे व त्याचा विचार **सायराक्यूस्**चे मोठे मोठे लोक पडल्यावर त्या शहरावर हल्ला करण्याचा आहे. हें ऐकल्यावर अर्थातच **सायराक्यूस्**चे जहाजांच्या कप्तानास तेथें राहण्याचा धीर होईना. तो म्हणाला कीं, जहाजें एकदम स्वदेशीं गेलीं पाहिजेत. पण त्यानें एवढें कबूल केलें कीं, **हायमेरा**च्या निराश्रित लोकांपैकीं जेवढ्या लोकांचा जहाजांत समावेश होईल तेवढे लोक घेण्यास आपण तयार आहों. लोक ह्यास सुद्धां कबूल होते; कारण, जरी अशा स्थितींत घरदार सोडणें म्हणजे अतिनिर्घृणतेचें कृत्य होतें तरी पण त्या गरीब बिचाऱ्यांना प्राणरक्षणाचा तेवढाच मार्ग खुला होता. शीघ्र

* ही प्रख्यात लढाई इसवी शकापूर्वी ४९० सालांत **ग्रीक** व **पर्शिअन्** लोक यांच्यामध्यें झाली. ह्या लढाईत **पर्शिअन्** लोकांचा पराभव होऊन फार नुकसान झालें; व **पर्शिअन्** लोकांच्या जुलुमापासून **ग्रीस** मुक्त झालें; व त्यामुळें जगाच्याही इतिहासाची दिशा बदलली असें कित्येक इतिहासकारांचें ह्मणणें आहे.

असेपावेतों लोक त्यांनीं जहाजांत घेण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. तदनंतर **सायराक्यूस्**चा सरदार इतक्या घाईनें निघाला कीं, त्याच्या फौजेंतील मेलेल्या शिपायांस पुरण्यासवरण्याच्या भरीस सुद्धां तो पडला नाहीं. ज्यांना जहाजांवर जागा मिळाली नाहीं असे पुष्कळ शहरवासी लोक त्या सरदाराच्या पाठोपाठ गेले. कारण जहाजें परत येण्याची वाट पाहण्यापेक्षां ह्याच रीतीनें त्यांच्या बरोबर जाणें त्यांना बरें वाटलें. अर्थातच जहाजें बाकीचे लोक नेण्या-साठीं परत यावयाचीं असें ठरलें होतें.

ते जहाजांबरोबर गेले तें बरेंच झालें. कारण दुसऱ्या दिवशीं **कार्थेजिनि-अन्** लोकांनीं पुन्हां हल्ल्यास सुरुवात केली. वेढलेले लोक फार थोडे होते आणि ते अगदीं थकले भागलेले होते. कारण आदले दिवशींची निकराची लढाई झाल्यानंतर सर्व रात्र शहरकोटावर आपल्या लष्करी पोषाखांतच जागून त्यांनीं काढली होती. तरी पण ते मोठ्या नेटानें लढत होते. सर्व दिवसभर लढाई जारीनें चालू होती. दुसरे दिवशीं तीं जहाजें परत आलीं; पण दुर्दैवा-मुळें असें जाहलें कीं हीं जहाजें नजरेस पडावयाचा मात्र अवकाश कीं लागलाच शत्रूंनीं घणांनीं शहरचे कोटाचा बहुतेक भाग पाडला आणि **हानिबाल्**च्या फौजेंतील **स्प्यानिअर्ड** लोक आंत घुसले. त्यासरसीं एकदम कत्तल सुरू जाहली; ती तशीच बराच वेळ चालू होती. शेवटीं **हानिबाल्**नें त्या लोकांना जिवंत धरण्याचा हुकूम आपल्या लोकांस केला तेव्हांच ती बंद जाहली. हा हुकूम त्यानें दयार्द्र बुद्धीनें केला असें नाहीं. बायका आणि पोरें ह्या लोकांनीं आप-आपसांत वांटून घेतलीं आणि पुरुष जे होते त्या सगळ्यांना **हामिल्कार** ज्या ठिकाणीं शेवटीं दिसला होता त्या ठिकाणीं नेलें आणि तेथें अति निर्दयपणानें तीन हजार लोक चरचरां कापून त्या मृत **हामिल्कारा**च्या आत्म्यास शांति देण्यासाठीं बळी देण्यांत आले. सर्व **हायमेरा** शहर अगदीं नष्ट करून टाक-ण्यांत आलें; सर्व घरें आणि भिंती वगैरे उध्वस्त करून जमीनदोस्त करण्यांत आल्या. देवळें पहिल्यांदा लुटलीं आणि मागाहून जाळण्यांतही आलीं.

सेलिनस् आणि **हायमेरा** शहरांची जी दशा झाली तीच आपली होईल कीं काय अशी भीति **सिसिलीं**तील बाकीच्या **ग्रीक** शहरांना वाटली असेल यांत कांहीं संशय नाहीं. पण तेवढ्या वेळेपुरती तरी त्यांची भीति पुष्कळ कमी झाली होती; कारण **हानिबाल्** मुख्य जें करण्यासाठीं म्हणून आला होता तें तो करून बसला होता. त्यानें **हायमेरा**चा पराभव, आपल्या आजाचा

मृत्यु आणि आपल्या बापाचें विवसन अथवा परदेशीं वास या सर्वांबद्दल जेवढें ह्मणून उट्टें काढावयाचें तेवढें काढून घेतलें होतें; आणि तेवढ्यानेंच तो संतुष्ट होता. त्यानें खुद्द **सिसिलीं**तील जे लोक त्याला मदत करण्यास आले होते त्यांना परत पाठविले. भाड्यानें जे शिपाई आणले होते त्यांना रजा दिली आणि जीं शहरें व जो प्रांत घेतला होता त्याला पुरेशी फौज **सिसिलींत** ठेऊन बाकीच्या फौजेनिशीं तो **कार्थेज्**ला परत गेला. त्यानें आपल्याबरोबर पुष्कळ लूट आणली होती व मौल्यवान् जयसूचक वस्तुही पुष्कळ आणल्या होत्या व लोकांनींही त्याचा सत्कार अति उत्तम तऱ्हेनें केला. **कार्थेज्**नें पूर्वी कधींही मिळविले नव्हते असे मोठे जय थोड्याशा मुदतींत त्यानें **कार्थेज्**ला मिळवून दिले.

भाग दुसरा.

कार्थेज् आणि डायोनिसिअस्.

(४०६–४०५.)

सिसिलींतील **हानिबाल्नें** मिळविलेल्या जयांमुळें सर्व बेट आपणास घेतां येईल अशी आशा **कार्थेजिनिअन्** लोकांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली. त्यांनीं दुसरी एक मोहीम **सिसिलीवर** करण्याचा निश्चय केला आणि **हानिबाल्ला** सरदार केलें. पहिल्या प्रथम आतां आपण वयोवृद्ध झालों असें ह्मणून प्रमुखत्व घेण्याचें त्यानें नाकारलें. पण जेव्हां त्याचाच संबंधी **हानोचा** मुलगा **हिमिल्को** यास मदतीस नेमलें तेव्हां त्यानें प्रमुखत्व पत्कारिलें. दोघांनीं **स्पेन** आणि **बालेआरिक्** बेटें यांतील अधिपतींशीं स्नेह जोडण्याकरितां जासूद पाठविले; आणि **आफ्रिकन्** लोक आणि समुद्रकिनाऱ्याच्या निरनिराळ्या **फिनिशिअन्** लोकांच्या जाती यांत लढाईकरितां लोक मिळविण्यासाठीं स्वत: हिंडले. दुसऱ्या प्रांतांतून व विशेषत: **इटलींतून** भाड्यानेंही कांहीं लोक मिळविले. **हानिबाल्च्या** सैन्यांतील पूर्वींचे **इटलीचे** लोक त्यानें आपणास वाईट रीतीनें वागविलें असें समजून **सायराक्यूस्ला** जाऊन मिळाले होते. ते लोक फार बलाढ्य असें **हानिबाल्ला** पूर्वींपासून ठाऊक होतें. शेवटीं ४०६ त ह्मणजे पहिल्या मोहिमेनंतर चार वर्षांनीं पुन: **सिसिलीवर** चालून जाण्यास जहाजें हांकारलीं. तें कमींतकमी एकलक्ष वीस हजार सैन्य होतें. कोणी कोणी तर

म्हणतात चार लक्ष होतें. त्यांना सर्वांना सुमारें हजार जहाजें लागलीं; आणि त्यांच्या संरक्षणार्थ म्हणून एकशें वीस लढाऊ जहाजें ठेविलीं होतीं. मागच्या लढाईंत शहाणे झाल्यामुळें **ग्रीक** लोकांनीं आपल्या संरक्षणाचीं साधनेंही चांगल्या रीतीनें तयार ठेविलीं होतीं. चाळीस **कार्थेजिनिअन्** जहाजें पहिल्यांदा पुढें पाठविण्यांत आलीं. **सायराक्यूस**चे लोकांनींही तितकींच ह्यांच्याशीं सामना करण्यास पाठविलीं. दोन्हीहीं आरमारें **परिक्स्**च्या प्रख्यात भूशिराजवळ मिळालीं. बराच वेळ झटापट होऊन **ग्रीक** लोकांची सरशी झाली आणि त्यांनीं शत्रूकडील पंधरा जहाजें बुडवून टाकलीं. बाकीचीं **आफ्रिके**च्या किनाऱ्याकडे पळून गेलीं म्हणूनच बचावलीं. **हानिबाल्**नें ह्या पराजयाची वार्ता ऐकतांच पन्नास नवीं जहाजें घेऊन आपण निघाला. त्याच्यापुढें **सायराक्यूस्**चें कांहीं चालेना; त्यावरून स्पष्टच झालें कीं शत्रूचा हल्ला आतां होणारच. आतां फक्त त्यांच्याशीं सामना करण्याची तयारी करणें हाच काय तो उत्तम मार्ग राहिला होता. **सायराक्यूस्**नें **इटलीं**तील **ग्रीक** लोकांस, तसेंच **स्पार्टा**ला, तसेंच बेटांतील आपल्या जातीचे लोक जेथें जेथें होते तेथें तेथें मदत मागण्यासाठीं वकील पाठविले. सगळ्यांत अतिशय धाक **आग्रिजेन्टम्** शहराला वाटत होता; कारण **सायराक्यूस्**खेरीज करून सगळ्या बेटांत अतिशय संपत्तिमान् आणि अतिशय वस्तीचें असें तेंच शहर होतें, किंबहुना तें **सायराक्यूस्**च्या बरोबरीचें होतें म्हटलें तरी चालेल. त्यांनीं आपल्या बचावाच्या आरंभास लागण्यास एक क्षणही विलंब केला नाहीं. **स्पार्टा**चा सरदार **डेक्सिपस्** जो एक दीडहजार फौजेनिशीं **जेला** येथें तळ देऊन होता, त्याला आपला सरदार नेमिलें आणि **हानिबाल्**च्या हाताखालीं काम केलेले **क्याम्पेनिआ**चे ८०० लोक एकदम तैनातीस ठेविले. ४०५ च्या मे महिन्यांत **कार्थेजिनिअन्** फौज त्याच्या शहरकोटाला येऊन धडकली. **हानिबाल्**नें पहिल्यांदा सामोपचाराचें बोलणें लावण्याची सुरुवात केली. पहिल्या प्रथम हल्ला करण्यांत तसेंच बचाव करण्यांत **आग्रिजेन्टम्**नें **कार्थेज्**ला साहाय्य करावें अशा अर्थाची शर्त पुढें आणली; आणि जर ही कबूल नसेल तर निदान **कार्थेज्**शीं दोस्ती राखावी व **कार्थेज्** जी पुढें लढाई करणार तींत कोणच्याच बाजूची तरफदारी करूं नये. **आग्रिजेन्टाइन्स्** आपल्या देशच्या लोकांना सोडून जाण्यास नाखूष होते, त्यामुळें त्यांनीं ह्यापैकीं कोणत्याच शर्ती कबूल केल्या नाहींत. शहर चांगल्या बळकटीच्या ठिकाणीं बांधलेलें होतें, व त्याला काळजीपूर्वक

सुधरून विशेष बळकटीही आणली होती. तें शहर एक टेकड्यांची रांगची रांग होती त्यावर वसलेलें होतें. टेंकाडांची उंची कांहीं कांहीं ठिकाणीं हजार फुटांवर होती. ह्या टेंकाडांच्या उतरत्या भागावर कोट बांधून ठेवलेला होता. ह्या कोटाचा कांहीं कांहीं भाग खडक फोडून तयार केला होता. हल्ला ज्या जागेपासून शक्य होता अशी काय ती एकच जागा होती. आणि ह्या जागेवर **कार्थेजिनिअन्** शिपायांनीं आपलीं सर्व लढाईचीं साधनें आणून खडीं केलीं. विशेषतः त्यांनीं आपल्या शिपायांना कोटावरील पहाऱ्यास ठेवलेल्या शिपायांशीं सामना करतां यावा ह्मणून दोन लांकडी बुरूज तेथें आणले. सर्व दिवसभर लढाई चालली होती तरी कांहीं निकाल लागला नाहीं. रात्रीचे वेळेस वेढलेले लोक एकदम बाहेर निघाले तों पहिल्यांदा त्यांनीं शत्रूंचीं इंजिनें जाळलीं. त्याबरोबर **हानिबाल्**नें शहरकोटाच्या बाहेरच्या बाजूस थडगीं होतीं त्या थडग्यांचे दगड उकरून काढावे आणि त्यांचे ओटे करून त्यावरून शत्रूवर मारा करावा असा हुकूम केला. त्या सर्व थडग्यांत, **थेरान्** ह्मणून एक सुमारें ऐंशी वर्षांपूर्वी राजा होऊन गेला होता त्याचें थडगें अतिशय भपकेदार होतें. त्या राजानेंही मागें एकदां **कार्थेज्**चा हल्ला असाच माघारा फिरविला होता. त्याचें थडगें जेव्हां **हानिबाल्**चे लोक उकरावयास लागले तेव्हां त्यांच्यावर एकदम वीज पडली. सर्वांच्या मनांत हा देवतांचा क्षोभच असेल अशी धास्ती बसली. ज्यांचीं थडगीं उकरलीं आहेत ते भूतें होऊन आह्मास त्रास देतात अशी कुरकुर रखवालीस असलेल्या शिपायांनीं केली. शिवाय **हानिबाल्**च्या छावणींत एकदम उपद्रव सुरू झाला. त्यामुळें पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडले. **हानिबाल्**ही मेला. भविष्यवादी लोकांस प्रश्न विचारतां त्यांनीं असें सांगितलें कीं ह्या अघोर पापकृत्यामुळें देवताही फार क्रोधाविष्ट झाल्या आहेत. असें ऐकतांच **हिमिल्को**नें थडगीं उकरण्याची एकदम बंदी केली आणि गतपापांच्या निरसनार्थ ह्मणून **सार्टर्न** अथवा **मलॉक्** नांवाच्या देवाला एक मुलगा बळी दिला आणि **नेप्च्यून** देवतेच्या प्रीत्यर्थ बरेच प्राणी समुद्रांत टाकले. हीं सर्व कृत्यें इकडे होत आहेत तों त्यानें हल्ल्याचें काम तसेंच जोरानें चालविलें होतें. त्यानें शहराचे तिन्ही बाजूंनीं वाहणारी एक नदी अडवून धरली. तो हें करीत होता तोंच शत्रूच्या साहाय्यार्थ **ग्रीक** लोकांची **ड्यापिनअस**च्या हाताखालील तीस हजार पायदळाची आणि पांच हजार घोडेस्वारांची कुमक येऊन पोहोंचली. ह्या फौजेबरोबरच समुद्रांतून एक तीस जहाजांचें आरमारही मदतीस

आलें होतें. **हिमिल्को**नें आपल्या सैन्यांतील **स्पेन्**चे आणि **इटली**चे लोक ह्या लोकांशीं लढण्यास पाठविले. **हायमेरा**च्या पश्चिम बाजूच्या मैदानांत दोन्ही सैन्यांची मोठी निकराची लढाई झाली. अखेरीस **ग्रीक** लोकांचा जय झाला. त्यांनीं शत्रूकडचे सुमारें सहा हजार लोक मारले. **ड्याफ्निअस्**नें जर ठेविली तितकी सावधगिरी ठेवली नसती तर **ग्रीक** लोकांची सगळी फौज ठार झाली असती. **हायमेरा**च्या लोकांचा मागील लढाईत अगदीं जयाच्या क्षणांत कसा बीमोड झाला होता हें लक्षांत ठेऊन त्यानें आंतल्या लोकांना पाठलागाच्या भरीस पडूं दिलें नाहीं. **हिमिल्को**पाशीं शिल्लक फौज पुष्कळ होती; आणि त्यामुळें तो आपणांस अपाय करील कीं काय अशी भीति वाटून **आग्रिजेन्टम्**च्या सरदारांनीं शत्रूकडचे लोक जेव्हां कोटाच्या बाजूनें पळून जात होते तेव्हां बाहेर येऊन त्यांना धरलें नाहीं. मदतीस आलेली फौज जेव्हां शहरांत शिरली तेव्हां त्या दिवशीं झालेल्या गोष्टीविषयीं शिपायी लोकांत बरीच चर्चा सुरू झाली. कित्येकांनीं चार लोकांदेखत त्या सरदारांवर भित्रेपणाचा आरोप केला. दुसरे कित्येकांनीं असें ठरविलें कीं, शत्रूकडून त्यांना कांहीं तरी लांच मिळाला असेल. सर्व लोक एकदम बाजारांतील चव्हाट्यावर धांवले आणि तेथें एक सार्वजनिक सभा भरवून **आग्रिजेन्टम्**च्या सरदारांना चौकशीकरितां तेथें आणलें. मदतफौजेपैकीं मुख्य **कामारिना**चा **मिनीस** हा दोषारोप करण्यांत प्रमुख होता. लोक ह्यामुळें अगदीं बेकाळून गेले व ते त्या सरदारांचें कांहीं एक सांगणें ऐकेनात. पांचांपैकीं चौघांना तर तेथल्या तेथेंच दगडांनीं ठार करण्यांत आलें, व पांचवा वयानें फार लहान म्हणून सोडून देण्यांत आला.

पहिल्या प्रथम **ड्याफ्निअस्**चा विचार **कार्थेज्**च्या छावणीवर हल्ला करण्याचा होता; पण छावणी फार मजबूत दिसली तेव्हां फक्त आपल्या रिसाल्याला सर्व रस्ते धरून बसून शत्रूंच्या फौजेंत तूट पाडण्याचा हुकूम करूनच तो संतुष्ट राहिला. शत्रूच्या सैन्यांत सामग्रीची तूट पडली; उपासमारानें बहुत लोक मेले. भाड्यानें आणलेल्या शिपायांनीं **हिमिल्को**च्या तंबूभोंवती जमून त्यास सांगितलें कीं आह्मांस खावयास अन्न द्या, नाहीं तर आह्मी शत्रूची तैनात पत्करूं. **सायराक्यूस्**चे लोक **आग्रिजेन्टम्**ला जलमार्गानें धान्य नेत आहेत अशी बातमी याच वेळेस **हिमिल्को**ला लागली. त्याची सर्व भिस्त पुरवठा

मधल्यामधेंच पकडण्यावर होती; म्हणून त्यानें ह्या बंडखोर लोकांस कांहीं दिवस वाट पाहण्यास सांगितलें व आश्वासनार्थ ह्मणून त्यांना आपल्या **कार्थेज्**चे सरदारांचीं कांहीं मौल्यवान् ताटें व वाट्या दिल्या. आपणावर ह्मणजे हल्ला येईल हें **सायराक्यूस्**च्या आरमाराच्या ध्यानींमनींही नव्हतें; कारण **हिमिल्को**नें समुद्राचा ताबा घेण्याचा कधींच प्रयत्न केला नव्हता. त्यामुळें हा हल्ला पाहून ते घाबरले व त्यांचा अगदीं पराभव झाला. त्यांची आठ लढाऊ जहाजें शत्रूंनीं बुडवून टाकलीं व बाकीचीं पिटाळून कांठाला आणलीं व सर्व काफला काबीज करून घेतला. ह्या एका गोष्टीनें लढाईचें रूप पालटलें. आतां धान्याची तूट **कार्थेज्**ला नाहीं पण **आग्रिजेन्टम्**ला पडली. कांहीं वेळ लोटला नाहीं तोंच **इटली**चे भाड्यानें आणलेले लोक आपली मुदत संपली म्हणून निघून गेले. पण असेंही ह्मणतात कीं, त्या लोकांचा सरदार **डेक्सिपस्** यानें शत्रूकडून लांच घेतल्यामुळें त्यानें त्या शिपायांना असें सांगितलें कीं बाबानों शहरांत कांहीं आतां धान्य नाहीं तेव्हां तुम्ही दुसरीकडे कोठें नोकरी पत्कराल तर विशेष हितावह होईल. धान्य नव्हतें ही गोष्ट अगदीं अक्षरशः खरी होती. कारण जेव्हां **आग्रिजेन्टम्**चे सरदार कोठारें पाहण्यास आले तेव्हां त्यांना समजलें कीं एकदम शहर सोडून देण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं.

त्याच रात्रीं त्यांनीं आपला तो बेत शेवटास नेला. जे लोक घरें सोडण्यास नाखूष होते किंवा जे घरें सोडण्यास फार अशक्त होते ते खेरीज करून बाकी **आग्रिजेन्टम्**चे दरोबस्त लोक **कार्थेज्**च्या लोकांनीं हल्ला करूं नये, ह्मणून बरीचशी लष्करी फौज बरोबर घेऊन पूर्वबाजूस **जेला**स जाणाऱ्या सडकेवर गोळा झाले. दुसरे दिवशीं सकाळीं **हिमिल्को** शहरांत शिरला. अतिशय संपत्तिमान् **ग्रीक** शहरांपैकीं **आग्रिजेन्टम्** हें एक होतें. त्याच्या स्थापनेपासून तों त्या दिवसापावेतों तीनशें वर्षांत कोणाही शत्रूचें पाऊल त्या शहरांत पडलें नव्हतें. शहरांतील सर्व घरें, चित्रें, पुतळे, उंची उंची सामान आणि सोन्यारुप्याचीं भांडीं यांनीं भरलेलीं होतीं. सहस्रावधि भक्त लोकांनीं वर्षानुवर्षे दिलेल्या देणग्यांनीं देवालयें अगदीं गच्च भरलेलीं होतीं. **हिमिल्को**नें त्यांपैकीं कांहीं एक राहूं दिलें नाहीं. जें कांहीं मौल्यवान् दिसलें—मग तें देवाचें असो कीं माणसाचें असो—तें सर्व त्यानें नेलें. ह्या वेळची एक चमत्कारिक गोष्ट आहे, ती अशी. **आग्रिजेन्टम्**मधील एक अतिश्रीमान् सावकार ह्या लुटीच्या वेळेला **अथीनी**च्या देवळांत जाऊन बसला. कारण त्याला त्याची सर्व संपत्ति

सोडून जाववेना. पण जेव्हां त्याला समजलें कीं, **हिमिल्को** देऊळ वगैरे कांहीं मोजीत नाहीं तेव्हां आपण होऊन त्यानें त्या देवळाला आग लावली व आपण आंत जळून मेला. **हिमिल्को**नें शहर हिंवाळ्याच्या अगदीं कडाक्याच्या वेळेस घेतलें. तें त्यानें उन्हाळा लागे तोंपावेतों ठेवलें. जेव्हां तो मोहिमेवर जाण्यास निघाला तेव्हां त्यानें घरेंदारें जाळून टाकिलीं व देवालयें अगदीं छिन्नविच्छिन्न करून टाकिलीं. शहर सोडतांच त्यानें **जेला**वर हल्ला सुरू केला. पहिल्यांदा भोंवतालचा प्रदेश त्यानें जाळला. अर्थातच कोणी त्याला आडवें आलें नाहीं आणि नंतर त्यानें शहरावर हल्ला केला. **जेला** शहराला कोणीं फारशी मदत केली नाहीं. त्याला स्वत:वरच सर्व ओझें घ्यावें लागलें. शिवाय तें शहर **आग्रिजेन्टम्**-सारखें मोठ्याशा बळकटीच्या जागेवरही बांधलेलें नव्हतें व लढाईला उपयोगी पडे अशी व्यवस्थाही त्याची कोणीं ठेवली नव्हती. तरी पण त्यांनीं मोठ्या शौर्यानें टिकाव धरला व विशेषत: बायकांनीं तर सुरक्षित ठिकाणीं दडून राहण्याचें नाकारलें एवढेंच नाहीं, तर शेवटपावेतों आपल्या बहादुरीची कमाल करून दाखविली.

इकडे काय झालें कीं **सायराक्यूस्**च्या फौजेचा मुख्य सरदार **डायोनिसिअस्** यानें साहाय्यार्थ ह्मणून एक मोठी फौज गोळा केली. किमानपक्ष तींत तीस हजार पायदळ, एक हजार घोडेस्वार व पन्नास मोठीं जहाजें होतीं. त्यानें **कार्थेजिनिअन्** छावणी आणि समुद्र यांच्यामध्यें आपल्या फौजेचा तळ दिला आणि या रीतीनें त्यांची सामग्री बंद पाडण्याचा प्रयत्न केला. दोघांचेंही ज्यांत फारसें नुकसान झालें नाहीं अशा सुमारें वीसएकदिवस लहानसान चकमकी चालल्या होत्या. तदनंतर त्यानें छावणीवर हल्ला करण्याचा निश्चय केला. हल्ला तीन बाजूंनीं एकदम करावयाचा असें ठरलें होतें. एक समुद्राच्या बाजूनें, दुसरा शहराच्या पश्चिम बाजूनें आणि तिसरा ज्या बाजूला लढाईच्या इंजिनांचा मारा विशेष जोरानें चालला होता तेथून. छावणीची समुद्राकडील बाजू अगदींच नरम होती. आणि सांगण्याचें नवल हेंच कीं त्याच बाजूनें अत्युत्तम टिकाव धरला आणि जर दुसऱ्या दोन बाजू चुकल्या नसत्या तर जय सुद्धां त्यांना मिळाला असता. पश्चिमेच्या तुकडीला चालून येण्यास फार उशीर लागला; कारण तिचा मारा सुरू होण्याच्या अगोदरं समुद्राच्या टोळीचा अगदीं पाडाव झाला होता आणि इंजिनें वगैरेंचा नाश करण्यकरितां जी टोळी येणार होती आणि जिचें

आधिपत्य **डायोनिसिअस्**कडेच होतें, ती मुळीं हल्ला करण्यापावेतों आलीच नाहीं.

आग्रिजेन्टम्नें जो मार्ग सुधरला तो स्वीकारण्याशिवाय दुसरी कांहीं तोड **जेला** शहराला उरली नाहीं. आणि त्याच रात्रीं त्यांनीं तें शहर शत्रूंना नासधूस करण्यास सोडून दिलें. आपुल्या मृतांना मूठमाती देण्यासाठीं ह्मणून एक दिवस लढाई तहकूब ठेवावी अशी विनंति **डायोनिसिअस्**नें **हिमिल्को**ला केली व अशा रीतीनें त्याला फसविलें. ज्यांना वाटेचे श्रम सोसतील असें वाटलें त्यांनीं एकदम शहर सोडलें. ह्याच रीतीनें **क्यामारिना** शहरही खालीं करण्यांत आलें. दोन्हींही शहरें लुटून फस्त करण्यांत आलीं.

सगळें **सिसिली** बेट **कार्थेज्**च्या ताब्यांत जातें असें आतां वाटूं लागलें. फक्त अतिमहत्वाचें असें **सायराक्यूस्** शहर काय तें आतां जिंकण्याचें राहिलें होतें. **कानी**च्या लढाईनंतर **हानिबाल् रोम**वर कां चालून गेला नाहीं, असें जसें प्रत्येक मनुष्याला विचारावेसें वाटतें तसेंच **हिमिल्को, जेला** आणि **क्यामारिना** घेतल्यावर **सायराक्यूस्**वर कां चालून गेला नाहीं, असा प्रश्न सहज विचारावासा वाटतो. अर्थातच **ग्रीक** संस्थानांपैकीं एका अतिबलाढ्य* संस्थानाच्या एका अति मोठ्या सेनेची **सायराक्यूस्**च्याच दरवाजाशीं अगदीं वाताहत झाली होती, ही गोष्ट त्याच्या स्मरणांत असेलच यांत कांहीं संशय नाहीं. शिवाय एवढ्या मोठ्या लष्कराला पोसणें आणि त्यांचा मुशाहिरा चालवणें हें सुद्धां फार अवघड काम होतें. पण सैन्यांत ह्याच सुमारास वाख्याचा उपद्रव सुरू झाला, त्यामुळें त्यानें तें सोडून दिलें हेंच खरें आणि संभवनीय कारण दिसतें. मागील वर्षीं सर्व उन्हाळाभर त्याच्या लष्करांत हा उपद्रव होताच आणि ह्या वर्षींही उन्हाळ्याच्या सुरुवातीबरोबर पुनः त्याची सुरुवात झाली. काय झालें असेल तें जरी पक्कें सांगवत नाहीं तरी एवढें खरें आहे कीं तो **कार्थेज्**ला परत आला तेव्हां त्याच्या फौजेंतील अर्धे लोक अजारानें गेले होते. कोणत्याही कारणानें ह्मणा त्यानें **सायराक्यूस्**नें मागणी केल्याशिवाय तह करण्याकरितां वकील पाठविले. **डायोनिसिअस्** तें करण्यास एका पायावर तयार होता. खालील शर्तींवर शेवटीं तह कर-

* **आथेन्स्**च्या **सायराक्यूस्** येथील पराभवामुळें तें संस्थान अगदीं बसलें ही गोष्ट **ग्रीस** देशाच्या इतिहासांत सुप्रसिद्ध आहे.

ण्यांत आला:—

१. **कार्थेज्**नें आपलीं सर्व जुनीं ठाणीं आणि **सिक्यानिअन्** लोकांचीं सर्व ठाणीं आपल्या ताब्यांत ठेवावीं.

२. **सेलिनस्, आग्रिजेन्टम्, हायमेरा, जेला** आणि **क्यामारिना** ह्यांपैकीं त्या त्या शहराच्या बाकी राहिलेल्या मूळ रहिवाशांनीं खुशाल येऊन राहावें पण ह्या शहरांला सभोंवतीं कोट नसावेत आणि त्यांनीं **कार्थेज्**ला खंडणी द्यावी.

३. **लिओन्टाइनी, मेसाना** आणि **सिकिल** जातीचे लोक स्वतंत्र रहावेत.

४. **सायराक्यूस् डायोनिसिअस्**च्या अंमलाखालीं राहावें.

५. जे कैदी किंवा जीं जहाजें एकमेकांनीं एकमेकांचीं घेतलीं असतील तीं ज्यांचीं त्यांस परत द्यावीं.

वास्तविक पाहतां ह्या मोहिमेंत जरी **कार्थेज्** यशस्वी जाहलें तरी शेवटीं त्याचें नुकसान फार जाहलें. जे लोक परत गेले त्यांनीं आपल्या देशांत वाखाही आपल्याबरोबर नेला. **कार्थेज्** आणि भोंवतालचा प्रदेश यांत तो अति जलदी पसरला आणि हजारों लोक प्राणास मुकले.

भाग तिसरा.

कार्थेज् आणि डायोनिसिअस्.

चारशें पांच सालच्या तहांत असें ठरलें होतें कीं डायोनिसिअस्नें सायराक्यूस् येथें राज्य करावें. पण असल्या परकीयांच्या मदतीनें तो त्या देशच्या लोकांना आवडता झाला नाहीं. आणि त्यानेंही आपल्या हातांत पुरेशी सत्ता आलीसें वाटल्याबरोबर ती मदत झुगारून दिली. तो तदनंतर सायराक्यूस्च्या लोकांची मर्जी संपादण्याच्या खटपटीस लागला. ३९७ त त्यानें सायराक्यूस्च्या लोकांची एक सभा भरविली आणि कार्थेज्वर स्वारी करण्याची सूचना सभेपुढें ठेविली. तो ह्मणाला, 'ह्या वेळेस पाहिलें तर कार्थेज् संस्थान वाख्यानें फार निःशक्त झालें आहे. तरी पण त्याच्या मनांत जी आपणावर स्वारी करण्याची आहे ती तें संधि मिळाली कीं लागलीच करण्यास सोडणार नाहीं. तेव्हां आपण वेळींच सावध होऊन तें पूर्वस्थितीस येण्याच्या पूर्वींच त्यावर चालून जावें हें बरें.' लोकांना ही डायोनिसिअस्ची सूचना फार मानवली. त्यांतही डायोनिसिअस्नें सायराक्यूस् शहरांत असणाऱ्या कार्थेजिनिअन् लोकांची मालमत्ता व बंदरांत असलेल्या कार्थेज्च्या व्यापाऱ्यांची जहाजें लुटण्याची परवानगी दिली, तेव्हां तर ह्या गोष्टीस त्यांनीं मोठ्या उत्साहानें अनुमोदन दिलें. सायराक्यूस्मध्यें जी ही लूट झाली त्याची बातमी बेटांत चहूंकडे पसरली

आणि सर्व ठिकाणीं **कार्थेज्**चे लोकांची कत्तल सुरू जाहली. **कार्थेज्**नें मागील जयाच्या वेळेस जीं निर्दय व क्रूर कृत्यें केलीं होतीं त्यांचा तंतोतंत मोबदला त्यास ह्या वेळीं लोकांनीं दिला. **कार्थेज्**चा अंमल फार जुलमाचा असे व ते जी खंडणी घेत असत ती नेहमीं लोकांच्या आहाराच्या बाहेर असे. शिवाय **कार्थेज्**चे लोकांच्या रीतीभातींचा **ग्रीक** लोकांना अगदीं मनापासून तिटकारा असे. ह्या सर्वांचा परिणाम असा झाला कीं जीं **ग्रीक** शहरें मागील तहानें **कार्थेज्**च्या ताब्यांत गेलीं होतीं तीं **कार्थेज**च्या विरुद्ध उठलीं. त्यांनीं बहुतेक **कार्थेजिनिअन्** लोकांना ठार केलें. त्यांचाच कित्ता **सिसिलीं**तील मूळ रहिवाशांनीं उचलला आणि थोडकेच दिवसांत पश्चिम किनाऱ्याच्या कांहीं ठाण्यांशिवाय **कार्थेज्**चें **सिसिली**च्या बेटांत कांहींएक राहिलें नाहीं.

युद्धनियमांप्रमाणें लढाई जाहीर व्हावयाच्या अगोदरच ह्या सर्व गोष्टी झाल्या होत्या. अर्थातच **डायोनिसिअस्** ती जाहीर करण्यास चुकला नाहींच. **कार्थेज्**कडे त्यानें खालील निरोप वकीलामार्फत पाठविला. 'जर **ग्रीक** शहरांना स्वतंत्रता देण्यास **कार्थेज्** तयार असेल तरच शांतता राहील नाहींतर **कार्थेज्**ला लढाई करण्यास तयार राहिलें पाहिजे.' **कार्थेज्**ची एव्हां लढाई करण्याची मुळींच तयारी होण्यासारखी नव्हती. कारण गेली मोहीम व वाख्याचा उपद्रव या दोहोंमुळें त्यांचें नुकसान अतिशय झालें होतें; तरी पण मागितलेली शर्त कबूल करणेंही अगदीं अयोग्य व असंभाव्य होतें आणि म्हणून **कार्थेज्**नें लढाईची तयारी केली. द्रव्याचा त्यांच्यापाशीं अगदीं भरभक्कम पुरवठा होता व त्यामुळें त्यांना भाड्यानें माणसें नेहमीं मिळत. ह्याही वेळेस त्यांनीं युरोपांतून भाड्यानें शिपाई मिळविण्यासाठीं राजसभेचे सभासद जिकडे-तिकडे धाडले.

डायोनिसिअस् आपले जासूद परत येण्याची वाट न पाहतां बेटाच्या पश्चिमभागावर चालून गेला. त्याचा रोंख **सिसिलीं**तील **कार्थेज्**चें मुख्य बंदर व दारूगोळ्याचें ठिकाण जें **मोट्या** त्यावर होता. सर्व **ग्रीक** शहरांचे लोक त्याला मिळाले. एकंदर मिळून त्याच्या फौजेंत ८०,००० पायदळ व सुमारें तीन हजारांवर घोडेस्वार होते. शिवाय २०० जहाजांचें आरमारही त्याच्या मदतीस होतें. **मोट्या**चा किल्ला एका बेटावर होता. त्याच्या आणि मुख्य बेटाच्यामध्यें सुमारें पाऊण मैलाचा समुद्र होता. साधा-रणतः मुख्य बेटावर जाण्यासाठीं एक दगडाची दरड होती. पण आवश्यक

वाटल्यास ही दरड काढून टाकतां येत असे व ह्या वेळेसही ती काढून टाकण्यांत आली होती. **डायोनिसिअस्**नें आपल्या इंजिनीअर लोकांच्या मदतीनें ती जागा तपासून घेऊन त्याला वेढा दिला. तें बंदर आणि तो सर्व किनारा त्यानें वेढून घेतला होता आणि अर्धीमुर्धी खाडीही त्यानें भरून काढली होती. त्यामुळें शहरकोटावर लढाईची इंजिनें चालवतां येण्याजोगीं होतीं. शत्रुपक्षाकडील फौजेचा सरदार **हिमिल्को** हा कांहीं आळशासारखा राहिला नव्हता. त्यानें **कार्थेज्**हून खुद्द **सायराक्यूस्**कडे दहा जहाजें पाठविलीं व त्यांनीं तेथील जहाजांची पुष्कळ खराबी केली. तदनंतर त्यानें **मोट्या**ला वेढून घेतलेल्या सैन्यावर एक मोठा प्रबळ हल्ला केला. आपण स्वत: आपल्या हाताखालीं एक शंभर जहाजांचें आरमार घेऊन रात्रीचा **कार्थेज्**हून **सेलिनस्**ला आला व तेथून कांठाकांठानें सकाळीं **मोट्या**पासून जरा अंतरावर आला. तेथें वेढून बसलेल्या जहाजांपैकीं त्यानें कांहीं जाळलीं व कांहीं बुडवून टाकलीं. **ग्रीक्** जहाजें बाहेर जमीनीवर ओढून टाकण्यांत आलीं होतीं. **डायोनिसिअस्**चें एकदम तीं समुद्रांत ढकलण्याचें धैर्य होईना कारण त्याच्या सर्व जहाजांना फिरण्यासवरण्या इतकें बंदर मोठें नव्हतें. **डायोनिसिअस्**नें बंदरापासून समुद्रापर्यंत लांकडांच्या फळ्या टाकून त्यांवरून जहाजें ढकलीत ढकलीत न्यावीं असा हूकूम केला. **हिमिल्को**नें त्याच्या आड येण्याची बरीच खटपट केली. **सायराक्यूस्**ची कांठांवर जी फौज होती तिनें **क्याटापुल्ट्** नांवाच्या यंत्रांतून बाणांचा वर्षाव **कार्थेज्**च्या लोकांवर करून सोडला. **क्याटापुल्ट्**चा शोध त्यावेळेस अगदीं नवा होता. त्यामुळें सध्यां जशी रानटी लोकांना बंदुका, तोफा वगैरे पाहून भीति वाटते, तशीच त्यांनाही अतिशय भीति वाटली. **हिमिल्को**चें आरमार सुमारें शत्रूच्या निम्में इतकेंही नव्हतें त्यामुळें शत्रूशीं सामना करण्याचें धाडस न करतां **कार्थेज्**लाच तो परत गेला.

बचावाचा प्रयत्न अशा रीतीनें निर्फळ गेल्यामुळें तर **डायोनिसिअस्**नें हल्ल्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालविलें. लढाईच्या घणांनीं भिंती तेव्हांच पाडून टाकण्यांत आल्या आणि शत्रूंनीं आपल्या शरवृष्टीनें कोटावरील शिपायांस मागें हटविलें. किल्ल्याच्या सभोंवती शत्रूंनीं आपले लांकडाचे बुरूज चढवून दिले आणि सहा सहा मजले पावेतों देरेक मजल्यावर शिपाई ठेवून दिले. त्यामुळें त्या शिपायांना शहराचीं घरें सुद्धां मारा करण्यास कांहीं

उंच नव्हतीं. इकडे **मोट्याच्या** लोकांनींही बचावाची तयारी मोठ्या जारीनें केली. शस्त्रापासून आपला बचाव होण्यासाठीं चिलखतें वगैरे घालून त्यांनीं मोठमोठ्या डोलकाठ्या उभारल्या व त्यांच्या आडव्या काठ्यांवर चढून मोठमोठे काकडे इंजिनांत टाकले व टर्पेंटाईन् तेलांत बुचकळून वाखाच्या जुळ्याच्या जुळ्या टाकल्या आणि अशा रीतीनें शत्रूंची फार धांदल उडवून टाकली. कारण स्वतःचें सैन्यच त्यांना संभाळतां संभाळतां पुरेवाट झाली. तरी पण हल्ला चालूच होता व होतां होतां शेवटीं किल्ल्याच्या तटाला भोंक पडलें. भोंक पडल्यावर मोठी कडाक्याची लढाई सुरू जाहली. **ग्रीक** लोक मागें सोसलेल्या सर्व हालांबद्दल सूड उगवून घेण्यास अतिशय उत्सुक झालेले होते. तसेंच समुद्र किंवा जमीन यांपैकीं कोणत्याही मार्गानें कोणत्याही तऱ्हेनें सुटून जाण्याचा मार्ग नाहीं आणि **ग्रीक** लोक आपणांवर कधींही दया करणार नाहींत अशी **कार्थेजिनिअन्** लोकांची खातरी असल्यामुळें ते अगदीं जिवावर उदार होऊन लढत होते. जेव्हां तटावर टिकाव धरवेना तेव्हां त्यांनीं रस्त्यावरच भिंती घातल्या आणि ते दरेक घराचें किल्ल्याप्रमाणें लढून संरक्षण करीत गेले. **ग्रीक** लोकांनीं रस्त्यावर आपले बुरूज आणले आणि तेथून घरांच्या मजल्यावर चढून आंत शिरले. तरी पण **मोट्याच्या** लोकांनीं धैर्य सोडलें नाहीं. आणि ज्यू* लोकांनीं **रोमन टायटस्**शीं लढून ज्या धैर्यानें **जेरुसलेम्** शहराचा बचाव केला होता त्या निश्चयानें व धैर्यानें ते शेवटपावेतों लढलें. ह्या रस्त्यावरील चकमकींत **ग्रीक्** लोकांचें फार नुकसान झालें. **मोट्याचे** लोक जिवाची पर्वा बिलकुल बाळगीत नव्हते व त्यांना रस्त्यांची माहिती चांगली होती त्यामुळें त्यांचें बरेंच फावलें. शेवटीं जेथें जोराचें कांहीं चाललें नाहीं तेथें युक्तीनें काम फत्ते केलें. बरेच दिवस रोज संध्याकाळच्या सुमारास शिंग वाजलें कीं लागलीच **ग्रीक्** लोक लढाई सोडून आपआपल्या छावणीकडे परत जात. शिंग लढाई तहकूब करण्याचें चिन्हच समजलें जात असे व शहरचे लोकही नियमित गोष्टींपैकीं ही एक समजत असत. पण **डायोनिसिअस्**नें एक दिवस अंधार जाहल्यावर एक निवडक टोळी पुनः हल्ला करण्यास पाठविली. शहरच्या लोकांना बातमी लागण्याच्यापूर्वीं ह्या टोळीचे लोक कांहीं घरांत दडून बसले. त्यांच्या पाठो-

* हा बचाव सिद्धीस गेला नाहीं. **जेरुसलेम** इ. स. ७० सालीं **रोमन** लोकांनीं कबज्यांत घेतलें. हा वृत्तांत फारच हृदयद्रावक आहे. सर्वांनीं हा वृत्तांत अवश्य वाचावा.

पाठ दुसरी फौजही त्या बुजवलेल्या खाडींतून आली आणि तिनें **मोट्या** सर करून घेतलें. लढाईचा क्रूरपणा जीमुळें विशेष भीतिप्रद वाटतो व जी गोष्ट लढाई पाठोपाठ नियमानें व्हावयाचीच अशी कत्तल एकदम सुरू जाहली. दयार्द्र अंत:कारणामुळें नव्हे तर आपल्याला गुलामाप्रमाणें विकावयास लोक सांपडतील व अशा रीतीनें पैसा मिळेल म्हणून **डायोनिसिअस्**च्या मनांत कत्तल बंद करावयाची होती पण त्याचें कोणींही ऐकलें नाहीं. शेवटीं त्यानें असा हुकूम केला कीं जे लोक जिवंत असतील त्यांनीं देवालयांत जाऊन देवाच्या आश्रयानें आपले प्राण वांचवावे. ही सूचना लोकांना तेव्हांच पसंत पडली. पण ह्यामुळें **डायोनिसिअस्**च्या शिपायांना यथास्थित लूट करण्यास सांपडली व त्यानें ही त्यांना बंद करण्याचा प्रयत्न केला नाहीं. पुढच्या मोहिमेंत येण्यासाठीं उत्तेजनार्थ म्हणून सर्व शहर त्यांना लुटावयास दिलें. ज्या टोळीनें छापा घातला त्यांच्यातल्या मुख्याला ४०० रुपयांचें बक्षीस दिलें व इतर ज्या ज्या लोकांनीं बाहादुरी गाजविली त्या सर्वांनाही बऱ्याच देणग्या दिल्या.

आपलें **सिसिलीं**तील राज्य पुन: मिळविण्यासाठीं एक जंगी फौज **कार्थेज्** तयार करीत होतें. कमींत कमी धरलें, तरी अदमासें एक लक्ष माणूस फौजेंत होतें. शिवाय तीस हजार लोक **सिसिलीं**त आल्यावर त्यांना आणखी मिळाले. **हिमिल्को**च पुन: सेनाधिपति झाला. **डायोनिसिअस्**चे गुप्त हेर **कार्थेज्**मध्यें आहेत असें त्याला ठाऊक असल्यामुळें दरेक टोळीच्या कप्तानाला **प्यानोर्मो**ला जाण्याविषयीं लेखी मोहोरबंद हुकूम त्यानें दिला. वाटेंत त्याच्यावर एका **सायराक्यूसन्** आरमारानें हल्ला करून त्यांच्यापैकीं पन्नास जहाजें बुडविलीं; सुमारें पांच हजार माणसें ठार केलीं व सुमारें दोनशें रथ नाहींसे केले. नंतर **हिमिल्को** आपलीं लढाईचीं जहाजें घेऊन चालून आला. तेव्हां **सायराक्यूसन्** लोक पळून गेले. **कार्थेजिनिअन्** सरदार **मोट्या** वरून गेला. जातां जातां **मोट्या** घेण्यास त्याला बिलकूल अडचण पडली नाहीं. **डायोनिसिअस्**ची त्याच्यावर हल्ला करण्याची हिम्मत होईना; ह्मणून तो **सायराक्यूस्**ला परत गेला.

यावर **हिमिल्को**नें एक मोठा साहसाचा व्यूह मनांत रचला. तो हा कीं आपल्या सर्व सैन्यासह एकदम **सिसिली**च्या ईशान्य बाजूस **मेसाना** शहरावर जाऊन धडकावयाचें. **मेसाना**चें बंदर मोठें विशाळ व सुंदर होतें. ह्यांचीं

सहाशेंहून अधिक जहाजें सर्व त्यांत सहज मावलीं असतीं. **इटली**ही तेथून अगदीं जवळ. तेव्हां लागल्यास नवी मदत मिळण्याची सोयही चांगली होती. शिवाय **ग्रीस**ही तेथून फार दूर होतें असें नाहीं. तो आपल्या सर्व आरमारासह उत्तरेच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें गेला; आणि **सिसिलीं**तील अगदीं ईशान्य बाजूच्या कोपऱ्यांत (**पालर्मो**) **पेलोरम्** येथें त्यानें तळ दिला. तेथून **मेसाना** फक्त सहा कोस दूर होतें. **मेसाना**चे लोक हें पाहून घाबरले. त्यांच्या तटाची डागडुजी वगैरे कितीएक दिवसांत केलेली नव्हती. त्यांचे स्नेहीही कोणी जवळ पास नव्हते. शिवाय त्यांच्या सैन्याचा बराच भाग **सायराक्यूस्**कडे पाठवून दिलेला होता. तेव्हां त्यांनीं पहिली गोष्ट केली ती ही कीं आपलीं बायकांपोरें आणि विशेष मौल्यवान् जिनसा दुसरीकडे पाठवून दिल्या आणि मग बचावाची तयारी करण्यास ते लागले. व कांहीं लोकांना एका जुन्या भविष्याची आठवण होऊन ते लढण्यास उत्सुक झाले. तें भविष्य असें होतें कीं '**कार्थेज्**चे पुत्र **मेसाना** शहराचे रस्त्यांत पाणी आणतील.' ह्या भविष्याचा अर्थ **मेसाना**च्या लोकांनीं असा केला कीं **कार्थेज्**चे लोक आपले शहरांत गुलाम होऊन राहतील. **कार्थेज्**चे लोक जर जमिनीवर उतरूं लागले तर त्यांना अटकाव करा असा हुकूम देऊन त्यांनीं कांहीं सैन्य **हिमिल्को**च्या छावणीकडे पाठविलें. ही बातमी लागतांच दोनशें जहाजांचें एक आरमार खुद्द शहरावर हल्ला करण्याकरितां **हिमिल्का**नें पाठविलें. त्याला वाटलें कीं इकडे सैन्य पाठविल्यावर शहरांत बंदोबस्त साधारणच असेल. त्या जहाजांना उत्तरेचा अनुकूळ वारा लागल्यामुळें **मेसाना**च्या लोकांपेक्षां ते लोक पुष्कळ आधीं पोहोंचले. त्या लोकांना बिनहरकत सर्व सैन्य जमीनीवर उतरतां आलें. तें सैन्य तटाच्या खिंडारांतून एकदम शहरांत शिरलें आणि अनायास त्यांनीं तें शहर काबीज केलें. कांहीं थोड्या लोकांनीं थोडा टिकाव धरण्याचा आव घातला. पण व्यर्थ प्राणास मुकले—कांहीं आसपासच्या किल्ल्यांत पळून गेले व कांहींनीं तर खाडी पोहून **इटली**कडे जावें या हेतूनें शेवटचा उपाय म्हणून खाडींत उड्या टाकल्या. त्यांपैकीं पन्नास पलीकडच्या कांठाला सुरक्षित पोहोंचले. **हिमिल्को**चा भोंवतालचे किल्ले घेण्याचा प्रयत्न निर्फळ झाल्यावर तो **सायराक्यूस्**कडे चालून गेला.

एट्ना पर्वताच्या दक्षिणबाजूच्या उतरणीवर वसलेल्या **काटाना** शहरावर त्यानें प्रथम चाल केली; त्याचा मूळचा बेत आपलें आरमार व आपलें सैन्य

बरोबर ठेवण्याचा होता. पण हा निघाला त्याच समयास **एट्नाचा** ज्वालामुखी पर्वत समुद्राच्या बाजूला उठला; त्यामुळें तो रस्ता जाण्यायेण्यास अशक्य झाला; तेव्हां त्याला डोंगराला वळसा घालून पश्चिमेच्या बाजूनें यावें लागलें. **डायोनिसिअस्**नें ही सैन्याची फूट झालेली पाहून जोंवर त्याचें आरमार जमीनीवरच्या फौजेच्या आटोक्याच्या बाहेर होतें तोंपावेतों त्याच्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला. तो आपली फौज घेऊन समुद्राच्या किनाऱ्यानेंच **काटाना**पावेतों आला. **सायराक्यूस्**च्या आरमाराचा कप्तान् **लेप्टाइनिस्** हा त्या लष्कराबरोबरच आपलीं जहाजें ठेवीत होता. **कार्थेज्**च्या जहाजांचा कप्तान् **मेगो** ह्यानें जेव्हां हीं दोन्हीं सैन्यें मिळून येतात असें पाहिलें तेव्हां त्याला पहिल्यानें भीतिच वाटली. पण त्याला लढाईशिवाय दुसरा मार्गच नव्हता. **मेगो**चें आरमार कांहीं लहान नव्हतें. मालाचीं वगैरे मिळून एकंदर पांचशें जहाजें त्याचेपाशीं होतीं. त्याच्या मालाच्या जहाजांला सुद्धां तांब्याच्या अणकुच्या बसवलेल्या होत्या, त्यामुळें तीं हल्ला वगैरे करण्याच्या मोठ्या उपयोगास पडण्यासारखीं होतीं. **सायराक्यूस्**चा कप्तान् हा फाजील हिय्या करणारा माणूस होता. सर्व जहाजें एके ठिकाणीं व सारख्या रांगेनें ठेविलीं तरच एवढ्या मोठ्या **कार्थेज्**च्या आरमाराशीं टिकाव लागेल असें पक्कें जाणून **डायोनिसिअस्**नें **लेप्टाइनिस्**ला कोणत्याही कारणाकरितां जहाजें मागेंपुढें न करावीं असा सक्त हुकूम फर्माविला होता. पण हा हुकूम त्यानें पाळिला नाहीं. आपल्यापैकीं तीस अति जलद चालणारीं जहाजें घेऊन सर्व आरमाराच्यापुढें निघून **कार्थेज्**च्या जहाजांवर तो चालून गेला. पहिल्याप्रथम त्यानें शत्रूंचीं कांहीं जहाजें बुडविलीं व अशा रीतीनें कांहींवेळ ठीक चालविलें होतें. पण शेवटीं त्याच्याशीं टक्कर देण्यास आणलेलीं शत्रूंचीं जहाजें फार अधिक होतीं. त्यामुळें आपलीं जहाजें त्याला चालवतांच येईनात. अर्थातच, ह्या जहाजांवरून त्या जहाजांवर जातां येण्याइतकीं जहाजें जवळ जवळ आलीं ह्मणजे अमकें चांगलें किंवा अमकें वाईट असा भेदाभेद फारसा राहत नाहीं. थोड्याच वेळांत सांपडतील तितकीं जहाजें घेऊन **लेप्टाइनिस्** मोठ्या खुषीनें भर समुद्रांत निसटून गेला. अशा रीतीनें कप्तान गेल्यावर बाकीचीं जहाजें अव्यवस्थितपणानेंच पुढें आलीं व त्यांनीं टिकावही जेमतेमच धरला. सुमारें शंभरांवर जहाजें **कार्थेज्**नें आपल्या ताब्यांत घेतलीं. व कांहीं बुडवून टाकलीं. किनाऱ्यावर **सायराक्यूस्**ची फौज होती. थोडासा टिकाव

धरून फुटक्या तुटक्या जहाजांवरून जे कांठावर येण्याचा प्रयत्न करीत होते त्यांच्या सुद्धां ही फौज उपयोगीं पडूं शकली नाहीं. **कार्थेज्**च्या लोकांनीं आपल्या होड्या शत्रूंच्या फुटक्या होड्यांच्या आड घातल्या व **सायराक्यूस्**च्या फौजेच्या डोळ्यांसमोर त्या लोकांना पाण्यांत बुडवून त्यांचे प्राण घेतले. **ग्रीक** लोकांचे वीस हजारांवर लोक ह्या लढाईत मेले.

सिसिलींत ह्या पराभवाची वार्ता पसरली नाहीं तोंच **हिमिल्को**ला जाऊन गांठावें असा पुष्कळ लोकांनीं **डायोनिसिअस्**ला आग्रह केला. आणि पहिल्यांदा त्याच्याही मनांत तसें करण्याचें आलें होतें. पण विचाराअंतीं अधिक सावधगिरीचा विचारच करण्यांत आला व तो फौजेसह **सायराक्यूस्**ला निघून गेला. कदाचित् ही चूकही झाली असेल. ह्यामुळें त्याचे कित्येक दोस्त त्याला सोडून गेले एवढेंच नाहीं तर शत्रूंचा मोड करण्याची एक संधिही त्यानें दवडली. ही लढाई झाली नाहीं तों लागलीच तुफान होऊन दर्या खवळला. त्यामुळें **कार्थेज्**चे लोकांना समुद्रांत राहतां येईना. **ग्रीक** फौज नुसती कांठावर असती तरी सुद्धां अशा वेळेस शत्रूंची पुष्कळ खराबी त्यांना करतां आली असती. आपल्या आरमाराला मदत करण्याकरितां **हिमिल्को** अगदीं वेळेवर आला. त्यानें आपलीं व **ग्रीक** लोकांचीं जीं घेतलीं होतीं तीं सर्व जहाजें कांठावर ओढून काढविलीं, आणि त्यांची दुरुस्ती केली. कांहीं दिवस आपल्या सैन्यालाही विश्रांति दिली आणि तदनंतर **सायराक्यूस्**ला निघाला. निघण्यापूर्वी **डायोनिसिअस्**च्या हाताखालचे **इटलीं**तील भाड्याचे शिपाई छावणी देऊन **पट्ना** शहरीं राहिले होते ते आपणाकडे राहण्यास खुषी असल्यास पहावें ह्मणून, त्यांच्याकडे कांहीं मनुष्यें त्यानें पाठवून दिलीं. त्या **इटली**च्या लोकांच्या मनांत पुष्कळ यावेंसें होतें पण त्यांना येतां येईना. कारण ते अद्यापपावेतों नोकरींत होते आणि त्यांनीं **डायोनिसिअस्**ला जामीन दिलेले होते. त्यामुळें त्यांना **हिमिल्को**ला नाहीं ह्मणून सांगावें लागलें. आणि **हिमिल्को**ला त्यांना पिछाडीस ठेवून पुढें जावें लागलें.

सायराक्यूस्ला पोहोंचल्याबरोबर आपल्याजवळ खूप मोठें लष्कर आहे, व आपली तयारीही उत्तम तऱ्हेची आहे असें दाखविणें हें त्याचें पहिलें काम होतें. त्यासाठीं आपलें सर्व आरमार घेऊन तो तेथील बाहेरच्या बंदरांत शिरला. त्याच्या आरमारांत दोनशें लढाऊ जहाजें आणि लहान मोठीं मिळून सुमारें दोन हजार इतर जहाजें होतीं. बंदर सुमारें दीड मैल रुंद व दोन मैल

लांब होतें. तरी पण ह्या सर्व सैन्यानें तें अगदीं भरून गेलें. सुमारें तीन लक्ष फौज होती असें लोक सांगतात, पण ही संख्या विश्वसनीय असेलसें वाटत नाहीं. एकंदरींत **कार्थेज्**च्या फौजेचा हा देखावा मोठा भीतिजनक होता. **सायराक्यूस्**ची तर तटाच्या किंवा बंदराच्या बाहेर येण्याची छातीच होइना.

कार्थेज्च्या सरदारानें तीन किल्ले बांधून शहराला वेढा घालण्याची तयारी केली. त्या किल्ल्यांत त्यानें पिण्याची दारू व इतर सर्व सामग्री ठेविली. नवीन सामग्री आणण्यासाठीं त्यानें **सार्डिनिआ**ला आणि **आफ्रिके**ला मनुष्यें पाठविलीं. **डायोनिसिअस्**नेंही **ग्रीस** आणि **इटली**हून भाड्यानें किंवा आपखुषीनें लढण्यास शिपाई मिळाले तर पाहावें म्हणून मनुष्यें पाठविलीं.

जयाचा ओघ **कार्थेज्**च्या उलट दिशेस वाहतोसें दिसूं लागलें. **हिमिल्को**चें एक मालाचें जहाज बाहेरून **कार्थेज्**च्या छावणीकडे येत होतें. त्याच्यावर **सायराक्यूस्**नें आंतील बंदरांतून पांच जहाजें धाडलीं आणि तें काबीज करून घेतलें. **कार्थेजिनिअन्** लोकांनीं चाळीस जहाजांची एक टोळी ह्या हल्ला करणाऱ्यांवर पाठविली. त्यासरसें **सायराक्यूस्**नें आपलें सर्व आरमार तयार केलं; शत्रूच्या टोळीवर ते एकदम चालून गेले. त्यांनीं **कार्थेज्**ची चाळीसांपैकीं चोवीस जहाजें बुडविलीं, आणि कप्तानाचेंही जहाज घेतलें. त्यांनीं मग **कार्थेज्**च्या छावणीचे समोर आपलें सर्व सैन्य खडें केलें आणि **कार्थेज्**च्या लोकांना 'होत असेल तर लढाईला या' ह्मणून सांगितलें; पण **कार्थेज्** लढाईला आलें नाहीं.

पुनः तिसऱ्या वेळेस **ग्रीक** लोकांचा जुना कट्टा सहाय्यकर्ता व **कार्थेज्**चे लोकांचा पक्का शत्रु जो वाख्याचा उपद्रव तो **ग्रीक** लोकांच्या मदतीस पुनः तिसऱ्यांदा येऊन उभा राहिला. **हिमिल्को**ही आपल्या पूर्वीच्या अधिकाऱ्या-प्रमाणेंच फक्त शत्रूच्या एवढेंच नव्हे तर मित्रांच्या देखील धर्मसमजुतीसंबंधा-नेंही अगदीं बेफिकीर असे. त्यानें आपल्या किल्ल्यासाठीं शहराच्या बाहेरचीं सर्व थडगीं उकरून काढलीं होतीं. तसेंच शहरकोटाच्या बाहेर जीं हाताला, येण्याजोगतीं देवालयें होतीं तीं सर्व त्यानें लुटलीं. **डिमीटर** आणि **पेर्सि-फोन्**चें जें देवालय त्यानें लुटलें होतें तें मोठें संपत्तिमान् आणि प्रख्यात देवा-

लयांपैकीं एक होतें. लोक बहुतकरून असल्या पापकृत्यांचा आणि ह्या उपद्रवाचा संबंध जोडीत असत. पण दुसरी स्वाभाविक कारणेंही वाख्याला पुरेशीं त्या स्थळीं होतीं. अतिशयच मोठें सैन्य तेथें गोळा झालें होतें त्यामुळें गर्दी फार. शिवाय ऋतुमानाप्रमाणें दिवसही वाईट होते. पुनः उन्हाळा संपत आल्यामुळें ऊन मोठें कडाक्याचें पडत असे. ह्या वेळेस सध्यां जो वाख्याचा उपद्रव सुरू झाला होता तो बहुतांशीं अर्वाचीन वाख्यासारखाच होता. पहिल्यांदा सूज येत असे व अति कष्टप्रद अशा पांच सहा दिवसांच्या अजारानंतर बहुतकरून निश्चयानें देहावसान होत असे. रोग स्पर्शजन्य असल्यामुळें अजाऱ्याची लक्षपूर्वक शुश्रूषा करण्यास किंवा मरणोत्तर पुरण्यास देखील लोक फार भीत असत. असें सांगतात कीं, एका वेळेस दीड लाख मुडदे जमीनीवर कुजत पडले होते. जर ही असली गोष्ट विश्वसनीय असेल तर इतके मेले ह्याचें कांहीं फारसें नाहीं पण इतके जिवंत राहिले ह्या गोष्टीचें अतिशय आश्चर्य वाटतें.

हल्ला करण्यास आलेल्या लोकांच्या ह्या दुःखद स्थितीचा उपयोग करून घेण्यास **सायराक्यूस्**चे लोक चुकले नाहींत. **डायोनिसिअस्**नें जमीनीवरून व समुद्रावरून एकदम हल्ला करण्याचा संकेत केला. **लेप्टाइनिस्** नांवाचा एक **स्पार्टा**चा सेनापति होता त्याच्या हाताखालीं ऐंशीं जहाजें देऊन त्याला समुद्राकडून हल्ला करण्यास पाठविलें, आणि **डायोनिसिअस्**नें सैन्याची व्यवस्था आपणाकडेस घेतली. तो रात्रीचा शहराबाहेर आला आणि अगदीं उजाडतां उजाडतां त्यानें जमिनीच्या बाजूनें एकदम **कार्थेजिनिअन्** छावणीवर अचानक हल्ला केला. पहिल्यांदा थोडी त्यांची पिछेहाट झाली. पण ही त्यांच्या संकेताच्या बाहेर होती असें नाहीं. ह्या युक्तीनें प्रतिपक्ष्यांना अनुकूळ असे जे लोक होते त्यांची आयतीच विल्हेवाट लावावयास सांपडली. त्यांना अगदीं तोंडाशीं ठेवलें होतें आणि मागील सैन्यानें जसें त्यांना मागून मदत करण्याचें सोडलें तसें ते अगदींच निराधार झाले आणि मग **कार्थेज्**च्या लोकांनीं त्यांचे तुकडे तुकडे केले. पण **डायोनिसिअस्** जेव्हां आपल्या सर्व सैन्यासह पुढें सरसावला तेव्हां **कार्थेज्**च्या लोकांचा पराभव झाला एवढेंच नव्हे तर त्यांचा एक किल्लाही शत्रूंनीं घेतला. ह्याच सुमारास दुसऱ्या बाजूनें **सायराक्यूस्**च्या जहाजांनींही हल्ला करण्यास आरंभ केला. **कार्थेज्**च्या जहाजांची मुळींच लढण्याची तयारी नव्हती. त्या जहाजांवरचे बहुतेक

लोक उपद्रवानें परलोकीं गेले होते; त्यामुळें त्यांचा अगदींच पराभव झाला. किनाऱ्यावर फौज होती पण तिचा उपयोग फारसा झाला नाहीं. कारण फौज अगदीं सत्त्वहीन झालेली होती. त्यांतही त्यांच्यावर **सायराक्यूस्**चा पाठी-मागें सारखा तडाका होताच. तेव्हां शेवटीं **कार्थेज्**चे लोकांनीं कांहीं जहाजें अजी सोडून दिलीं. **ग्रीक** लोकांनीं तींच पकडून त्यांना आग लावून दिली. तीं जहाजें हेलकावत हेलकावत वाटेल तिकडे जात. त्यामुळें **ग्रीक** लोकांच्या लढाऊ गलबतांना, मालाच्या जहाजांना व एकंदर आरमारालाही आग लागली. होतां होतां ही आग छावणीलाही जाऊन पोहोंचली. छावणीचासुद्धां कांहीं भाग जळून खाक झाला. सारांश **सायराक्यूस्**ला अगदीं पूर्ण जय मिळाला. ज्या **झीअस्**च्या देवळांत **हिमिल्को**नें आपला स्वतःचा मुक्काम कांहीं थोडे दिवसांपूर्वी केला होता तेथेंच **डायोनिसिअस्**नें त्या रात्रीं तळ दिला.

अशी दुःस्थिती झाली तेव्हां **कार्थेज्**चा सरदार **हिमिल्को** यानें **सायरा-क्यूस्**च्या लोकांना न कळत **डायोनिसिअस्**शीं खासगी पत्रव्यवहार चाल-विण्याचा निश्चय केला. जर शिल्लक सैन्य आहे त्यानिशीं मला **आफ्रिकेस** जाऊं द्याल तर मी तीनशें ट्यालन्टस्* आपणास देण्यास कबूल आहें अशा अर्थाचें पत्र त्यानें धाडिलें. **डायोनिसिअस्**नें जबाब पाठविला कीं, शह-रच्या लोकांच्या मनांत अगदीं सुद्धां अंदेशा उत्पन्न न होऊं देतां एवढें सर्व सैन्य वाहून नेण्याचें अवजड काम करणें अगदीं अशक्य आहे. तर आपण स्वतः व **कार्थेज्**चे सर्व सरदार लोक एवढेच जर जात असलां तर त्याची व्यवस्था करूं. **डायोनिसिअस्**च्या मनांत **कार्थेज्**चे लोकांना फार त्रास देण्याचें नव्हतें, कारण त्यांचा स्नेह पुढें एखादे वेळेस उपयोगीं पडेल अशी त्याला आशा होती. कारण त्याची स्वतःची सत्ता **सायराक्यूस्**मध्यें बसावी तशी बसली नव्हती. शिवाय त्याचा अंमल काढून टाकण्याविषयींही कांहीं मोठे वजनदार लोक खटपट करीत आहेत असेंही त्याला एक दोन कारणांवरून शेवटीं दिसूं लागलें होतें. **हिमिल्को**ला **डायोनिसिअस्**नें पाठविलेला जबाब पसंत पडला. त्यानें आणि **कार्थेज्**च्या सरदारांनीं चवथे रात्रीं निघून जावें असें दोन्ही पक्षांच्या सरदारांनीं आपसांत ठरविलें. **डायोनिसिअस्**नें आपलें सैन्य त्या वेळेच्या अगोदरच गांवांत परत नेलें. ठरल्याप्रमाणें पैसाही

* ह्या नाण्याची किंमत सुमारें २३ पौंड ह्मणजे २७५ रुपये असे.

वेळेवर पाठविण्यांत आला. आणि **हिमिल्को,** त्याचे सरदार, त्याची मित्रमंडळी व **कार्थेज्**चे थोडेंबहुत सैन्य इतके ठरल्यावेळेस तेथून निघाले. त्यांना चाळीस जहाजें जावयास लागलीं. त्यांना कांहीं शत्रूंना समजल्याशिवाय पळ काढतां आला नाहीं. **कार्थेज्**चे लोक पळून चालल्याची बातमी **डायोनिसिअस्**कडे नेण्यांत आली. पण तो जेव्हां ह्या कामांत ढिलाई करतो आहे असें दिसून आलें तेव्हां बंदरांत असलेलीं **कारिन्थिअन्** जहाजें आपण होऊन शत्रूवर चालून गेलीं, व त्यांनीं त्यांचा कांहींवेळ पाठलाग केला. आणि अगदींच मंद अशीं जीं कांहीं जहाजें होतीं तीं पकडूनही घेतलीं.

अशा रीतीनें मुख्य सरदारानें नामर्दपणानें सोडल्यावर सैन्याची साधारणरीतीनें जितकी अनवस्था व्हावयाची तितकी अनवस्था ह्या फौजेची कांहीं झाली नाहीं. फौजेंतील **सिकेल्**च्या लोकांनीं एकदम छावणी सोडली आणि त्यामुळें **सायराक्यूस्**चे लोक हल्ला करावयास यावयाच्या अगोदर ते आपापल्या घरीं बहुतेक अंशीं सुखरूप जाऊन पोहोंचले. **स्प्यानिश्** लोकांनीं इतक्या जोराची शत्रूशीं टक्कर दिली कीं, **डायोनिसिअस्**नें मोठ्या खुषीनें त्यांना आपल्या तैनातीस ठेवून घेतलें. बाकीचें सैन्य एकदम शत्रूच्या स्वाधीन झालें आणि त्यांनीं ते सर्व लोक गुलाम ह्मणून विकून टाकले.

ह्या कृत्याला फार दिवस झाले नाहींत तोंच असल्या नामर्द आणि विश्वास घातकी कृत्याला योग्य जी शिक्षा ती **हिमिल्को**ला भोगणें प्राप्त झालें. ह्या महाअनर्थाचा वृत्तांत ऐकून सर्व **कार्थेज्** शोक करूं लागलें. सर्व घरें आणि सर्व देवालयें बंद करण्यांत आलीं. देवांच्या पूजाअर्चा वगैरे सर्व बंद पडल्या. फार तर काय पण गांवांतील सर्व दुकानें वगैरेही बंद झालीं. सर्व शहर **हिमिल्को** आणि त्याचे अनुयायी ज्या जहाजांतून येत होते त्या जहाजांना भेटण्यास जमा झालें. आणि जो तो आपल्या मित्राचें आणि आप्ताचें काय झालें ह्मणून तपास करूं लागला. जेव्हां साद्यंत खरी हकीकत त्यांना सांगण्यांत आली तेव्हां तेथील जमलेल्या सर्व लोकांत एकच कल्होळ उडून गेला. **हिमिल्को** जहाजावरून खालीं उतरला तो अगदीं दीनावस्थेंत असल्यासारखा दिसला. उतरल्याबरोबर तो आकाशाकडे डोळे करून हात जोडून आपणावर व आपल्या देशावर जीं संकटें देवानें आणलीं तीं सर्व आठवून मोठमोठ्यानें रडूं लागला. त्याच्या मनाला धीर वाटत होता तो एवढाच कीं कांहींही असो, आपणास कांहीं शत्रूंनीं जिंकलें नाहीं. देवाचाच कोप झाला तर काय

करावयाचें. त्याचसमयीं त्यानें स्वतः जीं पापें केलीं तीं सर्व लोकांसमक्ष कबूल केलीं आणि जें घडलें त्यासंबंधीं सर्व दोष प्रांजलपणें आपणावर घेतला. गांवांतील प्रत्येक देवालयांत जाऊन दरेक देवासमोर ह्या सर्व पापांचा उच्चार करून शेवटीं तो आपल्या घरीं गेला. आंत जाऊन आपण आपल्यास कोंडून घेतलें आणि आपल्या मुलाबाळांना देखील तोंड दाखविल्याशिवाय अन्नत्याग करून त्यानें आपला प्राण दिला.

एवढ्यानेंच ह्मणजे **कार्थेज्**चें दुर्दैव संपलें असें नाहीं. कांहीं थोड्या काळापूर्वीं तें सर्व **सिसिली** बेट पादाक्रांत करून घेण्याच्या बेतांत होतें; फक्त एक शहर काय तें घ्यावयाचें राहिलें होतें. आणि कांहीं महिने लोटले नाहींत तोंच त्याला स्वतःच्या अस्तित्वासाठीं लढाई करावी लागली. त्याची **आफ्रिकन्** प्रजा आणि **आफ्रिकन्** मित्र हे **कार्थेज्**चा अगदीं मनापासून द्वेष करीत असत. आणि ह्यासमयीं ते सर्व एक होऊन **कार्थेज्**च्या विरुद्ध उठले. त्यांनीं सुमारें एक लक्ष वीस हजार सैन्य गोळा केलें आणि **ट्यूनीस्** येथें आपलें मुख्य ठाणें केलें. कांहीं वेळपर्यंत त्या लोकांचा जम इतका चांगला बसला होता कीं, **कार्थेजिनिअन्** लोकांना कोटाबाहेरसुद्धां येण्याची हिम्मत होईना. कांहीं वेळपर्यंत सर्व शहर अगदीं उदासीन दिसलें. ह्या दृश्य भीतीशिवाय लोकांच्या मनाला ईश्वरीक्षोभाचाही धाक होताच. त्यांच्या सरदारानें **ग्रीक** लोकांच्या देवतांचा निरर्गल उपमर्द केला होता. **सायराक्यूस्**मध्यें एका देवतेच्या देवळांत यानें वस्ती केली होती व दुसरें एक देवालय त्यानें लुटलें होतें. **कार्थेज्**मध्यें पूर्वीं कधींही पूजन झालें नाहीं, अशा देवता **डिमीटर्** आणि **पेर्सिफोन्** यांच्या क्रोधाच्या उपशमार्थ **ग्रीक** लोकांच्या रीतीप्रमाणें त्यांना यज्ञयागादि उपचार करण्यांत आले. ते करण्यासाठीं **ग्रीक** लोकांतील अति सुंदर तरुण पुरुष शोधून काढून नेमण्यांत आले. हें सर्व अगोदर केल्यावर मग शहराच्या रक्षणाच्या कामाला ते लागले. आणि कशी कां म्हणाना पण खरोखर भीति दूर झाली. शत्रूच्या त्या अवाढव्य फौजेंत चार चोहोंकडून कसे तरी जमा केलेले काय ते लोक होते. त्यांचे एकमेकांत पटेना. त्यांना शिकवण्यासवरण्याला कोणी चांगले पुढारीही नव्हते. त्यांना थोड्याच वेळांत धान्याची टंचाई पडूं लागली. त्यांच्यापाशीं जहाजें तर मुळींच नव्हतीं. **कार्थेज्**च्या लोकांचा समुद्रावर ताबा होता व त्यांना **सार्डिनिआं**तून हवें तितकें धान्य आणतां येण्याजोगें होतें. त्यांची संपत्ति त्यांना

एवढ्याच रीतीनें उपयोगीं पडली असें नाहीं. त्यांच्या शत्रूंपैकीं जे कांहीं बलाढ्य होते त्यांपैकीं कांहींकांना आपल्या बाजूचे करून घेण्यासही त्यांचा पैसा त्यांना उपयोगीं पडला. अशा रीतीनें कांहीं थोड्या महिन्यांत **लिबिआची** सर्व फौज कोठेंच्या कोठें विरून गेली आणि **कार्थेज्** भयमुक्त जाहलें.

भाग चवथा.

डायोनिसिअस्शीं शेवटचें युद्ध.

आतां **कार्थेज्**ची सत्ता **सिसिली**च्या पश्चिमभागांत कांहीं थोड्या भागावर काय ती राहिली होती. पण त्याला या हद्दीच्या आंतच सारखें राहणें बरें वाटेना. तेव्हां आपली सरहद्द वाढवि- ण्याचा प्रसंग आला कीं लागलीच तो साधून घेण्याचा प्रयत्न करण्यास त्यानें कमी केलें नाहीं. **डायोनिसिअस् ग्रीक** लोकांना नेहमीं प्रतिकूल असणाऱ्या आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्याला फौजफांटा वगैरे देऊन नेहमीं मदत करणाऱ्या **सिसिलीच्या** मूळ रहिवाशांना जिंकून घेण्याच्या कामांत गुंतून गेला होता. **सिकेल्** लोकांनीं (**सिकेल्** आणि **सिकिअन्** अशा दोन मूळ रहिवाशांच्या जाती होत्या.) **टारोमिनिअम्** येथें एक नवीन संस्थान स्थापन केलें. **डायो- निसिअस्**नें तें स्थान काबीज करण्याची अतिशय खटपट केली, पण त्यास यश न येतां उलट पुष्कळ खराबी होऊन परत फिरावें लागलें, आणि स्वतःसही एक जखम लागली. हें पाहून कांहीं **ग्रीक** शहरांनींही **सायराक्यूस्**चें स्वामित्व झुगारून दिलें; **सिकेल्**चे लोक तर त्याच्याविरुद्ध उठलेच होते. **कार्थेज्**चे प्रांतांचा मुख्य सरदार **मेगो** जो आपल्या प्रजाजनांत आणि आसपासच्या लोकांत प्रिय होण्यासाठीं झटून खटपट करीत होता, त्यानें एकदम लढाई सुरू केली आणि एकदम पूर्वदिशेस **मेसाना**पर्यंत चालून गेला. **डायो-**

निसिअस्नें परत येतांना त्यास गांठलें आणि एक निकराची लढाई लढून त्याचा पराभव केला. **मेगो**चे ह्या लढाईंत सुमारें ८००० लोक पडले. **कार्थेज्** आपली पूर्वींची कुवत हलके हलके मिळवीत चाललें होतें. आणि **सिसि-लीचा** कांहीं भाग घेण्याचा तर त्याचा निश्चयच होता. त्याचीं नेहमींचीं सैन्य मिळविण्याचीं ठिकाणें **आफ्रिका, सार्डिनिआ, इटली** यांजकडून ऐंशींहजार सैन्य **कार्थेज्**नें जमा करून **सिसिलींत** पाठवून दिलें आणि **मेगो**ला सेनाधिपति नेमिलें. **मेगो** मूळ रहिवाशांच्या , सर्व प्रांतांतून हिंडला आणि जेथें तेथें **डायोनिसिअस्**च्या विरुद्ध हत्यारें उचलण्याविषयीं सगळ्यांना सांगत फिरला. एका मोठ्या बलाढ्य जातीनें त्याचें मुळींच ऐकलें नाहीं त्यासाठींच त्यानें तेथें कांहीं दिवस मुक्काम केला. इतक्यांत **डायोनिसि-अस्**नें सुमारें वीस हजार फौज गोळा केली व त्यासह शत्रूशीं सामना देण्यास निघाला. **सिकेल्**चे सरदारांना आपणाकडचे करून घेऊन त्यानें **कार्थेज्**चे फौजेस जेरीस आणलें. **मेगो**चे मनांत त्यानें लढाई द्यावी असें फार होतें व त्याच्या हाताखालच्याही कांहीं लोकांचा सदरप्रमाणेंच अभिप्राय होता. पण त्यानें लढाई देण्याचें स्पष्टपणें नाकारलें. **कार्थेजिनिअन्** सेनेचा तळ परकी देशांत असल्यामुळें त्यांना धान्य वगैरेची तूट पडली व तहाची मागणी करावी लागली. तह करण्यांत आला. तहाच्या शर्तींत एक शर्त अशी होती कीं, **सिकेल्** लोकांनीं **सायराक्यूस्**च्या ताब्यांत रहावें. ह्यामागें **सिकेल्** लोकांनीं **कार्थेज्**ला पुष्कळ वेळां चांगली मदत केली होती. अर्थातच इतक्या-संबंधानें तर ह्या लढाईमुळें **फिनिशिअन्** लोकांच्या सत्तेला धक्काच बसला.

पुढें पुनः लढाई **डायोनिसिअस्**नें उकरून काढली, असें दिसतें. **साय-राक्यूस्** येथें त्याचें वजन चांगल्या तऱ्हेनें बसलें होतें आणि त्याची सत्ताही सारखी वाढत चालली होती. ती सत्ता दृढ करण्याची आणि बाकीचे आपले प्रतिपक्ष्यांना बेटांतून हांकून देण्याची त्याची फार इच्छा होती. **कार्थेज्**च्या हाताखालचीं संस्थानें नेहेमींप्रमाणेंच **कार्थेज्**ला चांगलें इच्छीत नव्हतीं. **डायोनिसिअस्**नें त्यांचीं गाऱ्हाणीं लक्षपूर्वक ऐकिलीं; त्यांना बंड करण्यास उत्तेजन दिलें, आणि त्यांना आपल्या तर्फेचे करून घेतलें. **कार्थेज्**नें ह्या सर्व कृत्यांचीं गाऱ्हाणीं पोंहोचविण्यासाठीं वकील पाठविले, पण त्यांची कांहींच दाद लागेना व प्रकरणेंही तोडजोडीला लागेनात असें पाहिलें, तेव्हां लढाई करण्याचा त्यानें निश्चय केला. हें कृत्य मोठें भयंकर होईल असें जाणून पहिल्यापासूनच

कार्थेज्नें विशेष तयारी ठेविली होती नेहेमींप्रमाणें भाड्यानें तर एक मोठें सैन्य गोळा केलें होतेंच. शिवाय खुद्द **कार्थेजिनिअन्** लोकांचीही एक टोळी त्यांनीं तयार केली. खरोखर पाहतां असें कधींही मागें झालें नव्हतें. यावरून असें वाटतें कीं **कार्थेज्**चे लोकांची ही वेळ मोठी आणीबाणीची आहे, असा पक्का ग्रह झाला होता. लढाई **इटली** आणि **सिसिली** दोन्हीही देशांत चालली होती असें दिसतें. पण ती कां आणि कशी या संबंधानें कांहींएक माहिती आपणापाशीं नाहीं. **इटलीं**तील लढाईचे संबंधानें माहिती तर अगदीं शून्य. **सिसिलीं**त दोन मोठ्या लढाया झाल्या, पहिली **काबाला** येथें जाहली. **डायोनिसिअस्**नें शत्रूंचा मोठा पराजय केला. सुमारें दहाहजार लोक लढाईंत ठार मारले व पांचहजार कैद केले. बाकी राहिलेले लोकांना मुळींच पाणी न मिळे अशा एका टेंकडीवर पळून जाऊन दडून बसावें लागलें. लढाईंत **कार्थेजिनिअन्** सेनाधिपति **मेगो** पडला. **कार्थेजिअन्** लोकांनीं तहाची मागणी केली. **डायोनिसिअस्**नें उत्तर पाठविलें कीं, सर्व **सिसिलीं**तील शहरें मोकळीं करून देत असलां व दंड ह्मणून लढाईंत खर्च जाहलेला सर्व पैसा देत असलां तर तहाचें मागणें कबूल करतों. ह्या शर्ती खरोखरच दुस्सह होत्या. कांहींतरी थोडें कमी करणें आवश्यकच होतें. **कार्थेजिनिअन्** सरदारांनीं उत्तर पाठविलें कीं, एवढ्या मोठ्या महत्त्वाचा, विशेषतः सर्व **कार्थेज्**चीं ठाणीं सोडून देण्याचा तह आमच्याच अधिकाराच्या बळावर करण्यास आम्हाला अधिकार नाहीं. खुद्द **कार्थेज्**ला आह्माला विचारलें पाहिजे तोंपावेतों कांहीं थोडे दिवसांपुरता हंगामी तह तरी करा अशी प्रार्थना केली. **डायोनिसिअस्**नेंही ती लागलीच मान्य केली. ह्या वेळांत **कार्थेज्**चे लोकांनीं पुनः सामन्याची तयारी केली. **मेगो**ला मोठ्या समारंभानें व योग्य सन्मानानें पुरलें. व त्याच्या मुलाला त्याच्या जाग्यावर नेमिलें. जरी तो वयानें लहान होता, तरी मोठा शौर्यवान् व कर्ता पुरुष असून सेनाधिपत्य करण्यास योग्य होता. सर्व सैन्याला कवाईत शिकविण्यांत व त्यांना लढाईसाठीं तयार करण्यांत **कार्थे-जिनिअन्** लोक आपला सर्व वेळ घालवूं लागले. तहाची मुदत संपल्याबरोबर ते छावणीच्या बाहेर आले आणि **डायोनिसिअस्**शीं लढाई दिली. लढाई **क्रोनिअम्** येथें झाली आणि तींत **ग्रीक** लोकांचा अगदीं पराभव झाला. **डायोनिसिअस्** एका बाजूवर होता, आणि त्याचा भाऊ **लेप्टाइनिस्** जो मागें दोन वेळ **सायराक्यूस्**चा कप्तान होता त्याच्या हाताखालीं फौजेची दुसरी

तुकडी होती. **डायोनिसिअस्**च्या हाताखालचे लोक फार शूर होते, व कांहीं वेळ पावेतों तो विजयी होता. इकडे त्याचा भाऊ **लेप्टाइनिस्** लढाईंत पडला व त्याच्या टोळीचाही पराभव झाला. त्याच्या मरणाची बातमी सैन्यांत पसरली तेव्हां सैन्यांतील सर्व शिपायांना मनांत मोठा धाक वाटला. **कार्थेजिनिअन्** लोकांनीं तर चहूंकडून सारखा मारा सुरू ठेवला होता. संध्याकाळीं लढाई बंद केली तोंपावेतों चवदा हजार **ग्रीक** लोक रणभूमीवर पडले असें ह्मणतात. **कार्थेज्**चे मनांत त्यांचा हा विजय चहूंकडे वाढ-विण्याचा नव्हता त्यामुळें ते लागलीच **प्यानोर्मस्**ला परत आले. दैव प्रतिकूळ झालें नाहीं तों जें मिळालें तेवढ्याचीच मजबुती करण्याचें त्यांच्या मनांत होतें, त्यामुळें त्यांनीं **सायराक्यूस्**शीं तहाचें बोलणें लावलें. **डायो-निसिअस्**नेंही तह लागलाच कबूल केला. तहाच्या शर्ती खालीं लिहि-ल्याप्रमाणें होत्या. **सायराक्यूस्**नें **कार्थेज्**ला १००० ट्यालन्टस् लढाईचा दंड म्हणून द्यावा. आणखी शिवाय **हेलसीअस्**च्या पश्चिमेस **आग्रिजेन्टम्**च्या ताब्यांत असलेले **सेलिनस्** आणि त्याच्या भोंवतालचा प्रदेश हे **कार्थेज्**ला मिळावे.

हा तह सुमारें पंधरा वर्षे राखण्यांत आला होता. तदनंतर **डायोनिसि-अस्**ला आपल्या जुन्या शत्रूवर हल्ला करण्याची पुनः संधि सांपडली. **कार्थेज्**-वर पुनः एकदां दैवाची कुऱ्हाड कोसळल्यासारखी झाली. त्यांचा जुना शत्रु वाख्याचा उपद्रव पुनः त्यांच्या भेटीस आला. त्याच्या अनुषङ्गानें येणारें दुसरें संकटही त्याच्या पाठोपाठ उभें होतें. तें कोणतें ह्मणाल तर त्यांच्या ताब्यांतल्या शहरांचीं बंडें. ही संधि पाहून **डायोनिसिअस्** आपली सरहद्द ओलांडल्याची सबब सांगून बरोबर ३८,००० पायदळ व तीन हजार घोडेस्वार घेऊन **कार्थेज्**च्या मुलखांत उतरला. **सेलिनस्**, **एन्टेलिअस्** आणि **एरिक्स्** हीं शहरें त्यानें जिंकलीं व आपलीशीं करून घेतलीं आणि लागलीच **लिलिबिअम्** नांवाच्या भूशिरावर असलेल्या त्याच नांवाच्या मोठ्या व्यापाराच्या शहराला वेढा दिला. पहिल्यांदा त्यानें हल्ला मोठ्या जोरानें चालविला होता. पुढें शहर अतिशयच मजबूत आहे असें त्याच्या लक्षांत आलें. तदनंतर **कार्थेज्**च्या सर्व गोद्या जळून गेल्या अशी बातमी त्या ठिकाणीं येऊन पोहोंचली. शत्रूंचीं सर्व जहाजें जळून गेलीं असतील असा विचार मनांत येऊन त्यानें **एरिक्स्**वर एकशें तीस जहाजें ठेवून बाकीचीं सर्व जहाजें परत **सायराक्यूस्**ला पाठवून दिलीं.

वास्तविक **कार्थेज्**चें त्या आगीमुळें विशेष नुकसान झालें नव्हतें. त्यामुळें त्यांनीं एकदम दोनशें जहाजें तयार करून **सिसिली**कडे पाठवून दिलीं. **ग्रीक** लोकांचा कप्तान ही संख्या पाहून घाबरला. त्याचीं अर्धीं अधिक जहाजें शत्रूंनीं हिरावून नेलीं. हिंवाळा अगदीं जवळ येत चालला त्यामुळें कसा तरी थोडे दिवसांपुर्ता तह करण्यांत आला. पुनः लढाई सुरू व्हावयाच्या अगोदर **डायोनिसिअस्** वारला.

त्याच्या मरणामुळें लढाई बंद पडली असें कांहीं झालें नाहीं, पण कांहीं एक महत्त्वाची बिना घडलीसें दिसत नाहीं. सुमारें एक वर्षानें तह ठरविण्यांत आला. पुढील वीस वर्षांचा **कार्थेज्**चा इतिहास कोठेंही सांपडूं शकत नाहीं.

भाग पांचवा.

कार्थेज् आणि टाय्मोलिअन्.

मागील भागांत सांगितलेंच आहे कीं, **डायोनिसिअस्**च्या मरणानंतर वीस वर्षांचें कांहींएक वृत्त आपणांसच काय पण जगासही माहीत नाहीं. त्या मुदतींत **कार्थेज्** आपली सत्ता हळूहळू वाढवीत चाललें होतें. **सिसिलीं**तील **ग्रीक** शहरांची स्थिती दिवसानुदिवस अधिक अधिक वाईट होत चालली होती. त्यांतील बहुतेक जुलमी राजाच्या हातांत सांपडलीं होतीं. आणि ते जुलमी राजे एकमेकांशीं कांहींना कांहींतरी खटपटी करीत असत व भांडत असत. **कार्थेज्** ही संधि पाहून आपली सत्ता एकसारखें वाढवीत होतें. तीनशें चव्वेचाळीसांत त्याची सत्ता इतकी वाढली होती कीं, जेव्हां मागील भागांत वर्णन केलेल्या मृत **डायोनिसिअस्**च्या त्याच नांवाच्या मुलानें कांहीं लोकांना **सायराक्यूस्**मधून हद्दपार केलें, तेव्हां त्या लोकांना बाहेरून **कारिन्थ**ची मदत मागावी लागली. खरोखर **कारिन्थ** **सायराक्यूस्**चें मूळ शहर होतें, व त्या दोहोंमध्यें स्नेहही चांगल्या तऱ्हेचा होता. **कारिन्थ**च्या लोकांनीं त्यांची प्रार्थना मान्य केली. दैवयोगानें त्यांच्यापाशीं ह्यांना देण्यासारखा मनुष्यही तयार होता. **टाय्मोलिअन् कारिन्थ** शहरांत अत्युच कुलांतील व उत्तम मनुष्यांपैकीं एक होता. पण तो अति दुर्भागी होता. त्याला एक अति अवघड काम कर्तव्य ह्मणून करावें लागलें होतें.

त्याचा एक अति आवडता भाऊ **कारिन्थ**मध्यें जुलूम करून राजा होण्याचा प्रयत्न करीत होता, त्यामुळें त्याला एकदम मारून टाकण्याचा हुकूम त्यानें केला. कित्येक लोक तर म्हणतात कीं, त्यानें स्वतः आपल्या हातानें त्याला मारलें. देशाच्या हितासाठीं असलें घोर कृत्य केल्यावर त्यानें आपणास्वतःस घरांत अगदीं कोंडून घेतलें. **सायराक्यूस्**चे लोक जेव्हां मदत मागण्यास आले तेव्हां तो विदेशीं जाण्यास अगदीं तयार होता व **कारिन्थ**चे लोकही त्याला धाडण्यास खुषी होते.

ह्या त्याच्या कृत्याला साहाय्य करण्यास मंडळी फारच थोडी मिळूं शकली—सुमारें दहा लढाऊ जहाजें आणि सातशें भाड्याचे शिपाई. त्याला अडविण्यास **कार्थेज्**नें एक आरमार धाडलें. कांहीं युक्ती करून त्यानें तें चुकविलें आणि तो **सिसिलीं**त उतरला. त्यानें जीं अति धन्यवाद गाण्याजोगतीं शूरकृत्यें केलीं त्यांचा आपल्या वृत्ताशीं संबंध नसल्यामुळें तीं येथें देतां येत नाहींत. एवढें सांगणें येथें बस होईल कीं, त्यांच्या शत्रूंपैकीं एकानें **कार्थेज्**चे लोकांना शहरांत घेतलें असतांही त्यानें **सायराक्यूस्** मिळविलें. तें मिळवून त्यानें त्या शहराला स्वतंत्रता दिली. दुसऱ्याही कित्येक **ग्रीक** शहरांना तो अशाच तऱ्हेनें उपयोगी पडला. ह्या सर्व कृत्यांला द्रव्य पाहिजे ह्मणून त्यानें **कार्थेज्**चा प्रदेश लुटला असे सांगतात. तें कसेंही असलें तरी **कार्थेज्**ला हीं कृत्यें आवडलीं नाहींत असें खात्रीनें सांगतां येईल. त्यांनीं एकदम लढाई पुकारली व ह्या शत्रूंशीं सामना देण्यासाठीं पुष्कळ खटपट केली. त्यांनीं सुमारें सत्तर-हजार फौज गोळा केली. (वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल कीं जसें जसें आपण अलीकडे येतों तसें तसें अधिक संभवनीय आंकडे आपल्या दृष्टीस पडतात.) त्यांनीं हत्यारें वगैरे सर्वांना दिलीं व सामग्रीही यथास्थित पुरविली. नेहमींप्रमाणें ह्यांतील बहुतेक लोक भाड्यानें आणलेलेच होते तरी पण खुद्द **कार्थेज्**चेही बरेच होते. एका इतिहासकारानें त्यांची संख्या दहा हजार होती ह्मणून सांगितलें आहे. हे सर्व लोक जहाजांत बसून **लिलिबिअम्**ला सुरक्षितपणें गेले. तेथें गेल्यावर ते लागलीच पूर्वेकडे निघाले. ह्या प्रचंड सेनेशीं टक्कर देण्यास **टायमोलिअन्**पाशीं सैन्य फार थोडें होतें. **सायराक्यूस्**मध्यें त्याला कांहीं तीनहजारांवर लोक मिळाले नाहींत. भाड्याच्या शिपायांपैकींही भित्रे व अशक्त त्यानें काढून लावले. त्यांशिवाय सुमारें तितकेच फौजेंत शिल्लक होते. तरी पण तो ती सहाहजार फौज घेऊन धैर्यानें

निघाला आणि त्याला शत्रू **क्रिमेसस्**जवळ छावणी देऊन आहेत असें आढळलें.

त्यावेळेस भर उन्हाळा होता; त्यामुळें सकाळच्या प्रहरीं नदीवरचें धुकें सूर्याच्या उष्णतेमुळें चहूंकडे पसरलें होतें. त्यामुळें **ग्रीक** लोकांना शत्रूच्या छावणीपैकीं कांहींएक दिसेना, फक्त अस्पष्ट असे पुष्कळ लोकांचे शब्द मात्र ऐकूं येत होते. जसें जसें सूर्याचें तेज अधिक अधिक प्रखर होत चाललें तसें तसें धुकें डोंगरावर जरी कांहीं वेळ तसेंच राहिलें तरी दरींतून अगदीं निघून गेलें. आणि धुकें जसें निघून गेलें तसें नदीचें पात्र अगदीं स्पष्ट दिसूं लागलें. त्यावेळेस **कार्थेज्**चे लोक नदी ओलांडून अलीकडे येत होते. सर्वांच्यापुढें चार घोड्यांचे रथ होते. त्यांच्यामागून अगदीं ओळ धरून चालणारी जुटीची सुमारें दहाहजार फौज होती. त्यांचीं हत्यारें वगैरे मोठीं भपकेदार होतीं व त्यांच्या सर्वांच्या ढाली अगदीं शुभ्र होत्या. ही टोळी खुद्द **कार्थेज्**च्या लोकांची होती. ते मोठ्या व्यवस्थेनें व सावकाश कुच करीत होते. त्यांच्या पाठीमागून अगदीं अव्यवस्थित व मुळींच कवाईत न शिकलेले भाड्याचे शिपायांची टोळी येत होती. त्यांच्यांतला दरेक माणूस अगोदर नदी ओलांडून कोण जातों ह्मणून खटपट करीत होता. जोंपावेतों शत्रूचें सैन्य असें विखरलेलें आहे, कांहीं नदींत आहेत; कांहीं पलीकडच्या कांठावर आहेत; तोंपावेतों आपणास हल्ला करण्यास अति उत्तम संधि असें **टायमोलिअन्**च्या तेव्हांच लक्ष्यांत आलें. **कार्थेज्**चे लोक नदी ओलांडून रांग धरतात तोंच शत्रूचे घोडेस्वार त्यांच्यावर येऊन पडले. शत्रू वरचेवर चालून येत पण त्यांचा कांहीं तादृश उपयोग झाला नाहीं. **कार्थेज्**चे लोक अति वेगानें रथ इकडून तिकडे व तिकडून इकडे नाचवीत, त्यामुळें **ग्रीक** लोकांना आपापल्या रांगा संभाळतां संभाळतां पुरेवाट झाली. **कार्थेज्**च्या रांगांवर शत्रूंचा मारा पोंचेना. **टायमोलिअन्** आपले कांहीं **सायराक्यूस**चे शिपाई आणि कांहीं निवडक भाड्याचे शिपाई यांसह आपल्या घोडेस्वारांच्या मदतीस आला. त्यानें रिसाल्याला स्पष्ट सांगितलें कीं "तुह्मी आतां शत्रूच्या अघाडीकडे बघण्याचें कारण नाहीं. त्यांच्याशीं मीच बघून घेतों, तुह्मी शत्रूच्या बाजूंवर जाऊन पडा." **मेसिडोनिआ**च्या लोकांनीं ज्या सेनेच्या रचनेनें एवढे मोठे विजय मिळविलें त्यासारख्याच कांहीं अंशीं तऱ्हेनें आपले सर्व लोक अगदीं एकमेकांजवळ राखून शत्रूवर त्यानें एकदम चाल केली. तरी सुद्धां कांहींवेळ **कार्थेज्**चे

लोकांपुढें त्यांचें कांहीं चालेना. **कार्थेज्**च्या शिपायांचीं छातीचीं लोहकवचें व डोक्यावर घातलेले तांब्याचे मुकूट व सर्वांगाचें रक्षण होई अशा मोठमोठ्या ढाला यांपुढें **ग्रीक** लोकांच्या भाल्यांचे कांहींएक चालेना. पण त्याचवेळेस दैवानें अथवा **ग्रीक** लोकांच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास **झीअस्** देवतेनें **टायमोलिअन्**ला मोठी मदत केली. एक मोठें थोरलें तुफान झालें. त्यावेळच्या त्या मेघांच्या प्रचंड गर्जनांनीं आणि डोळे अगदीं दिपवून टाकणाऱ्या अशा विजांच्या चमकण्यांनीं व गडगडण्यांनीं सर्व भोंवतालच्या टेंकड्या फुटून जातात कीं काय असा भास होई. मघां जें धुकें पर्वताच्या शिखरावर चढून गेलें होतें तें सर्व पुनः खालीं मैदानांत उतरलें. आणि त्याबरोबरच मोठा कडाक्याचा पाऊस आणि गारांचा वर्षाव सुरू जाहला. हा वर्षाव **ग्रीक** लोकांच्या पाठीवर बसे. पण **कार्थेज्**च्या लोकांच्या बरोबर तोंडावर कडाक्यानें येऊन पडे. गारा, पाऊस आणि विजा ह्यामुळें पुढचें त्यांना कांहींएक दिसेना व प्रचंड मेघगर्जनेमुळें आपल्या सेनानायकाच्या आज्ञा ऐकूं येईनात. कांहींवेळ गेला नाहीं तों जमिनीवर निसरडेंही फार झालें. त्यामुळें त्या शिपायांना सर्वांगभर घातलेल्या चिलखतांनीं संरक्षण होण्याऐवजीं अडचण बरीक होऊं लागली. त्यांना ह्या जागेवरून त्या जागेला त्वरेनें उठून जातां येईना. जागच्याजागीं उभे राहण्यासही त्यांना संकट पडूं लागलें. एकदां पडलें म्हणजे उठणें तर त्यांना अगदींच अशक्य होतें. एवढ्यानेंच झालें असें नाहीं. दुसरें एक नवेंच संकट उद्भवलें. वर पाऊस पडल्यामुळें नदीला पूर आला. शिवाय असें ह्मणतात कीं, एवढें थोरलें सैन्य नदींत शिरलें तेव्हां नदीचा ओघ अडल्यासारखा झाला त्यामुळें तर पाणी विशेषच चढलें, नदी दोन्हीं कांठांनीं तुडुंब भरून वाहूं लागली. तिच्या त्या ओढीमुळें **कार्थेज्**चे कित्येक लोक त्यांच्या चिलखतांनीं व इतर पेहेरावानें अवजड झाल्यामुळें, पाण्यांत घसरून पडून गटंगळ्या खाऊं लागले. पहिल्यांदा शत्रूंनीं पुढील पहिली रांग कापून काढली. तदनंतर सर्व पुढील टोळीचे तुकडे तुकडे केले. शेवटीं **कार्थेज्**चें सर्व सैन्य वाट फुटेल तिकडे पळालें. कांहीं उभ्या मैदानांत कापले गेले; कांहीं नदींत पडून बुडून मेले. कांहीं थोडे जे डोंगरावर चढून पळून जात होते त्यांना **टायमोलिअन्**च्या चपळ शिपायांनीं चढतां चढतांच पकडले त्या मैदानांत दहाहजार लोक मरून पडले. त्यांपैकीं कमींत कमी तीनहजार लोक **कार्थेजिनिअन्** होते. **कार्थेज्**चें असें जबरदस्त नुकसान

पूर्वीं कधींही झालें नव्हतें. ह्यावेळेस **आफ्रिकेचे** किंवा **स्पेन्**चे भाडोत्री शिपाई मेले असें नाहीं. खुद्द **कार्थेज्**चीं लेंकरें तनिहजार त्या रणांगणांत पडलीं. त्याबद्दल **कार्थेज्**नें किती बरें शोक करावा.

ह्या मोठ्या पराभवानेंही लढाई संपली असें झालें नाहीं. **ग्रीक** लोकांचीं आपसांत वितुष्टें होतींच आणि त्यामुळें **टायमोलिअन्**च्या शत्रूंनीं आपण स्वतः मदत करूं असें वचन देऊन **कार्थेज्**ला लढाई चालू ठेवण्यासाठीं बोलाविलें. दुसरी एक लढाई झाली. तिचाही परिणाम पहिल्यासारखाच जाहला. तेव्हां **कार्थेज**नें तहाचें बोलणें लाविलें; व तह खालील शर्तींवर कबूल करण्यांत आला.

१. **कार्थेज्**नें नेहमीं **हेलिसअस्**च्या पश्चिमबाजूला राहावें.

२. त्यानें **सिसिलीं**तील कोणत्याही शहराच्या कारभारांत हात घालण्याच्या भरीस पडूं नये.

भाग सहावा.

कार्थेज् आणि अगॉथॉक्लीस्.

टायमोलिअन् तीनशेंसदतीसांत मेला. त्यानंतर सुमारें वीस वर्षांवर जिकडे तिकडे **सिसिलींत** शांतता होती. पुढें पुन: **ग्रीक** लोक आपसांत भांडले. आणि एका पक्षानें **कार्थेज्**ला मदतीस बोलाविलें. **टायमोलिअन्**नें **सायराक्यूस्**ला स्वतंत्रता दिली होती. पण तें एका **अगॉथॉक्लीस्** नांवाच्या जुलमी मनुष्याच्या तडाक्यांत सांपडलें होतें. त्यानें हजारों लोक शहरांतून हांकून लाविले. ह्या सर्वांनीं एकमत करून **डीनॉक्रेटीस्**ला मुख्य नेमून **कार्थेज्**ची मदत मागितली. तीनशेंनवांत **कार्थेज्**नें एक मोठी थोरली फौज **सिसिली**कडे रवाना केली. जरूर लागल्यास भरतीला ह्मणून **कार्थेज्**चे उत्तम कुळांत जन्मलेले सुमारें दोन-हजार लोक व **आफ्रिके**चे आणि **इटली**चे भाड्याचे शिपाई तसेंच **बालेआरिक** बेटांतील एकहजार गोफणे इतके लोक शिलकेंत ठेवले होते. ह्या फौजेला निघावयास वाईट वेळ लागली होती असें दिसतें. ते निघाले नाहींत तोंच वाटेंत भयंकर तुफान झालें. त्यांत त्यांचीं साठ लढाईचीं जहाजें व दोनशें इतर जहाजें बुडून गेलीं. आणि त्यांचे **सिसिलींत** येईपावेतों बरेच हाल झाले. व फौजही बरीच कमी झाली पण त्यांना **सिसिलींत** लोक मिळण्यास वेळ लागला नाहीं. फौजेचा सेनापति **हामिल्कार** ह्याला

चाळीसहजार पायदळ व पांचहजार घोडेस्वार सहज येऊन मिळाले. **सिसिलीच्या** लढायांत प्रख्यात अशा **हायमेरा** नदीच्या कांठीं दोन्ही सैन्याची गांठ पडली. पहिल्याप्रथम **ग्रीक्** लोकांना अनुकूल अशा तऱ्हेनेंच लढाई चालली होती. **अगॉथॉक्लीस्**नें कांहीं लोक नदीच्या दरडींत छापा घालण्यासाठीं बसवून ठेविले होते; आणि **कार्थेजिनिअन्** लष्कराची एक टोळी लूट घेऊन नदी ओलांडीत होती तोंच त्यांनीं तिच्यावर हल्ला केला व त्यांना आपल्या छावणींत परत जावयास लाविलें. **अगॉथॉक्लीस्**नें ही संधि चांगलीं असें पाहून शत्रूवर चाल केली. पहिल्याप्रथम सर्व चांगलें चाललें होतें. मध्यें एकवेळ **कार्थेज्**चा पराभव खास होतो असें सुद्धां वाटलें. पण पुन: लढाईचा रंग बदलला. **बालेआरिक्**चे गोफणे पुढें सरसावले. त्यांनीं शत्रूंचे पुष्कळ लोक मारले व जखमी केले. शत्रूंनीं अद्याप पावेतों धीर धरून लढाई चालविली होती. पण इतक्यांत **आफ्रिके**तून एक नवीन टोळी येऊन त्यांनीं त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला. हें पाहून छावणींतल्या लोकांना धीर आला. आणि शत्रूंचा हल्ला त्यांनीं परत फिरविला एवढेंच नाहीं पण त्यांची अगदीं दाणादाण करून सोडली. दोन छावण्यांमधील अंतर काय तें पांच मैल होतें. **कार्थेज्**चे घोडेस्वारांनीं तें अंतर तेव्हांच तोडलें आणि पळत सुटलेल्या शत्रूंचे लोकांना अगदीं पुरें पुरें करून सोडलें. शिवाय आणखी एका विलक्षण कारणानें शत्रूंचे अधिक लोक मेले. लढाई अगदीं भर उन्हाळ्यांत ऐन दोनप्रहरच्या वेळीं झाली. त्यामुळें शत्रूंकडील बहुतेक लोक छावणींत न जातां नदीकडे धावले. तृषेनें ते अगदीं व्याकूळ जाहले होते; त्यामुळें ते यथास्थित पाणी प्याले. तें पाणी खारट किंवा कसेसेंच होतें. आणि तें शिपायांना अतिशय बाधलें. ते पाणी प्याले नाहींत, तों लागलीच कोणी मारल्यासवरल्या शिवाय कांठावरच पटापट मरून पडले. **ग्रीक्** लोकांचे एकंदर सातहजार लोक मेले व **कार्थेज्**चे फक्त पांचशें लोक मेले. **अगॉथॉक्लीसनें** आपल्यास **जेला** येथें कोंडून घेतलें. मनांतील हेतू कीं अशा तऱ्हेनें **हामिल्कारचें** सर्व लक्ष आपणावर लागलें म्हणजे **सायराक्यूस्** येथें आपल्या लोकांना पिकें गोळा करण्यास संधि सांपडेल. **कार्थेजिनिअन्** सरदारानें **जेला**ला वेढा दिला. पण आपणाला तें घेतां येणार नाहीं असें दिसल्याबरोबर लागलाच आपला बेत त्यानें फिरविला. पहिल्याप्रथम त्यानें बाकी सर्व शहरांना चांगल्या रीतीनें वागवून व बरेच पैसे देऊन तीं

आपलींशीं करून घेण्याचा यत्न केला. त्यांतलीं बरींच याला मिळालीं. कारण त्यांनाही भीति होतीच; शिवाय **अगॉथॉक्लीस्**चाही ते द्वेष करीत होते.

सायराक्यूस्शिवाय बाकीचीं सर्व शहरें हातचीं गेलीं अशी दशा झाली तेव्हां **अगॉथॉक्लीस** ह्या असाधारण मनुष्यानें इतिहासांत नमूद केलेल्या आहेत त्यासर्वांहून अति साहसाची अशी एक युक्ति काढली. त्यानें खुद्द **कार्थेज्**-मध्यें लढाई करावयाची असा निश्चय केला. त्याला ठाऊक होतें कीं एकंदर हल्ला आला असतां तो हटविण्याची खुद्द **कार्थेज्**ची कांहीं तयारी नाहीं. शिवाय **आफ्रिके**ची प्रजा **कार्थेज्**ला नेहमीं प्रतिकूलच असे. त्याला अगदीं वाटत होतें कीं **कार्थेज्**वर हल्ला करावयाचा तर **कार्थेज्** शहरीं जाऊन करावा. आणि त्याचा हा ग्रह खराही होता. पण त्यानें हा मनांतील बेत अगदीं गुप्त ठेविला. त्यानें हा आपला बेत सिद्धीस नेण्यासाठीं ज्या ज्या व्यवस्था केल्या त्या विलक्षण चतुराईच्या तर खऱ्याच पण अति विचित्र व अप्रशस्त होत्या. बरोबर जी फौज घ्यावयाची ती तो फार काळजीपूर्वक निवडावयास लागला. बहुतेक निवडले ते घोडेस्वार होते. घोडे **आफ्रिके**स नेण्याचें त्याच्याजवळ कांहीं साधन नव्हतें पण ते तेथें सांपडतील अशी त्याला आशा होती व त्यासाठीं आयतेवेळेस अडचण पडूं नये म्हणून दरेक शिपायाला खोगीर व लगाम बरोबर घेण्याचा त्यानें हुकूम केला. आपल्या गैरहजेरींत **सायराक्यूस्** येथें बंड वगैरे कांहीं न होई अशी व्यवस्था त्याला करणें जरूर होतें. त्यासाठीं त्यानें शहरांतील सर्व वजनदार अशा कुटुंबांकडून चांगल्या रीतीनें वागण्यासाठीं जामीन घेऊन ठेवले. एवढें करूनच तो राहिला नाहीं. दरेक कुटुंबांतला एक माणूस घरीं तर दुसरा फौजेंत अशी बहुतेक व्यवस्था त्यानें केली. पुढें पैसे पाहिजेत, ते मिळण्यासाठीं त्यानें अशी जाहिरात काढली कीं शहरांतल्या ज्या लोकांना लढाईतले हाल सोसण्याची शक्ति नसेल किंवा इच्छा नसेल त्यांनीं पैसे देऊन आपली सुटका करून घ्यावी. पुष्कळ श्रीमंत लोकांनीं आपली अशा रीतीनें सुटका करून घेतली. त्यांची अन्य ठिकाणीं राहण्याची सोय होती व त्यांना ह्या जुलमी सरदाराचा अंमल अगदीं आवडत नसे. त्यानें असल्या सर्व लोकांना मालमत्ता घेऊन जाण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणें ते गेले नाहींत तोंच त्यांच्या पाठीमागें त्यांना लुटण्यासाठीं भाड्याचे शिपाई त्यानें धाडले. त्या हतभागी लोकांची सर्व

मालमत्ता लुटली गेली व त्यांनाही ठार मारण्यांत आले. अशा रीतीनें त्यानें आपल्यास पुरेशी संपत्ति मिळविली.

तदनंतर त्यानें आपलें सर्व सैन्य जहाजांवर चढविलें. एकंदर साठ लढाऊ जहाजें त्याला लागलीं. नाकेबंदीवर राखलेलें **कार्थेज्**चें आरमार ह्याच्यापेक्षां पुष्कळच चांगलें होतें. यास्तव त्यांना चुकविणें ही त्याच्यावर पहिली कामगिरी येऊन पडली. त्याच वेळेस धान्याचीं कांहीं जहाजें बंदरांत पलीकडच्या बाजूस दिसलीं. **कार्थेज्**च्या जहाजांनीं त्यांचा पाठलाग करण्यासाठीं आपलीं ठिकाणें सोडलीं. ही संधि पाहून **अगॉथॉक्लीस्** बंदरांतून बाहेर पडला. **सायराक्यूस्**चें आरमार त्या दुसऱ्या जहाजांच्या संरक्षणासाठीं येत आहे असें समजून **कार्थेज्**चा कप्तान शत्रू हल्ला करतील अशी वाट पहात बसला होता. **सायराक्यूस्**चें आरमार दुसऱ्याच बाजूला जातें आहे असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां तो या आरमाराच्या पाठीस लागला. याचा परिणाम असा झाला कीं **अगॉथॉक्लीस्**ला दोहोंकडूनही जय मिळाला. धान्याचीं जहाजें बंदरांत जाऊन सुरक्षित पोहोंचलीं त्यामुळें शहरांत जी धान्याची तूट आली होती ती नाहींशीं झाली. इकडे यांनाही बराच वेळ आधीं पळावयास सांपडल्यामुळें हेही शत्रूच्या हातांत सांपडले नाहींत. पण ते सांपडतां सांपडतां वांचलें एवढीच गोष्ट खरी. पांच दिवस आणि पांच रात्री पाठलाग चालला होता. सहावे दिवशीं सकाळीं पाहतात तों **कार्थेजिनिअन्** आरमार एकदम अगदींच जवळ आलेलें दिसलें. दोन्ही पक्षांनीं आपल्या कडून झाली तितकी पराकाष्ठा केली. शेवटीं **ग्रीक** लोकांनीं शर्यत जिंकली. ते जमिनीवर अगोदर उतरले एवढेंच काय तें; त्यांच्या पाठोपाठ **कार्थेजिनिअनां**चें पुढचें जहाज येऊन थडकलें. थोडीशी जुजबी लढाई झाली तींत **कार्थेज्**चे जहाजांचें कांहीं एक चाललें नाहीं. आणि **अगॉथॉक्लीस्** सुरक्षितपणें उतरला एवढेंच नव्हें तर त्यानें तेथें चांगल्या बंदोबस्ताची छावणीही केली व त्याच्याच जवळ आपलीं जहाजेंही वर ओढून घेऊन ठेऊन दिलीं.

पण त्याला याहूनही अधिक साहसाचा प्रकार करावयाचा होता. त्यानें आपलीं जहाजें जाळून टाकलीं. ह्या रीतीनें सुटून जाण्याची सर्व आशा तुटल्यामुळें त्यांच्या लोकांना काय ते दोनच मार्ग मोकळे होते. एक शत्रूला आपण मारावें नाहीं तर आपण तरी मरावें. पहिल्या प्रथम त्यांच्या मनाला निराशा वाटूं लागली. पण **अगॉथॉक्लीस**नें त्यांना त्यांच्या स्थितीविषयीं

विचार करण्यास मुळींच वेळ दिला नाहीं. त्यानें **कार्थेज्**मधील मोठमोठ्या श्रीमंत लोकांचीं घरें आणि वाड्या जेथें होत्या त्या प्रदेशावर हल्ला करण्यास लागलीच त्यांना नेलें. त्या प्रांतांत द्राक्षांच्या आणि नारिंगांच्या मोठमोठ्या बागा चहूंकडे पसरलेल्या होत्या. तशींच मोठमोठीं कुरणेंही पुष्कळ होतीं. त्या विपूल संपन्नतेकडे पाहून **सिसिली**च्या लोकांना फार आश्चर्य वाटलें. दोन शहरें आयास न पडतां त्यांच्या कबज्यांत आलीं. त्यामुळें त्यांची निराशा जाऊन मनांत धीर येत चालला. हें सर्व पाहून **कार्थेज्**ला अतीच भय आणि आश्चर्य वाटलें. साधारण असेंच वाटावयास लागलें कीं **सिसिलीं**तील सर्व लोक मेले. कारण **सायराक्यूस्**ला तसेंच संकटांत ठेवून **अगॉथॉक्लीस्** **आफ्रिके**वर येईल असें कोणाच्याही मनांत येईना. कोणी तह करावा म्हणून सांगूं लागले; कोणी खरें समजेपावेतों वाट पहावी असें म्हणूं लागलें. खरें काय झालें तें जेव्हां समजलें तेव्हां त्यांच्या मनांत परत उत्साह आला आणि त्यांनीं या लोकांवर हल्ला करण्याची तयारी केली.

पहिली जी लढाई झाली त्यांत दोन्ही पक्षांकडे कोण कोण होते हें पाहण्याची जरा गंमत आहे. **आगॉथॉक्लीस्**कडे **सायराक्यूस्**चे लोकांशिवाय **सेम्नाइट्स्** **एट्रस्कनस्** आणि **सेल्ट्स्** (म्हणजे **गॉल** अथवा **फ्रान्स**चे लोक) इतके होते. सगळे मिळून अकराहजार लोक होते; पण त्यांतल्या बऱ्याच लोकांपाशीं हत्यारें वैगेरे नव्हती. त्यांच्यांतील लोक बरेच उदासीनसे होते. त्यामुळें परिणामाविषयीं मोठी शंका होती. एका सरदाराचा मृत्यू व दुसऱ्याची विश्वास घाताची वर्तणूक हीं जर आड आलीं नसतीं तर **कार्थेज्**ला जय मिळाला असता. **हानो** आणि **बोमिल्कार्** हे दोन त्या वर्षीचे मुख्य अधिकारी होते. **हानो** हा **कार्थेज्**चे लोकांच्या सेक्रेड् ब्यांड्चा अथवा पवित्र सैन्याचा मुख्य होता. **अगॉथॉक्लीस्** ज्या सेनेवर मुख्य होता त्या सेनेची व्यवस्थित रांग फोडण्याविषयीं अति उत्सुक झाल्यामुळें तो स्वतः साहस करून शत्रूवर चालून गेला. पण तो अगदींच उघडा सांपडल्यामुळें शत्रूंनीं त्याला तत्क्षणींच मारला. **बोमिल्कार्**च्या मनांत **कार्थेज्** येथें आपण राज्य करावें असें होतें व हल्ला करण्यास आलेले लोक जर विजयी झाले नाहींत तर आपला इष्ट हेतु सिद्धीस जाणार नाहीं अशी त्याला खातरी होती. शत्रूंशीं सुद्धां कांहीं त्याची सल्ला मसलत होती असें दिसतें स्वतःचे हाताखालचे अधिकाऱ्यांस त्यानें अशी बतावणी केली कीं, ज्याअर्थीं आपला प्रत्यक्ष साथीदार लढाईत पडला

त्याअर्थी आपण माघारें फिरावें हेंच उचित. **कार्थेज्**चे भाड्याचे शिपाई एवढा हुकूम ऐकतांच पळून जावयास लागले. पवित्रसैन्यानें मात्र पुष्कळ वेळ टिकाव धरला. पण शेवटीं त्यांनाही पळून जावें लागलें. छावणी **ग्रीक्** लोकांच्या हातांत गेली.

अगॉथॉक्लीस्नें बरेच जय मिळविले व शेवटीं अगदीं **कार्थेज्**चे कोटापावेतों लढाई पोहोंचविली. इकडे **सायराक्यूस्**कडेही त्याचें बरें चाललें होतें. **हामिल्कार्**नें एकदां शहरावर रात्रीचा हल्ला केला. पण त्यांत त्याचा पराभव झाला. एवढेंच नाहीं तर तो शत्रूच्या हातीं सांपडून मारला गेला. त्याचें मस्तक **अगॉथॉक्लीस्**कडे निशाणी म्हणून पाठवून दिलें. **कार्थेज्**चा पुष्कळ लढायांत ओळीनें पराभव होत गेला. तें सर्व सांगत बसलें असतां उगाच कंटाळवाणें होईल. शेवटीं त्यांच्या ह्या विपरीत काळाचें त्यांना एक कारण अगदीं समजल्यासारखें झालें. **बोमिल्कार्** शत्रूंशीं हा वेळपावेतों मिळून असून **कार्थेज्**शीं कपटाचरण करीत होता. त्याला आपल्या स्वतःला अधिकार मिळविण्याचा योग्य काळ खचित आला असें वाटलें, तेव्हां त्यानें शहरांतील सर्व सैन्याची तपासणी करण्याचा एक दिवस नेमिला व तदनुरूप सर्वांस कळविलें. ते सर्व गोळा झाले तेव्हां आपल्यास साहाय्य करण्याचें वचन देण्याचें ज्यांनीं नाकारलें त्या सर्वांना त्यानें हांकून दिलें. बाकीचे पांचशें **कार्थेज्**चे मूळ रहिवाशी आणि पांच हजार भाड्याचे शिपाई बरोबर घेऊन आपण स्वतःच 'राजा' ही पदवी त्यानें घेतली; आणि त्याच संबंधाची द्वाही चहूंकडे फिरविली. शिवाय त्यानें आपल्या सर्व शत्रूंची कत्तल करण्यास आरंभ केला. आंत काय चाललें आहे हें जर **अगॉथॉक्लीस्**ला कोटाबाहेर समजलें असतें आणि अशा वेळेस जर त्यानें हल्ला केला असता तर **कार्थेज्** खचित गेलें असतें. शहरच्या रस्त्यांत लढाई मोठी निकराची झाली. **बोमिल्कार्** आणि त्याचे साहाय्यकर्ते हे बाजारांत शिरले; पण त्यांच्यानें ती जागाही संभाळवेना. बाजारासभोंवतीं उंच उंच घरें होतीं व तीं सर्व सरकाराला अनुकूल अशा लोकांचीं होतीं. त्यांतून शत्रूंच्या अंगावर लोकांनीं भाल्यांचा व बाणांचा वर्षाव सारखा केला. **बोमिल्कार्**ला नव्या शहरांत पळून जावें लागलें. शेवटीं कांहीं वेळपावेतों तह ठरविण्यांत आला. सर्व बंडखोर लोकांना क्षमा करण्यांत आली व त्यांनींही आपलीं शस्त्रें खालीं ठेवलीं. पण **बोमिल्कार्** मनुष्य फार भयंकर होता व त्यानें **कार्थेज्**चें नुकसानही अतिशय केलें होतें, तेव्हां त्याला अशा रीतीनें जिवंत सोडावा असें कांहीं **कार्थेज्**चे

लोकांचे मनांत येईना. शिवाय **कार्थेज्**चे लोकांचे मनांत धर्मसंबंधीं किंवा नीतीसंबंधीं नियमाचें उल्लंघन करण्याला भीति किंवा अडचण अगदीं वाटत नव्हती. तेव्हां त्यांनीं दिलेलें वचन मोडलें आणि **बोमिल्कार्**च्या अंगाला खिळे ठोकून त्याचा त्यांनीं जीव घेतला. **अगॉथॉक्लीस्**नें **आफ्रिकें**तील **फिनिशिअन्** लोकांच्या ठाण्यांतील सर्वांत मोठें शहर जें **युटिका** तेंही त्यानें घेतलें. हें शहर फक्त **कार्थेज्**हूनच काय तें लहान होतें. शिवाय आणखीही कित्येक शहरें त्यानें घेतलीं. शेवटीं **कार्थेज्**चे सर्व साथीदार आणि इतर प्रजा यांपैकीं कोणीही पुढें येईनासें झालें.

कांहीं जरूरीच्या कामासाठीं **अगॉथॉक्लीस्**ला परत **सायराक्यूस्**ला बोलाविलें. तेथें त्यानें **आफ्रिकन्** फौजेवर आपला मुलगा **अर्कागेथस्** यास नेमिलें. **अर्कागेथस्** अति महत्वाकांक्षी होता. आपल्या शक्तीच्या बाहेरचीं अशीं सुद्धां साहसाचीं कृत्यें तो आपल्या शिरावर घेत असे. तो मध्यभागाकडे जाऊन तेथील लोकांना जिंकून घेण्याचा विचार करीत होता. पण तें कांहीं त्याला शक्य नव्हतें. इकडे **कार्थेज्**कडे वळलें तर असें दिसेल कीं त्याचे नवे अधिकारी मोठे चतुर होते. त्यांनीं आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या आणि तिघांनीं तीन बाजूंनीं हल्ला करावा असें ठरविलें. **अर्कागेथस्**चा शहरच्या बाहेरच्या बाजूस अगदीं पराभव झाला. शिवाय त्याच्या साथीदाराच्या बंडामुळें त्याची फौज अगदीं निर्बळ झाली. इतक्या अवकाशांत **अगॉथॉक्लीस्** परत आला व त्यानें बरीच सावरासावर केली व सर्व पूर्वस्थितीवर आणून ठेविलें. तरी पण एकदां तो **कार्थेज्**वर चालून गेला होता त्यांत त्याला यश आलें नाहीं. तदनंतर एकापाठीमागून एक अशा सारख्या विचित्र गोष्टी घडून आल्या. **कार्थेज्**च्या लोकांनीं आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें विजयानंतर नरयज्ञ करून छावणीला आग लावून दिली. सर्व लोक जेव्हां त्या धांदलींत अगदीं गुंग झाले होते तेव्हां कांहीं **आफ्रिकें**तील भाड्याचे शिपाई **अगॉथॉक्लीस्**ची नोकरी सोडून इकडे राहण्याकरितां आले. **कार्थेज्**चे लोकांना हा शत्रूचा हल्ला असें वाटून ते अगदीं घाबरून गेले. जेव्हां त्यांची चूक त्यांना समजली तेव्हां कांहींकांना आंत घेण्यांत आलें. तदनंतर **ग्रीक** लोकांमध्यें तशाच तऱ्हेची गडबड झाली. पण ह्या गडबडीमुळें **अगॉथॉक्लीस्**चे चार हजार लोक मेले. त्याचे **आफ्रिकें**तील मित्रही त्याला सोडून गेले आणि त्याचीही विजयासंबंधीं निराशा होत चालली. त्याला शत्रू ह्मणजे

आपल्याला कोणत्याही शर्तींवर सोडतील अशी आशा नव्हती. शिवाय त्याला आपलें सैन्य नेण्यास साधनेंही मुळींच नव्हतीं. तेव्हां त्यानें आपला धाकटा मुलगा बरोबर घेऊन गुप्त रीतीनें पळून जावयाचा बेत केला. पण हा बेत थोरला मुलगा **अर्कागेथस्** याला समजला आणि त्यानें सर्व सैन्यांतील लोकांना तो उघड करून सांगितला. ते शिपाई हा आपणास येथेंच सोडून जातो हें पाहून फार चवताळले; त्यांनीं बंड केलें आणि **अगॉथॉक्लीस्**ला पकडून त्याच्या पायांत बिड्या घालून कैद करून ठेविलें. सैन्यांत जिकडे तिकडे अव्यवस्था सुरू जाहली. शेवटीं **अगॉथॉक्लीस्** युक्तिप्रयुक्तीनें तेथून सुटला आणि **सिसिलीस** पळून गेला. हा आपल्यास सोडून गेला असें पाहून कोपप्रशमनार्थ त्याच्या दोन्हीं मुलांस त्यांनीं ठार मारलें व नंतर **कार्थेज्**शीं तह केला. त्यांनीं लढाईंत घेतलेलीं सर्व ठाणीं सोडून दिलीं व त्याच्या मोबदला तीनशें ट्यालन्ट्स् घेतले. ज्यांची परत जावयाची इच्छा होती त्यांना परत जाण्याची स्वतंत्रता मागून घेतली व ज्यांना तेथें रहावयाचें होतें त्यांना **कार्थेज्**च्या सैन्यांत नोकऱ्या देवविल्या. शहराला चार वर्षें वेढा पडला होता. शेवटीं एकदांची भीति दूर झाली. पुन्हा पूर्वींची कुवत परत येण्यास त्यास फार दिवस लागले नाहींत, थोड्याच वर्षांत **सिसिलींत** सत्ता मिळविण्याच्या हेतूनें आपल्या जुन्या शत्रूला (**अगॉथॉक्लीस्**ला) **कार्थेज्** मदत करण्यास तयार झालें.

कार्थेज्चा शेवटचा **ग्रीक्** शत्रु खरोखरच सर्वांहून अधिक भयप्रद झाला असता. **अलेक्झांडर धी ग्रेट्**चा आईकडचा संबंधी **एपिरस्**चा राजा **पिऱ्हस्** यानें त्या जगविख्यात आप्ताप्रमाणेंच सर्वत्र विजयी होऊन येण्याचा प्रचंड बेत केला. भेद एवढाच कीं **अलेक्झांडर** गेला होता पूर्वेकडे व हा जाणार होता पश्चिमेकडे. **पिऱ्हस्**चे काय काय बेत होते ते आपल्याला त्याचे स्वतःच्या विद्वान तत्त्ववेत्त्याशीं झालेल्या भाषणावरून समजेल. **प्लुटार्क**नें संवादरूपानें तें दिलें आहे तसेंच खालीं उतरून घेतलें आहे.

सिनिअस्:—हे **पिऱ्हस्** राजा, **रोमनस्** हे मोठे शूर योद्धे आहेत व त्यांचे राज्यही बहुत देशांवर आहे. जर देवाच्या कृपेनें आपण त्यांना जिंकलें तर आपण त्या विजयाचा काय उपयोग करून घ्यावा बरें?

पिऱ्हस्:—ह्याचें उत्तर काय सोपेंच आहे. आपण एकदां **रोम्** जर जिंकून घेतलें तर मग **ग्रीक्**चें ह्मणा किंवा एखादे रानटी लोकांचें म्हणा, आपल्या पुढें कोणाचें कांहींएक चालणार नाहीं, इतके बलाढ्य आपण होऊं; सर्व **इटली** आपल्या ताब्यांत येईल. **इटली**ची संपत्ति, त्याचें कलाकौशल्य, त्याचा मोठे-पणा हें सर्व तुला तर निदान ठाऊक आहेच.

सिनिअस्:—(थोडावेळ थांबून) **इटली** घेतल्यावर मग आपण काय करणार?

पिऱ्हस्:—(त्याचा आशय अद्यापि लक्ष्यांत न येऊन) **इटली** घेतलें कीं मग जवळच मोठें संपत्तिवान् भरवस्तीचें व घेण्यास सुलभ जें **सिसिली बेट** तें हात पुढें करून आपल्यास बोलावील. **अगाथॉक्लीस्** मेल्यापासून शहरांत कोणी दाबता नाहीं; त्यामुळें व ज्यांच्या हातांत सत्ता आहे त्यांच्या मूर्खपणामुळें तेथें सर्व अव्यवस्था आहे.

सिनिअस्:—तेंही होण्यासारखें आहे. आपण **सिसिली** जिंकून घेतली म्हणजे मग तरी आपल्या लढायांचा शेवट होईल काय?

पिऱ्हस्:—देवाच्या दयेनें आपल्या कार्यास येथपावेतों यश यावें मात्र. मग **आफ्रिका** व **कार्थेज्**कडे कोण बरें वळणार नाहीं? **कार्थेज्** तर तेव्हांच माझ्या हातांत येईल. **सायराक्यूस्**हून पळून गेलेल्या **अगाथॉक्लीस्**नें सुद्धां थोड्याशा जहाजांच्या मदतीनें तें जवळ जवळ घेतलेंच होतें.

आपल्याला बाकीच्या संवादाशीं किंवा त्यापासून **सिनिअस्**नें जें तात्पर्य काढलें त्याच्याशीं मुळींच कर्तव्य नाहीं. **पिऱ्हस्**चा बेत मोठा जंगी होता आणि तोही असला बेत सिद्धीस नेण्यास बुद्धीनें व सामर्थ्यानें योग्य होता. **हानिबाल्** ज्याच्या परीक्षेला असल्या विषयांत बराच मान असला पाहिजे त्यानें ह्मटलें आहे कीं पृथ्वीतलावर मोठ मोठे जे वीर झाले त्या सर्वांमध्यें **पिऱ्हस** हा श्रेष्ठ होता. पण मुख्य गोष्ट ही कीं त्याच्या महत्कृत्याचा आरंभाचा भागच साधण्यास फार कठीण होता. त्यानें **रोमवर** आपलें सामर्थ्य व्यर्थ खर्च केलें. त्यानें लढायांत **रोम**च्या सैन्याचा पुष्कळ वेळ पराभव केला; पण तो **रोम** ताब्यांत घेऊं शकला नाहीं. **रोम्**नें **कार्थेज**ला यावेळेस वांचविलें असें ह्मटलें तरी चालेल. पश्चिमेंत मुख्य अधिकार कोणाचा चालावा ह्याच्या निकालासाठींच हीं दोन राष्ट्रें लढणार होतीं.

पिऱ्हस्चा **कार्थेज्**शीं व्यवहार काय झाला तें थोडक्यांत सांगतां येण्याजोगें आहे. **इटलींत** त्यानें दोन मोहिमा केल्या. त्यांत त्याची कीर्ति पुष्कळ झाली. पण इतर कांहींसुद्धां मिळालें नाहीं. तदनंतर २७८ सालीं तो **सिसिली**कडे वळला. **ग्रीक्** लोकांनीं **कार्थेज्**शीं लढण्यासाठीं त्याची मदत मागितली होती. पहिल्या प्रथम त्याचा सर्वतो जय होऊं लागला. तेव्हां **कार्थेज्**नें त्याला भली मोठी खंडणी द्यावयाची कबूल केली व त्याच्या मुख्य हेतूंस साह्य करण्यासाठीं एक आरमार द्यावयाचें कबूल केलें. तरी पण **पिऱ्हस्** ऐकेना. त्यानें उत्तर पाठविलें कीं **कार्थेज्**नें **सिसिली**चें बेट अगदीं सोडून द्यावें व समुद्र हीच **ग्रीस्**ची आणि आपली सरहद्द समजावी तरच आमचें समाधान होईल. अन्य कोणत्याही गोष्टींनीं आमची तृप्ति होणें नाहीं. ह्यावरून त्याला **ग्रीक** या नांवाचा जो कट्टा अभिमान होता त्याची स्तुति केल्याशिवाय राहवत नाहीं. यानंतर त्याचें दैव फिरलें. **सिसिलीं**तील **ग्रीक** लोकांना त्याचा कंटाळा आला आणि त्यांनीं याच्याविरुद्ध बंडें केलीं. यानें त्यांना शिक्षा करतांना अशी सक्ती दाखविली कीं तीमुळें **ग्रीक** लोक त्याचा अधिकच तिरस्कार करूं लागले. तदनंतर **लिलिबिअम्**च्या किल्ल्यावर चालून जाऊन तो घेण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यांत त्याचा अपजयही झाला व त्याच्या युद्ध कौशल्याच्या कीर्तीला मोठा धक्का बसला. शेवटीं त्याला तेथून निघण्याशिवाय दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं. निघते वेळीं तो आपल्या गलबतावरून **सिसिली**कडे पाहून म्हणाला अहाहा काय सुंदर झगडून जिंकण्यासारखें कडें हें आहे बरें! मित्रहो, **रोम्** आणि **कार्थेज्** या दोघांना लढण्यासाठीं आपण हें सोडून देतों ना!!! ह्या पुस्तकाच्या चवथ्या भागांत ह्या दोघांच्या सामन्याची गोष्ट आपण ऐकूं.

पुस्तक तिसरें.

कार्थेजूची अंतःस्थिति.

भाग १ ला.

कार्थेजिनिअन् लोकांचे शोध.

भाग २ रा.

कार्थेजूची राज्यव्यवस्था व धर्म.

भाग ३ रा.

कार्थेजूची जमाबंदी व व्यापार.

पुस्तक तिसरें.

भाग पहिला.

कार्थेजिनिअन् लोकांचे शोध.

कार्थेज्चें कथानक म्हणजे फक्त त्यांनीं केलेल्या लढायांचें वर्णन; एवढेंच होय. **कार्थेज्**चे लोकांविषयीं किंवा त्यांच्या रीतिभातीविषयीं आपणास कांहींच माहिती नाहीं म्हटलें तरी चालेल व जी कांहीं आहे ती त्यांच्या शत्रूंकडून किंवा अगदीं परकीय अशा लोकांकडून मिळालेली आहे. पण ह्याला कांहीं गोष्टी अपवादभूत अशा आहेत. त्यांपैकींच एक **हानो**नें केलेल्या वसाहतींचा, शोधांचा व प्रवासांचा वृत्तांत हा होय; हा कांहीं **कार्थेज्**चे भाषेंत लिहिलेला नाहीं. कारण **कार्थेजिनिअन्** भाषेपैकीं फार झालें तर कांहीं थोडेसे शब्द शिल्लक आहेत—हा **ग्रीक** भाषेंत झालेल्या भाषांतररूपानें उपलब्ध आहे. **हानो**च्या कालासंबंधीं निश्चितपणें कांहींच ठाऊक नाहीं. तो **हाय्मेरा**च्या लढाईंत पडलेल्या **हामिल्कारा**चा बाप किंवा मुलगा असावा. पण अमकाच होता असें निश्चितपणें ठरविण्यास कांहींच मार्ग नाहीं. तत्रापि हा बापच असेल अशी कल्पना करावीशी वाटते. कारण **हाय्मेरा**चे लढाईचे पूर्वीं **कार्थेज्** चांगल्या भरभराटींत होतें व ते वेळेस अशा तऱ्हेच्या मोहिमेवर माणसें पाठविण्यास तें तयार होतें. ही

कल्पना जर खरी असें धरलें तर **ख्रिस्ती** शकाचे आधीं ५२० वर्षे तो झाला असावा. **हानोनें** लिहिलेला वृत्तांत मनोहर आहे; व त्यामुळें येथें सविस्तर देण्याच्या योग्यतेचा आहे. अडे अशा ठिकाणीं कांहीं थोड्या टिपा देण्यांत येतील.

"**कार्थेजिनिअन्** लोकांनीं असा ठराव केला कीं **हानोनें पिलर्स् ऑफ् हर्क्यूलिस्**च्या* पलीकडे जावें† व **लिबिफिनिशिअन्**‡ संस्थानांची स्थापना करावी. त्या ठरावानुरूप पन्नास पन्नास वल्ह्यांचीं साठ जहाजें व सुमारें बायका आणि पुरुष मिळून तीस हजार मनुष्यें§ आणि इतर सामान वगैरे घेऊन तो निघाला.

"आह्मी **पिलर्स** सोडून निघालों व दोन दिवसांच्या प्रवासावर एका शहराची स्थापना केली. व त्याला **थिमिआटेरिअम** असें नांव दिलें. ह्या शहराच्या खालच्या बाजूस एक मोठें मैदान होतें. तेथून पश्चिमेस निघालों तो **सोलीस्**‖ म्हणून **लीबिआ**चें भूशिर होतें तेथें आलों. तेथें झाडी फार दाट होती. तेथें **पोसिडन्**¶ देवाचें एक देवालय बांधलें व नंतर तेथून अर्धा दिवसपावेतों पूर्वेच्या बाजूला गेलों तों समुद्र कांठाहून समीपच असें एक सरोवर लागलें. त्यांत वेत अतिशय होते. तेथें आह्मांला पुष्कळ हत्ती व

---

* **जिब्राल्टर**ची खाडी.

† ह्या प्रवासाच्या इतिहासाला '**पेरिप्लस्**' अथवा '**जलपर्यटन**' असें ह्मणतात. **ग्रीक्** भाषेंत लिहिलेल्या वृत्तांताची हस्तलिखित प्रत **हीडलबर्ग**च्या पुस्तकालयांत आहे. **१५३३** त तें पहिल्यांदा छापण्यांत आलें.

‡ **कार्थेजिनिअन्** आणि **आफ्रिकन्** मूळ रहिवाशी यांच्या परस्पर संबंधापासून झालेली एक विशिष्ट जात. **कार्थेज्**चे अधिकारी लोक या लोकांचा विशेष द्वेष करीत असत.

§ ही संख्या फुगवलेली दिसते. तरी पण अशी कांहीं कल्पना करावयास नको. सर्व वसाहती करण्यास निघालेले लोक साठ जहाजांत मावले होते. हीं साठ बहुतकरून लढाऊ जहाजें असतील व ह्यांच्या बरोबर मालाचीं जहाजें शिवाय होतींच त्यांतून दरेक वसाहतीचे वेळेस लोक उतरवीत असतील.

‖ **केप् कान्टिन.**

¶ **ल्याटिन नांव नेप्चून** कदाचित् **फिनिशिअन डेगॉन्** असेल.

इतर जंगली जनावरें मोकळीं चरतांना दृष्टीस पडलीं. त्या सरोवरापासून एक दिवसभर जहाजें हांकारीत आम्ही गेलों व येथें समुद्राच्या कांठावरच बरींच शहरें स्थापन केलीं. त्यांना **कारिकन्**चा **किल्ला**, **गिट्टा**, **आक्रामेलिटा** आणि **आराम्बीस्** अशीं नांवें दिलीं. तेथून **लिबिया** देशांतून वाहत येणारी **लिक्सस्** * नदी आम्हांला लागली. तिच्या कांठावर **लिक्सिटि** म्हणून एक भटकणारी जात होती; तींतील लोक आपले मेंढ्याचे कळप चारीत होते. त्यांच्याशीं आह्मी स्नेह संपादिला व त्यांच्या सहवासांत कांहीं दिवस काढले. ह्यांच्या पलीकडच्या बाजूस अभ्यागताविषयीं अनादर असे. **इथिओपिअन्** लोक राहातात; त्यांच्या देशांत रानटी जनावरें अतिशयच आणि प्रदेशही अतिशय डोंगराळ; ह्याच डोंगरांतून **लिक्सस्** नदी वाहते, व ह्याच डोंगराच्या सभोंवती **ट्रोग्लोडाईट** म्हणून विचित्र चेहेऱ्याचीं माणसें † राहतात. **लिक्सिटी** जातीचे लोक म्हणाले कीं हे घोड्याहूनही अति वेगानें धावूं शकतात. **लिक्सिटी** लोकांकडून दुभाषे मिळवून आह्मी पुढें चालू झालों तों दोन दिवस अगदीं निर्जन प्रदेशांत आह्मी राहिलों. तेथून पूर्वेकडे एक दिवस चालू झालों. येथें एका उपसागराच्या एका कोपऱ्यांत एक लहानसें बेट शोधून काढलें. त्याचा सर्व परीघ सुमारें सात फर्लांग् होता. येथें आह्मी वसाहत केली व त्याला **सर्न्** ‡ असें नांव दिलें. प्रवासाच्या अदमासानें पाहतां हें **कार्थेज्**च्या बरोबर समोर§

---

* धी वाडिड्रा.

† कदाचित् **नीग्रो** असतील.

‡ **सर्न** हें **रिओडे उरो**च्या मुखाशीं असेल असें वाटतें. कांहीं कांहीं नकाशांत **हर्न्** असें नांव सांपडतें. तेथील लोकांच्या नांवाशीं **हर्न्** हें नांव बरेंच जुळतें. तेव्हां हें **सर्न्** सध्याचे **हर्न्** असेल असें वाटतें.

§ बरोबर समोर ह्याच्या अर्थासंबंधानें बराच संशय आहे. मिस्तर् **ब्यानबरी** ह्मणतात कीं **कार्थेज्**पासून **जिब्राल्टर्** आणि **जिब्राल्टर्**पासून **सर्न** हें सारखें असल्यामुळें, ह्या दोन्ही रेषा समद्विभूज त्रिकोणाच्या दोन बाजू होऊं शकतील. आणि **कार्थेज्** आणि **सर्न** जोडणारी रेषा त्या समद्विभूज त्रिकोणाचा पाया होऊं शकेल. आपणाला सध्यां जीं निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या स्थलांची परस्परांपासून लांबी किती व काय हें समजण्यास साधनें उपलब्ध आहेत तशीं त्या लोकांना (प्राचीनांना) नव्हतीं ही गोष्ट अगदीं विसरतां उपयोगी नाहीं. ती गोष्ट वरील ह्मणण्यांत विसरली गेली आहे असें वाटतें. **सर्न**हून आणखी दोन प्रवास केले त्याचें वर्णन तो आतां करीत आहे.

असावें असें आह्मांस वाटलें. कारण **कार्थेज्**पासून **पिलर्स**पावेतों जेवढा प्रवास होता तेवढाच **पिलर्स्**पासून **सर्न्**पर्यंत होता. यानंतर **च्रेटीस्*** नांवाच्या मोठ्या थोरल्या नदींत जाहाजें हांकारून आह्मी एका सरोवरावर आलों. ह्या सरोवरांत **सर्न**हून मोठीं अशीं तीन बेटें लागलीं. एक दिवस आह्मी तशीच गलबतें हांकारलीं तों सरोवराच्या पलीकडच्या कांठाला जाऊन पोहोंचलों. त्या कांठाला लागूनच मोठेमोठे बरेच डोंगर होते. त्यांत रानटी लोक जनावरांचीं कातडीं पांघरत असत. त्या लोकांनीं आम्हांला कांठावर पाऊलसुद्धां ठेवूं दिलें नाहीं. आम्ही कांठाजवळ आलों न आलों तोंच दगडाचा मारा सुरू केला. तेथून गलबतें हांकून आम्ही एका मोठ्या नदीवर आलों. त्या नदींत सुसरी व जलतुरंग अतिशय होते. तेथून मग आम्ही परतलों ते **सर्न**ला आलों तेथून पुनः दक्षिण दिशेस कांठाकांठानें गलबतें हांकीत बारा दिवस सारखा प्रवास केला. ह्या सर्व प्रदेशांत **इथिओपिअन्** लोक राहत होते. आह्मी जवळ जाण्याच्या अगोदरच ते लोक आह्मांस पाहून पळून जात. आमच्या बरोबर जे **लिक्सिटी** होते त्यांना सुद्धां त्यांची भाषा समजेना. बारावे दिवशीं आह्मांला कांहीं पर्वत लागले. ते बरेच उंच असून वृक्षाच्छादित होते. शिवाय त्या वृक्षांच्या लांकडांना व सालीना अतिशय मधुर असा सुवास येत असे व त्यांचे रंगही फार विचित्र असत. ह्या पर्वताच्या बाजूबाजूनें दोन दिवस आह्मी चाललों तों बऱ्याच रुंदीचा व बराच आंत गेलेला असा समुद्राचा भाग आह्मांस लागला. ह्याच्या दोन्ही बाजूंस एक मोठे विस्तीर्ण मैदान होतें. रात्रीं आह्मांस त्या मैदानांत चहूंकडे ज्वाळाच ज्वाळा दिसल्या. येथें आम्ही गोडें पाणी वगैरे जहाजांत भरून घेतलें व पुढें सारखीं पांच दिवस जहाजें हांकलीं. तेव्हां आह्मांला एक मोठा उपसागर लागला. त्याचें नांव आम्हाला दुभाष्यांनीं '**वेस्टर्नहॉर्न**'† (**पश्चिमगतशृङ्ग**) असें सांगितलें ह्या उपसागरांत एक बेट होतें व त्या बेटांत एका खाऱ्या पाण्याच्या सरोवरांत दुसरें एक बेट होतें. येथें आम्ही उतरलों. दिवसा ह्या ठिकाणीं आह्मांला कोळशे व राख ह्यांशिवाय कांहीं दिसलें नाहीं. पण रात्रीं सर्व अरण्यांत जिकडे तिकडे असंख्य ज्वाळा

* **च्रेटीस्** ह्मणजे **सिनिगाल्** इचें पात्र मुखाजवळ अतिशयच विस्तृत आहे. पण डोंगरांचें निदर्शन केलें आहे त्याविषयीं अडचण आहे. कारण **सिनिगाल्**च्या पात्राच्या मुखाजवळील प्रांतांत डोंगर वगैरे कांहीं नाहींत.

† **विसागॉस्**चें आखात.

दिसल्या. शिवाय विणे, झांजा, ढोलकीं ह्या सगळ्यांचे शब्द स्पष्ट कानांवर पडावयास लागले. कांहीं अस्पष्ट व एकमेकांत मिसळलेल्या आरोळ्यांचा गोंगाटही कर्णास त्रास द्यावयास लागला. हें सर्व पाहून आम्ही अतिशय भयाभीत झालों व आमच्या बरोबरच्या भविष्यवाद्यानेंही आह्मांस तें स्थल सोडायास सांगितलें. तेव्हां आह्मीं घाबरून लागलेच तेथून निघालों आणि चार दिवस जहाजें हांकारलीं. पांचवे रात्रीं आह्मांला बाजूचें सर्व अरण्य पेटलेलें दिसलें त्या सर्व ज्वालांच्या मध्यभागास एक अतिशय विस्तीर्ण ज्वाळाकल्लोळ दिसत होता. त्याच्या ज्वाळा अगदीं तारांगणांस जाऊन पोहोंचत होत्याशा दिसल्या. सकाळीं आम्हीं उठून पाहतों तों त्या ठिकाणीं एक उंच पर्वत दिसला. त्याला तेथील लोक '**देवतांचा रथ**'* म्हणत असत. तेथून तीन दिवस ज्वाळामय प्रदेशांतून जहाजें हांकीत हांकीत '**दक्षिणशृङ्ग**' नांवाच्या आखातीं येऊन पोंहोचलों. ह्या आखाताच्या एका कोंपऱ्यांत मागच्या सारखेंच बेट लागलें. ह्या बेटांत एक सरोवर होतें व त्यांत दुसरें एक बेट होतें. त्यांत रानटी लोक पुष्कळ राहत होते. त्यांत बायकाच अधिक होत्या. त्यांचें सर्वांग केसांनीं भरलेलें होतें. आमच्या दुभाष्यांनीं त्यांचें नांव **गॉरिलास्** असें सांगितलें. आह्मी त्या बायकांचा पाठलाग करून त्यांपैकीं तीन पकडल्या. पुरुष मुळींच सांपडले नाहींत कारण त्यांना मोठमोठे कडे भराभर चढून जातां येत होतें, आणि ते आपलें संरक्षण लोकांवर धोंडे मारून करीत त्यामुळें ते सर्व पळून गेले. पण त्या बायकाही जेव्हां लोकांना चावूं लागल्या व त्या ज्यांच्या ताब्यांत दिल्या होत्या त्यांना फाडावयास लागल्या आणि कांहीं केल्या बरोबर येईनात तेव्हां त्यांना मारून टाकल्या. त्यांचीं कातडीं सोलून काढलीं व तीं **कार्थेज्**ला नेलीं आमचा धान्याचा पुरवठा संपला तेव्हां मग आह्मी परतलों."

हानोनें कार्थेज्ला परत आल्यावर हा वृत्तांत **क्रोनॉस** अथवा **स्याटर्न्** देवाच्या देवळांत शिलेवर लिहून ठेवला. **स्याटर्न्** हा बायबलांतील **मलॉक्** ह्मणून जो आहे तोच होय.

ज्येष्ठ **प्लीनोनें** ह्या प्रवासांत **हानो अरेबियाच्या** किनाऱ्यापर्यंत जाऊन पोंहोंचला होता असा विचित्र उपन्यास करून मग लिहिलें आहे कीं 'याच समयास **हिमिल्कोला यूरोपच्या** उत्तरेच्या कांठचे प्रदेश शोधून काढण्यासाठीं

* **साम्रीस्** पर्वत.

पाठविलें होतें. दुर्दैवानें **हानों**च्या पर्यटना सारखी **हिमिल्को**च्या पर्यटनाची मुळींच कांहीं हकीगत आपल्याला माहीत नाहीं. आपल्याला ह्या पर्यटनाची कांहीं थोडी माहिती **अव्हेनिअस्** ह्मणून एक कवि होता त्यानें ख्रिस्तीशकाच्या चवथ्यासालीं लिहिलेल्या भूगोलावरून मिळालेली आहे. हा सत्यसंशोधना-विषयीं कधींच विशेष तत्पर नसे. **अव्हेनिअस्** जें **हिमिल्को**च्या पुस्तकांतून उतरून घेतलें ह्मणून लिहितो तें अगदींच अविश्वसनीय वाटतें. **कार्थेज्**हून एक विशेष प्रदेशांत जाण्यास (तें बहुतकरून **ब्रिटन** असावें) त्याला चार महिने लागले. कारण तेथें जहाजांना वारा बिलकुल नव्हता व तिकडील समुद्रांत लव्हाळे फार असल्यामुळें एखाद्या दाट झाडींतून जहाजें ओढून काढण्यास जशीं संकटें पडावींत तशीं त्यास तेथून जहाजें काढण्यास संकटें पडलीं. शिवाय समुद्रावर धुकें अगदीं एकसारखें व दाट पडलेलें असे. एवढ्याच संकटांनीं झालें असें नाहीं. तेथील समुद्रांत राक्षसी प्राणी अतिशय आणि ते वरचेवर पाण्याच्या बाहेर यावयाचे त्यामुळें त्यांचीं मनुष्यें अगदीं घाबरून जात व त्यांना वरचेवर धीर द्यावा लागत असे. **अव्हेनिअस्**नें प्रतिज्ञापूर्वक असें ह्मटलें आहे कीं आपण जें वृत्त लिहिलें, तें **हिमिल्को**नें लिहिलेला वृत्तांत प्रत्यक्ष वाचून लिहिलें आहे. पण हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं प्राचीनकाळचे लोक असल्या विषयांत तरी सत्याची फारशी पर्वा बाळगीत नसत. **कार्थेज्**चे लोक व्यापारांत फार खबरदार असत. ह्यावरून कोणीएकानें अशी कल्पना बसविली आहे कीं दुसऱ्या लोकांनीं आपल्या व्यापाराच्या आड येऊं नये ह्मणून मुद्दाम हा भीतिप्रद प्रवासवृत्तांत **हिमिल्को**कडून लिहविला कीं जो वाचून दरेक मनुष्यानें त्याच्यासारखा जाण्याचा बेत केला असल्यास मागेंच फिरावें. वास्तविक पाहतां उत्तरेकडेस जाणाऱ्या प्रवाशास अति स्थिर समुद्र किंवा जहाज सुद्धां न हाले इतके मंद वायु हे प्रवासाच्या आड विशेषतः येतील अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. तें कसेंही असलें तरी **हिमिल्को** प्रवास-कर्ता हा आपल्याला फक्त नांवानेंच काय तो माहीत आहे.

भाग दुसरा.

कार्थेज्‌ची राज्यव्यवस्था व धर्म.

आरिस्टाटल्‌नें आपल्या **पॉलिटिक्स्** अथवा **नीतिशास्त्र** या विषयावर जो ग्रंथ लिहिला त्याचा एक भाग **कार्थेज्‌ची** राज्यव्यवस्था वर्णन करण्यास लावला त्यावरूनच आपल्याला कांहीं थोडीबहुत माहिती त्यासंबंधीं जाहली आहे. अगोदर **आरिस्टाटल्‌नें** आणि **कार्थेज्‌**विषयीं लिहावें हें मोठें विचित्र आहे. कारण आपलें व आपण ज्या लोकांपासून सर्व विद्या व कला घेतल्या त्या **इजिप्त**चे लोकांचें याशिवाय कोणाचें कांहीं असलें तरी त्याविषयीं कधींच मान अथवा पूज्यबुद्धि **ग्रीक** लोकांना वाटत नसे. शिवाय **आरिस्टाटल्‌नें** ती राज्यपद्धति बऱ्याच सविस्तर रीतीनें सांगितली आहे एवढेंच नव्हे तर तिची स्तुतिही केली आहे. बऱ्याच तऱ्हेनें ती इतर संस्थानाहून चांगली आहे असें एका ग्रंथकर्त्याचें वचन घेऊन त्यानें त्या वचनाला आपली पूर्ण संमति दर्शविली आहे. शिवाय ती कां चांगली आहे हेंही दाखविण्यास त्यानें सबळ कारणें दिलीं आहेत. "संस्थानांतील साधारण प्रतीचे लोक राज्यव्यवस्थेस सदासर्वकाळ अनुकूल व संतुष्ट असले व कांहीं म्हणण्यासारखे तंटेबखेडे उपस्थित न झाले व कोणाही एका व्यक्तीस सत्ता न बळकावितां आली म्हणजे हींच संस्थान सुव्यवस्थित असल्याचीं खात्रीलायक चिन्हें होत" असें त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे.

आरिस्टाटल्नें **कार्थेज्**मध्यें '**किंग्स**' अथवा '**राजे**' असल्याबद्दल लिहिलें आहे. राज्याच्या मुख्य सत्ताधिशांना ही पदवी दिल्याचीं बरींच उदाहरणें इतिहासांत आढळतात. पण असल्या लोकांना आपल्या व्यवहारांत '**राजा**' अशी संज्ञा देत नाहींत. '**आसिरिया**' **पर्शिया** अथवा **इजिप्त** या देशांच्या राजांप्रमाणें त्यांना सत्ता नव्हती, ते **स्पार्टा**च्या राजांसारखे होते असे स्पष्ट उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आले आहेत आणि **स्पार्टा**च्या राजांना किती सत्ता होती ती आपणास माहीत आहेच. कायमचे सेनाधिपति अथवा मुख्य धर्माधिकारी यांच्या इतकाच अधिकार त्यांना असे. दोहोंमध्यें फरक एवढाच कीं **स्पार्टा**त दोनच कुलांत वंशपरंपरा हे अधिकार चालत असत व **कार्थेज्**मध्यें हे अधिकार निवडणुकीनें प्राप्त होत असत. ते चांगल्या कुटुंबांतील तर असावयास पाहिजेतच. पण त्यांना राज्याधिकार निवडणुकीनें प्राप्त होत असे, वयोपरत्वें मिळत नसे. पण ही निवडणूक दर वर्षास होत असेल असें वाटत नाहीं. उलट एकदां एक निवडला गेला म्हणजे जन्मभर तोच काम करण्यासाठीं निवडण्यांत येत असे. **रोमन** लोक ह्या दोन अधिकाऱ्यांना **सफेटीस्** म्हणत असत. **सफेटीस्** हा '**शोफेटीस्**' अथवा न्यायाधीश या शब्दांचा अपभ्रंश होय.

ह्या राजांच्या हाताखालीं '**सरदार**' ह्मणत असत. दोन्ही हुद्दे एकाकडे सुद्धां असूं शकत, पण बहुतकरून भिन्नभिन्न मनुष्यांकडेच असत. राजाला सरदारीचा अधिकार असल्याशिवाय आपल्याच हुकुमानें फौजा अथवा आरमार कोठेंही नेतां येत नसे. कामगिरीवर गैरहजर असतांना देखील सरदाराला राजा करण्यांत येत असे. **हानो** जेव्हां पृथ्वीपर्यटनाच्या कामगिरीवर होता तेव्हांच त्याला '**राजा**' ह्मणून निवडण्यांत आलें होतें.

ह्या संस्थानांत ह्या मोठ्या हुद्याच्या अधिकाऱ्यांच्या खालच्या दर्जात कायदे करणारी सभा येत असे. तिला, प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासांत आपल्या अगदीं डोळ्यापुढें असणारें '**सेनेट**' असें नांव द्यावें. ह्या **सेनेट**मध्यें दोन पोटभेद असत. मोठ्या सभेंतील सभासद धाकट्या मंडळीचे सभासद नेमीत, धाकट्या सभेचा अधिकार मोठा होता. **इंग्लंद** देशांतील क्याबिनेट-सारखा अधिकार त्या सभेला होता. कोणा एका व्यक्तीच्या अथवा एका कुटुंबाच्या हातांत सत्ता जाऊं नये ह्मणून ह्या सभेची योजना

होती. बहुतेक प्राचीन संस्थानांचा अधिकार अशाच रीतीनें लयास गेला होता तेव्हां ही योजना आवश्यक होतीच. जेव्हां **मेगो**च्या कुटुंबाची सत्ता फार वाढली व राज्याच्या स्वतंत्रतेला धक्का बसेल असें वाटूं लागलें, तेव्हां **सेनेट**च्या सभासदांतून शंभर न्यायाधीश निवडून काढले व लढाईहून सरदार परत आले ह्मणजे मग त्यांनीं काय केलें, काय नाहीं ह्याचा हिशेब घेण्याचा अधिकार त्यांना दिला. अशा रीतीनें व्यवस्था ठेवल्यानें असें झालें कीं सरदार जरी लढाईवर असले तरी पण स्वच्छंदानें वागत नसत. आपल्या देशाच्या कायद्याकडे पूर्ण लक्ष्य देऊन वागत असत. **काउन्सिल्**मधील सभासद **पेन्टार्कीस्** ह्मणजे पांचांपांचांच्या टोळ्या असत त्या निवडीत असत; ह्या पंचकड्यांचें खरें स्वरूप आपणास बरोबर ठाऊक नाहीं. तरी पण त्यांकडे दरेक खात्याचे अधिकार असत; आणि ह्या रीतीनें ह्या टोळ्या जमाबंदी, पोलीस, व्यापार, फौज इत्यादि सर्व खात्यांत फार महत्त्वाच्या होत्या. आतां ह्या पंचकड्या **काउन्सिल्**चे भाग असत किंवा **सेनेट**चे भाग असत हें कांहीं बरोबर ठाऊक नाहीं. पण एवढी गोष्ट अगदीं खात्रीपूर्वक सांगतां येते कीं **काउन्सिल्** नेहेमीं तेंच्यातेंच असे. त्यांची काम करण्याची शिस्त अगदीं एकसारखी एक असे व त्यांच्या वर्तनक्रमांत अद्वितीय एकरूपता दृष्टीस पडे. आणि **काउन्सिल्**चें नेहमीं एकच स्वरूप असल्याशिवाय त्यांस असा वर्तनक्रम कदापि ठेवतां आला नसता. **युनायटेडस्टेट्स्**मध्यें जसें **रिपब्लिकन्** सरकार असतें तें **डिमॉक्राटिक्** होतें किंवा एकाची सत्ता दुसऱ्याकडे जाते किंवा **इंग्लंदांत** जसे **कान्सर्व्हेटिव्ह** जाऊन **लिबरल्** येतात तसे कांहीं **कार्थेज्**मध्यें एक पक्ष जाऊन दुसरा येत नव्हता किंवा एकाची सत्ता दुसऱ्याकडे जात नव्हती.

मोठी सभा अथवा **सेनेट**कडे अधिकार काय काय होते ते आपणास माहीत नाहींत. बहुतकरून **सेनेट**कडे कायदेकानू करण्याचें काम होतें व **काउन्सिल्**कडे त्यांची अंमलबजावणी करण्याचें काम होतें व तें सध्यांच्या आपल्या **कांग्रेस्** अथवा **पार्लमेन्ट**सारखें होतें व **काउन्सिल्** हें **मिनिस्ट्रि** अथवा **क्याबिनेट** सारखें होतें.

शेवटीं लोकांची एक सार्वजनिक सभा होती. तिच्या अधिकाराविषयीं आपणास माहिती मुळींच नाहीं. **सेनेट**मध्यें विचार होऊन ज्या सूचना सभेपुढें

येतील त्या पसंत करणें किंवा नापसंत करणें एवढेंच तिचें काम होतें असा अदमास होतो. ह्याचप्रमाणें अधिकाऱ्यांच्या नेमणुका पसंत किंवा नापसंत करण्याचा अधिकार लोकांकडे होता. **स्पार्टा**च्या लोकांना आणि यांना एकच हक्क होते असें **आरिस्टॉटल्**चें मत होतें. आणि आपणास पक्कें ठाऊक आहे कीं **स्पार्टा**च्या लोकांचा राज्यव्यवस्थेशीं कांहींएक संबंध नव्हता.

राजे अथवा **सफेटीस्, सेनेट** आणि त्याचे दोन भाग आणि **सार्वजनिकसंसद** ह्याच कायत्या **कार्थेज्**च्या मुख्य संस्था होत. आतां सरदार वर्ग **कार्थेज्**मध्यें होता कीं नाहीं हा प्रश्न राहिला. बहुतेकांशीं **इंग्लंदां**तील सरदारांच्या वर्गाप्रमाणें तेथेंही सरदारांचा वर्ग होताच. सरदारांच्या कुटुंबांत वंशपरंपरा अमुक पदव्या अशा चालत नसत पण सरदारांच्या वर्गाचें संस्थानांत बरेंच चालत असे. बहुतकरून श्रीमंती असे पावेतोंच सरदारांचें वजन चालत असे. कारण अमुक कुटुंबांतील माणसांनाच सरदार होतां येतें असा निर्बंध कधींही तेथें नव्हता. अद्वितीय संपत्ति आणि अद्वितीय शहाणपण किंवा या दोहोंपैकीं कांहींतरी एक असलें ह्मणजे सरदार वर्गांत मोडतां येत असे.

आरिस्टॉटल्नें लिहिलें आहे कीं, राज्यांतील सर्व हुद्दे बिनपगारी होते. पण हुद्यांपासून मुळींच पैसा मिळत नसे असा याचा अर्थ करावयाचा नाहीं. कारण हुद्दा असला म्हणजे लोकांकडून नजरनजराणे मिळत असत व शिवाय आणखीही द्रव्यप्राप्ती करून घेण्याचे प्रसंग येत असत. **आरिस्टॉटल्**नें असें देखील म्हटलें आहे कीं **'राजा'** व मुख्य **'सेनाधिपति'** हे हुद्दे विकण्यांत येत असत. कदाचित् लांचानें मिळत असत असा त्याचा अर्थ होऊं शकेल. पण त्याच्या शब्दांचा साधारणतः तो अर्थ होऊं शकत नाहीं. शिवाय **कार्थेज्**च्या राज्यव्यवस्थेचा दोष म्हणून त्यानें काढला आहे तो हा कीं एकाच मनुष्याकडे पुष्कळ हुद्दे असूं शकत. त्यामुळें असें होणें शक्य आहे कीं पगार नसला तरी इतर साधनांनीं पुष्कळ पैसा असल्या लोकांना मिळवतां येत असेल. संपत्तिमान् संस्थानांत पुढेंमागें केव्हां तरी निश्चितपणानें जे वृद्धिंगत होतात व जे बहुशः त्यांच्या ऱ्हासास कारणीभूत होतात अशाच दोषांनीं ह्मणजे लांचलुचपतीनें व द्रव्याच्या अनिवार्य लोभामुळें **कार्थेज**चा नाश झाला असें बरेच लोक अनुमान काढतात. **रोम्**ची सुद्धां अशाचप्रमाणें स्वदेशप्रीति

व सद्गुण हें सर्व लयास गेलें तेव्हां क्षणैक न लागतां तें जुलमी राजाच्या ताब्यांत गेलें. **कार्थेज्‌**नें सुद्धां हाच नष्ट होण्याचा मार्ग स्वीकारल्याबरोबर थोड्या श्रीमंत लोकांच्या हातांत त्यांतील राज्यसूत्रें एकदम गेलीं.

साधारण भोजन व्यवहारांची रूढी जशी **स्पार्टा**त तशीच **कार्थेज्‌**मध्येंही होती असें **आरिस्टॉटल्‌**नें लिहिलें आहे. पण **स्पार्टा** म्हटलें ह्मणजे **कार्थे-ज्‌**च्या मानानें अगदींच लहान संस्थान होतें. **स्पार्टा**त लढाईच्या कामाला निरुपयोगी अशीं वृद्ध आणि अति लहान मनुष्यें वगळून टाकलीं (अशा लोकांना साधारण भोजनाला येण्याचा आग्रह नसे) ह्मणजे सुमारें एक हजार लोक काय ते होते; त्याहून अधिक कांहीं नव्हते. उलटपक्षीं **कार्थेज्‌** हें फार दाट लोकवस्तीचें शहर होतें. त्याच्या अगदीं निकृष्टावस्थेचे वेळेस जेव्हां **रोमन** लोकांनीं तें शहर घेतलें तेव्हां सुद्धां त्यांत सात लाखांची वस्ती होती. अर्थातच ह्यापैकीं शहरवासी लोक किती होते हें जरी निश्चितपणें ठाऊक नाहीं तरी पण एकाच स्थळीं भोजन करणें अशक्य होई एवढी तरी संख्या शहरवासी लोकांची खास होती. राज्यचालक वर्गापुरताच फक्त हा साधारण भोजनाचा नियम असला तर बरीक तें संभवनीय दिसतें. **आरिस्टॉटल्‌**नें सुद्धां हीं भोजनें मंडळीकडून होत असत असेंही म्हटलें आहे. शिवाय **लिव्ही**चें ह्मणणेंही यालाच जुळतें. **हानिबाल्‌**नें आपण विदेशी असतांना लढाईच्या पक्षाला जागृत करण्याकरितां कांहीं लोक **कार्थेज्‌**ला पाठविले. त्यांचें येण्याचें कारण व त्यांनीं आणलेला निरोप हीं पहिल्यांदा निरानिराळ्या सभांतून नंतर भोजन समा-जांतून व नंतर **सेनेट**मध्यें वाचून दाखविण्यांत आलीं. आणखी एका इतिहास-कारानें असें लिहिलें आहे कीं **कार्थेज्‌**चे लोक आपल्या राज्यकारभाराचीं बहुतेक कामें रात्रीं करीत असत. संध्याकाळीं आणि रात्रीं ते आपले समाज आणि सभा भरवीत असत. ह्या समाजांतून आणि सभांतून बहुतेक भावी सूचना तयार होत असत. सध्यांच्या अर्वाचीन राज्यव्यवस्थेंत **कॉकस्‌** म्हणून जशा वजनदार लोकांच्या सभा भरून त्यांत स्वपक्षाचा कार्यक्रम ठरविण्यांत येत असतो तशाच प्रकारच्या या **कार्थेज्‌**च्या लोकांच्या सभा व समाज असत.

अथेन्स्‌प्रमाणें न्याय इनसाफ **कार्थेज्‌**च्या सार्वजनिक सभेकडे नसे. त्या कामाकरितां निराळ्या कचेऱ्या काढलेल्या होत्या. ह्यांपैकीं एकाचें नांव*

* ही सभा शंभर सभासदांच्या काउन्सिलहून भिन्न होती.

'एकशेंचार लोकांची सभा' असें होतें. कदाचित् हें सर्व न्याय खात्याचें मिळून साधारण नांव असावें. त्यांपैकींच निरनिराळ्या जातीचे खटले तोडण्या-साठीं निरनिराळ्या कचेऱ्या ते भरवीत असत.

ज्या शहरांतून निघून त्यांनीं आपलें नवें राज्य स्थापन केलें त्या **टायर**चा आणि **कार्थेज्**चा धर्म एकच होता. मुख्य देव **बालहाम्मान्** अथवा **मॉलॉक्** होता. ज्यांनीं **कार्थेज्**चीं खिंडारें खणून काढून जगाला **कार्थेज्**विषयीं बरीच माहिती करून दिली आहे त्या **डाक्तर डेविस्** साहेबांनीं असें लिहिलें आहे कीं, ह्या देवाचें नांव सांपडत नाहीं, असें एकही देवालय किंवा पूजास्थान **कार्थेज्**मध्यें नव्हतें. त्या देवाला नेहमीं मनुष्यप्राण्यांचे बळी देत असत. त्याचा वृत्तांत तर या पुस्तकांत आपण वारंवार ऐकतोंच.* ह्या असल्या क्रूर आचारामुळें **ग्रीक** लोक ह्या देवाला **क्रॉनॉस्** अथवा **स्याटर्न** म्हणत असत. कारण ह्या **स्याटर्न** देवानें आपलीं मुलें खाल्लीं अशी **ग्रीक** लोकांत दंत-कथा आहे.

मानमान्यतेंत ह्याच्या खालोखाल **मेल्कार्ट** म्हणून देव असे. हें दैवत **कार्थेज्**च्या गृहदैवतांपैकीं एक असे. **टायर**चेंही हेंच गृहदैवत असे. **ग्रीक्** लोक या देवाला **हर्क्यूलिस्** ह्मणत असत. **टायर**चें ह्या देवाचें अतिभव्य व शोभायमान देवालय जगतांत अतिविख्यात स्थानांपैकीं एक असे. निर-निराळीं दानें व हवनें घेऊन **कार्थेज**हून लोक नियमानें ह्या स्थळीं पाठ-विण्यांत येत असत. ह्या देवाला मानवीरूप असल्याचें कोठेंही ऐकण्यांत किंवा पाहण्यांत आलें नाहीं. **हेराडोटस्**नें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यानें **टायर**चें मुख्य देवालय पाहिलें होतें, तरी तो तेथील मूर्ति वगैरेचें कांहींएक

* **अगॉथॉक्लीस्**नें जेव्हां **कार्थेज्**ला वेढा दिला तेव्हां शहरांतील उत्तम घराण्यांतील दोनशें मुलें बळी देण्यांत आलीं तीं या **मॉलॉक्** देवाला. तसेंच तीनशें मनुष्यें आपण होऊन बळी गेलीं. ज्या **कानानाईट्** अथवा **फिनिशिअन्** लोकांना **इस्राएल्** लोकांनीं **प्यालि-स्टाईन्**मधून हांकून दिलें त्या लोकांत हे असले नरयज्ञ फार जारी होते. **इस्राएल्** लोकांत हे पसरूं नयेत ह्मणून बरीच खबरदारी घेतली होती. **बायबल्**मध्यें ह्मटलें आहे "तूं आपलें बीज **मॉलॉक्** देवाला बळी देऊं नको" तरी पण हे **इस्राएल्** लोकांत बरेच पसरले. **सालोमन्**नें **मॉलॉक**चें देऊळ बांधलें आणि पवित्र **जोशिआ**नें **हिमाम्**च्या दरींत नर-यज्ञ करून ती विटाळली. तींत कोणीही आपलीं मुलेंबाळें बळी देऊं नयेत अशी सक्त आज्ञा होती.

वर्णन करीत नाहीं. ज्या अतिमौल्यवान् देणग्या देवास देण्यांत आल्या आहेत त्यांपैकीं एक सोन्याचा व दुसरा पाचेचा असे दोन अतिमौल्यवान् स्तम्भ तेथें असल्याबद्दल तो लिहितो. त्यांचा रात्रीं अतिशय प्रकाश पडत असे.* **ग्रीक्**लोक जिला **पोसिडोन्** ह्मणत असत व **रोम्**चे लोक जिला **नेप्च्यून्** म्हणत असत त्या जेलदेवतेचीही पूजा **कार्थेज्**मध्यें लोक करीत असत. **फिलिस्ताईन्** लोकांमध्यें ज्या **डेगन्** अथवा मच्छरूपी देवाची पूजा करीत असत तो आणि हा एकच देव होता. **ऑस्टारथ्** कीं जिला **ग्रीक्** लोकांत **आस्टार्टी** म्हणत असत ती **अफ्रोडाईट** अथवा **व्हीनस्** होय. **कार्थेज्**मध्यें तिला **त्यानिट्** ह्मणत असत. **ग्रीक्** लोकांच्या **ट्रायटन्** देवाची ही **कार्थेज्**चे लोक पूजा करीत असत. पण त्याला ते काय ह्मणत असत तें आपणास ठाऊक नाहीं. **ग्रीक ट्रायटन्** हा समुद्रसंबंधी देव होता; तेव्हां तो आणि **डेगन्** बहुतांशीं एकच असतील. धर्माधिकाऱ्यांचा निराळा वर्ग असा **कार्थेज्**मध्यें नव्हता. पण लढाई सुरू असतांना सुद्धां राजे आणि मुख्य सेनाधिपती हे यज्ञ, होम वगैरे करीत असत. **हायमेरा**च्या लढाईचे वेळेस **हस्ड्रुबाल**नें यज्ञ केला होता.

* हा स्तम्भ बहुतकरून हिरव्या कांचेचा असेल. कारण **इजिप्त**च्या लोकांना पुष्कळ आधीं कांचेची माहिती होती. त्या स्तंभाच्या आंत दिवा लावीत असतील त्यामुळें प्रकाश पडत असेल.

भाग तिसरा.

जमाबंदी आणि व्यापार.

कार्थेज्च्या जमाबंदीचीं साधनें बरींच होतीं. त्यांपैकीं कांहीं खालीं नमूद केलीं आहेत.

१ **मांडलिक आणि हाताखालच्या राज्यांपासून खंडणी**:—**कार्थेज्**च्या स्थापनेच्या अगोदरचीं व मागाहून अस्तित्त्वांत आलेलीं **आफ्रिके**तील किनाऱ्यावरचीं सर्व **फिनिशिअन्** शहरें **कार्थेज्**ला द्रव्यरूपानें खंडणी देत असत, उदाहरणार्थ **लेसर् सार्टिस्** मधील **लेप्टीस्** संस्थान दररोज एक ट्यालन्ट् खंडणी देत असे. मध्यभागांत जे लोक राहत होते ते आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या धान्य वगैरेच्या द्वारें खंडणी देत असत. कांहीं धान्य देत असत. कांहीं फिरत्या जाती खजूर, रानटी जनावरें, कमावलेलीं कातडीं, सोनें आणि मौल्यवान् दगड इत्यादि देऊन खंडणीची भरती करून देत असत. बाह्य प्रदेशांतीलही **कार्थेज्**च्या ताब्यांतील संस्थानें याच प्रकारें खंडणी देत असत. सैन्याच्या खर्चासाठीं वगैरे ह्मणून धान्याचा कांहीं भाग तीं संस्थानें आपल्या इकडेस ठेवीत असत व बाकीचें धान्य **कार्थेज्**ला धाडून देत असत. खंडणी जी संस्थानांतून घ्यावयाची ती अमुक एक रक्कम घ्यावयाची असें कांहीं ठरलेलें नव्हतें. **कार्थेज्**च्या सरकाराला जशी अधिकउणी गरज असेल तशी

खंडणीची रक्कम वाढविण्यांत येत असे; कधीं कधीं तर सर्व राज्याच्या वसूलाचा अर्धा अधिक हिस्सा खंडणीच्या रूपानें द्यावा लागत असे.

२ कर, दाण वगैरे—कार्थेज्च्या बहुतेक तहांत कराविषयीं शर्ती आढळतात. हे कर घेण्याचे नियमही मोठे सख्त होते. **एट्रुरीअन्** लोकांपासून **कार्थेज्**च्या लोकांनीं ज्या अटी कबूल करून घेतल्या होत्या त्यांत अमुक जिनसा **कार्थेज्**मध्यें आणाव्या व अमुक आणूं नयेत अशा शर्ती होत्या. दुसऱ्या **प्यूनिक्** लढाईच्या अखेरीस जेव्हां **हानिबाल्**ची सत्ता **कार्थेज्**मध्यें बरीच होती तेव्हां ह्या कर घेण्यासंबंधीं व्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली. समुद्राच्या बाजूनें आणि जमिनीवरून दोहींकडूनही येणाऱ्या मालावर कर होतेच. ह्या **हानिबाल्**च्या व्यवस्थेनें राज्याच्या वसुलांत इतकी सुधारणा झाली कीं **कार्थेजां**तील लोकांचे कर अजी कमी करावयास त्यास सांपडले. हे कर अतिशय जबरदस्त असत यांत कांहीं संशय नाहीं. कारण **सायरीन्** भोंवतालचीं **ग्रीक्** संस्थानें आणि **कार्थेज्**च्या अंमलाखालीं असलेलीं संस्थानें हीं नेहेमीं ते कर चुकविण्यासाठीं हर तऱ्हेच्या लबाड्या करीत असत.

३ खाणीः—कार्थेज्च्या **स्पेनां**त आणि **कॉर्सिकां**त खाणी होत्या. त्यांतील अतिमौल्यवान् खाणी **न्यू** अथवा **नव्या कार्थेज्**जवळ होत्या. **पोलिरिअस्**च्या कारकीर्दींत जेव्हां **रोम्**चे लोक त्या खाणी चालवीत होते तेव्हां दररोज सुमारें दोन हजार पाउंड त्यांतून काढीत असत. **अलेटीस्** नांवाच्या कोणी एका मनुष्यानें ह्या खाणींचा प्रथम शोध लावला. त्यानें स्वदेशहितार्थ इतकी खटपट केली होती कीं त्याच्या नांवाचें एक देवालय **न्यू कार्थेज्** येथें बांधलें होतें. तरी पण **डायोडोरस्**नें ह्मटल्याप्रमाणें सर्व खाणी ह्मणजे **कार्थेज्**च्याच ताब्यांत होत्या व **कार्थेज्**च चालवीत होतें असें ह्मणणें खरें होणार नाहीं. पुष्कळ खाणी शहरवासी लोकांच्या खाजगी होत्या आणि ते लोक त्यापासून पुष्कळ पैसे मिळवीत असत. सुप्रसिद्ध **बार्का** कुटुंब जें इतकें प्रसिद्धीस आलें व जें त्याचें वजन सर्व **आथेन्स्**वर इतके दिवस पडलें त्याचें कारण त्यांना या खाणींतून मिळालेली संपत्तिच होय. **हानिबाल्**ला ह्या खाणींमुळेंच फार संपत्ति मिळत होती असें ऐकिवांत आहे. बहुधा सरकारच्या ताब्यांत कांहीं थोड्याशा खाणी असतील व बाकीच्यांवर सरकारी कर असेल. अर्थातच हा कर खाणीच्या संपत्तिमत्तेच्या प्रमाणानें असेल.

कार्थेज्च्या व्यापाराचे मुख्य दोन भाग केलेले आहेत. एक **कार्थेज्**चा **आफ्रिके**शीं व्यापार व दुसरा **कार्थेज्**चा **युरोप**शीं व्यापार.

आफ्रिकेशीं व्यापार:—मध्य प्रदेशांतील रानटी लोकांशीं हा व्यापार बहुश: चालत असे. हा एक समुद्राच्या मार्गानें व दुसरा खुष्कीच्या मार्गानें अशा दोन मार्गांनीं चालत असे. ह्या रानटी लोकांविषयीं बरीच माहिती ज्यानें आपणास करून दिली त्या **हेराडोटस्**नें ह्या व्यापाराविषयींही कांहीं थोडीशी माहिती दिली आहे. त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांच्या व्यापाराच्या रीतीचें वर्णन केलें आहे:—

"**आफ्रिकेंत हरक्यूलिस्**चे स्तम्भापुढें एक देश आहे तेथें **कार्थेज्**चे-लोक आले म्हणजे ते आपला सर्व माल किनाऱ्यावर उतरून ठेवीत असत. सर्व माल उतरून टाकला ह्मणजे ते पुन: गलबतावर जात व तेथें एक मोठा धूर करीत असत. तो धूर लोकांच्या नजरेस पडला ह्मणजे मग ते समुद्र-किनाऱ्यावर सोनें ठेवून दूर कोठें तरी जाऊन बसत. तदनंतर **कार्थेज्**चे लोक जहाजांवरून खालीं उतरून येत आणि जर त्यांना आपल्या मालाइतकें सोन्याचें मोल दिसलें तर तें सोनें घेऊन परत जात. जर त्यांना सोनें कमी दिसलें तर ते जहाजावर परत जात आणि स्वस्थ बसत. मग ते रानटी लोक पुन: येत असत व आणखी कांहीं सोनें तेथें ठेवीत असत. अशा रीतीनें **कार्थेज्**चे लोकांना किंमत रुजू होईपावेतों चाले, कोणी कोणास इजा करीत नसे. कारण दोन्हीं सारखीं होईतोंपावेतों **कार्थेज्**चेलोक सोन्याला शिवत नसत व ते रानटी लोक ह्यांनीं सोनें घेतल्याशिवाय मालाला शिवत नसत.* खुष्कीच्या मार्गानें व्यापार करण्याकरितां **इजिप्त**च्या वरच्या भागांत **थिबीस्** ह्मणून ठिकाण आहे तेथून व्यापाऱ्यांचे समूह निघत असत. **हेराडोटस्**नें रस्त्यांतील सर्व उतरावयाचीं ठिकाणें वगैरे विगतवार दिलीं आहेत. पश्चिमेच्या बाजूला

* अगदीं ह्याचसारखा वृत्तांत **क्याप्टन् लिन्**च्या पुस्तकांतून **हिरिन**नें उतरून घेतला आहे. "**साउडन्**मध्यें साहारा अरण्याच्या पलीकडील प्रदेशांत कीं जेथें सोनें पुष्कळ सांपडतें तेथें अदृश्य लोक राहतात; तेथें व्यापार रात्रीचा चालतो. त्यांच्याशीं व्यापार करणारे लोक आपला माल तेथें आणून टाकीत असत व रात्रीचे विश्रांती घेण्यास जात असत. सकाळीं दरेक मालाच्या ढिगाजवळ एक एक सोन्याच्या मातीचा ढीग सांपडत असे तो जर त्यांना पुरेसा वाटला तर ते माल तेथें टाकून जात असत, अपुरासा वाटला तर अधिक सोन्याची माती येईतोंपावेतों ते दोन्हीही तसेंच ठेवीत असत."

जिब्राल्टर्पावेतों व दक्षिणेच्या बाजूस **फेझन्**पावेतों किंवा पुढेंही ते जात असत.

सुधारलेले लोक रानटी लोकांशीं ज्या वस्तूंचा बहुश: व्यापार करतात तसल्याच जिनसा **कार्थेज्**चे लोक रानटी लोकांपाशीं विकावयास नेत असत. दिखाऊ शोभेच्या जिनसा, अति भपकेदार रंग दिलेलें कापड आणि हलक्या प्रतीचीं हत्यारें ह्याच व्यापाराच्या मुख्य वस्तू होत्या. मीठही व्यापाराच्या अति महत्त्वाच्या वस्तूंपैकीं एक होतें. अगदीं मध्यभागीं राहणाऱ्या लोकांना परदेशांतून आल्याशिवाय मीठ मिळण्याची सोयच नव्हती. जीवनास तर ते फारच आवश्यक तेव्हां **कार्थेज्**ला तें नेण्यांत बराच फायदा होत असे. ते कांहीं समुद्रांतूनच आणीत असत असें नाहीं. तर जेथें पुष्कळ होत असेल अशा ठिकाणांहूनही ते तें नेत असत.

आपल्या मालाच्या बदली ते ज्या जिनसा घेत असत त्यांची गणना फारच थोड्यांत होण्याजोगी आहे. प्रथमत: सोनें; पैशाच्या रूपानें अथवा भांड्याकुंड्याच्या रूपानें **कार्थेज्**मध्यें सोनें अतिशय होतें. तदनंतर गुलाम; ज्यांचें दास्यत्व अद्यापि अगदीं गेलें नाहीं असे **नीग्रो**लोक तेव्हांपासून दास्यत्वांत होतेच. जरी कोणतेंही **ख्रिस्ती** राज्य उघड रीतीनें गुलामाचा धंदा करीत नाहीं तरी पण अद्यापि पृथ्वीवरून गुलाम नाहींसे झाले आहेत असें नाहीं. **नीग्रो** शिवाय इतर लोकही प्राचीनकाळीं गुलाम होत. त्यावेळच्या गुलामगिरींत दु:खद गोष्ट अशी असे कीं, राष्ट्रहिताकरितां म्हणा कीं स्वहिताकरितां ह्मणा, लढाईंत सांपडलेले कैदी व हस्तगत झालेल्या शहरांतील शहरवासी लोक ह्यांना गुलाम ह्मणून विकत असत. त्यामुळें धनी आणि त्याचा गुलाम हे दोघेही सारख्या कुलांत उत्पन्न झालेले व सारखे शिकलेले असेंही कधीं कधीं घडत असे. पण हे असले गुलाम नेहमीं असंतुष्ट असावयाचे व धन्यालाही त्यांची नेहमीं भीति वाटावयाची. ह्या कारणांनीं **नीग्रो**लोकांची किंमत फार चढली. **ग्रीक्** लोकांच्या अतिसुंदर वर्णाशीं व नीटनेटक्या अवयवाशीं ह्या **नीग्रो**लोकांचे विचित्र चेहरे अत्यंत विसदृश असल्यामुळें लोकांना असले

* एका **ल्याटिन** ग्रंथकर्त्यानें सुशिक्षित आणि अशिक्षित गुलाम असे गुलामांचे प्रकार केले आहेत. तो ह्मणतो **रोम** येथील अगदीं पूर्वींचे शिक्षक सर्व गुलाम असत आपल्या एका गुलामाकडे सर्व सरदारांचीं मुलें शिकावयास ठेवून वडील **क्रेटो**नें पुष्कळ पैसा मिळविला.

गुलाम ठेवण्याची विशेष हौस वाटूं लागली. **मिनांडर**मध्यें एक शिपाई आपल्या प्रियपत्नीला म्हणतो आहे 'तुझ्याकडे वाहणारा प्रीतीचा ओघ कधीं तरी तूं बंद पडतांना पाहिला आहेस काय? तूं मला **इथिओपिआ**ची दासी मला पाहिजे असें ह्मणालीस मात्र कीं माझें सर्व काम सोडून मा तुझ्यासाठीं एक शोधून आणली नाहीं काय?'

हस्तिदंत सुद्धां **कार्थेज्**चे व्यापाराच्या जिनसांपैकीं एक असेल; कारण **ग्रीक** लोकांना मूर्ति वगैरे करण्यास तें लागत असे.* वरिष्ठ न्यायाधीशाच्या खुर्च्या वगैरे सामान करण्यांतही तें वापरीत असत. हस्तिदंत **कार्थेज्**मध्यें कोठून येत असे हें कांहीं पक्कें सांगवत नाहीं. **व्हर्जिल्**नें तें **हिंदुस्तानां**तून येत होतें असें म्हटलें आहे व **प्लीनी**नें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, अगदीं पूर्वेच्या ऐषआरामाच्या वस्तूंशिवाय बाकी सर्व **रोमन** लोकांनीं वापरून टाकून दिल्या होत्या. एवढी गोष्ट बरीक खरी आहे कीं **कार्थेज्** जेव्हां अगदीं पूर्ण आबादानींत होतें तेव्हां तेथील व्यापारी हस्तिदंताचा अति मोठा व्यापार चालवीत असत. **आफ्रिकें**त अति उत्तम जातीचे आणि अति मोठे असे हस्तिदंताचे तुकडे अद्यापि सांपडतात. **साहारा**च्या दक्षिणेस जेथून म्हणून माणसांनीं आपली वस्ती करून हांकून लाविले आहेत त्याशिवाय इतर सर्व ठिकाणीं हत्ती पुष्कळ सांपडतात. **कार्थेज्**चे लोकांत हत्ती पाळण्याची रीत फार होती. **आफ्रिकें**तील इतर कोणतेही लोकांत हत्ती पाळण्याची चाल अद्यापपावेतों नाहीं.

रानटी लोक **कार्थेज्**चे मालाचे बदली त्यांना मौल्यवान हिरे, माणकें व दगड देत असत. **कार्थेज्**हून **युरोपां**त **कार्बन्कल्** नांवाचा दगड अतिशय येत असे. त्याला '**कार्थेज्**चा **दगड**' असेंच लोक म्हणत असत. खजूरही **कार्थेज्**चे लोकांना मध्यप्रदेशांतूनच मिळत असे.

युरोपशीं व्यापार:—**युरोपा**शीं ही वरील सांगितलेल्याच जिनसांचा व्यापार बहुशः चालत असे. शिवाय ह्या देशचा माल त्या देशाला नेऊन पोंचवि-

* **फिडिआस्**नें बनविलेले सुप्रसिद्ध पुतळेः—**आलिम्पिअस्** येथील **झीअस्**चा, **आर्गास** येथील **हिरिस्**चा व **आथेन्स्** येथील **आथिनिआ**चा हे सर्व पुतळे हस्तिदंत व सोनें यांचे बनविलेले आहेत आणि त्यांना **क्रिसेलेफंटाईन** असें ह्मणतात.

ण्याचें कामही **कार्थेज्**चे लोक करीत असत. **लिपारा** व **इटली**च्या दक्षिण प्रदेशांतून राळ होत असे; तसेंच **सिसिली**च्या उत्तरभागांत गंधक फार उत्पन्न होत असे. मध आणि मेण ह्या **कार्सिका**च्या व्यापाराच्या जिनसा होत्या. **कार्सिकें**-तील गुलामांनाही बरीच किंमत येत असे. **एल्बाचें** लोखंड, **बालेआरिक** बेटांतील फळफळावळ आणि जनावरें, **ब्रिटन्**मधील जस्त आणि तांबें आणि **बाल्टिक**समुद्रांतील **आम्बर** ह्याही व्यापाराच्या मुख्य वस्तू होत्या. किनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांशींच ते व्यापार करीत असत असें नाहीं तर मध्यप्रदेशांतही व्यापार करण्यास जात असत. ह्याच रीतीनें **स्पेन**देशांतून **फ्रान्सा**च्या मध्यभागांत ते माल चढवीत असत. त्यांना हा इतका लांब मार्ग स्वीकारावाच लागत असे; कारण **मार्सेलस्**चे लोक समुद्राचे किनाऱ्यावर त्यांना कोठ्या बांधूं देत नसत.

व्यापाराविषयीं लिहीत असतांना "**चर्मनाणक**" ह्मणून एक **कार्थेज्**चें नाणें होतें, त्याविषयींची चमत्कारिक माहिती येथें देणें आवश्यक आहे. ज्या ग्रंथांत हें वर्णन सांपडतें त्याला **साक्रेटिस्**चा शिष्य **एश्चाइनिस** याचें नांव आहे. पण हें नाणें त्याहून फार जुनें असावें. ग्रंथकर्ता कोणी असो त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें ह्या नाण्याचें वर्णन केलें आहे. "एका लहानशा कातड्याच्या तुकड्यांत चार **ड्राक्मां**च्या (तीन शिलिंग अथवा दीड रुपया) आकाराएवढा कोणत्याशा पदार्थाचा तुकडा गुंडाळीत असत; पण हा पदार्थ काय आहे हें नाणें करणाराशिवाय कोणालाही माहीत नसे. एवढें झाल्यावर त्याच्यावर सरकारी छाप होऊन तें नाणें ह्मणून चालविण्यांत येत असे. ज्याच्यापाशीं हीं नाणीं पुष्कळ असत त्याला सर्वांत श्रीमंत म्हणत असत. पण कोणा-पाशीं कितीही इतर नाणीं असलीं तरी तितक्या गारगोट्या आसल्यासार-खींच असत; हा पदार्थ कांहीं तरी धातूंचें मिश्रण असेल. पण त्या मिश्रणांत कोणकोणत्या धातु व किती परिमाणानें असावयाच्या तें फक्त संस्थानासच माहीत असे. त्याच्यावरचा छापही संस्थानाचाच असे." कांहीं अंशीं सध्यांच्या कागदाच्या नोटीसारखेंच हें कांहीं तरी असेल.

कार्थेज्चे लोकांचें कलाकौशल्य आणि विद्या अथवा वाङ्मय याविषयीं कांहीं फारसें बोलावयाचें नाहीं. **फिनिशिअन्** लोकांची बुद्धि दोहींकडेसही नांव करण्यास त्यांना उपयोगी पडली नाहीं. **कार्थेजिनिअन्** सुधारणेपैकीं जे थोडेसे

भाग शिल्लक आहेत आणि त्यांत जें हल्लीं कलाकौशल्यविषयक चातुर्य दिसत आहे तें स्पष्टच **ग्रीक**लोकांच्या संसर्गाच्या परिणामाचें सूचक होय. त्यांच्या नाण्यावरची नकशी **ग्रीक** कारागिरांच्या हातची होय. **कार्थेज्**चे लोकांच्या विद्येविषयीं कांहींच निश्चितपणें सांगवत नाहीं. **रोमन**लोकांनीं जेव्हां त्यांचें राज्य घेतलें तेव्हां शहरांत पुस्तकसंग्रहालयें होतीं असें खातरीनें सांगतां येतें, आणि असेंही सांगतां येतें कीं, जिंकणाऱ्या लोकांना त्यांची किंमत न कळल्यामुळें त्यांनीं तीं **आफ्रिके**च्या राजे लोकांचे हातीं जाऊं दिलीं. पण त्यांत खुद्द **कार्थेज्**चा कांहीं ग्रंथसमूह होता किंवा नाहीं ह्याविषयीं संशयच आहे; कदाचित् त्या पुस्तकसंग्रहालयांतून **ग्रीक** ग्रंथकर्त्यांचेच ग्रंथ असतील. एका **कार्थेजिनिअन्** ग्रंथाविषयीं आपणास थोडीशी माहिती आहे; त्या पुस्तकाचें नांव, ग्रंथकर्त्याचें नांव, विषय व आरंभाचें वाक्य एवढें आपणास माहीत आहे. हें पुस्तक शेतकीवर आहे; **मेगो** नांवाच्या मनुष्यानें हें लिहिलें होतें. त्याच्या आरंभाचें वाक्य असें आहे कीं "ज्याला आपलें शेत चांगलें करावें अशी इच्छा असेल त्यानें आपलें शहरांतलें घर विकून टाकावें". ह्या ग्रंथाचा इतका मान असे कीं **रोम**चे लोकांनीं जेव्हां **कार्थेज्** घेतलें तेव्हां **रोम**न सभासदांनीं त्याचें **ल्याटिन**मध्यें भाषांतर करविण्याकरितां एक मंडळी नेमिली. पाठीमागून त्याचें **ग्रीक** भाषेंत भाषांतर झालें. **रोमन** ग्रंथकर्ते त्याचा पुष्कळ उपयोग करून घेत असत आणि **सिसरो** हा ग्रंथ शेतकीवर प्रमाण असें मानीत असे.

कार्थेज्चे लोकांचे गृहस्थितीविषयीं आपणास कांहींएक माहिती नाहीं. जेथें संपत्ति पुष्कळ तेथें ऐषआरामही पुष्कळ असावयाचाच. कांहीं इतिहासकारांनीं ह्या ह्मणीचा प्रत्यय **कार्थेज्**चे राज्यांतही दाखविला आहे. आपण मागें बघितलेंच आहे कीं, **कार्थेज्**चे भाड्याचे शिपायांनीं जेव्हां पगारासाठीं **कार्थेज्**चे सरदारांना फार निकड लावली तेव्हां आपल्या **कार्थेज्**च्या शिपायांचे रुप्याचे पाणी प्यावयाचे प्याले वगैरे त्यांना हरकीसाठीं ह्मणून देतां आले. शिवाय असल्या सर्व गोष्टी एकत्र करणारा **अथिनिअस्** म्हणतो कीं, **डायोनिसिअस्**नें एका **कार्थेजिनिअन्** लक्षाधिपतीला तीस हजार पाउंडाएवढ्या अविश्वसनीय रकमेला एक झगा विकला. इतर देशांप्रमाणें **कार्थेज्**संबंधानेंही असें म्हणतां येईल कीं, देशांत जसजशी संपत्ति वाढत जाते तसतशीं मनुष्यें निस्सत्व होत जातात. राजकीय आणि युद्धकौशल्याची नीति

त्यांस पूर्णपणें अवगत होती. पण ते दिवसेंदिवस भाड्याचे शिपायांवर अधिक अधिक भिस्त ठेवूं लागले. अर्थातच हीं पैशानें विकत घेतलेलीं माणसें मागेंपुढें ऐन प्रसंगीं कशीं उपयोगीं पडणार? व न पडलीं तर त्यांत नवल तें कोणतें?

पुस्तक चौथें.

कार्थेज् आणि रोम्.

[पहिल्या आणि दुसऱ्या **प्यूनिक** लढायांविषयीं मुख्य आधारभूत ग्रंथ **पॉलिबिअस्** आणि **लिव्हि** होत. त्यांपैकीं **पॉलिबिअस्** हा **ग्रीक** होता व **कार्थेज्** जिंकणारा जो धाकटा **सिपिओ** त्याचा उत्तम मित्र होता. तो **कार्थेज्** काबीज करण्याचे वेळीं स्वतः हजर होता. पण त्यानें ह्याचें वर्णन ज्या भागांत केलेलें आहे तो भाग आणि तिसऱ्या **प्यूनिक** लढाईचा बहुतेक भाग नाहींसा झाला आहे. पहिल्या **प्यूनिक** लढाईची माहिती बहुशः प्रस्तावनेच्या भागांत लिहिलेली आहे; ती आणि दुसऱ्या लढाईची आहे तितकी माहिती फारच चांगली व महत्त्वाची आहे.. पण दुःखाची गोष्ट ही कीं ह्यांतीलही बहुतेक भाग नाहींसा झाला आहे. पांचव्या नंतरचें एकही पुस्तक समग्र उपलब्ध नाहीं व पांचव्या पुस्तकांत **कानी**च्या लढाईपर्यंत इतिहास आणून सोडलेला आहे. पण नष्ट पुस्तकांपैकीं ही बराच ग्रंथ उताऱ्याच्या रूपानें शिल्लक आहे. अशाच एका उताऱ्यांत **झामा**च्या लढाईचें समग्र वर्णन आहे. **मोलिरिअस**हा अति प्रशंसनीय इतिहासकारांपैकीं एक आहे. त्यानें माहिती मिळविण्याची पुष्कळच खटपट केली आहे. व तो अतिशय सरळ व न्यायी इतिहासकार आहे.

लिव्हि (टायटस् लिव्हिअस्) हा **रोमन् रिपब्लिक्**च्या अखेर अखेरच्या दिवसांत आणि **एम्पायर्**च्या आरंभींच जाहला. कारण तो **ख्रिस्तीशकाच्यापूर्वी** ५९ व्या सालीं जाहला ह्मणजे **फर्स्ट ट्रायम्व्हरेट**च्या वेळीं जन्मला, आणि **टाय्बेरिअस्**च्या चवथ्या सालीं वारला. त्यानें एकशें बेचाळीस पुस्तकांत एक **रोम्**चा इतिहास लिहिलेला आहे. त्यांपैकीं फक्त पसतीस पुस्तकेंच काय तीं शिल्लक आहेत. आनंदाची गोष्ट ही कीं एकवीसपासून तीसपर्यंतचीं दहा पुस्तकें व ज्यांत दुसऱ्या **प्यूनिक** लढाईचें अव्वलपासून अखेरपर्यंत वर्णन आहे, तीं पुस्तकें सर्व शिल्लक आहेत. आणि हरवलेल्या पुस्तकांची साररूपानें माहिती बरीच उपलब्ध आहे. त्यावरून पहिल्या आणि तिसऱ्या **प्यूनिक** लढायांची बरीच माहिती आपणास होते. **लिव्हि** हा फारच मोठा ग्रंथकर्ता आहे. मोठमोठ्या ग्रंथकारांनीं त्याची भाषासरणी प्राचीन आणि अर्वाचीन सर्व ग्रंथकर्त्यांत अतिशय चांगली आहे असें आपलें मत दर्शविलें आहे. त्याची भाषा फार जोरदार असूनही फार सुंदर आहे. पण **लिव्हि** हा फार मोठा इतिहासकार आहे असें ह्मणवत नाहीं. त्यानें अगदीं निष्काळजीपणानें लिहिलेलें आहे. ज्या लढायांचें किंवा ज्या बिनांचें तो वर्णन करतो त्या लढायांच्या स्थळीं किंवा इतर ठिकाणीं—मग तीं ठिकाणें अगदीं त्याच्या जवळ कां असेनात—तो कधींही गेला नाहीं किंवा स्वतःच्या मनांत त्या स्थळांची वगैरे कल्पना आणण्याचीही त्यानें कधीं ही खटपट केली नाहीं. तिसऱ्या **प्यूनिक्** लढाईविषयीं मुख्य आधारभूत ग्रंथ **एपिअन्**चा होय. हा **अलेक्झांड्रिआ**चा रहिवाशी होता. त्यानें **ग्रीक** भाषेंत **रोम्**चा इतिहास लिहिलेला आहे. त्यांत देरेकसंबंधानें निरनिराळें वर्णन केलें आहे.]

भाग पहिला.

सिसिलींतील आणि समुद्रावरील लढाई.

सिसिलींतील मागील लढायांत कधीं **ग्रीक** लोकांच्या पक्षानें कधीं **कार्थेज्**च्या पक्षानें लढत असतांना आपण **काम्पानि-अन्** लोकांचें नांव ऐकलेंच आहे. त्या लोकांना बिलकुल पर्वा नसे. ते थोडासा पैसा अधिक मिळाला किंवा थोडीशी जयाची आशा वाटली कीं लागलीच बेधडक आपली बाजू सोडून देत. इतर रीतीनें मिळालेली त्यांच्या वाईटपणाविषयीं जी हकीगत आपण ऐकतों, त्याला अनुरूप अशीच ही त्यांची संवय दिसते. ते गरीब होते ह्मणून आपली तरवार लोकांच्या खिदमतीस ठेवीत असत असें नाहीं तर त्यांना लढाईची व शिपाईगिरीची हौस फार असे. ते मनःपूत आचरण करणाऱ्या दुर्वृत्त आईबापांचे मुलगे होते व घरीं त्यांच्या स्वभावास योग्य असा कांहीं धंदा नसल्यामुळें व घरीं असल्यास नेहमीं रोम्‌चे लोकांशींच प्रसंग पडल्यामुळें ते कामधंदा शोधण्यास बाहेर पडले व त्यांना योग्य असा धंदा **सिसिलींत** सांपडला हें तर आपणांस ठाऊकच आहे. ह्या लोकांनीं **ग्रीक** शहरांतील एका शहराला एका प्रसंगीं जो क्रूरपणा व जी निघृणता दर्शविली ती तशा रीतीनें दर्शविली यांत आश्चर्य वाटण्याजोगतें कांहीं नाहीं असें आपणास तेव्हांच समजून येईल. **अगॉथॉक्लीस्** जरी मोठा जुलूम करणारा मनुष्य होता तरी पण तो अतिउत्साहाचा मनुष्य होता. त्याच्या मरणोत्तर

सिसिलींत जिकडे तिकडे बेबंदपाच्छाई सुरू झाली, आणि दंगेधोपे वाढले. शिवाय या अव्यवस्थेचें आणखी एक कारण असें झालं कीं **अगॉथॉक्लीस्**च्या तैनातीस असलेल्या **काम्पेनिअन्** शिपायांनीं त्याच्या मरणानंतर आपण स्वतंत्र आहों असें जाहीर केलें व आपलें सर्व लष्कर लढाईस उभें केलें. त्यांनीं **मेसाना** शहराला वेढा दिला; त्या शहराच्या लोकांना ठार केलें व कांहीं-कांना हाकून लावलें आणि त्या लोकांपाशीं होतें नव्हतें तें सर्व लुटून फस्त केलें. कांहींवेळ पावेतों ह्या **मामर्टाइन** (कारण हें नांव त्या लुटारू लोकांनीं धारण केलें होतें, ह्याचा अर्थ **मार्स** देवाचे भक्त) लोकांचा बराच उत्कर्ष झाला आणि त्यांची सत्ता **सिसिलीं**तील आजूबाजूच्या प्रांतांवर पसरली. पण इतक्यांत त्यांच्या सत्तेला कांहीं व्यत्यय आला. कारण **सायराक्यूस**ला **हायरो** म्हणून एक मोठा अनुभवी व शूर राज्यकर्ता सांपडला (त्याविषयीं पुढें बरेंच वर्णन येणार आहे). त्यानें ह्या लोकांची अगदीं दशा करून सोडली व निराश होऊन त्यांना लोकांची मदत भाकणें भाग पडलें.

ह्या **मामर्टाईन्** लोकांतही दोन पक्ष होते. एक **कार्थेज्**कडचा व एक **रोम्**कडचा. पहिल्याप्रथम **रोम्**चा पक्ष बलवत्तर होता, त्यामुळें **रोम्**ची आज्ञाधारकता कबूल करून त्यांजकडून मदत आणण्यासाठीं प्रणिधि अथवा जासूद पाठविण्यांत आले. **रोमन्** लोकांना ह्या असल्या प्रार्थनेमुळें जरा विचार पडला. **इटली**च्या सरहद्दीच्या बाहेर पाऊल टाकण्याचा हा त्यांना पहिलाच प्रसंग होता. **इटली**मध्यें त्याची सत्ता अगदीं निष्कंटक होती. पण त्यांना **इटली**च्या बाहेर दुसरे प्रांत काबीज करण्याचें जरा अवघड वाटत असे. त्यांना पक्कें ठाऊक होतें कीं ही मागणी कबूल करणें ह्मणजे **कार्थेज्**शीं वैरभाव उघड उघड सुरू करणें होय. बरें जर मागणी कबूल न करावी तर **कार्थेज्**चे हातांत **मेसाना** जाणार व मग **कार्थेज्**ची सत्ता फारच वाढल्या-सारखी होणार व मग आपल्यालाही थोडाबहुत उपसर्ग त्यांचा लागणार. शिवाय एक फक्त **सायराक्यूस्** घेतलें कीं सगळ्या **सिसिलीं**चे मालक **कार्थेज्** होऊन बसणार. **रोम्**च्या अधिकृतराजकारणीसभेंत दोनतीनदां ह्या प्रश्नाचा उहापोह झाला; पण कांहीं निकाल लागला नाहीं.

फक्त त्यांना ह्या अगदीं नव्या मार्गाचें आक्रमण करण्यास धाक वाटत असे एवढेंच नव्हे, तर या असल्या अविश्वसनीय व बेवकूफ लोकांशीं दोस्ती

बांधण्यास त्यांचें मन चरकत होतें. अधिकृतराजकारणीसभेकडून हा प्रश्न लोकांपुढें ठेवण्यांत आला. लोकांना कांहीं भय वाटलें नाहीं व धाकही वाटला नाहीं. एकदम त्यांनीं **मामर्टाइन्** लोकांना मदत पाठविण्याचें ठरविलें व **मामर्टाइन्** लोकांना आपले दोस्त म्हटलें.

ह्या इकडे असें जाहलें कीं **मेसानां**तील दुसरा पक्षही आपली खटपट चालवीत होता. त्यांनीं **कार्थेज्**कडे मदत मागितली व **कार्थेज्**नेंही ती एकदम पाठवून दिली. शहराला **हायरो**नें वेढा दिला होता. त्याच्याशीं एकदम तह करण्यांत आला. **कार्थेज्**चें आरमार एकदम बंदरांत येऊन पोहोंचलें आणि **हानो**च्या हाताखालीं त्यांनीं एकदम किल्ला हस्तगत करून घेतला. **अपिअस्-क्लाडिअस्** जेव्हां आपल्या फौजेसह आला तेव्हां त्यानें पाहिलें तों **कार्थेज्**चे लोक आपले आधींच तेथें गेले होते. **कार्थेज्**चे दुर्भाग्यामुळें त्याच्या आरमारावरचे दोन्ही अधिकारी व **हानो** या तिघांनाही पोंच जरा कमी होता व तिघेही निश्चयाचे जरा कमी पडले. शहरवासी लोकांची सभा भरली होती तेथें शांतता राखण्याकरितां म्हणून आरमारावरचे अधिकारी जों गेले तों त्यांना पकडण्यांत आले. व **हानो**नें तर आपल्या फौजेला सुरक्षित जाऊं द्यावें, एवढ्याच शर्तीवर किल्ला मोकळा करून दिला. तेव्हां **रोमन्** लोक एकदां सुद्धां हात वर उगारण्याची पाळी न येतां **मेसाना**चे मालक झाले. **कार्थेज्**चे लोकांना हा येथील वृत्तांत मुळींच सहन जाहला नाहीं. **हानो**नें आपल्या वर्तणुकींत मुळींच धैर्य किंवा शहाणपणा कांहींच न दाखविल्यामुळें त्याच्या अंगाला खिळे ठोकून त्याचा प्राण घेतला. तदनंतर **हायरो**शीं मसलत करून त्याच्यानिशी **कार्थेज्**नें शहराला वेढा दिला. **क्लाडिअस्**नें तह मिळण्याचा प्रयत्न केला. **मामर्टाइन्** लोकांना राहूं दिल्यास तो तेथून निघून जाण्यासही सिद्ध होता. पण **कार्थेज्**ला कोणत्याच तहाच्या शर्ती कबूल होईनात, तेव्हां त्याला लढाई देण्याखेरीज दुसरा उपायच राहिला नाहीं. त्याअर्थी तो शहरच्याबाहेर आला आणि लढाईस उभा ठाकला. **हायरो**नेंही लढाईची तयारी केली. बराच वेळ मोठी निकराची लढाई झाल्यावर **हायरो**चा पराभव झाला व त्याला राहिल्यासाहिल्या सैन्यासह छावणींत परत यावें लागलें. दुसरे दिवशीं तो **सायराक्यूस्**ला निघूनही गेला. इकडे **एपिअस्** **हायरो**चा पराभव करून तसाच **कार्थेज्**चे सैन्यावर चालून गेला व त्यांचा अगदीं बीमोड करून टाकला; त्यामुळें त्यांना लागलीच वेढा उठवावा लागला. दुसरें वर्षी **रोम्**नें

अधिक सैन्य पाठविलें. **हायरो** हा मोठा धूर्त होता. त्यानें **रोम्**चा ह्या मोहिमेंत जय होईल असें तेव्हांच ताडून तो त्याच्या पक्षाला जाऊन मिळाला. **कार्थेज्**चे ताब्यांतील व इतर कांहीं **सिसिलीं**तील संस्थानें हें पाहून **रोम्**-लाच जाऊन मिळालीं. इकडे **कार्थेज्**नेंही **सिसिलीं**तील आपलें सैन्य वाढविलें व **आग्रिजेन्टम्** कीं जेथें त्याचे दारूगोळा वगैरे सर्व सामान होतें तेथें सर्व सैन्य जय्यत तयार करून ठेविलें.

दुसरे वर्षीं **रोमन्** लोकांनीं **आग्रिजेन्टम्**ला वेढा दिला व शत्रूची सर्व फौज आंत कोंडून ठेविली. पांच महिने सारखा वेढा कोटाभोंवतीं होता. **कार्थेज्**चा सेनाधिपती **हानिबाल्** यानें जेव्हां पाहिलें कीं आतां आपल्या सैन्यांत दुष्काळ खास पडतो तेव्हां त्यानें कशी तरी कुमक पाठवा ह्मणून मोठ्या काकुळतीचा निरोप **कार्थेज्**ला पाठविला. ह्यामुळें एकदम बरेचसे शिपाई पायदळ व कांहीं हत्ती इतके येऊन दाखल जाहले. ह्या नव्या भरतीमुळें **हानो**चें सैन्य **रोमन्** लोकांचे सैन्यापेक्षां अधिक बलवत्तर जाहलें. ह्या **हानो**चे सैन्यानें **रोमन्** लोकांचे धान्याचा वगैरे पुरवठा बंद पाडला व त्याची बरीच दैना करून सोडली. जर अशा वेळेस **रोम्**ला त्याच्या दोस्ताची (**हायरो**ची) मदत नसती तर खचित **रोम्**च्यानें टिकाव धरवला नसता. **रोम्**च्या सैन्याची अशी स्थिति पाहून **हानो**ला वाटलें कीं हल्ला करण्यास हीच संधि अतिउत्तम. अशा हेतूनें त्यानें आपला रिसाला हल्ला करण्यास पाठविला. रिसाल्याला त्यानें सक्त हुकूम देऊन ठेवला होता कीं पहिल्यांदा **रोमन**रिसाल्या-वर हल्ला करावयाचा व ते आवेशानें लढण्यास तयार झाले ह्मणजे मग त्यांना अंगावर घेऊन आपल्या मुख्य सैन्याचे आटोक्यांत आणून सोडावयाचे. सुदैवानें **हानो**ची युक्ति अगदीं छान साधली. **रोमन्** लोक अतित्वेषानें **आफ्रिकन** लोकांवर चालून गेले व त्यांना त्यांनीं अगदीं पळवून लावलें. शेवटीं **हानो**च्या मुख्य सैन्याशीं गांठ पडून त्यांना परत फिरावें लागलें.

नंतर दोन महिनेपावेतों दोन्हीही बाजूचीं सैन्यें एक मैलाच्या अंतरावर आपापल्या ठिकाणीं स्वस्थ राहिलीं. इतक्या अवकाशांत शहराचे आंतील सैन्याची स्थिति अगदीं दुस्सह झाली. त्यांना अन्नपाण्याचे हाल सोसवेनात. तेव्हां **हानिबाल्**नें आपल्या सैन्याकडून कांहीं बार काढवून (**कार्थेज्**चे लोकांना विद्युद्यंत्राची कांहीं माहिती असेलसें वाटतें.) व जासूद व हेर पाठ-

वून आपल्या जोडीदारास आतां टिकाव धरण्याची सोय नाहीं असें कळविलें. **रोमन्** सैन्याचीही स्थिति तशीच होती व तेही लढण्यास अगदीं उत्सुक होते. लढाई जी झाली ती मोठी निकराची झाली; व बराच वेळ चालली होती. शेवटीं **कार्थेज्**चे भाड्याचे शिपाई जे आघाडीस होते ते मागें हटले व त्यांच्या पाठीमागें असलेल्यां हत्तीवर पडले. त्यामुळें सर्व सैन्यांत जिकडे तिकडे घोटाळा झाला; फक्त काय ती एक लहानशी टोळी वांचली. **हानिबाल्**च्या हाताखालचे आंतील शिपायांचे इतके बुरे हाल झाले नाहींत. **रोमन्** लोक जयाच्या धुंदीत आपल्या रांगा यथातथाच सांभाळीत आहेत असें पाहून तो एकदम कोणास न समजतां त्यांच्यामधून निघून गेला. दुसरे दिवशीं **रोमन्** शिपाई **आग्रिजेन्टम्**मध्यें शिरले. तेथें त्यांना लूट पुष्कळ सांपडली व पुष्कळ लोक गुलाम करावयासही सांपडले.

ह्या जयानंतर **रोमन्** लोकांना वाटावयास लागलें कीं **सिसिली** घेणें आपणास कांहीं अशक्य नाहीं. पण त्यांना मुख्य अडचण अशी होती कीं सर्व समुद्राची मालकी **कार्थेज्**कडे होती. त्यांच्या स्वतःच्या किनाऱ्यावरही **कार्थेज्**चे लोक हल्ला करण्यास मागेंपुढें पाहात नसत. जर त्यांना आपली आशा कोणत्याही तऱ्हेनें तडीस न्यावयाची होती तर त्यांना त्यांचें स्वतःचें आरमार तयार करणें अत्यावश्य होतें. त्यांच्याजवळ जहाजें नव्हतीं असें नव्हतें. कारण सुमारें शंभर वर्षांच्यापूर्वीं जाहलेल्या तहांतही आमच्या हद्दीच्यापुढें **इटलीनें** जहाजें न न्यावींत अशा तऱ्हेच्या शर्ती दिसतात. पण **इटली**चीं जहाजें हीं **कार्थेज्**च्या पांच बाजूंच्या जहाजांपुढें कांहींच नव्हतीं. सुदैवानें ह्या जातीचें एक जहाज तुफानाच्या तडाक्यांत सांपडून **रोम्**च्या कांठाला लागलें होतें व त्यांच्या ताब्यांत आलेलेंही होतें. ह्याचा नमुना पाहून त्यांनीं आपल्या जहाजें करणाराकडून असलीं जहाजें तयार करविलीं. थोड्याच मुदतींत सुमारें शंभर पांच बाजूंचीं जहाजें व सुमारें तेवीस इतर जहाजें त्यांनीं तयार करविलीं. हीं ओल्या लांकडाचीं असल्यामुळें फार दिवस टिकतीलशीं नव्हतीं. पण सध्यां कांहीं दिवसपावेतों चालावयाजोगतीं होतीं.

ह्या नव्या सामुग्रीचा पहिला प्रयत्न प्रयत्न मुळींच यशस्कर जाहला नाहीं. कारण त्यांच्यांतील सतरा जहाजें त्यावरील कप्तानासहित **लिपारा** येथें शत्रूंच्या हस्तगत

जाहली. तरी पण **कार्थेज्**चे लोकांना थोडकेच दिवसांत असें कळून आलें कीं **रोम्**चे लोक जितके जमिनीवर तितकेच समुद्रावरही जिंकण्यास अवघड आहेत. कारण एकदां असें जाहलें कीं **हानिबाल्** जेव्हां सुमारें आपल्या पन्नास जहाजांनिशीं समुद्रावर हेरत बसला होता तेव्हां त्याची अकस्मात् शत्रूंच्या अधिक बलाढ्य आरमाराशीं गांठ पडली; त्यांमुळें **हानिबाल्**चा अगदीं पराभव जाहला. त्याचीं जहाजें तर सर्व गेलींच पण त्याचाच जीव कसा तरी वांचला. कदाचित् **कार्थेज्**च्या चपल खलाशांमुळें **रोम्**शीं त्यांनीं बरेच दिवस अघाडी राखली असती पण **रोम्**च्या लोकांनीं नवीन एक युक्ति काढली त्यामुळें समुद्रावरच्या लढाईंत व जमिनीवरच्या लढाईंत फारसा फरक राहिला नाहीं. **रोमन्** लोकांनीं दरेक जहाजावर, एक एक जहाजावर चढून जाण्याचें यंत्र तयार ठेविलें होतें. डोलकाठीच्या एका बाजूस असलेल्या जहाजाच्या एका फळीसारखी फळी ते तयार करीत, व ती डोलकाठीच्या दुसऱ्याबाजूच्या काठीच्या टोंकांशीं एक खांब बसविला असे त्याला अडकवून ठेवीत असत. ह्या फळीची लांबी सुमारें अठरा फूट व रुंदी चार फूट असे शत्रूचें जहाज आपल्या जहाजाजवळ आलें कीं ही फळी लागलीच सोडून द्यावयाची. त्या फळीच्या दुसऱ्या टोंकाला एक अणकुचीदार मेख ठोकून ठेवावयाची. ती फळी इतक्या जोरानें आपटल्यामुळें शत्रूंच्या जहाजाच्या वरच्या मजल्यांत बसे व त्यामुळें तें अडकून राही. नंतर जर दोन्ही जहाजांच्या बाजूच एकमेकांना लागल्या तर हे शत्रूंच्या जहाजावर उड्या टाकून जात व तेंच जर टोंक टोंकाला मिळालें तर त्या फळीवर दोन दोन मिळून सर्व चढून जात.

ह्या नवीन यंत्राचा लागलाच उपयोग करून बघण्यांत आला. **हानिबाल्** (**आग्रिजेन्टम्**मधून सुरक्षितपणें पळून गेलेला) एके प्रसंगीं **रोमन्** सरदार **डुलिअस्** याशीं सामना करण्यास उभा राहिला व आपल्या आरमाराची ठाकठिकी केल्याशिवाय एकदम **रोमन्** जहाजावर चालून गेला. शत्रूंनीं त्याची अघाडीचीं जहाजें पुढें येऊं दिलीं व तीं आपल्या आटोक्यांत आलींशीं पाहिलीं त्याबरोबर आपलीं हीं नवीं यंत्रें टाकलीं व एकदम **रोम्**चे लोक शत्रूंच्या जहाजावर चढून गेले. **कार्थेज्**चे लोक हें पाहून एकदम घाबरून गेले व त्यांचा पराभवही जाहला. त्यांचीं सर्व अघाडीचीं तीसही जहाज शत्रूंच्या स्वाधीन झालीं. बाकीच्यांची दुर्दशा इतकी जाहली नाहीं. तरी पण त्यांची जवळ-

येण्याची छाती होईना. ते जवळ यावयास लागले मात्र कीं लागलीच हीं यंत्रें उभारलेलींच असावयाचीं. शेवटीं आणखी पन्नास जहाजें घालवून **कार्थेज्**चें आरमार पळून गेलें. **हानिबाल्** एका धाकट्याशा होडींतून कसा तरी वांचला. ही लढाई **मायूली** येथें झाली. हिच्या जयामुळें होन्ही संस्थानांत चाललेल्या अति दीर्घ समारंभाचा ओघ फिरल्यासारखा दिसला. आज कितीएक वर्षें समुद्रावर **कार्थेज्**ची शक्ति अप्रतिहत असे. पण ह्या लढाईत तर असें झालें कीं कांहीं थोड्याशाच महिन्याच्या अभ्यासानें **रोमन्** लोकांनीं समुद्रावरच त्याचा पाडाव केला.*

सगळ्या झगड्याची सविस्तर हकीगत देत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. **मायूली**ची लढाई ज्या सालीं झाली त्याच सालीं **हानिबाल्**चाही अंत झाला. तो **सार्डिनिआ**कडे आपल्या जहाजांसह जात होता तों रस्त्यांत त्याला **रोमन्** आरमारानें गांठलें व त्याचीं पुष्कळ जहाजें हिरावून घेतलीं. मागीलप्रमाणें **हानिबाल्**नें बचावयाचा प्रयत्न केला पण निष्फळ झाला. त्याला बाकी राहिलेल्या लोकांनीं पकडलें व त्याच्या अंगाला खिळ ठोकून त्याचा जीव घेतला.

पुढील दोन वर्षें **सिसिलींत** कांहीं निश्चयाची लढाई जाहल्याशिवाय तंटे बखेडे व तुरळक लढाया सुरू होत्या. तरीपण त्यांत सुद्धां बहुतकरून **रोम्**चीच सरशी होत असे. दोनशें छपन्नांत एक मोठी लढाई जाहली. **रोम्**चे सरकारला ह्या असल्या क्षुल्लक लढायांचा कंटाळा येऊन त्यांनीं शत्रूंच्या घरांतच **आफ्रिकें**त लढाई करण्याचें ठरविलें. त्यांनीं ह्या बेतासाठीं ह्मणून तीनशें तीस मोठ्या जहाजांचें आरमार गोळा केलें. त्यांनीं आपलीं उत्तम उत्तम सैन्यें त्या जहाजांवर ठेऊन दिलीं. दरेक जाहजावर तीनशें दर्यावर्दी व शेंदीडशें लोक मदतनीस ह्मणून ठेविले. **कार्थेज्**चें सैन्य याहूनही अधिक होतें त्याचीं साडेतीनशें जहाजें होतीं व दीडलाख फौज होती. दोन्ही आरमारांची **सिसिलीच्या** दक्षिणेस **एक्नोमस्** म्हणून भूशिर होतें तेथें गांठ पडली.

*डुलिअस्चा रोमन् लोकांनीं बहुमान केला. एक जयस्तंभ त्याच्या नांवाचा बांधला व त्याच्यावर जिंकून घेतलेल्या जहाजांचीं टोकें बसविलीं व रात्रीं जातां येतांना त्याच्या बरोबर एक मशालजी व एक तुतारीवाला नेहेमी बरोबर असावा असा ठराव केला.

रोमन् लोकांनीं आपल्या आरमारांतील जाहजांचा एक त्रिकोण बनविला व त्याचें टोंक शत्रूच्या आरमाराकडे केलें. ह्या टोंकाशीं दोन मोठीं सहा वल्ह्यांचीं जाहजें ठेविलीं होतीं. त्यांत **आटिलस् रेग्युलस्** व **मेनालिअस्** हे दोघे **रोमन्** सरदार बसले. त्रिकोणाच्या दोन्हीं बाजूस कांहीं जहाजांच्या दोन तुकड्या ठेवल्या व तिसरी तुकडी पाठीमागच्या बाजूस ठेविली; तीवर घोडेस्वार ठेवले होते. व चवथी टोळी काम पडल्यास उपयोगांत आणतां यावी ह्मणून अगदीं मागें एका ओळीनें लावून ठेविली होती. ही रांग दोन्हीं बाजूंपलीकडे बरीच पसरली होती.

कार्थेज्चे लोकांनीं कांहीं निराळीच व्यवस्था केली होती. त्यांनीं आपलीं गलबतें एका ओळीनें लावून ठेवलीं. ह्यांचा असें करण्याचा मुख्य उद्देश असा होता कीं जुळल्यास शत्रूच्या सर्व आरमारास घेरून घ्यावें. डाव्या अथवा किनाऱ्याच्या बाजूवर **हामिल्कार** मुख्य होता व बाकीच्या आरमारावर **आग्रिजेन्टम्**च्या लढाईंत पराभव पावलेला **हानो** मुख्य होता. **रोमन्** आरमारानें पहिल्यांदा हल्यास सुरुवात केली. शत्रूंची जहाजांची रांग फक्त एकेरी आहे असें पाहून **रोमन्** जहाजांनीं एकदम मोठ्या जोरानें मधल्या भागावर हल्ला केला. **हामिल्कार**नें हा रोंख अगोदरच जाणून तेथील जहाजांना हल्ला आल्यास एकदम बाजूला निघून जाण्याची इशारत देऊन ठेवली होती. त्याप्रमाणें **कार्थेज्**चे लोकांनीं केलें. त्याचा परिणाम असा जाहला कीं, **रोमन्** लोकांनीं शत्रूंच्या पाठीमागें लागण्याच्या घाईंत आपली रांग सोडून दिली. त्यामुळें पुढच्या दोन टोळ्या मागील एक टोळी व शिलकीची रांग यापासून दूर पडल्या. असें पाहून या पळणाऱ्या **कार्थेज्**चे जहाजांनीं आपल्या पाठीस लागलेल्या जहाजांवर हल्ला केला. तेव्हां मोठी निकराची लढाई सुरू जाहली. **कार्थेज्**चे लोक आपलीं जहाजें अति वेगानें चालवूं शकत व इकडे तिकडे वळविण्यांत तर फार हुशार असत. पण त्यांनीं कांहींही केलें तरी शत्रूच्या जहाजांच्याजवळ जाण्याची त्यांची छाती होईना. सर्व **रोमन्** जहाजांना पकडून धरण्याचीं व चढण्याचीं यंत्रें लावून दिलीं होतीं. एकदां त्यांच्या तडाक्यांत शत्रूचें जहाज सांपडलें कीं मग शिपाई एकमेकांशीं लढावयाचे. त्यांत **कार्थेज्**चे लोकांना **रोम्**पुढें टिकाव धरण्याचें बळ नव्हतें.

ही झटपट इकडे चालली आहे तोंच **रोमन्** लोकांच्या मागील बाजूस दुसरी झटापट सुरू जाहली. **हानो**नें शिलकेस ठेवलेल्या **रोमन्** जहाजांवर

एकदम हल्ला केला. तिसरीकडे **कार्थेज्**चे आंतील बाजूचे **आरमारानें** शत्रूच्या तिसऱ्या तुकडीवर हल्ला केला. चहूंकडे **रोमन्** लोकांचीच सरशी होत होती. **कार्थेज्**च्या लोकांना जवळ येण्याची तर जणूं काय शपथच होती. व दुरून जरी एखादें **रोमन्** जहाज आपल्या चातुर्यानें बुडविलें तरी पण केव्हांना केव्हां तरी जवळ येणें त्यांना भागच होतें. शेवटीं **हामिल्कार्**नें पहिल्यांदा मागचा पाय काढला. त्यानें पाय काढला मात्र, कीं लागलीच सर्व सैन्य **हानो**वरच वळलें व त्यालाही पळवून लावलें. अशा रीतीनें **रोमन्** लोकांनीं दुसरी मोठी समुद्रावरची लढाई जिंकली. **रोमन्** लोकांचीं सव्वीस जहाजें शत्रूनें बुडविलीं पण शत्रूच्या हातीं एकही लागलें नाहीं. **कार्थेज्**चे लोकांचीं सुमारें शंभर जहाजें गेलीं, पैकीं साठ तर सर्व सामानासह शत्रूंच्या हातीं लागलीं. व बाकी राहिलेलीं तीं सर्व चार चहूंकडे पसरलीं व आतां **रोम्**ला **आफ्रिकें**त जाण्याला कोणत्याही प्रकारची आडकाठी उरली नाहीं.

भाग दुसरा.

आफ्रिकेवर स्वारी.

ह्या **इक्नोमिअस्**च्या लढाईच्या हवालाची वर्दी देण्यास व आपल्या देशबांधवांस लढाईची तयारी करावयास सांगण्यासाठीं **हानो** लगबगीनें **कार्थेज्**ला गेला. जरी पराभूत सरदाराला घरीं परत जाणें कोणत्याही प्रकारें क्षेमकर नव्हतें असें त्याला ठाऊक होतें तरी पण त्यानें हिय्या केला. नेहमींप्रमाणेंच खुद्द घरावर हल्ला आला असतां **कार्थेज्**चें कांहीं एक चालण्याजोगें नव्हतें, त्यांची प्रजा नेहमीं त्यांना प्रतिकूळ असे व बंड करण्यास तयार असे. शिवाय त्यांच्या हाताखालील शहरांना ते कधींही बुरूज वगैरे कांहीं बांधूं देत नसत; त्यामुळें तीं अगदीं उघडीं असत. जेव्हां शत्रू चालून आले तेव्हां त्यांना प्रतिबंध करण्यास कोणत्याही प्रकारचीं साधनें नव्हतीं. **अगॉ-थॉक्लीस्**नें पन्नास वर्षांपूर्वीं ह्या प्रदेशावर जेव्हां हल्ला केला होता तेव्हां जी स्थिति ह्याची होती तीच आजमित्तीलाही होती. प्रदेश अतिशय सुपीक व संपत्तिमान्, पण संरक्षणाच्या नांवानें अगदीं शून्य. त्यामुळें ह्या वेळीं शत्रूंना बरेंच फावलें. त्यांनीं खूप लुटालूट केली. सुमारें वीस हजार तर गुलाम मिळविले. जर लुटालूट करण्याच्या कामांत न पडतां एकदम **रोम्**चे सरदार **कार्थेज्**वर चालून गेले असते तर कदाचित् एकाच लढाईत काम आटपून टाकणें शक्य होतें.

जर कधींही **कार्थेज्** घेणें शक्य होतें तर तें **रोम्**नें आपल्या सरदारांपैकीं एकाला परत बोलावून घेतल्यावर तर अगदींच अशक्य झालें. **रोम्**च्या राजसभेनें असा हुकूम पाठविला कीं, लढाई संपविण्यास आवश्यक तितकीच फौज तेथें ठेवून बाकीच्यांनीं एका प्रतिनिधीबरोबर परत यावें. ह्या हुकुमान्वयें पंधराहजार पायदळ व सहाशें घोडेस्वार आणि चाळीस जहाजें इतका सरंजाम तेथें ठेवून **मॅनलिअस्** सर्व लूट जहाजांवर चढवून तेथून निघाला. **कार्थेज्**चे लोक आपले सैन्यांत भरती करण्याचा व होईल तितकें सैन्य मजबूत करण्याचा झटून प्रयत्न करीत होते. त्यांनीं दोन नवे सरदार नेमिले व तिसरा एक **सिसिली**हून मागविला. त्यानें बरोबर पांच सहा हजार लोक आणले. पण आश्चर्य हें कीं सर्व समुद्रावर मालकी जरी **रोमन्** लोकांची होती तरी त्यांनीं या सैन्याला आड सुद्धां येण्याचा प्रयत्न केला नाहीं. हें सैन्य येऊन पोहोंचल्याबरोबर **कार्थेज्**नें आपण होऊनच लढाई देण्याचा निश्चय केला. शहरांतील संपत्तिमान् लोकांना आपल्या बागबगीच्यांची व मोठ्या सुंदर इमारतींची राखरांगोळी होत होती ती पाहवेना; तेव्हां जें होईल तें होईल लढावेंच असा त्यांनीं निश्चय केला. जर **कार्थेज्**कडे चतुर सरदार असते तर लढाईचा निकाल काय जाहला असता हें कांहीं सांगवत नाहीं. पण दैवयोग असा कीं, **कार्थेज्**कडे चांगला चतुर असा एकही सरदार नव्हता. **हामिल्कार** आणि त्याचे साथीदार हे शहरांतून बाहेर निघाले व त्यांनीं शहराबाहेर एका टेंकडीवर मोरचे लाविले आणि लढाईस खडे जाहले. वास्तविक पाहतां त्यांच्यापाशीं घोडेस्वार व हत्ती अधिक होते तेव्हां त्यांनीं चांगली सपाटीची जागा लढण्यास पहावयाची होती. म्हणजे त्यांच्या हत्तींना व घोड्यांना मारा चाल वगैरे करण्यास जागा चांगली सांपडली असती. **रोमन्** सरदार **रेग्युलस्** हा फार चतुर होता; ह्याच्या तेव्हांच ती गोष्ट लक्ष्यांत आली. शत्रूचें अर्ध्याहून अधिक सैन्य ज्या स्थितींत होतें त्या स्थितींत तें निरुपयोगी होतें हें त्याला पक्कें ठाऊक होतें. आणि त्याच स्थितींत त्यानें शत्रूवर हल्ला करण्याचा निश्चय केला. ज्या टेंकडीवर **कार्थेज्**चे सैन्यानें तळ दिला होता त्या टेंकडीवर दोन्ही बाजूंनीं हल्ला करण्याचा त्यानें हुकूम सोडला. घोडेस्वार आणि हत्ती यांचा कांहींच तादृश उपयोग होईना. भाड्यानें आणलेल्या शिपायांनीं जरी कांहींवेळ नेटानें टिकाव धरिला तरी पण जेव्हां पिछाडीचा मारा दुसरीकडून सुरू जाहला तेव्हां त्यांचें कांहीं चालेना. जरी घोड्याचें

बळ कमी असल्यामुळें शत्रूंचा पाठलाग करून विशेषशी खराबी करतां आली नाहीं तरी पण **रोम्**ची सर्वस्वी फत्तेह जाहली. दुसरे दिवशीं त्यांनीं **काट्यु-नीस्** येथें तळ दिला. हें गांव **कार्थेज्**हून फक्त पांचच मैल दूर आहे.

कार्थेज्चे लोक अगदीं निराश जाहले. त्यांच्या आरमाराचा अगदीं पराभव आधींच झाला होता. आतां त्यांच्या फौजेचाही अशा रीतीनें बीमोड झाला. शिवाय **कार्थेज्**ची प्रजा व **कार्थेज्**चे स्नेही हेही त्याच्या विरुद्ध उठले. व त्यांनीं **रोमन्** लोकांपेक्षांही अधिक क्रूरतेनें राज्याची लुटालूट व नासाडी चालविली. वास्तविक पाहतां आतां त्यांचा ताबा फक्त शहरावर काय तो चालत होता. व त्या शहरांतही चोहोंकडून लोक गोळा झाल्यामुळें दुष्काळ पडण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. ही अशी एकंदर स्थिति होती अशा वेळींच **रेग्युलस्**नें आपले कारभाराचे वर्षाचे आंतच लढाई संपवून घेण्याच्या उद्देशानें आपली तह करण्याची इच्छा प्रणिधिद्वारा प्रदर्शित केली. त्याप्रमाणें **कार्थेज्**नें वकील पाठविले. पण तहाचें कांहीं जुळलें नाहीं, **रोम्**ची राजसभा कांहीं विशेष सवलती देणार नाहीं असें जाणून **रेग्युलस**नें असह्य अशा शर्तींच्या मागणीचा हट्ट धरला; **कार्थेज्**च्या सरकारानें विचार केला कीं ह्या असह्य शर्ती कबूल करण्यापेक्षां समूळ पराभवानें ही आपली अधिक मानहानि होणार नाहीं. तेव्हां जें होईल तें होईल अखेर पावेतों लढाईच चालवावयाची. असें ह्मणून त्यांनीं तहाचें बोलणें बंद केलें.

तदनंतर दैवयोग असा कांहीं घडून आला कीं त्यामुळें **कार्थेज्**च्या दैवानें उलट खाल्ल्यासारखें दिसावयास लागलें. इतिहासांत असल्या गोष्टी कांहीं कमी असतात असें नाहीं. नाशाच्या अगोदर जो एक मनुष्याला गर्व होत असतो तशांतलाच **रोमन्** सरदाराचा गर्व होता. **कार्थेज्**नें आपल्या अपारतुल्य संपत्तीनें बाहेर देशांतून भाड्याचे शिपाई आणविण्याचें काम अगदीं जारीनें एकसारखें चालू ठेविलें होतें. त्यांत असें जाहलें कीं भाग्योद-यामुळें ज्याला मोठेमोठे प्रसंग यावयाचे आणि त्यांचा पूर्ण उपयोग करून घेण्याचें चातुर्यही ज्याच्या अंगीं होतें असा एक भाग्यवान् शिपाई एका भाड्याच्या टोळीचें सेनाधिपत्य स्वीकारून **आफ्रिके**त आला. **झान्टि-पस्** हा सर्व जगांत अतिउत्तम अशा नावाजलेल्या शाळेंत (**स्पार्टां**त) तयार झालेला शिपाई होता. मागें जेव्हां **आथेन्स्** अगदीं **सायराक्यूस्**

घेण्याच्या बेतांत होतें तेव्हां एका **स्पार्टा**च्याच शिपायानें त्याच्या विरुद्ध लढून विजयाचा ओघ उलथून टाकला व आतांही एक **स्पार्टा**चाच शिपाई **रोम्**च्याविरुद्ध लढून **कार्थेज्**ला अगदीं मृत्युमुखांतून ओढून काढणार होता. **झान्टिपस्**नें नुकत्याच झालेल्या लढाईचा सर्व वृत्तांत ऐकला; त्यानें **कार्थेज्**चें सर्व सैन्य, पायदळ, घोडेस्वार व हत्ती वगैरे सर्व पाहिलें व मनांत तर पक्कें जाणलें कीं **कार्थेज्**चा जो पराभव झाला तो त्याच्या सैन्याच्या निशक्तपणामुळें नव्हे तर सरदाराच्या अडाणीपणामुळेंच. तो जाणून राहिला एवढेंच नव्हे तर सर्व लोकांत तें सांगण्यांतही त्यानें कमी केलें नाहीं. हें होतांच राजसभेनें त्याला एकदम बोलावून नेलें. तेथें गेल्या बरोबर त्यानें शेवटच्या पराभवाचीं सर्व कारणें निवेदन केलीं व आतां पुढें कोणता मार्ग स्वीकारावयाचा तेंही स्पष्टपणें सांगितलें. त्याच्या स्पष्ट व निश्चित बोलण्यानें सर्व सभासदांची अगदीं खातरी होऊन गेली. त्यासरसें जुन्या सरदारांना काढून टाकण्यांत आलें. व **स्पार्टा**चे शिपायाचे ताब्यांत सर्व सैन्य देण्यांत आलें.

दरेक मनुष्यास आतां कांहीं बदल होईल असें वाटूं लागलें. **झान्टिपस्**ही आपण आपल्या कामास योग्य आहों असें दाखवूं लागला. त्यानें एकदम कवाईतीस आरंभ केला. कवाईतींत सुद्धां त्यांची हुशारी त्याच्या जोडीदारापेक्षां इतकी कांहीं अधिक होती कीं शिपायांना त्याचा एक प्रकारचा अतिशय विश्वास वाटे. ते आह्मांला शत्रूवर न्या असें मोठ्यानें ह्मणूं लागले व आमचा मुख्य **झान्टिपस्** व्हावा असेंही बोलूं लागले. इतर सरदारांनीं आपलें आधिपत्य तेव्हांच सोडून देण्याचें पत्करिलें. सुमारें बाराहजार पायदळ, चारहजार घोडेस्वार व शंभर हत्ती इतकी फौज लढाईला तयार केली. **झान्टिपस्**नें एका रांगेनें सर्व हत्ती अगदीं पुढें लावलें. त्याच्या मागें **कार्थेज्**चे लोकांची पलटण लावली. कदाचित् देशाच्या या दीन अवस्थेमुळेंच खुद्द **कार्थेज्**चे लोक लढण्यास सरसावले असतील. उजव्या बाजूला भर हत्याराचे शिपायांची टोळी व डाव्या बाजूस हलक्या हत्यारांचे शिपाई व घोडेस्वार असे होते.

* अगदीं दुष्काळ ज्या शहरांत पडण्याच्या बेतांत होता त्या शहरांत शंभर हत्ती कसे पोसले जात होते ह्याची कल्पनाही करणें फार कठीण आहे. दरेकाला सुमारें अर्धा-हण्ड्रड्वेट अन्न तर लागतच असेल. आणि त्यांतलें कांहीं तरी माणसाच्या उपयोगास पडलें असतें.

इकडे **रेग्युलस्**नें जेव्हां आतां **कार्थेज्**चे लोक लढणार असें पाहिलें तेव्हां हत्तीमुळें फारशी खराबी न होई अशा तऱ्हेनें आपली फौज उभी केली. कारण त्याचे शिपायांना हत्तींची अतिशय भीति वाटत असे. हलक्या हत्यारांचे लोक अघाडीस ठेविले होते व त्यांच्या पाठीमागें अगदीं दाट व जवळजवळ अशा रांगांनीं सर्व फौज ठेवली होती. घोडेस्वार सर्व बाजूंवर ठेवलेले होते. ह्यामुळें हत्तींचें भय कमी झालें. पण अघाडी अगदीं अरुंद पडल्यामुळें बाजूवर रिसाल्याचा हल्ला येण्याची भीति विशेष वाढली.

आपले हत्ती **रोमन** सैन्याच्या मध्यभागावर चालवून **झान्टिपस्**नें लढाईस सुरुवात केली व आपल्या घोडेस्वारांना दोन्ही बाजूंवर हल्ला करण्यास हुकूम केला. **रोम्**चे पांचशें घोडेस्वार ह्याच्या चारहजारांबरोबर कितीवेळ टिकाव धरणार! **रोमन्** सैन्याच्या डाव्याबाजूची स्थिति याहून कांहीं बरी होती. त्यांना हत्तींचें वगैरे कांहीं भय नव्हतें त्यामुळें शत्रूंच्या भरहत्याराच्या फौजेवर त्यांनीं मोठा जोराचा हल्ला केला व त्यांना त्यांच्या तळापावेतों परत लावलें. मध्यभागानेंही आपली बाजू मोठ्या धैर्यानें राखली होती. त्यांच्या पुढील रांगा हत्तीखालीं चिरडन मेल्या; पण तेवढ्यानें कांहीं मागच्या दाट रांगांस बिलकुल धक्का बसला नाहीं. पण त्यांना पुढचे, मागचे व बाजूंवरचे हल्ले सोसण्यासाठीं तोंडें फिरवावीं लागत असत. त्यांच्यांतल्या एका भागाला हत्ती मागें हटविले नाहींत तोंच **कार्थेज्**च्या अगदीं ताज्यातवान्या मुळींच न लढलेल्या सैन्याशीं टक्कर द्यावी लागली. दुसऱ्या भागाला घोडेस्वाराचा जोराचा मारा सोसावा लागला. शिवाय इतकेंही असून पाठीमागें मदतीला शिलकेंत फौज मुळींच नव्हती. बहुतेक सैन्य जागच्याजागेवरच पडलें. कांहीं हत्तीखालीं चिरडून मेले. कांहीं घोडेस्वारांच्या बिचव्यांच्या तडाक्यानें मेले. कांहीं **कार्थेज्**चे शिपायांशीं लढतां लढतां पडले. जे पळून गेले ते ह्याहूनही मानहानि होऊन मेले. **रोम्**नें समुद्रकिनाऱ्यावर दिलेल्या छावणीचा रस्ता एका उघड्या सपाट मैदानांतून होता. त्यामुळें जे पळून गेले त्यांचा हत्तींनीं व घोड्यांनीं लागलाच पाठलाग केला. त्यामुळें फारच थोडे लोक **आस्पिस्**ला सुरक्षित जाऊन पोहोंचले. पांचशें लोक शत्रुंनीं कैद केले; त्यामध्यें सेनाधिपति **रेग्युलस्** हाही सांपडला. बाकीची सुमारें बाराहजारांवर फौज रणांगणांत किंवा पळून जातांना रस्त्यांत पडून मेली. ज्या प्रख्यात **पोलिबिअस्**च्या इतिहासांतून ह्या लढाईचें वर्णन घेतलें आहे त्यानें सर्व विचित्र वर्णन दिल्यावर शेवटीं

ह्मटलें आहे 'दैवाची गति पहा किती विचित्र आहे ती कीं जिच्या योगानें अभ्युदयाच्या उच्च शिखरांपासून तों अगदीं दुःखाच्या अगाध दरींत मनुष्य एक दिवस न लागतां पडतो. शिवाय एका मनुष्याच्या बुद्धियोगानें किती विचित्र व अघटित कृत्यें होऊं शकतात.' पण त्या इतिहासकारानें कैद झालेल्या **रेग्युलस्**च्या लोकोत्तर मरणाविषयीं कांहींच लिहिलेलें नाहीं. आपणास सुद्धां तो अमक्याच सालीं मरण पावला असें पक्कें ठाऊक नाहीं. व त्याच्या मरणाची हकीगत खरी असेल असें सुद्धां पक्कें ठाऊक नाहीं. पण त्याच्या मरणाचा वृत्तांत जगप्रसिद्ध आहे, व त्याचें सारही अत्युदात्त आहे. तेव्हां तो येथें न देणें इष्ट होणार नाहीं. अगदीं साधे व मितव्ययी **रोम्**चे सरदार जे आपला शेतकीचा* धंदा शेतांत करीत असतां अधिकारपदाप्रत पावले त्यांपैकीं एकाच्या जीवनवृत्तांताच्या अखेरीस त्याच्या मरणाची हकीगत देणें प्रशस्तच दिसेल ह्मणून येथें ती दिली आहे.

हॉरेस्नें ती आपल्या कवितेंत गोवून दिली आहे. त्यापेक्षां अधिक सुरस रीतीनें ती कोणी देऊं शकेलसें वाटत नाहीं. **रेग्युलस्**ला बरींच वर्षे **कार्थेज्** एथें कैदेंत ठेऊन मग तह करण्यासाठीं **रोम्**ला परत पाठविला. जर तहाचें न जुळलें तर परत येईन अशी शर्त सोडतांना करून घेतली. त्या शर्तीमध्येंच एकमेकांचे कैदी एकमेकांस परत देण्याचीही शर्त होती. जेव्हां मोठ्या मिनतवारीनें त्याला राजसभेंत आणला, तेव्हां त्यानें तहाचें बरेंच भाषण केलें व शेवटीं तहाविरुद्ध मत दिलें.

रोमन् राजसभेला दोष देऊन सावध करण्याच्या हेतूनें खालीं लिहिल्याप्रमाणें निश्चयाचें व कठोर भाषण त्यानें केलें. **रोम्**ची पुढील होणारी स्थिति त्यांतील प्रजेची भविष्यत्कालीं होणारी दुर्नीति व त्याचा भावी परिणाम हीं

---

* अशी दंतकथा लोक सांगतात कीं जेव्हां **रेग्युलस्**ला तो राजसभेचा मुख्य निवडला गेल्याची बातमी समजली तेव्हां तो शेतांत नांगर हांकीत होता. व ह्याच गोष्टीवरून **सेरानस्** असें दुसरें आडनांव त्याला दिलें होतें **एनिअस्**ला आपल्या वंशजांतील भावी प्रसिद्ध पुरुष जे दिसले होते त्यांत नांगर हातांत असलेला **सेरानस्**ही दिसला होता. जरी त्यामुळें गोष्टीचा विरस होतो तरी सांगणें भाग आहे कीं **सेरानस्** ही पदवी पहिल्यांदा आपल्या **रेग्युलस्**च्या मुलाला प्राप्त जाहली व शिवाय 'सेरानस्चा' खरा उच्चार **स्यारानस्** आहे व तें नांव तत्सदृश गांवाच्या नांवावरून पडलेलें आहे.

सर्व त्याच्या नेत्रापुढें स्पष्ट रेखल्यासारखीं उभीं राहिलीं व त्यावरून तो म्हणाला,—"ह्या नेत्रांनीं, ह्याच माझ्या नेत्रांनीं शत्रूंच्या हातांतील शस्त्रें जशींच्या तशीं आपल्या रक्ताच्या स्पर्शानें न विटाळतां हिरावून घेतलेलीं पाहिलीं आहेत. ह्या माझ्या नेत्रांनीं **कार्थेज्**च्या दूषित देवालयांवर सुद्धां **रोम्**चीं निशाणें फडकलेलीं पाहिलीं आहेत. ह्या माझ्या नेत्रांनीं स्वतंत्रतेची शेखी मिरविणाऱ्या लोकांना गुलाम करून टाकलेले पाहिले आहेत. फार तर काय, पण प्रत्यक्ष शत्रूंचीं उध्वस्त करून टाकलेलीं रानें व शेतें आपल्या **रोम्**च्या शिपायांनीं नांगरतांना पाहिलीं आहेत.

"काय! पैसा देऊन सोडवून घेतलेला गुलाम-शिपाई कधींही अधिक निमकहलाल किंवा अधिक शूर परत येण्यानें होईल काय! कधींही नाहीं. त्याला सोडवून घेणें ह्मणजे त्याच्या गुन्ह्याच्या भरीस संस्थानाचा पैसा घालविणें होय. एकदां लोंकरीवर क्रीटाचा रंग चढला म्हणजे पुन्हां कधीं तरी तिचा स्वभावसिद्ध रंग व तकाकी तिच्यावर दिसेल काय? कधींही नाहीं. तद्वतच शौर्य व धैर्य एकदां कां मागें हटलें व फिक्कें पडलें म्हणजे मग परवश अंतःकरण पूर्वीच्या उज्वलतेनें व पूर्णतेनें कधींही उद्दीत व्हावयाचें नाहीं.

"हरिण एकदां पारध्याच्या शरसंधानांतून सुटला म्हणजे तो मनुष्याला चुकविण्याचा प्रयत्न मोठ्या आयासानें करतो व अरण्यांत फिरतो. पण अरण्यांत स्वच्छंदानें फिरणाऱ्या हरिणाची तो कधीं तरी शौर्यांत बरोबरी करूं शकेल काय? कधींही नाहीं. तद्वतच तुमचा शिपाई आहे. तो दुष्ट व घातकी शत्रूंना वश झाला आहे. त्याला सुद्धां त्याच्या गळ्याला लागलेला फांस टोंचतो आहे. आणि त्यानें आपला देह शरमेच्या भयानें नव्हे तर मृत्यूच्या भयानें शत्रूच्या स्वाधीन केला आहे.

"जरी त्याच्या मनाचा लढण्याचा पक्का निश्चय होता तरी त्यानें तह करण्याची विनवणी केली. असले मनुष्य पुनः कंबरा बांधून लढाईस तयार होतील काय? कधींही नाहीं. ते आपले प्रिय प्राण शत्रूंचे उपहास व टोमणे सोसून पुनः विकत घेतील. हे बलाढ्य **कार्थेजा**, शत्रूच्या दुर्लौकिकामुळें तुह्मी सर्वतः पसरणारी कीर्ति पहा आणि **रोम्**च्या ऱ्हासामुळें व **रोमन्** लोकांच्या दुर्वर्तनामुळें सुस्थित होणारें स्वतःचें राष्ट्र पहा!!!".

"तो आपल्या गृहिणीच्या व आपल्या प्रियकर बालकांच्या अव्याज चुम्बन व दृढ आलिंगनापासून आपणच आपणावर ओढून घेतलेल्या मृत्युला वश होत्साता मोठ्या कष्टानें दूर सरला व त्यानें आपल्या विशाल भिवया धिक्कारयुक्त मुद्रेनें वर करून मोठ्या निश्चयानें, कठोरतेनें व क्रूरतेनें एकदम दृष्टि भूमीवर रोंविली. तों त्याच्या अश्रुतपूर्व उपदेशानें राजसभेंतील दरेक सभासदाचें अनिश्चित अंतःकरण खवळून गेलें. दरेक चेहेरा देशाभिमानामुळें आरक्त होऊन गेला व सर्व सभासदांनीं मोठ्या आनंदानें टाळ्यांचा गजर केला व तदनंतर तो आपल्या शोकाकुल मित्रांची रजा घेऊन विदेशीं मृत्यूच्या हस्तगत होण्यास निघाला."

"**कार्थेज्**चे रानटी लोक द्वेषामुळें आपले कसे कसे हाल करतील हें त्यास पक्कें ठाऊक होतें. आपला जो परिणाम व्हावयाचा त्यांतच आनंद मानून जे लोक त्याला राहण्याविषयीं फार फार आग्रह करीत होते त्यांना सौम्यतेनें हातानें त्यानें एकीकडे केलें व मागें जसा आपल्या **विनाफ्रिअन्** शेतांत विश्रांति घेण्यासाठीं आपला सर्व कारभार आटपून प्रजाजनांच्या गर्दींतून जात असे तसा याही वेळेस तो गेला."

'रानटी लोकांनीं त्याचे कसे कसे हाल केले' त्याबद्दल आपणास खरी माहिती मुळींच नाहीं. परत गेल्यावर आपल्या नायकाचे **कार्थेज्**चे लोकांनीं फार हाल केले असें **रोम्**चे लोक सांगतात. पण शत्रूंच्या वर्तनाविषयीं लिहितांना **रोम्**चे लोक सत्यासत्यतेची विशेष काळजी घेत नसत आणि **कार्थेज्**विषयीं तर ते वाटेल त्या गप्पा उठविण्यास तयार होतील असें मानण्यास सबळ कारणें आहेत. शिवाय **कार्थेज्** आपल्या पराभव पावलेल्या सरदारालाही कधीं सदयपणानें वागवीत नसे आणि आपल्या शत्रूलाही त्यानें दया दाखविली नसेल हें संभवतें खरें. आणि **रेग्युलस्**नें **कार्थेज्**चें नुकसान किती केलें होतें व **कार्थेज्**ला किती उद्दामपणानें वागविलें होतें हें लक्ष्यांत आणलें ह्मणजे **कार्थेज्**नें केलें तें कांहीं फार केलें असें वाटत नाहीं.

पण तितक्याच सबळ पुराव्यावर **रोमन्** लोकांच्या अथवा एका **रोमन्** स्त्रीच्या अघोर कृत्याविषयीं ऐकलें ह्मणजे अंगावर कांटाच उभा राहतो. **रोम्**च्या राजसभेनें **रेग्युलस्**च्या प्राणसंरक्षणार्थ दोन **कार्थेज्**चे सरदार **रेग्युलस्**च्या बायकोकडे ओलीस म्हणून ठेविले. जेव्हां तिला **रेग्युलस्**च्या

मरणाची बातमी समजली तेव्हां आपल्या नोकराकडून एका पिपांत त्या दोघांना बांधून टाकून अन्नपाण्याशिवाय तिनें ठेविलें. पांच दिवसानंतर त्या दोहोंपैकीं एकजण मेला. त्या क्रूर महामायेनें त्या जिवंत राहिलेल्या मनुष्यास तसाच त्या शवाजवळ ठेविला व त्याच्या यातना थोड्या अधिक व्हाव्यात ह्मणून त्याला थोडें थोडें अन्नपाणी द्यावयास लागली. ह्या असल्या अघोर व अमानुष कृत्यांचा शेवटीं त्या तिच्या इतर नोकरांना वीट आला व त्यांनीं ती बातमी न्यायाधीशांना कळविली. शेवटीं त्यांनीं त्या हतभाग्याला सोडविला व मग लोकांनीं तिनें त्याला छळूं नये ह्मणून बंदोबस्त केला.

भाग तिसरा.

पुनः सिसिलींत लढाई.

अद्यापपावेतों **रोमन्** लोकांचेंच समुद्रावर वर्चस्व होतें. जरी **कार्थेज्**चे लोक जन्मतःच उत्तम दर्यावर्दी होते व जरी आज कितीएक शतकें त्यांचेंच समुद्रावर प्राधान्य होतें तरी सुद्धां त्यांना अगदीं समुद्राशीं अपरिचित* अशा लोकांनीं खालीं पाहावयास लावावें ही मोठी विचित्र स्थिति होय. पण तसें झालें होतें खरें. **रेग्युलस्**च्या सर्व सैन्याचा जो पार फडशा उडाला त्याची बातमी **रोम्**पर्यंत गेली व त्यांनीं तेथून एक आरमार पाठविलें. कांहीं **रोम्**चे लोक **क्लिपिआ** येथें अद्यापपावेतों टिकाव धरून होते; त्यांना नेण्यासाठीं हीं जहाजें पाठविण्यांत आलीं होतीं. त्यांनीं **कार्थेज्**च्या आरमाराला गांठून त्याचा पराभव केला. सुमारें दोनशेंपैकीं एकशें चौदा जहाजें कैद करून आपली फौज सोडवून नेली. पण जरी **रोम्**चे शिपाई समुद्रावर जमिनीसारखेच लढत होते तरी ते कांहीं खरे खलाशी नव्हते. पुढील कांहीं वर्षांत जहाजें फुटल्यामुळें जें त्यांचें नुकसान झालें तें सांगण्यांत येणारच आहे. ह्या नुकसानाचें मुख्य कारण

* रोमन् लोकांच्या जहाजांवर बहुतेक इटलीचे लोक असत. त्यांना ते पुष्कळ दिवसपावेतों समुद्रावरचे दोस्त ह्मणत असत. रोमन् लोकांचे अज्ञान दाखविण्यासाठीं ह्मणून **पॉलिबिअस्**नें लिहिलें आहे कीं अगदीं प्रथम जेव्हां **रोम्**चे लोकांनीं जहाजें तयार केलीं तेव्हां जमिनीवरच वल्हीं धरण्यास व मारण्यास त्यांना शिकवीत असत. असला अभ्यास त्यांच्या फारच थोडा उपयोगीं पडला असेल.

जरी सेनाधिपतीचें अज्ञान व हट्ट नव्हता, तरी नुकसान ह्यामुळें अधिक होत असे. कप्तानांनीं **सिसिलीच्या** दक्षिणबाजूचा समुद्र धोक्याचा आहे असें कितीएक वेळ सांगितलें असेल पण त्याचा कांहींएक परिणाम जाहला नाहीं. **पॉलिबिअस्** नांवाच्या एका शांत आणि शहाण्या इतिहासकारानें लिहिलें आहे कीं इतिहासांत इतकें जबरदस्त नुकसान झालेलें क्वचितच आढळण्यांत येईल. चारशेंसाठ जाहजांपैकीं साठ जहाजें सुद्धां वांचलीं नाहींत. **कार्थेज्**ला हें पाहून बरेंच धैर्य आलें. व त्यांनीं एक नवें सैन्य व नवें आरमार उभें करून **सिसिलींत** लढण्याचा निश्चय केला. पहिल्या मोहिमेंत त्यांचें **प्यानोर्मस्** शहर गेलें. पण पुढील स्वाऱ्यांत कांहीं थोडेंबहुत यश त्यांना मिळालें. पुनः एकदां वायूचें सहाय्य त्यांना मिळालें. त्यांच्या शत्रूचें सर्व आरमार पुनः एकदां सर्व चहूंकडे विखरून नाश पावलें व त्यामुळें **रोमन्** लोकांनीं समुद्रावर वर्चस्व मिळविण्याची सर्व आशा सोडून दिली. ते आपणास लागण्यापुरतें धान्य वगैरे आणण्यासाठीं लागतील तेवढींच जहाजें समुद्रावर सोडीत असत. जमीनीवरही **कार्थेज्**चीच सरशी होत असे. मागील मोहिमेंत **रेग्युलस्**च्या सैन्याची हत्तींनीं काय स्थिति केली होती ती ते पूर्णपणें जाणून होते व हत्तींना फिरण्यासवरण्यापुरती जागा असेल अशा ठिकाणीं लढण्याचें धैर्यच त्यांना होत नसे. त्यांच्या सैन्याची जेव्हां पक्की खातरी जाहली कीं हे प्राणी रागावले ह्मणजे जितके शत्रूंना तितकेच मित्रांना अपाय करतात तेव्हांच ते लढावयास येईसे जाहले. एकदां एक **कार्थेजिनिअन्** सरदारानें किल्ल्याचा तट पाडण्यास हत्ती लावले. त्यांच्यावर किल्ल्याच्या भिंतीवरून सारखी बाणांची वृष्टि सुरू झाल्याबरोबर त्या वेदनांनीं ते चवताळून गेले त्यासरशीं ते मागें परतले व आपल्या सैन्याची त्यांनीं खराबी केली. त्यामुळें पुष्कळ **कार्थेज्**चे शिपाई **रोमन्** लोकांच्या हातांत सांपडले. पण याहूनही अधिक नफा असा झाला कीं त्या जनावरांची भीति नाहींशी झाली.

आतां इतिहासांत अति चेंगट ह्मणून नमूद केलेल्या वेढ्यास आरंभ झाला. **लिलिबिअम्** नांवाच्या भूशिराजवळ **लिलिबिअम्** ह्मणून एक शहर होतें. त्याचा तट अतिशय उंच होता व तटाभोंवतालचा खंदकही फार खोल होता; व बंदरांत येण्यास कांठाजवळ असलेल्या लहानलहान सरोवरांशिवाय दुसरा मार्गच नव्हता. **रोमन्** शिपायांनीं प्रथमतः नैर्ऋत्य बाजूच्या तटावर हल्ला केला व तेथचे सहा बुरूज पाडले. **कार्थेज्**चा मुख्य **हिमिल्को** हा एकसारखी खडी मेहनत

करीत होता; होईल तितका तट सांधून घेत होता, खंदकही खणून घेत होता व तितक्यांत **रोमन्** लोकांच्या किल्ला पाडण्याच्या सामानासुमानाला आग लावून देण्याची संधि पहात होता. एवढें करूनही शिवाय आपले भाड्याचे शिपाई फुटून शत्रूला जाऊन मिळत होते तेंही सर्वांत मोठें अरिष्ट त्यानें टाळलें. भाडोत्री शिपायांचे मुख्य **रोमन्** लोकांशीं गुप्त सल्ला मसलत करीत होते तोंच ती गुणगुण **हिमिल्को**च्या कानावर आली व त्यानें जिकडच्या तिकडे शांत केलें. थोडेच दिवसांनीं **कार्थेज्**हून कुमक आली. **लिलिबिअम्**च्या फौजेकडून कांहींएक बातमी न आल्यामुळें कांहीं तरी त्यांच्यावर अरिष्ट गुदरलें असेल अशी कल्पना सहजच **कार्थेज्**मध्यें ज्याची त्याची झाली व त्यावरून एक पन्नास जहाजांचें आरमार व त्याबरोबर सुमारें दहा हजार फौजेची मदत पाठविण्यांत आली. ह्या आरमाराचा कप्तान सर्व तयारी करून बसला व अनुकूल वारा लागल्याबरोबर एकदम जो निघाला तो बंदरांत येऊन पोहोंचला. **रोमन्** लोक शत्रूचें हें धाडसाचें कृत्य पाहून अगदीं चकित होऊन गेले व त्यांना अडविण्याचा प्रयत्नही त्यांनीं केला नाहीं. ही नवीन कुमक आल्यामुळें **हिमिल्को**ला मोठा धीर आला व त्यानें शत्रूवर आपण होऊन चालून जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपलें सर्व सैन्य बरोबर घेतलें व शत्रूंनीं किल्ला पाडण्याचीं वगैरे यंत्रें ज्या ठिकाणीं लावून ठेविलीं होतीं त्या ठिकाणावर हल्ला केला. त्याची फौज त्या लांकडी बुरुजांना व इंजिनांना आग लावणार इतक्यांत आपली फार खराबी होईल असा संभव त्यास दिसून आला व त्यानें आपली फौज तेथून एकदम काढून घेतली. परंतु कांहीं दिवसांनीं त्याच्या प्रयत्नास यश आलें. मोठ्या सोसाट्याचा वारा सुटल्यामुळें त्यांच्या बुरूज वगैरे कामाचा कांहीं भाग पडला; व त्याची बरीच धांदल उडून गेली आहे असें एका भाडोत्री शिपायानें पाहिलें. आणि हल्ला करण्यास ही संधि चांगली आहे असें **हिमिल्को**ला जाऊन सांगितलें. **हिमिल्को**ला तर हा बेत पसंत वाटला. त्यानें तीन टोळ्या बाहेर पाठविल्या व तिघांनीं तीन ठिकाणीं आग लावून दिली. **रोम्**चे लोक हें सर्व पाहून घाबरले. वाऱ्यामुळें त्यांच्या डोळ्यांत इतका धूर जाई कीं त्यांना कांहीं डोळ्यांनीं दिसेना व कांहीं करतांही येईना. अखेरीस सर्व कांहीं जळून फस्त जाहलें. लांकडाचे बुरूज अगदीं जमीनदोस्त होऊन गेले. त्या लढाईच्या घणांचीं लोखंडाचीं डोकीं पार वितळून गेलीं. ह्या नंतर त्यांनीं हल्ला करून शहर घेण्याची सर्व

आशा सोडून दिली व वेढ्यावरच सर्व हवाला ठेवून शहराला सर्व बाजूंनीं घेरून बसले.

कार्थेज्चें आरमार **ड्रेप्यानम्**वर होतें. दोनशें एकूण पन्नास सालीं **रोम्**-हून नेमून आलेल्या **कॉन्सलां**नीं त्यावरच हल्ला करण्याचा निश्चय केला. शत्रूंना मुळींच न समजूं देतां **पब्लिअस् क्लाडिअस्** या ठिकाणीं येऊन पोहोंचला. **कार्थेज्**चा कप्तान् **आर्डिबाल्** हा हें पाहून घाबरला पण त्यानें धैर्य सोडलें नाहीं. त्यानें एकदम जहाजें तयार केलीं आणि शत्रु ज्या बाजूनें आंत शिरत होते त्याच्या दुसऱ्या बाजूनें आपलीं जहाजें बाहेर काढून रांगेनें लावून ठेविलीं. ह्यामुळें **क्लाडिअस्**ला आपलीं जहाजें परत फिरवावीं लागलीं व त्यामुळें आंत शिरणाऱ्या व बाहेर निघणाऱ्या जहाजांच्या टक्करा होऊन बरीच गडबड व धांदल उडाली. तरी पण त्यांच्या कप्तानांनीं समुद्र-किनाऱ्याच्या बाजूनें आपलीं जहाजें लाविलीं व त्यांच्या नाळा शत्रूंकडे फिर-विल्या. ह्या गडबडींत त्यांना जागेची आवड निवड करण्यास सांपडलें नाहीं. इकडे **कार्थेज्**ला अफाट समुद्र त्यांचाच होता. त्यामुळें त्यांना पाहिजे तिकडे जाण्यासवरण्यास यथास्थित स्वतंत्रता होती. फार बेतल्यासारखी झाली तर त्यांना पळून जातां येत असे व संधि मिळाल्यास पुनः परत येतां येत असे. **रोमन्** लोकांची गोष्ट अशी होती कीं त्यांचीं जहाजें पुढें आल्यास पुढून पाठी-मागून आणि बाजूंनीं त्यांच्यावर **कार्थेज्**चे लोक हल्ला करीत असत, व असा हल्ला असतां पाठीमागें जाण्यास काय तो समुद्राकिनारा, जर ते तिकडे वळले तर अगदीं थोडक्या पाण्यांत जावें लागत असे किंवा जहाजें जमिनींत रुतून बसत असत. जहाजांच्या बांधणीनें किंवा खलाशांच्या हुशारीनें ह्या अडचणी भरून आल्या होत्या असेंही नाहीं; कारण ह्यांचीं जहाजें ओबडधोबड होतीं व खलाशी तर अगदीं अडाणी होते. अखेरीस **क्लाडिअस्**चें अतिशय नुकसान होऊन पराभव झाला. त्यानें एकतीस जहाजांसह स्वतःचा बचाव कसा तरी केला. सुमारें शंभर जहाजें सर्व खलाशांसहित शत्रूंच्या ताब्यांत गेलीं. कांहीं-कांनीं आपलीं जहाजें कांठाला लावून कांठावर उड्या टाकल्या; तेवढे कायते वांचले.

ज्युनिअस् दुसरा **कॉन्सल्** ह्यापेक्षांही अतिसंकटांत पडला होता. त्याच्याबरोबर फक्त एकशेंवीस लढाऊ जहाजें होतीं आणि सुमारें आठशें

मालाचीं जहाजें संभाळण्यासाठीं म्हणून बरोबर होतीं. **कार्थेज्**च्या सेनाधिपतीनें (आडमिरलूनें) त्यांना उलट वाऱ्यावर किनाऱ्याला लागून जहाजें नांगरावयास लावलीं. जेव्हां तुफानास सुरुवात झाली तेव्हां या वेढणाऱ्या **कार्थेज्**चे आरमारानें **प्याकिनस्** भूशिराला वळसा घालून भर तुफानाचा मारा चुकविला. **रोमन्** आरमाराला तसें करण्यास वेळ मिळाला नाहीं ह्मणा किंवा त्याला तसें करण्याचें सुचलें नाहीं ह्मणा; पण त्यामुळें **रोमन्** आरमाराचा समूळ नाश झाला. एक फळीसुद्धां त्या आरमारापैकीं हातीं लागली नाहीं असें एका इतिहासकारानें ह्मटलें आहे. थोडेच दिवसांपूर्वीं **लिलिबिअम्** बंदरांतील सर्व जहाजें जळून गेलीं असल्यामुळें **रोम्**पाशीं आतां जहाजें मुळींच नव्हतीं.

हें सर्व झालें तरी **लिलिबिअम्**चा वेढा तसाच चालू होता. वेढणाऱ्या सैन्यास सर्व **सिसिली**तून हवें तिकडून धान्य मिळण्याजोगतें होतें. व आंतील लोकांस समुद्राच्या बाजूनें पुरवठा होत होता. **रोमन्** लोकांनीं मोठ्या युक्तीनें जरी अतिमजबूत **एरिकस्**चा डोंगरी किल्ला घेतला तरी पण दोन्ही बाजूस तादृशसें नफानुकसान न होतां लढाई तशीच चालली होती.

शेवटीं एकदां समरांगणीं **कार्थेज्**मध्यें जे थोडे अतिमहान् असे पुरुष होऊन गेले, त्यांपैकीं एक दिसावयास लागला. **हामिल्कार बार्का** जेव्हां **कार्थेज्**चे आरमाराचा व सेनेचा अधिपति झाला तेव्हां वयानें अगदीं लहान होता. तरी पण त्यानें आपलें नांव बरेंच गाजविलें होतें व थोडक्याच काळांत आपण त्या जागेस पात्र आहों असें त्यानें दाखविलें. **प्यानोर्मस्** आणि **ड्रेप्यानम्**च्या मध्यें बेटाच्या नैर्ऋत्य बाजूस चांगलीशी मजबुतीची जागा पाहून तेथें तो तळ देऊन बसला. ही जागा म्हणजे **हर्क्टा** (सध्यां तिला **प्यालेग्रिनो** ह्मणतात.) नांवाचा खडक होय. ही जागा सर्व प्रकारें सोयीची होती. जमिनीच्या बाजूनें त्या जागेकडे जाण्यास इतकें कठीण होतें, कीं अगदीं लहानशा फौजेनेंही त्या स्थलाचें संरक्षण होण्याजोगतें होतें. आजूबाजूच्या जमिनींत कांहीं कांहीं ठिकाणीं पिकें होण्याजोगी जागा होती. तेथील हवा अति थंड व सुखकर होती. बंदर चांगलें विस्तीर्ण व कांठाला पाणी बरेंच खोल होतें. सर्व आजूबाजूचीं स्थलें जरी **रोम्**चे लोकांच्या ताब्यांत होतीं तरी पण त्यानें तीन वर्षें ह्या ठिकाणीं टिकाव धरला होता. तो आपलें आरमार **इटली**च्या दक्षिण किनाऱ्यावर धाडी व तेथील लुटीवर सामानसुमानाचा व धान्याचा पुरवठा आपल्या

लोकांपुरता करून घेई. कारण **रोम्**चे लोकांनीं समुद्रावर शत्रूशीं समाना करण्याचें बहुतेक सोडून दिलें होतें. जमिनीच्या बाजूनें वरचेवर छापे घालून व निरनिराळ्या युक्त्यांनीं त्यानें शत्रूंना सारखें गुंतवून ठेविलें होतें. त्यानें स्वत: जरी मोठासा विजय मिळविला नाहीं तरी पण शत्रूंना दुसरें कांहींएक करण्यास फुरसद दिली नाहीं. त्यामुळें **लिलिबिअम्**चा वेढा जशाच्या-तसाच होता. **रोमन्** लोक शत्रूंना त्या जागेतून हांकून काढण्यास इतके उतावीळ अथवा उत्सुक झाले होते कीं शत्रूवर निरनिराळ्या ठिकाणांहून हल्ला करण्यासाठीं एक वेळेस तर चाळीस हजार लोक त्यांनीं जमा केले. पण त्या सर्वांचा कांहींएक उपयोग जाहला नाहीं. तीन वर्षांच्या शेवटीं **कार्थेज्**नें आपण होऊन तें ठिकाण सोडलें व तें दुसरें ठिकाण धरून बसलें. आतां धरून बसलेलें ठिकाण **एरिक्स्** म्हणून होतें. तें **रोम्**नें घेतल्याबद्दलची हकीगत वर नुकतीच सांगितलेली आहे. **हामिल्कार् बार्का**नें एकदम जहाजें भरलीं व निर्दिष्टस्थानास गेला. डोंगरावरचा किल्ला शत्रूच्या ताब्यांत होता त्यामुळें तात्पुरतें खालचें गांव घेऊन तेथेंच तो ठाणें धरून बसला. ह्या ठिकाणीं त्यानें दोन वर्षें काढलीं. त्याला ह्या मुदतींत **कार्थेज्**हून फारच थोडी मदत मिळत होतीसें दिसतें. कारण भाड्याच्या शिपायांचा पगारासाठीं अतिशय तगादा त्याच्या पाठीमागें होता. त्याच्यापाशीं तर त्यांना देण्यास कांहींएक नव्हतें. त्यामुळें त्याला आजउद्यांचे वायदे करण्याखेरीज दुसरा कांहींएक मार्ग नव्हता. तरी पण **रोमन्** लोकांचें त्याच्यापुढें कांहींएक चालेना आणि त्यामुळें अर्थात्च **कार्थेज्**चे किल्ले घेण्याचें काम अगदींच बंद पडलें,

हामिल्कारच जर चहूंकडे असूं शकता तर लढाईचा परिणाम फारच भिन्न झाला असता; निदान लढाई इतक्या लवकरच परिणामास तरी लागली नसती; कांहीं थोडे दिवस तरी लांबली असती. पण सर्व ठिकाणीं आपल्यासारखींच शूर व दक्ष आपल्या हाताखालील माणसें असतील अशी त्याची खातरी होईना. दोनशें एकेचाळीस सालीं **रोम्**नें समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा अतिमहान् प्रयत्न केला. सुमारें पांचपंचवीस वर्षें सारखी लढाई चालू असल्यामुळें सरकारी खजिना अगदीं रिता झाला होता. पण शहरवासी लोकांनीं आपल्या खानगी शिलकेंतून मदत देण्याचें अभिवचन दिलें. कांहीं कांहीं श्रीमंत लोकांनीं दरेकानें एकेक जहाज बांधवून देण्याचें कबूल केलें.

व ज्यांना तितकें झेंपेना त्यांनीं दोघांदोघांनीं तिघांतिघांनीं मिळून एकेक जहाज तयार करण्याचें वचन दिलें. अशा रीतीनें दोनशें पांच–बाजूंचीं जहाजें अति-उत्तम बांधणीचीं त्यांनीं तयार केलीं. हीं घेऊन **ल्युटेटिअस् काट्युलस् कॉन्सल् सिसिलीवर** निघाला. **कार्थेज्**चे लोक ह्याच्याशीं सामना कर-ण्यास चांगल्याशा तयारींत नव्हते. कारण शत्रू इतकीं वर्षें स्वस्थ बसल्यावर पुन: समुद्रावर हक्क सांगण्यास येतील असें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. यामुळें **काट्युलस्**ला **लिलिबिअम्** आणि **ड्रेप्यानम्** हीं दोन्हींही बंदरें कांहींएक अडथळा झाल्याशिवाय घेतां आलीं. त्यानें **ड्रेप्यानम्**वर हल्ला मोठ्या जोरानें चालविला होता आणि वेळ सांपडेल तेवढ्यांत आपल्या खलाशांना शिकवून तयार करीत होता. या अभ्यासामुळें त्यानें आपल्या लोकांना प्रसंगास चांगले उपयोगी पडण्याजोगे धूर्त व तयार केले.

कार्थेज्चे लोकांनींही लढाईची तयारी केली. आरमाराचा मुख्य **हानो** यानें खालील बेत केला. आपल्याबरोबर धान्याचा चांगलासा पुरवठा करून घ्यावा; तो **एरिक्स्** येथें उतरून **हामिल्कार्**च्या सैन्याला द्यावा व कांहीं तेथील निवडक लोक घेऊन **हामिल्कार्**सुद्धां इकडे यावें. **हामिल्कार्** एकटा एका सैन्याबरोबरीचा होता हें सर्वांना पक्कें ठाऊक होतें. **रोमन्** लोकांचा बेत या गोष्टींतील कांहींएक होऊं न देण्याचा होता. ह्याच्या अगोदरच हल्ला केला ह्मणजे हें सर्व आयतें बंद पडेल अशा हेतूनें, **लिलिबिअम्**च्या समोर **एग्यूसा** बेट होतें तेथें आपल्या जहाजावर अगदीं निवडक फौज घेऊन **काट्युलस्** गेला. समुद्रांत जरा पुढच्या बाजूस **हायूरा** ह्मणून बेट होतें तेथें **हानो** होता. ह्या सर्व पुढें आलेल्या भागास **एगेट्स्** म्हणत असत. (बोकडाला जो **ग्रीक्** शब्द आहे त्याचा आणि **एगेट्-स्**चा कांहीं संबंध आहे.) **काट्युलस्**नें एकदम लढाई देण्याचा विचार केला परंतु लढाईची वेळ जशी अगदीं समीप आली तशी त्याच्या मनांत आशंका येऊं लागली. समुद्रावर तुफानाचा वारा सुरू होता व तो पश्चिमेकडून वाहत असल्यामुळें शत्रूंच्या तो उपयोगास येण्याजोगता होता व ह्याला थोडाबहूत प्रतिबंधच करणारा होता. इकडे तर जसजसा उशीर होत होता तसतसें अतिशय नुकसान होत होतें. ह्या वेळेस **कार्थेज्**चीं जहाजें सामानसुमानानें भरून तयार होतीं. जर ह्यांच्याशीं ह्या वेळेसच लढाई न केली तर एकदम हीं जहाजें आपला माल उतरून टाकतील. दुसरे शिपाई आंत घेतील व सगळ्यांत

फिकीरीची गोष्ट अशी कीं **हामिल्कार्** या मंडळींत शिरूं शकेल. हे विचार आल्यामुळें त्यानें एकदम लढाई करण्याचा निश्चय केला. त्यानें आपलीं जहाजें समुद्रांत बाहेर काढावयाच्या अगोदरच **कार्थेज्**चीं जहाजें पूर्वबाजूस वाटेला सुद्धां लागलीं होतीं. त्याचीं मनुष्यें नेहेमींच्या अभ्यासानें चांगलीं वहिवाटलीं गेल्यामुळें आपलीं जहाजें शत्रूच्या व ते जात होते त्या जागेच्या मध्यें घालूं शकलीं. आणि एका ओळीनें आपलीं जहाजें लावून शत्रूशीं लढण्यास सिद्ध झालीं. **हानो**चीं जहाजें मालानें लादलीं गेल्यामुळें अवजड झालीं होतीं, त्याचे खलाशी अगदीं अडाणी होते; त्याचें आरमार फार दिवस अगदीं बघितल्या सवरल्याशिवाय पडलें होतें व त्याच्या जहाजावरची फौज नुकत्या जमा करून आणलेल्या शिपायांच्या टोळ्यांसारखी होती. ह्या सर्व बाबतींत **रोम्**चे लोक वरचढ होते. लढाईला लागणाऱ्या सामानाशिवाय इतर कांहीं त्यांच्या जहाजांवर नव्हतें; त्यांचें खलाशी केले सवरलेले व समुद्रांत पुष्कळ वापरलेले होते, व त्यांची फौज अगदीं उत्तम तयारींत होती. पहिल्या सलामींतच त्यांनीं आपली हुशारी दाखवून दिली. **कार्थेज्**चे लोकांचीं पन्नास जहाजें त्यांनीं बुडवून टाकलीं व सत्तर जहाजें सर्व मालमाणसांसहित पकडलीं. बाकीचीं जहाजें एकदम उलटा वारा सुटल्यानें वाचलीं गेलीं. कारण तीं चांगला वारा लागल्यामुळें परत **हाय्रा**ला जाऊन लागलीं.

एगेट्स्च्या लढाईनें ह्या स्वारीचा शेवट झाला. **कार्थेज्**ला **सिसिलीं**तील सैन्याला धान्याचा पुरवठा करतां येईना; त्यामुळें लढाई उगाच लांबविणें व्यर्थच असें त्यांना वाटूं लागलें. ह्यामुळें **हामिल्कार्**ला त्यांनीं तह करण्यास अधिकार दिला. **रोम्**चे लोकही तह करण्यास राजी होते; कारण तेही फार दिवस चाललेल्या लढाईनें अगदीं जेरीस आले होते. थोडेंबहूत बोलणेंसवरणें होऊन तह करण्यांत आला. मुख्य शर्त अशी होती कीं **कार्थेज्**नें आपलीं **सिसिलीं**तील सर्व ठाणीं सोडावीत व पुन: **सिसिलीं**च्या कारभारांत कधीं पडूं नये. सुमारें चारशें वर्षें **कार्थेज्**चा अंमल **सिसिलींत** होता. व दोनशें वर्षें पावेतों तर तें सबंध जिंकण्याचीही त्यांना आशा होती. कांहीं कांहीं वेळेस ते अगदीं घेण्याच्याही बेतांत होते. आतांबरीक त्यांना अगदीं त्याची आशा सोडावी लागली. ह्यामुळें **कार्थेज्**चे संस्थानाला निस्संशय धक्का बसला. **कार्थेज्**चे अधोगतीला सुरुवातच झाली म्हणावयाची. लढाईचा दण्ड ह्मणून ८००००० आठ लक्ष पौंड द्यावे लागले. परंतु **हामिल्कार्**चा आपलें नांव

राखण्याचा निश्चयच होता. **रोमन्** लोकांनीं **एरिक्स्** सोडून द्यावें म्हणून मागणी केली. पण त्यानें ती एक निश्चयानें नाकारली. शेवटीं **रोम्**नें ती सोडून दिली. **हामिलकार्**चें सैन्य विजयी सैन्याप्रमाणें मोठ्या थाटानें बाहेर निघालें व त्यांना **कार्थेज्**ला बोलावून नेण्यांत आलें. अशा रीतीनें चोवीस वर्षें चालून पहिल्या **प्यूनिक्** लढाईचा शेवट झाला.

भाग चवथा.

कार्थेज् आणि त्यांचे भाड्याचे शिपाई.

कार्थेज् आणि त्यांचे भाडोत्री शिपाई या दोघांमध्यें नेहमींच घोटाळे होत असत असें मागें सांगितलेंच आहे. असल्या प्रकारचा घोटाळा सध्यां उपस्थित झाला होता; व त्याला ह्या खेपेस जरा विशेष भयंकर स्वरूप प्राप्त झालें होतें. देशांत जरी विपुल संपत्ति होती तरी ती सुद्धां सारखी पंचवीस वर्षें लढाई चालल्यामुळें अगदीं नाहींशी झाली होती. आणि भाड्यानें जे शिपाई आणले होते त्यांना ठरवलेले पगार देण्यास **कार्थेज्**-पाशीं पैसा मुळींच नव्हता. आणि सध्यांचे भाडोत्री शिपाई पाहिले तर नेहेमींपेक्षां लढाई वगैरेंत अतिकुशल व अगदीं तयार होते. ते कांहीं अमुक एका मोहिमेला बोलावले व दुसऱ्याला हांकून दिले अशांतले नव्हते, त्यांना एकजुटीनें काम करण्याची इतके दिवसांच्या कवाइतीनें संवयच लागून गेली होती, व एकमेकांविषयीं त्यांची आवड बरेच दिवसांच्या सहवासानें वाढत गेली होती. आणि शिवाय त्यांतील बहुतेक लोक **हामिलकार् बार्का**-सारख्या महायोद्ध्याच्या हाताखालीं युद्धविद्या शिकलेले होते.

तह वगैरे ठरल्यानंतर **लिलिबिअम्**चा सुभेदार ह्या शिपायांच्या लहान लहान टोळ्या करून **कार्थेज्**ला पाठवावयास लागला होता. त्याचा अद-मास असा कीं जसजसें आपण धाडीत जाऊं तसतसें त्यांना सरकार पगार

देऊन वाटेस लावील. व असें झालें असतें तर सर्व सुयंत्रित चाललें असतें. पण सरकारची तसें करण्याची इच्छा तरी नव्हती किंवा तसें करणें त्यांना शक्य तरी नव्हतें. सारखीं जहाजेंच्या जहाजें भरून येत होतीं शेवटीं शहर अगदीं या लोकांनीं भरून गेलें. थोड्याच वेळांत ते इतके अस्वस्थ व त्रास-दायक व्हावयास लागले कीं कोटाच्या बाहेर एका ठिकाणीं एका तळावर त्यांना गोळा केलें व तेथेंच सोडून दिलें. तेथें त्यांना काम काय तें फक्त एकच होतें. त्यांनीं आपल्या तक्रारीविषयीं कांहीं बोलत बसावें किंवा जुळल्यास कांहीं दंग्याधोप्याचा बेत करावा.

जेव्हां गोष्ट अगदीं निकरास आली तेव्हां कांहीं थोडासा पैसा देण्यास सरकार तयार झालें. पण त्यावेळेस गोष्ट आहाराबाहेर गेली होती. सैन्यानें आपले प्रमुख नेमिले होते व त्या प्रमुखांचें युद्ध करण्यांतच हित होतें. त्यांपैकीं एक **स्पेण्डिअस्** नांवाचा होता. तो **क्याम्पानिआ**हून पळून आलेला गुलाम होता. अर्थातच लढाई संपली म्हणजे त्याला त्याच्या धन्याकडे जाणें भाग होतें. व तेथें परत गेल्यावर दुस्सह कष्ट व मृत्यु याशिवाय दुसरें कांहीं मिळेल असें त्याला स्वप्नांत देखील वाटत नसे. त्याची शक्ति अद्भुत होती व तो शूर इतका होता कीं कोणी एखादा त्याला वृथासाहसी सुद्धां म्हणेल. दुसरा प्रमुख **म्याथो** हा **आफ्रिकें**त जन्मलेला व स्वतंत्र होता. **आफ्रिकें**तही भाडोत्री शिपायांची टोळी आल्यापासून त्यांच्या सर्व चळवळींत हा प्रमुख असे. तेव्हां त्याला आपले मालक **कार्थेज्**चे लोक आपणास काय दुःखें भोगावयास लावतील त्याची भीति नेहेमीं असेच. **मेथो**चें ऐकण्यास सर्व **आफ्रिके**चे लोक तयार होते व त्यानें जें त्यांस सांगितलें त्यांत सत्याचा अंश बराच होता. तो आपल्या मित्रांस म्हणाला, **कार्थेज्** सरकार इतर सर्व ठिकाणचे लोक आपापल्या ठिकाणीं पाठवून देईल, व तुम्ही एकटे राहिलां म्हणजे मग आपला राग कसा काय आहे तें दाखवील. बंडास कारण म्हणून त्यांना विशेष संधि लवकरच सांपडली. सर्व कामाची विल्हेवाट लावण्यास **ग्यास्को** म्हणून एक सरदार पाठविण्यांत आला होता त्यानें त्या सर्वांचा पगार चुकता केला; पण घोडे, धान्य वगैरेचा निकाल मागाहून करण्यांत येईल असें सांगितलें. हें कृत्य लोकांना न आवडल्यामुळें लोक आरडाओरड करूं लागले व कांहीं थोड्या क्षणांत सर्व सैन्य एके ठिकाणीं गोळा झालें. तेथें **स्पेण्डिअस्** आणि **मेथो** यांनीं मोठ्या आवेशाचीं भाषणें केलीं व लोकांनींही तीं मोठ्या आनंद-

युक्त गर्जनेनें ऐकिलीं. दुसरा कोणी बोलावयास उठला कीं ठार मेलाच. **युरोपां**तील पश्चिम प्रदेशांतील दरेक प्रांतांतून गोळा झालेल्या या सर्व समूहांत 'मारा' या शब्दाशिवाय दुसरा कोणताही शब्द एकमेकांस कळत नसे, असें एका इतिहासकारानें लिहिलें आहे. ह्या दोघा वक्त्यांना सर्वानुमतें पुढारी नेमण्यांत आलें. ह्या लोकांनीं **गास्को** व त्याच्या बरोबरचीं माणसें या सर्वांना पकडलें; त्यांच्या पायांत बिड्या ठोकल्या; व सर्वांना बंदीखान्यांत टाकलें आणि आतां उघड उघड लढाई सुरू जाहली. **आफ्रिकन्** शहरें सर्व बंडखोरांना जाऊन मिळालीं कारण नेहमींच ती आपल्या धन्यांशीं वांकडीं असत व आतां, तर त्यांचा द्वेषभाव पराकाष्टेस जाऊन पोहोंचला होता. ह्या नुकत्याच संपलेल्या लढाईनें **कार्थेज्**ला अनिवार खर्च आला, त्यामुळें त्यांना मांडलिक शहरावर विशेष कराचा बोजा लादावा लागला, व मोठ्या सक्तीनें तो कर उगवून घ्यावा लागला. जे शेतकरी नक्त पैशाशिवाय धान्याच्या वगैरे रूपानें भाडें देत असत त्यांच्या कडून जमीनींचें अर्धें उत्पन्न घेण्याचा ठराव झाला; इतर संस्थानिकांपासून घ्यावयाची खंडणीही दुप्पटीनें वाढविली; कोणी रकमेचा भरणा करून देण्यास चुकला तर त्याला जबर शिक्षा देत असत. ह्या सर्व जुलुमामुळें एकंदर लोक इतके चवताळून गेले होते कीं, **आफ्रिकन्** बायकांनीं आपले दागदागिने सर्व एके ठिकाणीं करून बंडखोरांना दिले. (**आफ्रिकन्** बायकांच्या आंगावर दागिने पुष्कळ असत हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे). ह्या आणि असल्याच इतर साधनांनीं **स्पेण्डिअस्** आणि **मेथो** यांजजवळ इतकें द्रव्य झालें कीं त्यांनीं त्यांतून सर्व सैन्याचे हिशोब चुकते करून तर दिलेच पण लढाई चालू ठेवण्यासाठीं भरपूर संचयही करून ठेविला.

हिपो आणि **युटिका** हीं दोन शहरें काय तीं **कार्थेज्**कडे होतीं. हीं शहरें एकदम बंडखोर लोकांनीं वेढून घेतलीं. ह्या बंडखोर लोकांनीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. एक **हिपो**वर ठेविली दुसरी **युटिका**वर व तिसरी **ट्युनिस्** येथें तळावर ठेविली होती. ह्या रीतीनें **कार्थेज्**चें **आफ्रिके**तील लोकांशीं खुष्कीच्या मार्गानें दळणवळण अगदीं बंद केलें होतें. जलमार्ग वरीक खुला होता.

कार्थेज्चा मुख्य सरदार **हानो*** हा **युटिका**ला ज्या बंडखोर टोळीनें

* **हानो** ह्यास "ग्रेट" ह्मणजे मोठा अशी संज्ञा मिळाली होती; पण तो त्या संज्ञेस कसा पात्र जहाला हें मुळींच समजत नाहीं.

वेढा दिला होता त्यावर चालून गेला. त्याच्याबरोबर सुमारें शंभर हत्ती होते ते शत्रूंच्या सैन्यांत शिरले त्यामुळें सर्व शिपाई रानोमाळ पळून गेले. **हानोला** नेहमीं अर्धवट रानटी लोकांशीं लढण्याची संवय होती व त्याला ठाऊक होतें कीं, असले लोक एकदां पळून गेले म्हणजे पुन्हां एके ठिकाणीं जमण्याचें अगदींच अशक्य असतें; त्यामुळें त्याला आपला विजय झालासा खास वाटला. व तो स्वतः जरा मौजमजा करण्यांत गुंतला आणि त्याचे शिपाईही बेफिकीर होऊन हवें तें करीत राहिले. पण बंडखोर शिपाई **हामिल्कार् बार्काच्या** शाळेंत शिकलेले होते; त्यामुळें त्यांना पळून जाणें व पुन्हा परत जमणें हें जसें कांहीं हातचेंच काम होतें. जरूर पडल्यास एका दिवसांतून एकाहून अधिक वेळ सुद्धां तसें करण्यास ते तयार होते. **कार्थेज्**चे लोक गाफील आहेत असे पाहून ते लोक जमा झाले; व शत्रूवर हल्ला करून कांहीं सामानसुमान लुटलें. ह्याच लुटींत बंडखोरांनीं **कार्थेज्**चा तोफखाना लुटला.

आतां **हामिल्कार्** सेनाधिपति नेमण्यांत आला. खुद्द **कार्थेज्**चे दहा हजार लोक एवढीच कायती मुख्य फौज त्यांच्यापाशीं होती; शिवाय कांहीं भाड्याचे शिपाई, कांहीं शत्रूकडून पळून आलेले शिपाई व सत्तर हत्ती. पहिल्याप्रथम, **युटिका** शहराचा बचाव करण्याचा त्यानें संकेत केला. ह्या कृत्यास पहिली अडचण म्हणजे **मेथोनें** दिलेला **कार्थेज्** शहराभोंवतीं वेढा ही होय. तो उठविणें हें पहिलें काम होतें. ज्या संयोगीभूमीवर **कार्थेज्** शहर वसलें होतें त्याचा **आफ्रिका** खंडाशीं संयोग करून देणाऱ्या सर्व टेंकड्या शत्रूंच्या कबज्यांत होत्या एवढेंच नव्हे तर त्यांनीं सर्व टेंकड्यावरून संरक्षणार्थ लोक ठेविले होते. तसाच **मकार** नदीवरचा पूल शत्रूंनीं अडकवून टाकला होता. पण **हामिल्कार्** यानें बघून ठेविलें होतें कीं अमका एक वारा सुरू जाहला म्हणजे मुख आणि मुखाजवळील नदीचें पात्र हीं वाळूनें भरून जात व तेवेळेस सैन्यास ओलांडण्या इतकेंच पाणीं तेथें राही. असा एक प्रसंग साधून त्यानें आपल्या सैन्यासुद्धां नदी ओलांडली आणि सकाळीं एकदम पलीकडील कांठावर प्राप्त होऊन शत्रूंस तसेंच मित्रांस अगदीं आश्चर्यचकित करून टाकलें व एकदम पुलावरच्या तुकडीच्या पिछाडीवर हल्ला केला. तिच्या मदतीस बंडखोरांनीं **युटिकाहून** एक टोळी पाठविली. ही टोळी यावयाच्या अगोदर **हामिल्कार्**नें आपले हत्ती सर्वांत पुढें ठेविले; त्याच्या पाठीमागें हालक्या हत्यारांचे शिपाई व त्याच्या पाठीमागें भरहत्याराचे शिपाई राखले. पण शत्रु पाहिल्याबरोबर

त्यानें आपल्या पलटणीची व्यवस्था बदलली. **स्पेण्डिअस्**ला वाटलें कीं **हामिल्कार**च्या लोकांनीं पळ काढण्यास सुरुवात केली व त्याअर्थीं त्यानें आपल्या शिपायास मारा करण्याचा हुकूम दिला. इकडे भरहत्यारांचे शिपाई त्यांचा मारा घेण्यास उभेच होते, व हत्ती व घोडेस्वार त्यांच्या बाजूवर पडले. बंडखोराकडचे सहा हजार लोक पडले व दोन हजार लोक कैद झाले. **हामिल्कार्**नें वेढा तर उठविला; पण **हिपो** आणि **युटिका** अद्यापि संकटांत होतींच व **ट्युनिअस्** येथेंही बंडखोर लोकांचा पगडा होताच.

ह्या **हामिल्कार्**च्या विजयाचा **आफ्रिकन्** जातींवर सुपरिणाम झाला. कारण **न्युमिडिआ**च्या राजांपैकीं एक आपल्या दोन हजार सैन्यानिशीं **कार्थेज्**च्या गोटांत आला व त्यामुळें **हामिल्कार्**ला लागलीच लढाई करण्याची आपणांत ताकद आहेसें वाटूं लागलें. पुढें जी लढाई झाली ती फारच निकराची झाली व फार वेळ चालली. अखेरीस **कार्थेज्**ची सरशी झाली; ह्या वेळेस त्यांचे हत्ती त्यांना बरेच उपयोगीं पडले. बंडखोरवाल्यांचे दहा हजार लोक मारले गेले व चार हजार कैद झाले. **हामिल्कार्**नें ह्या शेवटील लोकांवर बरीच दया केली. त्यांनीं पाहिजे तर **कार्थेज्**चे तैनातीस राहावें अथवा वाटल्यास घरीं परत जावें असें ठरविलें. पण जर ते लोक शत्रूच्या कम्पूंत दिसले तर कोणत्याही प्रकारची दया दाखविली जाणार नाहीं असेंही फर्माविण्यांत आलें.

शत्रूंकडच्या सरदारांना ही युक्ति पाहून फार भीति वाटली. कारण त्यांचा मुख्य हेतु आपल्या अनुयायाकडून क्षमा न होण्याजोगीं कृत्यें करविण्याचा होता. यामुळें त्यांनीं आपल्या सर्व शिपायांची एक सभा भरविली. त्यांत **सार्डिनिआं**तील बंडखोरांकडून चिठ्ठी घेऊन आलेला ह्मणून एक जासूद आणून उभा केला. त्या चिठ्ठींतील आशय असा होता कीं, **गेस्को** आणि इतर बंदिवान् यांची सोडवणूक करण्यासाठीं कांहीं खलबत फौजेंत चाललें आहे. तेव्हां सूचनार्थ लिहिलें आहे. हें लिहिल्यानंतर **स्पेण्डिअस्** असें बोलला:—"**हामिल्कार्**च्या वचनावर विश्वास ठेवूं नका. यांची दया नव्हे पण ढोंग आहे. त्याच्या ताब्यांत तुह्मी सर्व आल्यासारखे झालां ह्मणजे मग तो तुम्हां सर्वांस शिक्षा करण्यास सोडणार नाहीं. सध्यांपुरतें तुम्हांस सांगणें आहे कीं **गेस्को** फार भयंकर मनुष्य आहे व त्याला सोडून न देण्याची खबरदारी ठेवा. तो

आपलें भाषण संपवीत आहे तोंच दुसरा एक जासूद **ट्युनिस्**कडून आलों म्हणून सांगत आला. त्याचाही निरोप अक्षरशः पूर्वींसारखा होता. ह्या निरोपावर भाषण करण्यास **स्पेण्डिअस्** आणि **मेथो** यांच्याबरोबर सेनाधिपतीचें काम केलेला **गॉल**चा एक मनुष्य उभा राहिला. त्याला **कार्थेजिनिअन्** भाषा येत होती व ती इतर सर्व शिपायांना **कार्थेज्**च्या हाताखालीं बरेच दिवस काम केल्यामुळें थोडीबहुत समजत होती. ही इतर सरदारांहून याला एक विशेष अनुकूल गोष्ट होती. त्यानें आपल्या श्रोतेजनांस स्पष्ट सांगितलें कीं आतां **कार्थेज्**शीं तह करणें ह्मणजे शुद्ध वेडेपण होय. जो कोणी असा उपदेश करील तो आपला द्रोही असें समजावें व या प्रकारचा मनुष्य आपल्या सैन्यांत असण्याचा संभव समूळ नाहींसा करण्यासाठीं एकदम सर्व बंदिवान् लोक ठार मारून टाकावेत.

ह्या भयंकर उपदेशाप्रमाणें एकदम काम करण्यांत आलें. **गेस्को** आणि त्याजसारखेच इतर सातशें बंदिवान् अतिनिर्दयपणानें एकदम मारण्यांत आले. व त्या दिवसापासून लढाईच्या समाप्तीपावेतों कोणात्याही पक्षानें उलटपक्षास एवढीसुद्धां दया दाखविली नाहीं.

आरंभीं **कार्थेज्**ला सर्वच प्रतिकूल होऊं लागलें. **हामिल्कार्**ला **हानो** नांवाचा मनुष्य सेनाधिपत्यांत जोडीदार नेमण्यांत आला. पण ह्या दोघांचें बनेना व त्यामुळें सैन्याचें बरेंच नुकसान व खराबी झाली. **सार्डिनिआ**ला तर **कार्थेज्** कधींच मुकलें होतें व आतां **युटिको** आणि **हिपो** हींही **कार्थेज्**वर उठलीं व त्यांनीं आपापल्या हद्दींतील सर्व **कार्थेज्**चे शिपायांची एकदम कत्तल केली. पण ह्या अशा निकराच्या समयास **कार्थेज्**चे विदेशी मित्र यांनीं त्यास सोडलें नाहीं. ते ह्याशीं फार नेकीनें वागले. **सायराक्यूस्**चा **हायरो** यानें तर चांगलीच मदत केली. **कार्थेज्**ला अपाय व्हावा किंवा **कार्थेज्**चा नाश व्हावा हें थोड्याबहुतांशीं त्याला अपायकारक होतें. कारण त्यामुळें **रोम्** अगदीं निष्कंटक होईल व तसें झाल्यास तें **सायराक्यूस्**ला केव्हांच घशाखालीं उतरवून टाकील असें त्यास वाटत असे. **रोम्**ला जरी असें कांहीं अंतस्थ कारण नव्हतें तरी पण तें ह्या समयास फार स्नेहभावानें वागलें. बंडखोरांनीं **सार्डिनिआ** व **युटिका** दोन्हीं दिलीं असतां **रोम्**नें ती घेण्याचें नाकारलें. आपल्या व्यापाऱ्यांना **कार्थेज्**ला धान्याचा

वगैरे पुरवठा करूं दिला व बंडखोरांशीं सर्व तऱ्हेचा व्यवहार एकदम कायद्यानें बंद केला.

आतां दिशा बदलून विजयाचा ओघ बंडखोरांच्या उलट जाऊं लागला. त्यांनीं **कार्थेज्**ला वेढा दिला होता खरा पण ते स्वतःच वेढले गेले. **न्युमिडिअन्** लोकांचा **न्यारव्हासस्** यानें आपल्या रिसाल्याच्या साहाय्यानें त्यांचें सर्व देशांकडील धान्य वगैरे बंद केलें. त्यामुळें त्यांचें अतिशय खडतर हाल झाले. **स्पेण्डिअस्** आणि त्याचे जोडीदार यांनीं तह करण्याची खटपट केली. **हामिल्कार्**नेंही त्याला पाहिजे होतें त्या दहा शिवाय करून इतर सर्वांस मुक्त करूं असें कबूल केलें. जेव्हां तह ठरला तेव्हां **हामिल्कार्** म्हणाला कीं दहांत ह्या येथें हजर आहेत ते मला पाहिजेत **स्पेण्डिअस्** आणि **अन्टारिटस्** हेही त्यांत होते.

कार्थेज्चा वेढा उठविण्यांत आला आणि **हामिल्कार्** आपल्या सैन्यासह **टयुनिस्**कडे गेला. एका बाजूस आपण स्वतः होता व दुसऱ्या बाजूस आपल्या हाताखालचा अधिकारी **हानिबाल्** यास ठेविलें. **स्पेण्डिअस्** आणि इतर कैदी यांस तटाच्या समोर खिळे ठोकून ठार मारण्यांत आलें. दुर्दैवानें **हानिबाल्** हा अगदींच कच्चा सरदार पडला. बंडखोर लोकांचा नायक **मेथो** हा बाहेर चालून आला. त्यानें एकदम छावणीवर स्वारी केली, आणि **हानिबाल्**लाच कैद करून टाकला. **स्पेण्डिअस्**च्या मृत्यूचा मोबदला म्हणून ज्या खांबाला **स्पेण्डिअस्**ला व ज्या स्तंभावर त्याचें शव अद्यापि टांगलेलेंच होतें त्याच खांबाला **हानिबाल्**ला जखडून टाकलें.

कार्थेज्नें आतां लढाईची अखेर करण्याचा शेवटचा प्रयत्न केला. ज्या कोणाचें म्हणून शस्त्र धारण करण्याचें वय होतें त्या सर्वांना फौजेंत शिरण्याचें भाग पाडलें. **हामिल्कार्** आणि **हानो** ह्या दोघांनीं घटकाभर आपले मतभेद सर्व एका बाजूला ठेवण्याचें कबूल केलें, आणि सर्व सुयंत्रित चालूं झालें. ह्या लोकांनीं **मेथो**ला लढाई करण्यास लावलें. त्यांत त्याचा पराभव झाला आणि तो कैद झाला. **आफ्रिके**तील **युटिका** आणि **हिपो**शिवाय सर्व संस्थानें एकदम **कार्थेज्**ला वश झालीं. व त्यांनाही आपण अगदीं एकटे पडलों असें दिसलें तेव्हां ह्यांनींही फार वेळ ओढून धरलें नाहीं.

पोलबिअस्नें झटलें आहे ' ह्या रीतीनें **कार्थेज्** आणि त्यांचे भाडोत्री शिपाई यांमधील तंटा मिटला; सुमारें तीन वर्षें व चार महिने हा चालला होता. व ह्या अवधींत जो रक्तपात झाला व जितकें अन्यायाचरण झालें तितकें कधींही कोणत्याही समयीं झालेलें इतिहासांत दिसून येत नाहीं.

ह्या झगड्यांत **कार्थेज्** बरेंच निश्शक्त झालें. माणसें गेलीं, द्रव्य गेलें, हें सर्व तर गेलेंच गेलें; पण त्याबरोबर **सार्डिनिआ** बेटही गेलें. **रोमन्** लोकांना आपल्या ढिलाईचें आतां वाईट वाटावयास लागलें व दुसऱ्यांदा जेव्हां बंडखोर लोक तें **रोमन्** लोकांस द्यावयास गेले तेव्हां त्यांनीं त्याचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला. **कार्थेज्**नें जेव्हां तें परत घेण्याचा प्रयत्न केला तेव्हां **रोम्**चे लोकांनीं प्रसिद्धपणें लढाई पुकारली. हतभागी **कार्थेज्**ला मागें तर घ्यावें लागलेंच पण वर १२०० ट्यालन्ट् भुर्दंडही द्यावा लागला.

भाग पांचवा.

कार्थेज् आणि स्पेन.

शेवटीं एकदांची जेव्हां ही भाडोत्री शिपायांच्या बंडाची धामधूम अगदीं शांत झाली तेव्हां **हामिल्कार् बार्का** सर्व मनुष्यांत श्रेष्ठ होऊन बसला होता. कारण गरजेच्यावेळीं त्यानें **कार्थेज्**ला वांचविलें होतें. आणि स्वभावतःच लोक सल्लामसलत त्याचीच मानीत असत. ह्यापुढें सुमारें चाळीसएक वर्षे तो, त्याच्या कुटुंबांतील माणसें व त्याच्या पक्षाकडील इतर माणसें ह्यांना लोक '**बारकाईनपक्ष**' म्हणत असत. यांच्या हातांत सर्व राज्यसूत्रें होतीं. **कार्थेज्**चें जें गेलें होतें तें परत मिळविणें हा कायतो **हामिल्कार्**च्या मनांतील प्रधान हेतु होता. पण तो सिद्धीस जाणें फार कठीण होतें. पश्चिम **भूमध्यसमुद्रां**तील **सिसिली** वगैरे बेटें पुन्हां घेणें ह्मणजे तर अगदीं अशक्य होतें. चारशें वर्षें हे प्रदेश घेण्याकरितां निरनिराळ्या तऱ्हेनें उद्योग **कार्थेज्**नें केला होता. पण त्याच्या पूर्णपणें कधींही हे प्रदेश ताब्यांत आले नव्हते. आतां तर ते **कार्थेज्**हून बलाढ्य अशा राष्ट्राच्या ताब्यांत गेले होते. त्याच्या हांतून ते सुटण्याची फारच थोडी आशा होती. सध्यांचा वेळ प्रत्यक्षपणें **रोम्**शीं विरोध करण्याचा नव्हता एवढेंच नव्हतें तर त्याच्या मनांत कांहीं विरोधभाव येई असें सुद्धां कांहीं करण्याचा नव्हता. **कार्थेज्**च्या अंगांत पूर्वशक्ति येईपावेतों तरी निदान **रोम्**शीं लढाई ह्मणजे

कार्थेज्चा खास नाश होता. आणि लढाईचीं चिन्हें थोडींबहुत दिसत होतींच. तेव्हां **हामिल्कार्**ला आपलें लक्ष्य दुसरीकडे वळविणेंच आवश्यक होतें. अर्थातच तो **स्पेन**कडे वळला. **कार्थेज्**चा ह्या देशाशीं पूर्वीपासून बराच व्यवहार असे. ह्यांच्या किनाऱ्यावर **कार्थेज्**च्या व्यापाराच्या कोठ्या होत्या. **कार्थेज्**चे उत्तमोत्तम शिपाई ह्यांतील कांहीं जातीचे होते, आपल्या राष्ट्राचें एकीकडे जें नुकसान झालें होतें तें त्या ठिकाणीं एक राष्ट्र बनवून भरून काढण्याचा **हामिल्कार्**चा विचार होता. हा बेत अमलांत येण्याच्या मार्गाला लागे तोंपावेतों त्यानें गुप्त ठेविला. **कार्थेज्**चे पश्चिमेस ज्या कांहीं **आफ्रिकन्** जाती राहतात त्यांना जिंकण्याकरितां ह्मणून त्यानें एक स्वारी काढली. त्यांतील सैन्याचा आपणच सततचा सेनाधिपति झाला. तो **स्पेन्**मध्यें जाऊन पोहोंचला व तेथील मूळ रहिवाशांशीं लढाई करतो आहे ही बातमी येईपावेतों त्याच्याविषयीं कांहींएक बातमी कळली नाहीं. नऊ वर्षें **स्पेन्**मध्यें राज्य-स्थापन करण्याकरितां सतत परिश्रम त्यानें केले. त्याच्या स्वाऱ्यांची आपणास कांहींच माहिती नाहीं. एवढें बरीक ठाऊक आहे कीं, तो बहुतेक विजयी होत गेला. त्यानें आपल्या सर्व सैन्याचा व लढाईचा खर्च लढाईंतून भागवला एवढेंच नाहीं तर आपल्या पक्षाचें **कार्थेज्**मध्यें वजन रहाण्यासाठीं म्हणून घरींही मोठ्या रकमा पाठविल्या. शिवाय तेथील कांहीं सरदारांना लाच-रुसवत देऊन वश करून घ्यावयासही शिल्लक पैसा त्याजजवळ होता. नऊ वर्षांच्या शेवटीं तो एका लढाईंत पडला. पण त्याच्या पाठीमागें त्याचा जांवई **हस्‌ड्रुबाल्** होता. तोही त्याच्याचसारखा कर्ता पुरुष होता व **हामि-ल्कार्**च्या बहुतेक मोहिमांत हा त्याजबरोबर होता. **हस्‌ड्रुबाल्**नें त्याचे सर्व बेत तडीस नेले व अशा रीतीनें त्यानें आरंभिलेलें काम उत्तम रीतीनें शेवटास नेलें. ह्याही स्वाऱ्यांची संगतवार माहिती आपणास मुळींच नाहीं. तो शूर शिपाई होता एवढें बरीक आपणास खात्रीलायक रीतीनें सांगतां येतें; कारण **हामिल्कार् स्पेन**मध्यें आल्यावर जेव्हां **आफ्रिकें**तील कांहीं जातींनीं पुनः बंड केलें. तेव्हां तें मोडण्याकरितां **हस्‌ड्रुबाल्** यास पाठविण्यांत आलें होतें; व त्यानें तें फारच थोड्या कालांत मोडून टाकलें व त्यांना वश करून घेतलें. पण त्याच्या शूरत्वापेक्षां इतर मनुष्यावर छाप बसविण्याच्या त्याच्या गुणांनीं व त्याच्या कर्तृत्वशक्तीनें तो अधिक प्रसिद्ध झाला आहे. आपल्या मनोहर वर्तनानें मूळ जातींशीं मोठ्या व्यावहारिक चातुर्यानें वागून आणि

लहानसहान सरदारांशीं अतिशय स्नेह संपादून त्यानें एका **स्पेन**च्या राजकुमारीशीं लग्नही लाविलें होतें असें ह्मणतात. लढाईनें जितकें साधलें असतें त्याहूनही अधिक कार्य साधून घेतलें व देशाचें कल्याण केलें. '**नव्याकार्थेज्**'चीही स्थापना त्यानेंच केली. तेथें अतिउत्तम बंदर होतें. हें बंदर **अलिटस्**नें शोध लावलेल्या संपत्तिमान् रुप्याच्या खाणीच्या अगदीं जवळ होतें. फारच थोड्या अवकाशांत हें शहर ह्या नव्या प्रांताची राजधानी होऊन बसलें. तो इतका बलाढ्य झाला होता कीं लोक तो **कार्थेज्**चा मालक होऊन बसण्याचा विचार करीत आहे अशी सुद्धां शंका घेत होते. **रोम्**चे लोकांनीं **इब्रो** नदी ज्या तहानें आपल्या व **कार्थेज्**च्या राज्याची सरहद्द करून घेतली तो तह **हस्ड्रुबाल्**शींच केला होता असें लोक म्हणतात.

हा इतका विस्तार **रोम्**च्यानें निमूटपणें पाहवला नाहीं. त्यांच्या मनांत असूया उत्पन्न जाहली. **कार्थेज्**चा सरदार **हस्ड्रुबाल्** हा तेथील संस्थानिकाशीं कशा रीतीनें किती स्नेह व सत्ता संपादित आहे हें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें; व ते आपणासाठीं स्नेही संपादण्याचा प्रयत्न करूं लागले. **सागन्टम्** नांवाचें एक अर्धवट **ग्रीक्** शहर (**ग्रीस्** देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर **झाकिन्थास्** ह्मणून एक शहर आहे त्या नांवाचा ह्या नांवाशीं कांहीं संबंध कित्येक बांधितात) **रोमन्** लोकांची मदत मागण्यास आलें व त्यांनीं ती तत्परतेनें दिली. **आयवरस्** अथवा **इब्रो** नदी **कार्थेज्**च्या संस्थानाची सीमा असावी अशा अर्थाचा एक तह करण्यांत आला. पण त्यांत अशी ही शर्त **रोम्**नें घालून घेतली कीं जरी **सागन्टम्** त्या सरहद्दीच्या आंत पन्नास मैल होतें तरी तें स्वतंत्र राहील. **हस्ड्रुबाल्**चा परिणाम त्याचा कोणी खून केल्यामुळें झाला. त्यानें सरकारचेविरुद्ध अपराध केल्यासाठीं म्हणून एका **स्प्यानिश्** सरदाराचा खून केला. त्यावरून त्याच्या एका गुलामानें याला ठार करून तें वैर साधलें. **स्पेन्**मध्यें **हस्ड्रुबाल्**चा अंमल आठ वर्षें होता.

आतां **कार्थेज्**मध्यें जे मोठे पुरुष होऊन गेले त्या सर्वांहून श्रेष्ठ असा पुरुष पुढें सरसावला. सुमारें सतरा वर्षांपूर्वीं जेव्हां **हामिल्कार् स्पेन**कडे यावयास निघाला तेव्हां त्याचा नऊ वर्षांचा मुलगा **हानिबाल्** यानें आपणास बरोबर यावयाची परवानगी मिळावी म्हणून विज्ञप्ति केली. बापानें ती मान्य केली. पण

त्याच्या अगोदर आपल्या प्रयाणाच्या आरंभीं जो एक यज्ञ करीत होता त्या यज्ञकुंडासमोर त्या मुलाला आणून उभें केलें, व त्याला हवनीयावर हात ठेवून शपथ घेण्यास लाविली कीं, आजन्मपावेतों मी **रोम्**चा कट्टा दुश्मन राहीन. मुलानें आपली प्रतिज्ञा कशी काय पाळली तें आतां पुढें दिसेलच.

ज्या लढाईंत त्याचा बाप मरण पावला त्या लढाईंत **हानिबाल्** हा हजर होता. व तो तेव्हां जरी फक्त अठरा वर्षांचा होता तरी त्याच्या मेव्हण्यानें त्याला सैन्यांत मोठेमोठे अधिकार देऊन लवकरच मोठ्या पदवीस चढविलें. **लिव्हि**नें म्हटलें आहे कीं "धैर्याचें, नेटाचें, व उत्साहाचें काम असलें म्हणजे **हस्ड्रुबाल्** दुसऱ्या कोणासही सांगत नसे. व शिपायांनाही दुसऱ्या कोणाच्याही हाताखालीं इतकें निर्धास्त वाटत नसे व इतका धीरही येत नसे. तो शूर होता पण वृथा साहसी नव्हता; भीतीच्या प्रसंगीं तो मनस्वीच शांत असे; त्याची कल्पकता अगाध होती. थकणें, भागणें हें तर त्याच्या जिवाला मुळींच ठाऊक नव्हतें. थंडी, वारा व उष्णता तिन्ही सारखी सोसण्याची त्याच्या अंगांत शक्ति होती. त्याचें खाणेंपिणें इतकें नेमस्त असे कीं चरितार्थाला आवश्यक इतकेंच तो खात व पीत असे. सर्व काम संपून जो वेळ राही तेवढाच तो निद्रेकडे लावीत असे. निद्रा त्याला हवे त्याठिकाणीं व हवे त्या स्थितींत येत असे. त्याचा सर्व शिपायाचा पोषाख अंगावर असून शुद्ध जमिनीवर घोरत पडलेला तो कितीएक वेळ आढळांत येत असे. शिपायांत आणि पहारेकऱ्यांत तो पुष्कळ वेळ पडत असे. पोशाखाविषयीं तर तो अगदींच निष्काळजी असे. त्याच्या सैन्यांतील अगदीं गरीबांतल्या गरीब शिपायाच्या पेहेरावापेक्षां त्याचा पेहराव कधींही चांगला नसे. पण त्याचीं हत्यारें आणि घोडे हे बरीक अगदीं अद्वितीय असत. तो स्वतः अतिउमदा स्वार असे; हत्याराच्या कामांतही अति चतुर असे व जितका चतुर असे तितकाच शूरही पण तो होता. असला मनुष्य फौजेंत असल्यावर **हस्ड्रुबाल्**च्यामागें सेनाधिपत्य कोणाला द्यावें याविषयीं शंकाच नव्हती. सर्व सैन्यानें एकदम त्याला आधिपत्य दिलें. त्याचा चेहेरा अगदीं बापासारखा होता व त्याच्या बापाचा चेहेरा सैन्यांतील बऱ्याच शिपायांच्या चांगला आठवणींत होता. ही गोष्ट त्याला आधिपत्य मिळण्याच्या कामीं कमी कारणीभूत झाली असें म्हणतां येत नाहीं. **कार्थेज्**चे सरकाराला ही शिपायाची निवडणूक निमूटपणें पसंत करावी लागली.

अपर् टेगस्च्या दोन्ही बाजूंस राहणाऱ्या मध्यप्रदेशांतील **स्पेन्**च्या कांहीं जातींशीं पहिल्याप्रथम **हानिबाल्**नें लढण्यास आरंभ केला. शत्रूच्या एक लाख सैन्यावर मोठा विजय मिळून ही मोहिम शेवटास गेली. ह्या मोहिमेला जवळ जवळ २२१ व २२० हीं दोन सालें लागलीं.

दोनशें एकोणीस सालच्या वसंत ऋतूंत **हानिबाल्**नें **सागन्टम्**ला वेढा दिला. पहिल्याप्रथम् त्याच्या कृत्याला बऱ्याच अंशानें यश येत होतें. शहर तटाचा जीर्ण भाग कोणता हें तेव्हांच त्याच्या सूक्ष्म नजरेच्या आटोक्यांत आलें व त्यानें एकदम त्याच ठिकाणीं मारा सुरू केला. पण **सागन्टम्**चे लोकही तयारच होते. त्यांनीं नुसता टिकाव धरला एवढेंच नव्हे तर आणखीही अधिक कांहीं केलें. तटावरून फेंकलेल्या एका **ज्वाव्हिलन्**नें **हानिबाल्**ला बरीच जबरी जखम झाली. पण **हानिबाल्**ची सेना संख्येनें फारच अधिक होती. **हानिबाल्**च्या सैन्यांत दीड लाख माणूस होतें. आणि शत्रूकडे तटावर चौफेर बचावासारखा तर ठेवण्यासाठींही पुरेसे लोक नव्हते. त्यामुळें घणांचा मारा फारच उपयोगीं पडला व भिंतीला भोंक तर पडलें. तदनंतर शत्रूंनीं **हानिबाल्**च्या सैन्यावर अतिजोरानें चालून जाण्याचा बेत केला व त्यांनींही तो तितक्याच शौर्यानें हटविला. शहरांतील एका विचित्र हत्यारानें शत्रूचें फार नुकसान केलें. ह्या हत्याराला पुढच्या बाजूस एक लोखंडी अणी असे, व त्याच्या मागच्या दाण्ड्यास चहूंकडून वाख लावलेला असे व हा पाठीमागचा भाग पेटविलेला असे. अखेरीस ह्या चालून आलेल्या लोकांची चांगलीच पिछेहाट झाली.

मध्यंतरीं **रोम्**हून कोणी वकील आले. **हानिबाल्**नें त्यांना आपल्या गोटांत सुद्धां येऊं देण्याचें नाकारिलें. प्रणिधींना आंत येणें क्षेमकर नाहीं असें ढोंग त्यानें केलें. या रानटी लोकांपासून रक्षण करण्याचा जिम्मा आपण आपल्या शिरावर घेऊं इच्छित नाहीं असें त्यानें स्पष्ट सांगितलें. त्यांच्या हुकुमाबरहुकूम ते वकील **कार्थेज्**कडे चालते झाले. तेथें तहपक्षाचा मुख्य **हानो** यानें **रोम**च्या तहाच्या शर्ती कबूल कराव्यात म्हणून मोठ्या खटपटीनें तरफदारी करून सांगितलें. आपलें सैन्य **सागन्टम्**मधून तुरत काढून घ्यावें. झालेल्या अपराधाबद्दल **रोम्**ला दंडादाखल खंडणी द्यावी व तह मोडल्याबद्दल **हानिबाला**लाही शत्रूच्या ताब्यांत द्यावें, इत्यादि बराच उपदेश राजसभेला

त्यानें केला. पण राजसभेंत त्याच्या सूचनांना अनुमोदन करण्यासही कोणी मिळेना तेव्हां वकीलांना अर्थातच नाकबुलीचें उत्तर घेऊन परत जावें लागलें.

हें सर्व होईपावेतों वेढ्याचें काम जोरानें चाललें होतें. शहरांतील शिपायांनीं तट पडला होता त्याठिकाणीं नवीन भिंत घातली. शत्रूंनीं ती सहज पाडून टाकली. व वेढणाऱ्या लोकांपैकीं कांहीं लोक शहरांतही शिरले. तरी पण बचावाचें काम शत्रूंनीं सुरूच ठेविलें होतें. आतां कांहीं त्यासंबंधानें फारशी आशा राहिली नव्हती. **हानिबाल्** कांहीं शर्तीवर तह करण्यास तयार होता. त्यानें त्या लोकांना कळविलें कीं तुह्मी आपल्या बायकां पोरां सुद्धां खुशाल निघून जावें. पण नेसत्या पांघरत्या वस्त्रांशिवाय दुसरें कांहीं एक बरोबर घेऊं नये. सर्व मालमत्ता शहरांतली शहरांत ठेवावी. ह्या शर्तींचा एका अव्यवस्थित सभेंत (असेंच म्हटलें पाहिजे कारण गांवांतील बरेच इतर लोक राजसभेंत घुसले होते व मुख्य शहरवाशांपैकीं बरेच जण हें पाहून निघून गेले होते) विचार चालला होता तोंच शहरांतल्या इतर लोकांनीं एक मोठा अग्नि पेटविला. सरकारी जामदारखान्यांतील सर्व चीजबस्त तसेंच सर्व हातास लागलें तें खाजगी वैभव एके ठिकाणीं गोळा केलें व त्या सर्वांची अग्निनारायणास प्रथमाहुति दिली आणि नंतर बहुतेकांनीं जिवावर उदार होऊन निश्चयानें अग्नींत उड्या टाकल्या व जळून मेले. हें सर्व होत होतें तों **कार्थेज्**चे लोक घरांतून शिरले व त्यांनीं जो कोणी पुरुष हातीं लागला त्याला ठार केलें. लूट खूपच सांपडली. सर्व शिपायांनीं आपणांस पाहिजे तितकें घेतल्यानंतरही सामान्य खजिन्यांतही बराच पैसा टाकावयास शिल्लक राहिला.

आतां लढाईस सुरुवात होणार याबद्दल मुळींच शंका राहिली नाहीं. **रोमन्** लोकांनीं सर्व लढाईची तयारी केली. तथापि त्यांना सर्व गोष्टी शिस्तवार करण्याची फार इच्छा असल्यामुळें त्यांनीं पुन्हा एकदां **कार्थेज्**कडे वकील पाठविले. **हानिबाल्**नें **सागन्टम्**वर सरकारच्या हुकुमानें हल्ला केला कीं काय एवढाच प्रश्न फक्त **कार्थेज्**चे राजसभेला विचारावा अशी आज्ञा त्या वकीलांना झाली होती. **कार्थेज्**चे राजसभेनें या प्रश्नाचें स्पष्ट व निश्चयात्मक उत्तर देण्याचें नाकारलें. सभेचें मत सांगणाऱ्या प्रमुखानें अशी कोटी काढली कीं **कार्थेज्**शीं **रोम्**चा जो खरा तह झाला आहे त्यांत **सागन्टम्**चें कोठें नांवही नाहीं व **हस्ड्रुबल्**शीं **रोमन्** सरकारानें जो खाजगी तह केला

तो **कार्थेज्** सरकार कबूल करूं इच्छित नाहीं. **लिव्हिनें** लिहिलें आहे कीं, हें ऐकून **रोम्**च्या वकिलानें आपला झगा गोळा करून ह्मटलें कीं ‘आम्हीं तुम्हांसाठीं तह व लढाई दोन्ही वस्तू आणल्या आहेत तुह्मास पाहिजे ती घ्या.’ राजसभेंतून एकदम आरोळी उठली कीं रोम्ला पाहिज तें त्यांनीं द्यावें. **रोमन्** वकीलानें तें गाठोडें हालविलें आणि ह्मणाला ‘मी तुम्हाला लढाई देतों.’ सर्वांनीं उत्तर दिलें कीं ‘ही आह्मी स्वीकारतों व ज्या हिम्मतीनें आम्ही स्वीकारतों त्याच हिम्मतीनें ती आम्ही चालवूंही.’

अशा रीतीनें दुसऱ्या **प्युनिक्** लढाईस आरंभ झाला.

भाग सहावा.

इब्रोहून इटलीस गमन.

सागन्टम् हस्तगत करून घेतल्यावर **हानिबाल्** हिंवाळ्यामुळें **न्युकार्थेज्** येथें विश्रांति घेण्यास गेला. ज्यांना ज्यांना घरीं जावयाचें होतें त्या सर्वांना त्यानें कांहीं मुदतपावेतों रजा दिली. रजा देतांना तो त्यांना म्हणाला 'तुह्मी वसंतऋतूंत लवकर या. मी तुह्माला अशा एका मोहिमेवर नेईन कीं, ज्यापासून विपुल कीर्ति व संपत्ति तुह्मा सर्वांना मिळेल.' सर्व हिंवाळा आपल्या महद्व्यूहाचा पूर्ण विचार करण्यांत त्यानें घालविला. हा महद्व्यूह म्हणजे **इटली**वर हल्ला करणें होय. **कार्थेज्** जें इतकें मोडकळीस आलें तें खुद्द त्याच्या घरांत शत्रु शिरल्यामुळें; हें त्यास पक्कें ठाऊक होतें. कारण त्याचेच प्रजाजन व संबंधी त्याच्या विरुद्ध उठले व त्याजवर हल्ला करण्यास सिद्ध झाले. **रोम्**चे कांहीं प्रजाजनांनाही **रोम्**चा अंमल अगदीं आवडत नसे. सुमारें मागील शंभर वर्षांत **इटली**चा बहुतेक भाग **रोम्**नें आपल्या राज्याला जोडला होता. तेव्हां **इटलीं**तच आपणास दोस्त मिळतील अशी त्याला पूर्ण आशा होती. त्याच्या आशा कोठवर सफल झाल्या व कोठपावेतों फसल्या हें आतां हळू हळू आपण पाहूं.

वसंतऋतूंत पहिल्याप्रथम त्यानें आपल्या सर्व सैन्याची नीट व्यवस्था लावली. सुमारें पंधरा हजार शिपाई (त्यांतील बहुतेक लोक **स्पेन्**चे होते),

त्यानें **आफ्रिकें**त धाडले. आपला भाऊ **हस्ड्रुबल्** याजजवळ बारा हजारांपासून तेरा हजारांपावेतों पायदळ, सुमारें अडीच हजार रिसाला, पांचशें गोफणे, एकवीस हत्ती आणि मोठ्या आकाराचीं सुमारें सत्तावन जहाजें, इतका सरंजाम ठेवला. अशी व्यवस्था करण्यांत त्याचा मुख्य हेतु **आफ्रिकें**त **स्पेन्**चे शिपाई व **स्पेन्**मध्यें **आफ्रिकें**तले शिपाई ठेवणें असा होता. स्वतःबरोबर नव्वद हजार पायदळ व बारा हजार घोडा घेऊन त्यानें **इब्रो**नदी ओलांडली.

इब्रोनदी जी अद्यापपावेतों नाममात्रेंकरून तरी **रोम्** आणि **कार्थेज्**मधील सरहद्द होती ती ओलांडणें म्हणजे उघड लढाई सुरू करणें होतें. नदी ओलांडण्याच्या पूर्वरात्रीं **गेड्स्** येथील **मेलकार्थ्** देवाचें मोठ्या समारंभानें व शास्त्रोक्त रीतीनें दर्शन करून आल्यावर त्याला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत देवासारखा अत्युज्वल व सुंदर तरुण पुरुष त्याच्या दृष्टीस पडला व तो त्याला म्हणाला कीं **ज्यूपिटर्** देवानें मला तुझें सैन्य **इटली**पावेतों पोंहोचविण्याकारितां पाठविलें आहे. तर तूं माझ्या पाठोपाठ ये. मागें मात्र अगदीं पाहूं नको. **हानिबाल्** त्याच्या पाठीमागें कांहीं वेळ गेला. पण थोडा वेळ गेल्यानंतर त्याच्यानें पाठीमागें बघितल्याशिवाय राहवेना. त्यानें पाहिलें तों एक अतिविलक्षण सर्प दृष्टीस पडला. तो सारखा पुढें जात होता व जातांजातां सर्व अरण्य उध्वंस करून टाकीत होता. हें काय म्हणून जेव्हां त्यानें त्या वाटाड्यास विचारलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं 'हा **इटली**चा नाश होय. चल, पुढें चल. कांहींएक विचारूं नकोस; दैवाधीन गोष्टी आहेत त्या तशाच अंधःकारांत राहूं दे, त्यावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करूं नको.'

आल्पस्च्या पायथ्याशीं जाई तोंपावेतों त्याच्या सैन्याचे पुष्कळ लोक कमी झाले. खरोखर हा म्हणजे प्रवासाचा पहिलाच टप्पा होता. **इब्रो** आणि **पिरिनीस्** मधील प्रदेश त्याला जिंकून घ्यावा लागला व तो संभाळण्यासही त्याला बरेंच सैन्य तेथें ठेवावें लागलें. शिवाय बरोबर येण्यास जे लोक साधारण नाखूष होते त्यांनाही त्यानें तेथून परत लाविलें. **पिरिनीस्** पर्वत ओलांडतांना त्याजबरोबर पन्नास हजार पायदळ व नऊ हजार घोडेस्वार होते. **पिरिनीस्** पर्वतापासून तें **ऱ्होन** नदीपावेतों त्याच्या कोणी फारसें आड आलें नाहीं. **नेमेसस्** (सध्यांचे **नाइम्स्**) शहरावरूनच त्याचा रस्ता होता व **रुकीमार** शहराजवळ त्यानें नदी ओलांडली असावी असें वाटतें. नदीच्या मुखापासून

चार दिवसाच्या रस्त्यावर तें होतें असें **पोलिबिअस्** म्हणतो. समोरील कांठावर **गाल्** लोकांचें मोठें थोरलें सैन्य गोळा झालें आहे असें त्याला आढळून आलें. त्याच्या वाटाड्यांनीं त्याला सांगितलें कीं पंचवीस एक मैलांवर वरच्या बाजूस एक बेट आहे व तेथें नदीचा ओघ दुभागल्यामुळें यावया-जावयास सोपा मार्ग आहे. हें ऐकून **बोमिल्कार**चा मुलगा **हानो** याला कांहीं सैन्यानिशीं त्या ठिकाणीं नदी ओलांडून शत्रूच्या पिछाडीवर हल्ला करण्यास पाठविलें. पण पाहतात तों **हानो**ला कोणीही आवडलें नाहीं. त्याच्या फौजेंतील **स्प्यानिश्** लोक नेहेमीं पाण्यांत वागलेले; त्यांनीं एकदम आपला कपडालत्ता भोपळ्यांवर चढविला व ते भोपळे आपल्यापुढें ढकलीत ढकलीत समोरचे कांठाला येऊन लागले. **आफ्रिकन्** शिपायांना इतका चांगला पाण्याचा परिचय नसल्यामुळें लांकडाच्या फळ्यांवर बसून ते तरून गेले. इकडे **हानिबाल्**ही आपल्या तुकडीची ओलांडण्याची सोय पाहत होता. कांठावर राहणाऱ्या आपल्याला अनुकूल अशा जातींकडून कांहीं लहान नावा त्यानें मिळविल्या व त्यांवर पायदळ चढविलें. मोठीं कांहीं जहाजें व लोकांनीं तयार केलेले ताफे यांवर घोडेस्वार चढविले. व त्यांना नदीचें पाणी तोडण्याकरितां वरच्या बाजूस ठेविलें. त्यामुळें खालील बाजूच्या लहान नावांना फारच सोपें जाई असें त्यानें केलें. सर्व तयारी झाल्यावर एकदम निघण्याचा हुकूम सोडला. समोर शत्रु पाहूनही ज्या निश्शंकपणानें हे लोक नदींत शिरले तो पाहून जरी कांठावरील लोक घाबरले तरीपण आपल्याच पिछाडीस जर बंदुकांचे आवाज व धूर बघतेना तर कदाचित् अर्धनदींतच **हानिबाल्**चे सैन्यास त्यांनीं हटवलें असतें. अगोदर ठरल्याप्रमाणें **हानो** व त्याचें सैन्य पिछाडीस येऊन पोचलें होतें व त्यांनीं निशाणी म्हणून मोठा थोरला जाळ केला. शत्रु अगदींच न शिकलेले व अडाणी शिपाई असल्यामुळें त्यांना कशा रीतीनें आपलें संरक्षण करावें तें सुचेना. **हानिबाल्** निःशंकपणें पुढें चालला होता. तो अगदीं पहिल्या बोटींत होता. एकदम कांठावर उडी टाकून त्यानें आपल्या लोकांना हल्ला करण्याचा हुकूम दिला. **गाल्** लोकांची दाणादाण झाली. व ते मुळींच लढल्याशिवाय पळून गेले. अद्यापपावेतों त्याला त्याचे हत्ती आलीकडे आणावयाचे होते त्यासाठीं त्यांनीं एक मोठा तक्ता कराविला व त्याजवर माती टाकली व तो जमिनीला पक्का बांधून टाकला. त्याच्याच पुढें दुसरा एक पूर्वीपेक्षां लहान तक्ता लावून ठेवला होता. ह्यावरही

माती टाकलीच होती. हत्तीला जमिनीवरच असल्यासारखें वाटून तो त्या तक्त्यावर येत असे. तेथें तो आला म्हणजे लहान तक्ता हा सोडून टाकावयाचा व पाण्यांत ढकलावयाचा. फळी तरंगावयास लागली कीं हीं अवाढव्य जनावरें फार घाबरत; पण घाबरल्यामुळेंच तीं अगदीं शांत राहात. दोहोंनीं नदींत उड्या टाकल्या. पण जरी त्यांचे महात मेले तरी पण ते सुखरूप पलीकडील कांठाला येऊन पोंचले.

इसीरी बेट लागे पावेतों तो **ऱ्होन्**च्या कांठानें वर जात होता. येथें त्यानें **अलबर्गस्**च्या मुख्याचा स्नेह संपादिला; त्याचा धाकटा भाऊ गादीला हक्क सांगत होता; त्याच्याविरुद्ध त्याला **हानिबाल्**नें मदत दिली. **ह्या** राजानें हे उपकार स्मरून **हानिबाल्**च्या फौजेला जें जें लागलें तें तें पुरविलें आणि **आल्प्स्**च्या पायथ्यापावेतों ह्या सर्वांना पोंचविण्यासाठीं आला. **हानिबाल्**च्या सैन्याला जोडे यानें पुरविल्याचें सर्वत्र लिहिलेलें आहे.

ह्या हल्ल्यापासून आपला बचाव करण्यासाठीं **रोमन्** लोक कांहींच करीत नव्हते कीं काय असा प्रश्न सहज कोणीही करील. त्यांना त्यांचें दुसरीकडे काम होतेंच, कारण उत्तर **इटलींत गाल्** लोकांशीं ते लढतच होते. फौज गोळा केली ती पहिल्याप्रथम त्यांच्याकडे पाठविण्यांत आली; नंतर **पब्लिअस् कार्नेलिअस् सिपिओ** (त्याचें पुढें बरेंच वर्णन येणार आहे) यास एका फौजेसह **ऱ्होन्**च्या मुखाशीं पाठविण्यांत आलें. तो जर नदीच्या कांठाकांठानें वर चढून आला असता तर **हानिबाल्**ला नदींतच अटकाव करूं शकला असता; पण तो अगदींच स्तब्ध राहिला. **कार्थेजिनिअन्** लोक जवळ आले आहेत याची खूण त्याला **हानिबाल्**नें लवकरच पोंचविली. **हानिबाल्**नें **आफ्रिकन्** घोडेस्वारांची एक टोळी शत्रूची हालचाल बघण्याकरितां पाठविली होती. त्या टोळीची व त्याच कामाला फिरत असलेल्या **सिपिओ**च्या एका टोळीची गांठ पडली. दोघांची बरीच जोराची चकमक उडाली. दोघां शत्रूंचीं हत्यारें भिडण्याचा हा पहिलाच प्रसंग होता व त्यांत **रोमन्** लोकांचा जय झाला. ती घोडेस्वाराची टोळी परत आल्यावर **सिपिओ** कांठाकांठानें वर जाण्यास निघाला. पण तो येण्याच्यापूर्वींच **हानिबाल्** केव्हांच निघून गेला होता व त्याचा पाठलाग करीत बसणें हें **सिपिओस** उचित वाटेना; तेव्हां तो समुद्र-

कांठीं परत आला. तेथून आपल्या सैन्याचा बराच भाग आपला बंधु **नीअस्** याजबरोबर देऊन त्याला त्यानें **स्पेन**मध्यें पाठविलें व आपण बाकीची फौज घेऊन **इटलींत** परत आला. **इटलींत** अधिक भीतीचा प्रसंग असतांनाहीं हें जें सैन्य **स्पेन**मध्यें पाठविण्यांत आलें होतें ही एक युक्ति होती व तिचें भावी चांगलें फल पुढें दृष्टोत्पत्तीस येईलच.

हानिबाल्नें कोणच्या रस्त्यानें **आल्प्स्** पर्वत ओलांडला त्याबद्दल बराच मतभेद आहे; पण त्या वादांत आपणास शिरण्याची फारशी आवश्यकता दिसत नाहीं. खालीं दिलेला मार्ग आपणास खरा व संभवनीय दिसतो. तो **विएन**पावेतों **ऱ्होनू**च्या डाव्या कांठानें गेला तदनंतर नदी सोडून **अपर-डाफिनि**च्या सपाट मैदानांतून सरळ जाऊन पुन्हा **सेन्ट्जेनिक्स्**च्या तेथें नदीला मिळाला. तेथून मग **अपर् इसिरी**च्या खोऱ्यांतून वर चढला आणि **लिटल् सेन्ट् बर्नार्डे**चा घाट चढून **एओस्टा**च्या दरींतून खालीं उतरला.

मोठमोठ्या इतिहासकारांनीं रस्त्याच्या अडचणी व भीति स्पष्ट रीतीनें रेखून ठेवल्यासारख्या लिहिलेल्या आहेत आणि खरोखरच त्या अडचणी भयप्रद होत्या यांत बिलकुल संशय नाहीं. फौजेचें सर्व सामानसुमान, दाणागोटा, बसावयाचे घोडे व लढाइचे हत्ती हें सर्व व ती अफाट सेना **आल्प्स्**वर चढवून नेणें म्हणजेच प्रथमतः खरोखर आश्चर्य करीत राहण्याजोगेंच काम होतें. शिवाय तो कोणत्या ऋतूंत चढून गेला ह्याचा विचार केला ह्मणजे तर अधिकच आश्चर्यास कारण होतें. तो जेव्हां अगदीं माथ्यावर जाऊन पोहोंचला तेव्हां आक्टोबरची अगदीं अखेर होती आणि त्यावेळचें ऋतुमानही सध्यापेक्षां सर्व प्रकारें तीव्रतर होतें हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे.

हानिबाल्ला नुसत्या या भौतिक विघ्नांशीं जरी टक्कर द्यावयाची असती तरी सुद्धां त्याला ह्मणजे कांहीं लहानसान काम शिरावर घेण्याचें होतें असें नाहीं. शिवाय डोंगरी जातीही सर्व त्याच्या अगदीं विरुद्ध होत्या. ही प्रचंड सेना आपल्या प्रदेशांत घुसली हें त्यांस सहन होईना आणि ते ह्यांच्याशीं लढण्यास चांगलीशी संधि पाहत होते. ही फौज चढावयास लागली मात्र कीं, लागलींच त्यांच्या हल्ल्यास सुरुवात झाली. ते हल्ले अगदीं **आल्प्स्**च्या शिख-

रास पोंहोचे तोंपावेतों सुरू होते. **रोजेंट्** सरोवराला जाणाऱ्या रस्त्याचा तेथें पहिला टप्पा होता. या टप्प्यापावेतों दर मैलामैलास बहुतेक लढाया लढाव्या लागल्या; रस्ता अगदीं अरुंद व उभा होता व रानटी लोकांनीं माऱ्याच्या चांगल्या जागा पाहून हल्ला करण्याचा क्रम ठेविला होता. आधले रात्रीं शत्रूंनीं जी जागा धरली त्याहून उंच ठिकाणीं आपण आपली छावणी देण्याची तो खबरदारी घेत असे. त्यामुळें म्हणण्यासारखें फार नुकसान त्यांचें झालें नाहीं. जेव्हां अगदीं घाटमाथ्यावर ते आले तेव्हां मग त्यांना त्याच्या कवायतीमुळें शत्रूची भीति वाटण्याची नाहींशी झाली. त्यांनीं त्यांच्या एका तटबंदी केलेल्या शहरावर हल्ला केला व आपली गेलेली सर्व मालमत्ता परत मिळविली. पुढील तीन दिवसांच्या प्रवासांत कांहींएक विघ्न आलें नाहीं. तदनंतर आपलें शौर्य कांहीं चालत नाहीं असें जेव्हां त्यांना दिसलें तेव्हां फसवा-फसवीनें कांहीं साधलें तर पाहावें म्हणून तें त्या रीतीनें प्रयत्न करूं लागले. त्यांच्या जातींतील मुख्य मुख्य **हानिबाल्**च्या छावणींत आले, त्यांनीं त्याला जामीन दिले; त्यांना धान्य वगैरेचा पुरवठा केला व अगदीं जवळच्या आणि उत्तम रस्त्यानें सैन्याला नेण्याचें वचन दिलें. **हानिबाल्** त्याच्यावर कधींच पूर्णपणें विसंबला नाहीं व एखादा अवचित हल्ला आल्यास तो हटविण्याला नेहेमीं तयार असे. पण जेथें लांबचा रस्ता अधिक सोईचा झाला असतां अशा वेळीं तो त्यांच्या वाटाड्यांना अवघड व खळग्याखाचांच्या मार्गानें सैन्य नेऊं देत असे. अशाच एका ऐन प्रसंगाच्या वेळीं शत्रूंनीं हल्ला केला. मोठमोठे दगड टेंकड्यावरून ढकलून द्यावयास आरंभ केला व दऱ्या खोऱ्यांत लपून सैन्यावर दगडांचा अगदीं पाऊस पाडला. सैन्याचें अतिशय नुकसान झालें पण सैन्य त्यांतून कसें तरी सुटलें. त्या घसरड्या आणि अरुंद रस्त्यानें नेण्यास जरी महत्प्रयास पडले असतील तरी पण हत्ती ऐन प्रसंगीं त्यांच्या फारच उपयोगीं पडले. डोंगरी जाती त्यांना पाहून अगदीं घाबरून जात. आणि जेथेंजेथें हे दृष्टीस पडत त्या जागेच्याजवळ सुद्धां येण्याची हिम्मत करीत नसत.


जे दगड काढतां येईनात व ज्यावरून चढतांही येईना असे खडक विनिगर् आणि अग्नि यांच्या साहाय्यानें **हानिबाल्**नें फोडून काढल्याची गोष्ट इतकी प्रसिद्ध आहे कीं ती येथें न सांगणें अगदीं उचित होणार नाहीं. वास्तविक तेथें विनिगर् त्याजपाशीं कोठून आली असेल ह्याबद्दल कांहीं कल्पना बसवतां येत नाहीं. त्यानें असला हा कल्पनाबाह्य पदार्थ साठवून बरोबर घेऊन

ठेवण्याइतकें त्याचें दूरदर्शित्व विलक्षण होतें कीं काय याविषयीं कांहीं विशेष टीका केल्याशिवाय **लिव्हिच्याच** शब्दांत ह्या गोष्टीचें वर्णन सांगणें बरें दिसतें. "दगड फोडण्याची जरूर पडली तेव्हां त्यांनीं लांकडांचा एक मोठा थोरला ढीग केला. अर्थातच हीं लाकडें शेजारीं मोठीं मोठीं झाडें होतीं त्यांच्याच खांद्या तोडून आणलेल्या होत्या. बराच सोसाट्याचा वारा सुटला म्हणजे ते त्या लांकडांच्या ढीगाला आग लावून देत असत. आणि मोठा जाळ झाल्यावर व खडक सपाटून तापल्यावर त्यावर विनिगर् टाकून ते वितळवून टाकीत व मग घण वगैरे लोखंडी हत्यारांनीं ते ते खडक फोडून टाकीत."

उतरतांना **हानिबाल्**ला असे खडक फोडावे लागले असें **लिव्हिनें** लिहिलें आहे. पण तोंपावेतों खरोखर बहुतेक काम झाल्यासारखें होतें. नऊ दिवस सैन्याला **आलप्स्**च्या शिखरावर जाण्यास लागले. पोहोंचल्यावर दोन दिवस सैन्याला त्यानें विश्रांति दिली. ते पुन्हा जों निघाले तों बर्फ पडावयास लागलें व त्यामुळें त्यांतील शिपाई अगदीं निराश झाले. पण **हानिबाल्नें** त्यांना धैर्य धरण्यास सांगितलें. व आतां तुमच्या श्रमाचें फळ तुम्हास दाखवितों असें त्यांस आश्वासन दिलें. आणि कांहीं थोड्या वेळानंतर ते अशा ठिकाणीं आले कीं तेथून **इटली**च्या सुपीक जमिनी स्पष्ट दिसत होत्या त्यांकडे पाहून तो आपल्या शिपायांना म्हणाला "तुम्ही फक्त **इटली**च्याच नव्हे तर **रोम्**च्या सुद्धां तटावर चढून जात आहां; आतां राहिला आहे तो अगदीं सोपा उतार आहे. एक किंवा अतिशयच झालें तर दोन लढायांत **इटली**ची राजधानी आपल्या हस्तगत होणार."

त्याला **आलपस्** उतरावयास सहा दिवस लागले. **न्यूकार्थेज्**हून निघून त्याला आज चार महिन्यांहून अधिक दिवस झाले होते. वाटेनें त्याचें नुकसान अतिशयच झालें. तो **इटलीं**त उतरला त्यावेळेस त्याजपाशीं वीस हजार पायदळ (तीन पंचमांश **आफ्रिकनस्** व दोन पंचमांश **स्प्यानिअर्डस्**) व सहा हजार घोडेस्वार यांहून अधिक फौज नव्हती. तेहतीस हजार लोक वाटेंत श्रमानें, थंडीनें, व आजारानें मरण पावले. एवढ्याच सैन्यानिशीं तो **इटली** जिंकून घेणार होता. कायमचें म्हटलें तर एवढेंच सैन्य त्याजपाशीं होतें. **कार्थेज्**च्या

छावणींतील एका **रोमन्** कैद्यानें ही संख्या सांगितलेली आहे; त्या शिपायानें खुद्द **हानिबाल्**च्याच तोंडून ऐकलेली होती.



भाग सातवा.

इटलींतील पहिली स्वारी.

हानिबाल्‌नें आपल्या सैन्याला कांहीं थोडे दिवस विश्रांति दिली; त्यांना विश्रांति अगदीं अवश्यच होती. त्यांनीं जे हाल सोसले होते व त्यांना जे कष्ट पडले त्यामुळें ते इतके पालटून गेले होते कीं ते माणसें आहेत कीं नाहींत हें सुद्धां ओळखतां येत नसे. ह्या विश्रांतीनंतर त्यानें मोहिमेस सुरुवात केली. अर्थातच आपला विजय होण्यासाठीं त्याला **इटलिअन्** द्वीपकल्पांतील कांहीं लोक आपल्या तर्फेचे करून घेऊन **इटली**विरुद्ध उठवणें आवश्यक होतें. कोणत्या तरी रीतीनें, मग सामोपचारानें म्हणा कीं लढून म्हणा, त्यांना आपल्या तर्फेचे करून घ्यावयास पाहिजे होतें. जेव्हां **टारिनि** (**गाल्**‌ची एक जात) जातिच्या लोकांनीं याच्याशीं स्नेहसंबंध जोडण्याचें नाकारलें तेव्हां **हानिबाल्**‌नें त्यांच्या किल्यावर हल्ला केला व सर करून घेतला. (**टरिनी** लोकांचे शत्रु **हानिबाल्**‌च्या पक्षास होते हें कळविणें अवश्य आहे. हें पाहून **गाल्**‌च्या बहुतेक जाती **हानिबाल्**‌ला वश झाल्या त्यांनीं ह्याला धान्य वगैरे पुरवण्याचें कबूल केलें व त्याला कांहीं उत्तम शिपाई दिले.

हा वेळपावेतों **पब्लिअस् सिपिओ पायझा** येथें येऊन ठेपला, तेथून त्यानें **अपिनाइन्** पर्वत ओलांडला व **प्लासेशिआ**च्या तेथें **पो** नदी ओलां-

डून शत्रूची गांठ घेण्यास तो जात होता. **हानिबाल्**ला **सिपिओ** इतक्या लवकर पोहोचेलसें वाटत नव्हतें, तसेंच **आल्प्स्** पर्वतावरून **हानिबाल्** हें सारें सैन्य घेऊन येईल असें **सिपिओ**च्या स्वप्नींही आलें नाहीं. दोन्ही सैन्यांनीं लढाईची तयारी केली. तयारीपैकींच एक भाग ह्मणून आपल्या सर्व सैन्यासमक्ष एक चमत्कारिक संविधानक करविलें. **आल्प्स्** ओलांडतांना जे कांहीं पहाडी लोक कैदी करून बरोबर घेतले होते त्यांच्या जोडीजोडीनें कुस्त्या लावण्यांत आल्या. जे जिंकतील त्यांना स्वतंत्रता मिळावयाची, व एक एक हत्याराचा संज बक्षीस द्यावयाचा असें ठरलें होतें. जे हरतील ते अर्थातच मृत्यूमुळें शत्रूंच्या हातांतून मोकळे व्हावयाचे. सर्व कैदी ह्या गोष्टीस लागलेच कबूल झाले व मोठ्या धैर्यानें लढले. ज्या कैद्यांना या जोड्यांत घेतलें नव्हतें ते जोड्या करून घेण्यास फार उत्सुक होते. **हानिबाल्**नें या गोष्टीवरून आपल्या लोकांस उपदेश केला कीं 'तुमचीही या लोकांसारखीच स्थिति आहे. स्वतंत्रता व मोठें मौल्यवान् बक्षिस एका बाजूस आहे व मृत्यु दुसऱ्या बाजूस आहे. हे रानटी लोक सुद्धां पहा ह्या शर्तीवर लढण्यास किती उत्सुक आहेत ते. तुम्हीही त्यांच्यासारखेच उल्हासवृत्ति व शूर व्हा आणि शत्रूशीं युद्ध करा.'

सिपिओनें **टिसिनस्** नदी पुलाच्या साहाय्यानें ओलांडली. आतां दोन्हींही सैन्यें **पो** नदीच्या उत्तरेस आलीं. **कार्थेज्**चे लोक पूर्वेकडे जात होते व **पो** नदी त्यांच्या उजव्या हातास होती. **रोमन्** लोक त्यांची गांठ घेण्यास पश्चिमेकडे जात होते. दोन्हीं सैन्यांनीं दोन दिवस वाट चालून सायंकाळच्या समयास आपापल्या ठिकाणीं तळ दिला. तिसरे दिवशीं प्रातःकाळीं ते आपापले घोडेस्वार पुढें काढून निघाले. **सिपिओ** व **हानिबाल्** दोघेही स्वतः घोड्यावर हजर होते. **रोमन्** लोकांचे **ग्यालिक्** घोडेस्वार व हलक्या हत्यारांचे घोडेस्वार अघाडीस होते; व भरहत्याराचे व इतर घोडेस्वार मागील बाजूस ठेविले होते. **हानिबाल्**नें मोठ्या चातुर्यानें आपले भरहत्याराचे घोडेस्वार मध्यभागीं उभे केले. व चपल **आफ्रिकन्** घोडेस्वार—कीं जे लगामाशिवाय बसत होते.—त्यांना दोन्हीं बाजूंस ठेविलें. हलक्या हत्याराचे **रोमन्** शिपाई एकदां आपल्या **ज्याव्हेलिन**नीं हल्ला करून लागलेच आपल्याच सैन्यांत परत फिरले. भरहत्याराच्या घोडेस्वारांची मोठी निकाराची लढाई होऊन थोडीबहुत **रोम्**चीच सरशी झाली. कारण दोन्ही बाजूंस **आफ्रिकन्**

घोडेस्वार एकदां जे मोठ्या आवेशानें व जमून निघाले ते त्यांनीं पहिल्यांदा हलक्या हत्याराच्या शिपायांवर हल्ला केला व मागाहून भरहत्याराच्या शिपायांच्या पिछाडीवर झड धरली त्यामुळें जिकडे तिकडे अतिशय धांदल उडून गेली. सर्वांहून अतिमोठा अनर्थ असा घडला कीं **सिपिओ**ला अति दुस्सह जखम लागली व त्यानें तो अगदीं जाया झाला. त्याच्या फक्त सतरा वर्षांच्या तरुण मुलानें अशा वेळीं जर शौर्याचें काम केलें नसतें तर खास त्याचा बाप प्राणासच मुकला असता. शेवटीं कांहीं घोडेस्वारांनीं त्याच्या भोंवतीं संरक्षणार्थ वेटाळें घालून त्याला रणभूमीवरून दूर नेलें.

शत्रु सर्व सैन्यानिशीं लढण्यास येतात कीं काय याचा अदमास काढण्याकरितां कांहींवेळ **हानिबाल्**नें तशीच वाट पाहिली. पण त्याचें कांहींच जेव्हां चिन्ह दिसेना तेव्हां तो पुढें निघाला. **रोमन्** सैन्यानें आपला तळ सोडला असें त्यानें पाहिलें तेव्हां तो पहिल्याप्रथम **टिसिनस्** नदी उतरून **पो**कडे चालू झाला. पुढें त्यानें **पो** ओलांडली व तेथें सहाशें **रोमन्** लोक जे सैन्याच्या पाठीमागें राहिले होते त्यांना कैद करून घेतलें. **सिपिओ** आतां **प्लासेन्शिआ**च्या किल्यांत आपल्या सर्व सैन्यासह आला होता. तेथें एकदां हल्ला करून प्रयत्न निष्फळ गेल्यावर सुमारें सहा मैलावर **हानिबाल्** आपल्या सैन्यासह छावणी देऊन राहिला. ह्या विजयाचा प्रथम परिणाम असा झाला कीं **पो** नदीच्या दक्षिण बाजूचे **ग्यालिक्** सरदारांच्या झुंडीच्याझुंडी **हानिबाल्**च्या छावणींत यावयास लागल्या. लोकांच्या मनोवृत्तींत फरक झाल्याचें चांगलेंच एक उदाहरण थोड्या वेळांत घडून आलें. **रोमन्** सैन्याचे साहाय्यास असलेली शिल्लकींतली **ग्यालिक्** फौज एक रात्रीं छावणींतून निघाली, आपल्याबरोबर आपण मारलेलीं आपल्याच सैन्यांतील शिपायांचीं डोकीं घेतलीं, व शत्रूंना तीं दाखवून तींतील लोक शत्रूंच्या (**हानिबाल्**च्या) छावणींत नौकरीस राहिले. **गाल्** लोकांमधील ही हालचाल पाहून **सिपिओ** घाबरला व ती छावणी सोडून **ट्रेबिआ**कडे दक्षिणबाजूस चालता झाला. कारण तेथें बचावाला जागा चांगली होती व आसपासचे सर्व लोक मित्र होते. **हानिबाल्**नें हें पाहतांच **आफ्रिकन्** घोडेस्वार त्याचा पाठलाग करण्यासाठीं पाठविले. हे घोडेस्वार सोडलेल्या छावणींत लुटालूट व नासधूस करण्यांत गुंतले नसते तर पळत्या शत्रूचें बरेंच नुकसान करूं शकले असते. पण वास्तविक स्थिति अशी झाली कीं **आफ्रिकन्** घोडेस्वार येऊन पोहोंचावयाच्या पूर्वीं

थोड्याबहुत आळशी स्वारांशिवाय सर्व निघून गेले होते. **सिपिओ** आपलें सर्व सैन्य घेऊन एका टेंकडीवर जाऊन बसला व **सेम्प्रोनिअस्** येऊन मिळे तोंपावेतों तेथेंच वाट पाहण्याचा त्यानें निश्चय केला. **हानिबाल्** आपल्या सर्व सैन्यासह यांच्या पाठोपाठ येत होता. त्यानें उत्तरेस पांच मैलांवर आपल्या सैन्याचा तळ दिला. मध्यंतरीं **प्लासेन्शिआ**च्या जवळचा **क्लास्टिडिअम्**चा किल्ला हस्तगत झाल्यानें त्याला फारच चांगला फायदा झाला. कारण **रोमन्** लोकांचीं धान्याचीं मोठमोठीं पेवें तेथें होतीं. असें म्हणतात कीं त्या किल्याचा अधिकारी **ब्रुन्डिसिअम्**चा राहणारा यानें चारशें मोहोरा घेऊन तो किल्ला विश्वासघात करून शत्रूंच्या ताब्यांत दिला.

सेम्प्रोनिअस् आपल्या सैन्यासह थोडेच दिवसांत येऊन पोहोंचला. ह्या नव्या सैन्याच्या योगानें **रोमन्** लोकांच्या सैन्याची संख्या खूप वाढली. पण ह्या वाढीचा परिणाम मुळींच हितावह झाला नाहीं. **सिपिओ** मोठा हुशार सरदार होता. **सेम्प्रोनिअस्** फक्त शूर होता. त्या वर्षीं तो निवडून आल्यामुळें सैन्याचें आधिपत्य त्याजकडे आलें होतें. **रोम्**च्या दुर्भाग्यामुळें **सिपिओला टिसिनस्** येथें जी जखम लागली होती ती अद्यापि बरी झाली नव्हती व त्यामुळें तो मुळींच कामास येण्यासारखा नव्हता. पूर्ण जय मिळण्याकरितां **रोम्**नें शत्रूला गांठून एक मोठीथोरली लढाई जिंकली पाहिजे अशी **सेम्प्रोनियस्**ची पूर्ण खातरी जाहली होती; फक्त शत्रूनें तसा प्रसंग मात्र आणला पाहिजे. आपणांस स्वतःसच विजयाचा मान मिळावा अशी त्याची इच्छा फार होती; व हा मिळविण्यास एकदम लढाई देणें एवढाच मार्ग होता. आतां हिंवाळा नजीक आला होता व पुनः लढाई सुरू होण्याच्या आधीं तर त्याचें वर्ष संपणार होतें.

जर त्याच्या मनांत विजयाविषयीं कांहीं आशंका राहिली असेल तर ती त्याच्या व **कार्थेज्**च्या एका घोडेस्वाराच्या टोळीच्या चकमकीच्या निकालानें अगदींच निघून गेली. **रोम्**शीं स्नेहभावानें वागणाऱ्या एका जातीच्या लोकांच्या जमिनी वगैरे लुटण्यास कांहीं **आफ्रिकन्** व **गॉल्**चे घोडेस्वार **हानिबाल्**नें बाहेर पाठविले होते. ते लुटीनें भरून परत येत होते तोंच कांहीं **रोमन्** सैन्याच्या टोळ्यांनीं त्यांजवर हल्ला केला व त्यांचे जबरदस्त नुकसान करून त्यांना छावणींत परत हांकून दिलें.

सेम्प्रोनिअस्नें आतां लढण्याचा अगदीं पूर्ण निश्चय केला; **सिपिओला** कांहीं त्याला वारतां येईना. **रोम्**ला जितकी लढाई अपायकारक तितकीच **हानिबाल्**ला हितावह होती; त्यामुळें **हानिबाल्** हा अधिक नाहीं तरी निदान **सेम्प्रोनिअस्** इतका तरी लढाई देण्यास उत्सुक होताच होता. त्यामुळें लढाईस फार अवधि मुळींच लागली नाहीं. **सेम्प्रोनिअस्**च्या हाताखालीं चाळीस हजार सैन्य होतें व **हानिबाल्**चेंही **गाल्स्** वगैरेचे मिळून सुमारें बहुतकरून तितकेंच होतें.

नदीच्या आसपास झाडींत कोठें तरी अगदीं निवडक असे दोन हजार लोक आयते वेळेस शत्रूच्या सैन्यावर तुटून पडावयास म्हणून प्रथम **हानिबाल्**नें तयार करून ठेविले. त्याचा भाऊ **मेगो** यानें शंभर घोडेस्वार व शंभर शिपाई स्वतः निवडून त्यांपैकीं प्रत्येकास नऊ माणसें निवडून घेण्याचा अधिकार दिला. ह्यांचा लढाईत फारच उपयोग झाला असें पुढें समजेलच. दुसरे दिवशीं सकाळींच **हानिबाल्**नें कांहीं **आफ्रिकन्** घोडेस्वार नदीपलीकडे पाठविले. त्यांनीं **रोमन्** छावणीपर्यंत लढत लढत जावें व **रोमन्** सैन्याला हल्ला करावयास लावावें अशी आज्ञा केली. **सेम्प्रोनिअस्** ह्या भुलवणीनें फसला, त्यानें अन्न पाण्याशिवाय आपले लोक सर्व लढाईला धाडून दिले. अघाडीस घोडेस्वार, त्यांच्या पाठीमागें हलक्या हत्यारांचे शिपाई व त्यांच्या पाठीमागून सर्व सैन्य अशी व्यवस्था ठेविली होती. हिंवाळ्याचा अगदीं कडाका पडला व बर्फाची सारखी झड लागून राहिली होती आणि **ट्रेबिआ** दोन्ही कांठांनीं भरून तुफान चाललेली होती. नदींत शिपायांच्या छातीइतकें पाणी होतें; त्यामुळें उपाशी पोटीं आणि थंडीचे त्यांना नदी ओलांडण्यास फारच त्रास पडला. इकडे **कार्थेज्**चे शिपाई सकाळचा नाष्टा करून आकब्याशीं शेकून ताजे तवाने झाले होते. सावकाशीनें व शांतपणानें आपले सैन्याची व्यवस्था **हानिबाल्**नें लाविली. कारण त्याला वेळ पुष्कळ सांपडला होता. **आफ्रिकन्स्, स्प्यानिअर्ड्स्** व **गॉल्स्** मिळून सुमारे वीसहजार लोक त्यानें मध्यें ठेविले व दहा हजार घोडेस्वार दोन्ही बाजूंस लाविले व हत्ती सर्वांच्या पुढें ठेविले. हलक्या हत्याराचे शिपाई, पुढें **आफ्रिकन्** घोडेस्वार गेले होते, त्यांच्या मदतीस अगोदर धाडून दिले. **रोमन्** लोकांनींही आपलें सैन्य अशाच तऱ्हेनें उभें केलें होतें. मागें **टिसिनस्** येथें झालें होतें त्याप्रमाणें येथेंही **रोमन्** रिसाल्यावर कमकुवतपणा त्याच्या नाशास करणीभूत झाला. **कार्थेजिनिअन्** स्वार **रोमन्** लोकांच्या दोहों

बाजूंवर तुटून पडले व अगदीं झगडल्याशिवाय शत्रूंना पळवून लावलें. ह्यामुळें मध्यावर असलेल्या मोठ्या थोरल्या पायदळांच्या बाजू अगदीं उघड्या पडल्या आणि त्यामुळें शत्रूकडच्या घोडेस्वारांना व हलक्या हत्यारांच्या शिपायांना, यांच्यावर बाजूंनीं हल्ला करण्यास फावलें. पण **रोमन्** पायदळानें आपल्या जातीला अनुरूप अशा धैर्यानें व नेटानें लढून बराच वेळ टिकाव धरला होता. शेवटीं सर्वच त्यांच्या उलट व्हावयास लागल्यावर त्यांचा सर्वच उपाय हरला. छाप्यासाठीं तयार ठेविलेले **मेगो**चे लोक याच समयास झाडींतून निघून येऊन पायदळाच्या पिछाडीवर मोठ्या आवेशानें तुटून पडले. मग बरीक **रोम्**चा नाश खास ठरला. कांहीं जर नाशास बाकी राहिलेंव असलें तर तें हत्तींनीं पूर्ण करून दिलें. असलीं हीं विचित्र व भीतिप्रद जनावरें **रोमनस्**नीं किंवा त्यांच्या पक्षाच्या इतर लोकांनीं कधींही पाहिलीं नव्हतीं. अर्थातच **आफ्रिकनस्**च्या पिछाडीचें फारच नुकसान झालें; तिचा अगदीं समूळ नाश झाला. अघाडीचे शिपाई **ग्यालिक्** आणि **आफ्रिकन्** घोड्यांमध्यें घुसून **प्लासेन्शिआ**कडे पळून गेले. अशा रीतीनें सुमारें दहा हजार लोक वांचले. आणखी कांहीं फालतु शिपाई त्यांना येऊन मिळाले. कांहीं लोक छावणीकडे पळून गेले. कारण विजयी सैन्यानें नदीच्या पलीकडे पाठलाग केलाच नाहीं. एकंदर मेलेले, कैद झालेले, व चुकलेले मिळून **रोमन्** लोकांचें अर्धें अधिक सैन्य नाश पावलें.

कार्थेज्चे लोकांनाही कांहीं नुकसानाशिवाय विजय मिळाला असें नाहीं. पण जे मेले ते बहुतेक **गॉल्** होते; त्याविषयीं **हानिबाल्**ला फारशी काळजी नव्हती. त्याच्या **स्प्यानिअर्ड** आणि **आफ्रिकन्** पायदळाला बिलकूल धक्का लागला नाहीं. पण त्यांना थंडी फार लागली. ती त्यांना सोसवेना. थंडीमुळेंच एक शिवाय करून सर्व हत्ती गेले.

ह्या **ट्रेबिआने**च्या लढाईनें दुसऱ्या **प्यूनिक्** लढाईतील पहिल्या मोहिमेची अखेर झाली.

भाग आठवा.

ट्र्यासुमेन्नस्.

लिगुरिअन् गॉल्** लोकांच्या प्रदेशांत **हानिबाल्**नें हिंवाळा घालविला. **रोम्**चा जेता म्हणून त्यांनीं त्याचें आपणाकडे आल्यासारखें चांगलें आदरातिथ्य केलें; पण जेव्हां आपणास त्याची फौज पोसावी लागते असें त्यांच्या नजरेस आलें तेव्हां ते याचा कंटाळा करूं लागले. पुढें पुढें **हानिबाल्**ला आपल्या जीवाचीदेखील भीति वाटत असे व त्यासाठीं त्याला त्याचा पोषाख व कधींकधीं झुबाही बदलावा लागत असे. हिंवाळा संपला न संपला तोंच तो लढाईस निघाला. **आर्नो**च्या दलदलींतून व पाणथळ रानांतून तो **एट्रुरिआ**मध्यें शिरला. हा रस्ता घेतल्यानें त्याच्या पाळतीवर बसलेल्या **रोमन्** फौजांना त्यानें फसविलें खरें पण त्याचें स्वतःचें नुकसान अतिशयच झालें. जिकडे तिकडे नद्या, ओढे यांना पूर आले होते; त्यामुळें त्या सगळ्या रानांत ह्याच्या शिपायांना विश्रांति घेण्यास कोरडी जागा सुद्धां मिळाली नाहीं. ते आपले सर्व सामानसुमानाचे ढीग करीत व त्यांवर विश्रांति घेत. असेही प्रसंग आले कीं त्यांना मेलेल्या घोड्यांचे ढीग करून त्यांवर पडावें लागलें. थकल्याभागल्यामुळें, अन्नाच्या अभावामुळें, व निद्रा घेण्यास मुळींच संधि न सांपडल्यामुळें सहस्रावधि लोक ह्या स्वारींत निजधामास गेले. पाणी आपणास लागूं नये म्हणून एका शिल्लक राहिलेल्या हत्तीवर जरी **हानिबाल्**

बसला होता तरी सुद्धां त्याला डोळ्याचा विकार झाला व त्या आजारांत त्याचा एक डोळा गेला. जेव्हां तो थोडा उच्च प्रदेशांत येऊन पोहोंचला तेव्हां त्यानें आपल्या सैन्याला कांहीं थोडी विश्रांति दिली व नंतर **रोम्**कडे चालूं झाला. जातां जातां वाटेच्या सर्व **इटलीं**त नांवाजलेल्या सुपीक प्रदेशाची होईल तितकी नासाडी केली. **रोमन्** मुख्य राज्याधिकाऱ्यांपैकीं एक **फ्लामिनिअस्** तीस हजार फौजेसह **आरेशिअम्** येथें होता व दुसरा **आर्मिनिअम्** येथें तितकीच फौज घेऊन होता. **हानिबाल्**नें त्या दोघांनाही आपल्या पिछाडीस टाकलें व आतां **रोम्**च्या व त्याच्यामध्यें मुळींच कोणतीही फौज नव्हती. **फ्लामिनिअस्**च्यानें आपल्या डोळ्यांसमोर आपल्या मित्रांच्या व आप्तांच्या प्रदेशाची तरवारीनें व अग्नीनें शत्रु जी नासाडी करीत होते ती पाहवेना व **रोम्** मुळींच लढाई केल्याशिवाय शत्रूच्या हस्तगत व्हावें हें कांहीं त्याला खपेना. त्यानें एकदम आपली छावणी उठवली व **कार्थेज्**च्या सैन्याच्या पाठीमागें लागला. हेंच **हानिबाल्**ला पाहिजे होतें व अशीच त्याची इच्छा होती. त्यानें या पाठलाग करणाऱ्या शत्रूसाठीं छापा तयार करून ठेवला. **हानिबाल्** हा **कोर्टोना**हून **पिरूशिआ**ला जो रस्ता जातो त्या रस्त्यावर होता. हा रस्ता **ट्र्यासुमेन्नस्** सरोवराच्या उत्तरेच्या बाजूनें अगदीं जवळून जात होता. ह्या सरोवराच्या नैर्ऋत्य दिशेच्या कोपऱ्यावर दोन्ही बाजूंचे डोंगर अगदीं एकमेकांला येऊन भिडले होते. तसेंच ईशान्येच्या कोपऱ्यावर उत्तरेच्या बाजूच्या डोंगरांमुळें या रस्त्याहूनही अधिक अरुंद रस्ता होता; दक्षिणेच्या बाजूला सरोवर होतें. ह्या दोन कोपऱ्यांच्यामध्यें धनुष्याकृतीचें एक सपाट मैदान होतें. जर सरोवराच्या कांठाला धटकाभर दोरी असें समजलें तर भोंवतालच्या टेंकड्या बरोबर धनुष्यासारख्या अर्धचंद्राकृति होत्या. पूर्वेचा रस्ता ज्या टेंकड्यावरून दिसत होता त्या टेंकड्यांच्या पुढच्या बाजूस त्यानें **आफ्रिकन्** आणि **स्प्यानिश्** शिपाई ठेविले व त्यांवर **हानिबाल्** आपण स्वतः राहिला. रस्त्याच्या टोंकाच्याजवळ एका टेंकडाच्या पाठीमागें साधारण जाणारा येणाराला न दिसे अशा रीतीनें आपले **ग्यालिक्** घोडेस्वार ठेविले, बाकीची फौज उत्तर दिशेच्या पर्वताच्या पायथ्याशीं व मध्यें ठेविली. **फ्लामिनिअस्** सूर्यास्ताच्या वेळेस सरोवराच्या पश्चिमेच्या बाजूच्या कोंपऱ्यावर येऊन पोहोंचला. व रात्रीं त्यानें तेथेंच तळ दिला. सकाळीं झुंझुरकाच्या वेळेस चारी बाजूंचा व पुढील रस्त्याचा

तलास आणविल्याशिवाय तो एकदम पुढील मजल गांठण्यास निघाला. नैर्ऋत्येच्या अरुंद वाटेनें जेव्हां पलीकडील मैदानांत सर्व सैन्य गेलें तेव्हां **हानिबाल्**नें पूर्वीं ठरलेली खूण दिली. त्यासरसें **न्युमिडिअन्** घोडेस्वार आणि **ग्यालिक्** पायदळ डोंगरावरून खालीं उतरलें आणि पश्चिमेचा बाहेर जाण्याचा रस्ता त्यांनीं अडवून धरला. तेव्हां अर्थातच **रोमन्** सैन्य बाजूनें घेरलें गेलें, शिवाय **रोमन्** लोकांच्या सर्व बाजूनें धुकें होतें व तें सपाट जमिनीवर व सरोवराच्या कांठावर वगैरे अतिशय दाट होतें, **कार्थेजिनिअन्** फौजेला धुक्याचा संपर्कही नव्हता. ते ज्या उंच प्रदेशांतून उतरून येत होते तेथें उत्तम प्रकाश पडलेला होता त्यामुळें **रोमन्** लोक लढाईच्या रांगा बांधतात व तरवारी उपसण्याची तयारी करतात तोंच शत्रु त्यांच्यावर येऊन पडले.

फ्लामिनिअस्नें पुष्कळ खटपट केली पण त्याला यापुढें फारच थोडें करतां येण्याजोगें होतें. त्याच्या अंगीं सेनाधिपतीचें पूर्ण चातुर्य असलें तरी तें दाखविण्यास असल्या ठिकाणीं मार्ग मुळींच नव्हता. आतां फक्त शिपाईगिरीच्या लढण्यावर बेत येऊन ठेपला. दरेक शिपायानें लढून आपला बचाव करण्याचा प्रसंग होता; पण **रोम्**चे शिपाई म्हणजे शेतांतून पकडून आणलेले गडी व द्राक्षासव काढणारे मजूरदार लोक. हे लोक **कार्थेज्**च्या कसलेल्या सैन्याशी कितीवेळ टिकाव धरणार! शिवाय त्यांच्याभावतीं विपत्ति तरी किती होत्या! तरी पण कांहीं वेळपावेतों त्यांनीं मोठ्या शौर्यानें मोठा टिकाव धरला होता. तीन तासपर्यंत युद्ध इतकें तुंबळ झालें कीं, एक जबरदस्त धरणीकंपाचा धक्का बसलेलाही कोणाच्या लक्ष्यांत आला नाहीं. (ह्या धरणीकंपानें बरींच गांवें समूळ नाहींशीं झालीं होतीं). नंतर **फ्लामिनिअस्** पडला. आपल्या चकाकणाऱ्या व पाणीदार हत्यारांसह जिकडे तिकडे फिरून त्यानें लढाई सुरू ठेविली होती. अखेरीस **हानिबाल्**च्या एका **इन्सर्बिअन् गॉल्** शिपायानें त्यास गांठलें व त्याचा चेहेरा ओळखून (कारण आठ वर्षांपूर्वीं त्यानें **इन्सर्बिअन्** लोकांना जिकलें होतें) अति त्वेषानें त्याच्यावर आपला घोडा घातला.

तो शिपाई मोठ्यानें ओरडून आपल्या जोडीदारांना ह्मणाला 'अरे पहा हाच तो हाच कीं ज्यानें आपलीं सैन्याचीं सैन्यें रसातळाला पोहोंचविलीं व

आपला प्रदेश सर्व उध्वस्त केला. आपण आपल्या मृतबांधवांच्या आत्म्यांना याचा देह अर्पण करूं या.' त्या **कॉन्सल**चा कंचुकवाहक त्याचा वार घेण्यास मध्यें आड आला तों त्यालाच प्रथम त्यानें छाटून टाकलें व नंतर **ड्युकेरिअस्**नें आपला भाला त्याच्या शरीरांत आरपार भोंसकला. आपला सेनाधिपति मेल्यानंतर शिपायांनीं लढण्याचें बंद केलें. कोणी टेंकड्यांवर चढून गेले; व कोणी सरोवरांत उड्या टाकल्या. सरोवरांत कांठापासून कांहीं हातपावेतों पाणी थोडें होतें. पुढें त्यांचीं सर्व चिलखतें वगैरे अंगावर असल्यामुळें शिपायांना पोहतां येईना; कांहींकांनीं तसेंच पोहण्याचें धाडस केलें; त्यांतील बहुतेक खोल पाण्यांत बुडाले; ज्या थोड्याबहुतांनीं परत येण्याचा प्रयत्न केला ते बहुतेक **कार्थेज्**चे घोडेस्वारांच्या हातून मारले गेले; कारण घोडे पाण्यांत शिरलेच होते. अघाडीपैकीं सुमारें सहा हजार लोकांनीं पूर्वबाजूच्या रस्त्यावर जें शत्रूचें सैन्य होतें त्यांतून कसा तरी रस्ता काढला व लांब एका उंचवट्यावरून लढाई कशी काय चालली होती तें पाहण्यास उभे राहिले. जसा जसा सूर्य वरती आला तसें तसें धुकें अगदीं नाहींसें झालें व जेव्हां यांच्या मित्रांची खरी कष्टमय स्थिति त्यांनीं पाहिली तेव्हां आपाआपलीं निशाणें घेऊन ते पळून गेले. पण खावयास जवळ अन्न नाहीं व कोठें जावें तर रस्ता माहीत नाहीं अशा स्थितींत ते आपणच होऊन दुसरे दिवशीं **हानिबाल्**च्या स्वाधीन झाले. समरांगणांतून दहा हजार लोकांनीं पळून जाण्याची योजना केली व ते तडक **रोम्**ला चालते झाले. जवळ जवळ पंधरा हजार लोक लढाईंत अथवा पळून जातांना प्राणास मुकले; **कार्थेज्**चे सुद्धां अडीच हजार लोक मेले. यावरून कांहीं वेळ तरी लढाई मोठ्या निकराची झाली असेल असें दिसतें. असल्या शूर शत्रूला चांगल्या रीतीनें मूठमाती द्यावी अशा इच्छेनें **हानिबाल्**नें मोठ्या बारकाईनें **कॉन्सल्**चे शवाचा शोध करविला. पण तें कोठें सांपडलें नाहीं.

कांहीं थोडे दिवसानंतर त्याला आणखी एक जय मिळाला. **सर्विलिअस्**नें आपल्या जोडीदाराच्या साहाय्यार्थ एक रिसाला पाठविला होता. त्याला **महारबाल्**नें मध्येंच गांठून त्यांतील निम्मे ठार केले व निम्मे कैद केले. **हानिबाल्** पुढें दक्षिणेच्या बाजूस चालूं झाला; पण **रोम्** जरी अगदीं उघडें

होतें तरी एकदम त्यावर हल्ला करण्याचें धैर्य त्याला होईना आणि खरोखरच **अम्ब्रिआं**तील **स्पोलिशिअम्** नांवाचें सैन्याचें ठिकाण प्रयत्न करूनही त्याला घेतां आलें नाहीं; तो पुढें आग्नेयी दिशेस चालू झाला. जातांना वाटेंतील सर्व प्रदेश तो उध्वस्त करून टाकीत असे; व मिळेल तितकी लूट मिळवीत असे; असें करीत करीत तो समुद्रकिनाऱ्याच्या **हेड्रिआ** नांवाच्या बंदरीं येऊन पोहोंचला. तेथें कांहीं दिवस त्यानें विश्रांति घेतली व आपल्या सैन्यासही पुनः ताजें होण्यास कांहीं दिवस सुट्टी दिली. त्याचीं माणसें तसेंच त्याचीं जनावरेंही उपासमारानें व मेहनतीनें अगदीं थकून गेलीं होतीं; लोक असें सांगतात कीं, त्याचे सर्व घोडे खवंदांनीं भरलेले होते. त्यांना दारूनें न्हाऊं घातलें व त्यानें ते बरेही झाले. याच ठिकाणाहून आपण काय काय केलें त्याच्या कच्च्या हकीगतीचें वर्णन **हानिबाल्**नें **कार्थेज्**कडे पत्रद्वारें पाठविलें. **इब्रो**हून निघाल्यापासून **कार्थेज्**कडे त्यानें पाठविलेली खबर कायती हीच. शिपायांचें असें म्हणणें असतें कीं आपला पाठीमागचा सर्व आधार कापून टाकून पुढें घसणें यासारखी धोक्याची गोष्ट सेनाधिपतीला कोणतीही नाहीं. **हानिबाल्** तर आपला सर्व आधार कापून टाकून इतका दूर गेला होता कीं बरें वाईट झाल्यास मागें ज्यावर विसंबतां येईल असें कांहीं एक त्यानें ठेविलें नव्हतें. त्यानें हें इतक्या धाडसानें केलें होतें कीं त्याला आपली खबरसुद्धां जासुदाच्या द्वारें पाठविणें अशक्य झालें होतें. आतां बरीक तो समुद्रकिनाऱ्यास आला होता व आतां निरोप पाठविण्यास त्याला सवड होती. त्यानें आपल्या कांहीं शिपायांना **रोमन्** शिपायांचे पोषाख दिले असें ह्मणतात. **हेड्रिआ**हून तो आणखी पुढें दक्षिणेकडे गेला. **अप्युलिआ**पर्यंतच्या **इटली**च्या पूर्वभागाची जातांना त्यानें बरीच नासाडी केली. पण त्याच्या लुटण्यांतसुद्धां तो असें दर्शवीत असे कीं, त्याचें वैर काय तें **रोम्**शीं होतें; **रोम्**च्या **इटलिअन्** प्रजेशीं कांहींएक नव्हतें. कोणीही **रोमन्** दिसला मग तो लहान असो कीं मोठा असो शस्त्र धरण्यास तो समर्थ असला कीं लागलीच त्याला ठार करण्याचा तो हुकूम सोडीत असे.* **इटलिअन्** लोक जे त्याच्या

---

* असें **रोमन्** इतिहासकार लिहितात; पण त्याजपाशीं इतके **रोमन्** कैदी होते हीच गोष्ट ह्या वर्णनाशीं जुळत नाहीं तेव्हां हें वर्णन खोटें असें ह्मणावें लागतें.

हातीं येत असत त्यांना तो वांचवीत असे एवढेंच नाहीं तर फार मायाळुपणानें वागवीत असे.

भाग नववा.

फेबिअस् आणि त्याच्या युक्त्या.

शोकाचा आणि भीतीचा प्रथम आवेग शांत झाल्यानंतर **रोम**मध्यें लढाई मोठ्या उत्साहानें चालविण्याला जीं कांहीं साधनें लागतात त्या सर्वांची मोठ्या जारीनें तयारी सुरूं झाली. तहाचें किंवा शत्रूला वश होण्याचें कोणाच्या स्वप्नीं देखील येईना. सर्व संस्थानांतील फौजांचा मुख्य सेनाधिपति **क्विन्टस् फेबिअस् माक्सिमस्** म्हणून एक जुना अनुभविक माणूस नेमण्यांत आला. त्यानें वीस एक वर्षांपूर्वी मोठमोठ जय मिळविले होते. **सिबिल्**च्या पुस्तकांतून काय काय आज्ञा निघतात तें त्यानें पहिल्याप्रथम पाहिलें. त्यांतून खालील आशयाच्या आज्ञा निघाल्या "स्तोत्रपाठ व यज्ञयागादि क्रिया करून देवतांचें पूजन करावें; कांहीं देवालयें बांधवावींत व कांहीं देवताप्रीत्यर्थ जत्रा भरवाव्यात." यांतील कांहीं गोष्टी लागल्याच करण्यांत आल्या व कांहींकांना अवधि मागून घेतली, मग त्या **डिक्टेटर**नें (कारण ही पदवी त्या सेनाधिपतीला देण्यांत आली होती) दोन नव्या फौजा (लिजन्स्=६००० शिपाई) व शहराच्या संरक्षणासाठीं व आरमारासाठीं कांहीं सैन्य गोळा करण्यास लोकांना आज्ञा केली. त्यानें शिवाय **हानिबाल्**च्या कूच करण्याच्या मार्गावरच्या सर्व वस्तु जाळून टाकाव्या अशीही आज्ञा केली. ह्याचा आशय म्हणून एवढाच कीं **कार्थेज्**चे

शिपाई जेथें जातील तेथें निर्जन अरण्याशिवाय दुसरें कांहीं एक त्यांना दिसूं नये. हें झाल्यानंतर तो उत्तरेकडे निघाला. **आम्ब्रिआंत ऑक्रिक्यूलम्** शहरीं त्याला **सर्विलीअस्** भेटला. त्याजपासून त्याची फौज त्यानें घेतली. **सर्विलिअस्**ला त्यानें **इटालिअन्** समुद्राचें रक्षण करण्यासाठीं **ऑस्ट्रिआ** येथें तयार केलेल्या आरमारावर मुख्य नेमिलें व आपल्याबरोबर पन्नास एक हजार लोक घेऊन शत्रूच्या शोधार्थ निघाला. **आप्युलिआ** प्रांतांत कोणी आपल्या पक्षाला मिळत नाहींत असें पाहून **हानिबाल्** पश्चिम दिशेस **सेम्निअम्** प्रांताकडे वळला. हा प्रांत शंभर वर्षांपूर्वी **रोम्**चा कट्टा शत्रु होता पण येथें सुद्धां **रोम्**चे आणि या लोकांचें वितुष्ट पाडण्याच्या प्रयत्नास त्यास यश आलें नाहीं. तदनंतर **इटलींत** सर्वांत सुपीक प्रदेश जो **फालर्निआ** त्यांत तो शिरला. तेथील द्राक्षांच्या वेलींचे कुंज तर सर्व जगांत अद्यापपावेतों प्रसिद्ध आहेत. **फेबिअस्** सारखा त्याच्या पाठीवर होताच, कांहीं कोठें **हानिबाल्**चे लोक मुख्य फौजेपासून दूर पडले कीं, तो त्यांना मारीत असे; होईल त्या प्रकारें-करून त्याला त्रास देत असे; पण कधींही त्याच्याशीं खड्या सामन्याला उभा राहत नसे. जेव्हां **फेबिअस्**नें **फालर्निआ**च्या मैदानांत खालीं **हानिबाल्**ची फौज पाहिली (कारण त्यानें आपलें सैन्य डोंगरावर ठेविलें होतें त्यामुळें त्याला दूरवर खालचा प्रदेश दिसत होता), तेव्हां त्याला वाटलें कीं, आतां शत्रु आपल्या ताब्यांत आला खरा. कारण उत्तरेस **लोशिअम्** व **रोम्**कडे जाण्याचे सर्व रस्ते त्यांनीं अडवून ठेविले होते. त्याच्या पुढच्या बाजूस समुद्र व दक्षिणेच्या बाजूस **व्हालटर्नस्**नदीचें खोल पात्र होतें; व पूर्वेकडील घाटांतील रस्ते सर्व **रोमन्** शिपाई धरून बसले होते. तेव्हां **हानिबाल्**ला कोणच्याही तऱ्हेनें या व्यूहांतून निघण्याचा मार्गच नव्हता. अशा स्थितींत तो आला तेंव्हांच आपल्यापाशीं किती युक्त्या आहेत; काय चातुर्य आहे, व कशी करामत आहे तें **हानिबाल्**नें **फेबिअस्**ला दाखवून दिलें. तो या व्यूहांतून सुटला एवढेंच नाहीं तर आपण जी लूट गोळा केली होती तीही सुखरूप त्यानें नेली. त्यानें खालीं वर्णिलेली युक्ति रचिली. त्यानें जे प्रांत लुटले होते त्यांत बैल बरेच मिळाले होते, त्यांपैकीं एक दोन हजार बैल घेतले, त्यांच्या शिंगांना वाळलेल्या लांकडाच्या जुड्या बांधल्या. पुढें एके दिवशीं संध्याकाळ झाली तशी आपल्या छावणीचा उठाव केला व शिपायांना पर्व बाजूच्या डोंगराकडे कूच करण्याची आज्ञा केली; बैल जे होते ते सैन्याच्या

अघाडीच्या थोडेसे पुढें चालविले होते. डोंगराच्या पायथ्याशीं येईपावेतों रात्र झाली व जिकडे तिकडे अंधार पडला; तेव्हां त्यानें त्या जुड्या पेटविण्याचा हुकूम केला; त्यांच्या हांकणारांनीं त्यांना डोंगराची चढण लागतां लागतां चिडवून दिलें; ते बैल भयानें व वेदनांनीं अगदीं वेडे झाले; जिकडे तिकडे उजेड पाहिल्यामुळें त्यांना भीति वाटली; व ज्वाला अंगाला लागल्या ह्मणजे त्यांना वेदना होत; त्यामुळें ते वेडावून जाऊन चहूंकडे धांवत. घाटांतील रस्त्यावर अडविण्यास म्हणून जें चार हजार **रोमन्** सैन्य होतें तें हें पाहून घाबरलें. त्यांना हें काय आहे तें कळेनाच पण कांहीं तरी भीति आहे असें त्यांना खास वाटे. त्यांना वाटलें कीं आपल्याला शत्रूंनीं वेढून घेतलें. अतिशूर व अतिचलाख फौज नसली म्हणजे अशी भीति वाटणें साहाजिकच आहे. कसेंही असो त्यांनीं एकदम आपलीं ठाणीं सोडलीं व डोंगराच्या माथ्यावर चढून गेले. **फेबिअस**नें सुद्धां हा विचित्र व आश्चर्यजनक देखावा पाहिला पण त्यांतील तथ्य उमगलें नाहीं व त्यानें सकाळ होईपावेतों बाहेर देखील येण्याचें धाडस केलें नाहीं.* मध्यंतरी **हानिबाल्** अति त्वरा करून आपलें सैन्य वगैरे घेऊन घाटांतून निघून गेला. आपली सर्व लूटही त्यानें सुरक्षितपणें नेली. दुसरे दिवशीं डोंगराच्या पलीकडील बाजूस **अलिफि** येथें त्यानें आपली छावणी दिली. **फेबिअस्** त्याच्या पाठीस लागला होताच. **हानिबाल्** उत्तरेच्या बाजूस **सामनिअम**मधून जाऊन लुटीत लुटीत **पेलिग्नाय्** येथें जाऊन पोहोंचला. **फेबिअस्**सारखा पाळतीवर होताच; तो आपलें सैन्य **हानिबाल्**च्या आणि **रोम्**च्या मध्यें राखण्याची खबरदारी घेत होता.

हानिबाल्च्या या मुक्ततेचा परिणाम दोन रीतींनीं हितावह झाला. एक तर तो स्वतः सुटला व लूट सुरक्षितपणें न्यावयास सांपडली व दुसरे **फेबि-**

---

* **निबुर** ह्मणतो 'ह्या **लिव्हि**च्या गोष्टीनें **रोमन्** लोक अगदीं मूर्ख होते असें ठरतें. पण वस्तुस्थिति **पोलिबिअस्**नें अशा तऱ्हेनें वर्णिली आहे. रात्रीचे कंदील घेऊन कुच करण्याची प्राचीन लोकांत बरीच चाल होती आणि जेव्हां रखवालीस असलेल्या **रोमन्** शिपायांनीं स्वतःच्या व खालील मैदानाच्यामध्यें कंदील पाहिले तेव्हां **कार्थेजिनिअन्** डोंगर चढून येत आहेत. असा अदमास बांधला व त्यांचा रस्ता अडविण्याकरितां ते कंदीलाच्या दिशेकडे चालून गेले.

असूची लढाई दूरवर टाकण्याची युक्ति अमलांत आणण्यास त्याला कठीण जाऊं लागली. ह्या त्याच्या युक्तीच्या विरुद्ध लोक फार होते, कारण ज्या ज्या **रोम्**च्या मित्रांना आपल्या नेत्रांसमक्ष लढल्याशिवाय आपल्या ताब्यांतील प्रदेशांची नासधूस होतांना निमूटपणें पाहण्याचा प्रसंग येई ते लोक ह्याच्यावर अगदीं चवताळून जात, तसेंच **रोमू**चे बडे बडे लोक ज्यांच्या विस्तीर्ण जमीन-जुमल्याची नासाडी होत असे तेही आपला असंतोष दर्शवीत असत. **हानि-बाल्**नें **फेबिअस्**चीं शेतेंभातें तशींच ठेविलीं व इतर आजूबाजूचीं शेतें बरीक अगदीं धुळीस मिळवून टाकलीं; त्यामुळें तर लोक विशेषच चवताळले व आपला द्वेष स्पष्ट दाखवूंही लागले. मध्यें एकदां कांहीं कामासाठीं **फेबि-अस्**ला **रोम्**ला यावें लागलें; येतांना त्यानें रिसाल्याच्या मुख्याला लढाई अगदीं न करण्याविषयीं सूचना देऊन सर्व सैन्याचा अधिकार कांहीं दिवसांपुरता दिला. **मिन्सिअस्** (रिसाल्याचा मुख्य) यानें लढाई केली व थोडासा विजयही मिळविला. जेव्हां त्याविषयाची बातमी **रोम्** येथें येऊन पोहोंचली तेव्हां सैन्याचे दोन विभाग करावेत एक भाग **फेबिअस्**च्या हाताखालीं व दुसरा **मिन्सिअस्**च्या हाताखालीं असावा अशाबद्दल **फेबिअस्**च्या शत्रूंनीं लोकांचीं मनें वळविलीं.

आतां एका मैलाच्या अंतरावर **रोम्**ची दोन सैन्यें होतीं. हें **हानिबाल्**ला समजलें होतें व त्यानें ह्याचा फायदा करून घेण्यास सोडलें नाहीं. **मिन्सि-अस्**ला आपल्या मित्रांना संतुष्ट ठेवण्यासाठीं तरी लढाई करणें भाग होतें व **हानिबाल्**नें त्याला दिसावयास अनुकूल अशी लढाईची संधिही दिली. आपल्या व **रोमन्** लोकांच्या छावण्यांच्या मधोमध कांहीं थोडेसे लोक बरोबर घेऊन एका माळरानांत तो उभा राहिला. अर्थातच **रोमन** लोक एकदम त्याला तेथून हांकून लावण्यास धांवले; पण **हानिबाल्**नें पांच हजार लोक छपवून बसविले होते; ते साधारण लढाई बरीचशी सुरू झाल्यावर एकदम **रोमन्** पिछाडीवर तुटून पडले. त्यामुळें अर्थातच **रोमन्** लोक हरले. जर **फेबिअस्** आपल्या सैन्यानिशीं अगदीं वेळेवर येऊन दिवस न उलटविता तर **रोमन्** लोकांचें आणखी जबरदस्त नुकसान झालें असतें; वस्तुतः नुकसान कांहीं विशेष झालें नाहीं उलट नफा असा झाला कीं, **मिन्सिअस्**नें आपली चूक कबूल केली व सर्व सेनाधिपत्य **फेबिअस्**ला दिलें. बाकीच्या त्या वर्षांत कांहीं विशेष नुकसान जाहलें नाहीं. फक्त **कॉन्सल् सर्विअस्** आफ्रिकाच्या

किनाऱ्यावर उतरून देशाचें फार नुकसान करीत होता त्याच्यावर **कार्थेजिनि-अन्स्**नीं हल्ला करून त्याचा पराभव केला. सुमारें हजार माणसें या कृत्यांत दगावलीं.

हानिबाल्नें हिंवाळा **आप्युलिआ**च्या उत्तरेस **जेरोनिअम्** येथें घालविला. हा प्रदेश फार डोंगराळ होता व समुद्राच्या अगदीं जवळ होता. हा **आप्युलिआ**चा भाग **आड्रिआटिक** समुद्राच्या बराच आंत शिरलेला आहे. त्याच्यापाशीं धान्यवगैरेचा पुरवठा बराच होता आणि **कार्थेज्**शींही त्याचा व्यवहार होता. कांहीं नवी फौजही त्याच्याकडे धाडण्यांत आली होती, कसेंही असो नव्या वर्षाच्या (२१६) च्या आरंभीं तो अतिबलाढ्य झाला होता. हिंवाळ्यांत त्याच्या पाळतीवर असलेल्या **रोमन्** सैन्यांच्या भोंवती भोंवती फिरण्याचे कामास त्यानें प्रथम सुरुवात केली. शत्रूंनीं गोळा केलेलें बरेंच लढाईचें सामान वगैरे त्यानें लुटलें. शत्रूंना खडी लढाई करण्यास लावण्याचा त्याचा मुख्य हेतु अद्यापि कायम होता व ह्या लुटीनें तर त्या हेतूला भरच पडली. **रोमन्** लोकांनीं मोठी थोरली फौज गोळा केली होती पण तिला पोसण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नव्हतें. **हानिबाल्**ला इकडून तिकडे स्वच्छंदानें फिरूं दिलें व लागेल तसें लुटूं दिलें तर आपले स्नेही आपणास सोडतील कीं काय अशीही भीति त्यांना होतीच; नव्या निवडणुकींतही लढाईच्या पक्षाचाच जय झाला. **सी. टेरेन्शिअस व्हारो** म्हणून एक लोकांच्या तर्फेचा मनुष्य उठला. त्यानें एक मोठें आवेशाचें भाषण करून सांगितलें कीं सरदार लोक आपल्या हितासाठीं लढाई लांबणीवर टाकीत आहेत. ह्या **व्हारो**लाच पुष्कळ अधिक मतें मिळून तो **कॉन्सल्** झाला. नवीं गोळा केलेलीं सैन्यें व जुनीं सैन्यें या दोघांना एकत्र करून मग लढाईस सुरुवात करावयाची असें ठरलें. जूनच्या आरंभाला दोन्हीं सैन्यें एके ठिकाणीं जमविण्यांत आलीं; सर्व मिळून नव्वद हजार लोक होते. **आप्युलिआ**च्याजवळ **हानिबाल्** हंगामाच्या दिवसांत धान्य गोळा करीत होता तेथें ही अफाट सेना जावयास निघाली. **व्हारो** आणि त्याचा जोडीदार **एमिलिअस् पालस्** हे एक दिवसा आड सेनाधिपति होत. **एमिलि-अस्** चांगला अनुभविक शिपाई असल्यामुळें त्याला लढाईच्या परिणामाचा धाक वाटे व तो लढाई लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करी; उलटपक्षीं **व्हारो** हा लढाई करण्यास अतिउत्सुक होता व त्याला स्वतःचा फार भरंवसा वाटत

असे. त्यानें आपल्या सेनाधिपत्याच्या पहिल्याच दिवशीं समुद्राच्या व **हानिबाल्**च्या सैन्याच्यामध्यें आपलें सैन्य घालून गोष्ट अगदीं लढाईच्या थरावर आणली.

भाग दहावा.

कानी.

तरी पण निश्चयाची थोरली लढाई होण्यास कांहीं थोडे दिवसांची अवधि लागली. पण जेव्हां **हानिबाल्**च्या घोडेस्वारांनीं **रोमन्** सैन्याचे लोकांस नदीवर जातांना अडविलें व जेव्हां **इटली**च्या उन्हाळ्याच्या प्रखर उन्हांत **रोमन्** सैन्य पाण्यासाठीं तळमळूं लागलें तेव्हां मग शिपाई उगा राहिनात. पहिल्या **आगस्ट्**चे* दिवशीं **व्हारो**ची अधिकाराची पाळी असतांना त्यानें आपल्या तंबूवर लढाईचें सूचक म्हणून लाल निशाण उभारिलें. **आफिडस्** नदी ओलांडून नदीच्या उजव्या कांठाला रांग धरण्याची त्यानें सैन्याला आज्ञा केली. **हानिबाल्**नें लागलीच आमंत्रण स्वीकारून दोन वाटांनीं नदी ओलांडून शत्रूच्या सैन्याच्या समोर आपलें सैन्य उभें केलें. शत्रूच्या अर्ध्याइतकी त्याची फौज असेल नसेल; व आपला पराभव म्हणजे समूळ नाश हेंही पण त्याला पक्कें ठाऊक होतें. पण त्याच्या मनाची खातरी विलक्षण होती. त्यामुळें तो अगदीं आनंदांत होता. लढाईच्या दिवशींच्या सकाळची एक तत्संबंधीं गोष्ट **प्लुटार्क्**नें लिहिली आहे. त्या गोष्टीवरून त्याची शिपाईगिरी नव्हे तर तो माणूस कसा काय होता हें पूर्णपणें लक्ष्यांत येतें. तो अशापैकीं एक माणूस होता कीं ज्यांचा उत्साह व ज्यांची बुद्धि

---

* **रोमन्** वर्ष खऱ्या वर्षाच्यापुढें सहा सात आठवडे होतें. वास्तविक पाहतां हा वेळ भर उन्हाळ्याचा होता.

जशी जशी भीति जवळ येते तशीं तशीं तीव्रतर होत जातात व इतर साधारण लोक जेव्हां गंभीर होतात तेव्हां ते अगदीं मजेंत व आनंदांत असतात. त्याच्या हाताखालील **गिस्को** नांवाचा एक सरदार त्याला म्हणाला 'शत्रूच्या सेनेची संख्या पाहून मन फार चकित होत आहे.' **हानिबाल्** हांसून ह्मणाला 'होय **गिस्को,** पण त्याहूनही अधिक आश्चर्यकारक गोष्ट त्वां पाहिलीस काय?' तो म्हणाला 'काय बरें ती?' **हानिबाल्** ह्मणाला 'अरे जरी त्यांच्या फौजेंत इतके शिपाई आहेत तरी पण एकाचें सुद्धां नांव **गिस्को** नाहीं.' हें असें अकल्पित उत्तर ऐकून कोणाही शिपायास हंसल्यावाचून राहवलें नाहीं. **प्लुटार्क** असें ह्मणतो कीं आपल्या सरदाराचा हा भरंवसा पाहून **कार्थेज्**च्या फौजेंतील दरेक शिपायास मोठा उत्साह आला. **आफिडिअस्** नदी पहिल्यांदा दक्षिणेकडे वळते व पुढें कांहीं अंतर-पावेतों पूर्वेकडे सरळ जाऊन मग उत्तरेच्या बाजूस वळली आहे. त्यामुळें तेथें मालेच्या आकाराचें तिचें पात्र झालें आहे. ह्याच वळणांत **हानिबाल्**नें आपलें सैन्य उभें केलें. डाव्याबाजूस **स्प्यानिअर्डस्** आणि **गालस्** मिळून आठ हजार भर हत्यारांचे घोडेस्वार त्यानें ठेविले. त्यांच्या डाव्या आणि उजव्या दोन्ही बाजूंस नदी होती. त्यांच्या पाठीमागें **आफ्रिकन्** पायदळाचा अर्धा भाग उभा केला होता. **लिव्हि**नें ह्मटलें आहे कीं हें पायदळ अगदीं **रोमन्** सैन्यासारखें दिसत होतें. कारण **ट्रेबिआ** आणि **ट्रेसुमेनस्**च्या लुटींतील हत्यारें व पोषाख त्यांना दिले होते. त्याच ओळीला पण जरा पुढें म्हणजे पहिल्या घोडेस्वारांच्या समोरील **स्प्यानिश्** आणि **गॉल्**चें पायदळ उभें केलें होतें. त्यांच्या टोळ्या एक **स्प्यानिश्** तर एक **गॉल्** अशा तऱ्हेनें लावल्या होत्या व **हानिबाल्** व त्याचा भाऊ **मेगो** यांच्या खुद्द देखरेखीखालीं हें पायदळ होतें. ह्या सैन्याचे जुने पोषाख अद्यापि तसेच कायम होते. **स्प्यानिअर्ड** लोक लांब गुडघ्यापर्यंत पोहोंचेशा पांढऱ्या चकचकीत कफनी घालीत असत; त्या कफनींना जांभळी फीत लावीत असत. त्यामुळें ते फार शोभत. त्यांचें मुख्य हत्यार ह्मटलें ह्मणजे लहान अटपसर तरवार; ही बहुश: ते फेंकून मारीत असत; पण ती भोंसकण्याच्या किंवा हातांत धरून वार करण्याच्या कामांत येण्याजोगी ही होती; कारण तिला एका बाजूनें धार होती. **गाल्**चे शिपाई कंबरेपासून वर उघडे असत. ते भल्या लांब पण बोथट तरवारी वापरीत असत. दोघांच्याही ढाली चौकोनी असत. (भूमितींत

ज्या आकृतीला आयत ह्मणतात त्या आकृतीच्या). **रोमन्** आणि **इटालिअन्** साधारण उंचीच्या माणसांना हीं भव्य मनुष्यें राक्षसतुल्य भासलीं. त्यांच्याही पलीकडे उजवे बाजूस **आफ्रिकन्** पायदळाची दुसरी टोळी होती. ती हिच्याच जोडीच्या डाव्या हाताच्या टोळीशीं समांतर व सारखीच होती. सर्व सैन्याच्या उजव्या बाजूस **आफ्रिकन्** हलक्या हत्यारांचे घोडेस्वार ठेविले होते. ह्यांच्या उजव्या बाजूस संभाळावयास कोणीही नव्हतें आणि हेही फक्त दोन हजारच होते. कारण **इटलींत** शिरल्यापासून बहुतेक मोठमोठ्या लढायांचा भार यांच्यावरच पडलेला होता. तरी पण त्यांना विजयाची अगदीं खात्री होती. सर्व मिळून पन्नास हजार फौज होती; त्यांतील दहा हजार फौज छावणीच्या बचावाकरितां त्यानें ठेविली होती. शत्रूच्या सैन्याकडे पाहिलें असतां त्यांनीं आपल्या उजव्या हाताला आपला रिसाला ठेविला होता ह्मणजे अर्थात्च **कार्थेज्**चे घोडेस्वाराच्या बरोबर समोर यांचा रिसाला होता. त्याच्या शेजारी **रोमन्** पायदळांच्या टोळ्या होत्या; ह्यांना रांगेनें लावलें होतें ह्मणण्यापेक्षां त्यांचा एक स्तम्भ तयार केला होता म्हटलें तरी चालेल. **रोमन्** लोकांचें पायदळ जरी **कार्थेजिनिअन्**पेक्षां अधिक होतें तरी पण तें कमी जागेंत मावलें होतें. अगदीं डाव्या बाजूस **रोम्**चे स्नेह्यांचे घोडेस्वार होते. ह्या सैन्यावर **व्हारो** होता व उजव्या बाजूचे सैन्यावर **पाल्स्** होता. छावणीच्या रक्षणाला धाडून दिलेली फौज वगळली तरी सुमारें ऐशी हजार सैन्य एकंदर होतें. **रोमन्** सैन्याचीं तोंडें दक्षिणेकडे होतीं; त्यामुळें त्यांचें बरेंच नुकसान झालें; सूर्य तोंडावर येत होता म्हणून नव्हे; कारण अद्यापपावेतों सूर्य फार वर आलेला नव्हता; पण **व्हल्टर्नस्** नांवाच्या उष्ण वाऱ्यानें त्यांच्या डोळ्यांत इतकी वाळू व धूळ जात असे कीं त्यांच्यापुढचें सुद्धां त्यांना मोठ्या संकटानेंच दिसत असे.

लढाईच्या प्रथमारंभीं सैन्याच्या कांहीं कांहीं टोळ्यामध्यें चकमकी झाल्या. त्यांत अर्थातच **कार्थेज्**ची सरशी झाली. कारण **बालेआरिक्** बेटांतील गोफण्यांची बरोबरी **रोमन्** हलक्या हत्यारांच्या शिपायांच्यानें होईना. त्यांनीं जो धोंड्यांचा वर्षाव केला त्यानें **रोमन्** सैन्यांतील पुष्कळ शिपाई फार जाया झाले; **कॉन्सल् पाल्स्**लाही त्यांपैकींच एक धोंडा लागला. यानंतर मग **कार्थेज्**च्या भरहत्यारांच्या घोडेस्वारांनीं समोर असलेल्या **रोमन्** घोडेस्वारांवर हल्ला केला. जरी **रोमन्** स्वार मोठ्या उत्तम कुळांतले व अतिशूर सरदार होते तरी ते संख्येनें शत्रूपेक्षां कमी होते एवढेंच नव्हें तर ते त्यांच्याहून हलकेही होते,

त्यांचे घोडेही यांच्याहून हलके होते; व त्यांचें सामानसुमानही यांच्यापेक्षां हलक्या जातीचें होतें; त्यांच्यापाशीं लांब तरवारी नव्हत्या; त्यांच्या ढाली अगदींच निर्जीव होत्या व त्यांचे भाले लागलीच मोडून पडत. त्यांचे अंगीं घोडेस्वारांचें चातुर्य कांहीं दिसलें नाहीं. जर त्यांच्यापाशीं असलें तर त्यांना ते दाखवावयास संधि मिळाली नाहीं; कारण त्यांना घोडे मागें पुढें वळविण्यासही जागा नव्हती. त्यामुळें लढाई जी झाली ती प्रत्यक्ष शिपायाशिपायामध्यें झाली. कितीक **स्प्यानिअर्ड्स्** आणि **गाल्स्**नीं आपल्या घोड्यावरून उड्या टाकल्या व शत्रूंनाही त्यांच्या घोड्यावरून ओढलें.

मध्यभागीं जेथें **रोमन्** पायदळाची व **ग्यालिक्** आणि **स्प्यानिश्** पायदळांची लढाई चालली होती तेथें कांहीं थोडा वेळ **हानिबाल्**ची पिच्छेहाट होतीसें दिसावयास लागलें. त्यानें आपलें पायदळ इतर सैन्याच्या फारच पुढें नेलें होतें आणि जेव्हां शत्रूंच्या जवळजवळ असलेल्या सैन्यानें यांजवर मिळून हल्ला केला तेव्हां यांना मागें हटावें लागलें. त्यावेळीं **रोमन्** लोक फारच दाटीनें व अव्यवस्थित रीतीनें यांच्या पाठीमागें लागले तेव्हां अर्थातच अगदीं विजयाच्यावेळीं सर्व बाजूंनीं त्यांच्यावर हल्ला आला. दोन्ही बाजूंनीं दोन **आफ्रिकन्** पायदळांच्या टोळ्या त्यांजवर धावून आल्या. यांना अद्यापपावेतों कांहींएक काम करावें लागलें नव्हतें. त्याचवेळेस **हस्डुबाल**ही आपला रिसाला घेऊन तेथें आला. त्यानें प्रथम उजव्या बाजूच्या **रोमन्** स्वारांचा अगदीं पराजय करून डाव्या बाजूच्या **रोम्**च्या दोस्तांच्या घोडेस्वारांवर हल्ला केला. सुमारें पांचशें **आफ्रिकन्** लोकांनीं पहिल्याप्रथम हटल्याचें ढोंग करून आयत्यावेळेस पुनः जमून या सर्व घोड्यांच्या लेंड्या कापून टाकल्यामुळें या घोडेस्वारांची अगदींच तिरपीड उडून गेली होती. **हस्डुबाल**नें तर त्यांचा अगदीं पराभव केला. आणि **आफ्रिकन्** शिपायांना त्यांचा पाठलाग करण्यास लावून आपण **रोमन्** पायदळाच्या पिछाडीवर हल्ला केला. आतां हें पायदळ बरीक चहूंकडून घेरल्यासारखें झालें. **गाल** आणि **स्प्यानिअर्ड** लोकांनीं त्यांचें पुढें जाणें अगदीं बंद करून टाकलें. आणि मग निराश्रित सैन्यसमूहावर मारावयाचा कंटाळा येईपावेतों **कार्थेजिनिअन्** लोकांनीं आपल्या तरवारी चालूं ठेवल्या. **पालिबिअस्** या कत्तलींत सत्तर हजार लोक मेले ह्मणून सांगतो. **लिव्ही** म्हणतो पन्नास हजार मेले असतील. दोहोंत **पालिबिअस्**चें म्हणणें विशेष संभवनीय दिसतें. मेले त्यांत एक

कॉन्सल् सर्विलीअस्, एकवीस **कर्नल्**च्या योग्यतेचे अधिकारी आणि ऐंशी राजसभेचे सभासद होते. **व्हारो** सुमारें सत्तर घोडेस्वार घेऊन पळून गेला. **हानिबाल्**चे सहा हजारांचे आंत लोक पडले.

पुढें प्रश्न उभा राहिला कीं आतां **हानिबाल्**नें करावें काय? त्यानें शत्रूच्या सैन्याचा पराभव केला होता. तसेंच छावणीच्या बचावाकरितां ठेवलेले लोकही त्याच्या ताव्यांत आले होते; दुसरें कांहीं कोणतेंही सैन्य शत्रूंच्याजवळ नव्हतें. त्यांचे हातांखालील सर्व अधिकारी वगैरे जे भेटायास येत ते त्याला आणि त्याच्या सैन्याला विश्रांति घेण्यास सांगत. **महारबाल्** ह्मणून एक घोडेस्वारांवरचा मुख्य होता त्याचें मत भिन्न होतें. तो **हानिबाल्**कडे येऊन म्हणाला 'आजच्या विजयानें आपणास काय मिळालें आहे तें तुम्हास ठाऊक आहे काय? नसल्यास मी सांगतों. आजपासून चार दिवसांनीं **रोम्** शहरांत आपण सर्व **क्यापिटॉल्**मध्यें भोजनास बसूं. मला माझ्या रिसाल्यानिशीं पुढें जाण्याची आज्ञा व्हावी. मी येतों आहें असें समजण्याच्या अगोदर मी तेथें आलों आहें असें त्यांना समजलें पाहिजे. पण **हानिबाल्**ला कांहीं आपल्या जयाची इतकी मातबरी वाटत नव्हती. त्यानें **महारबाल्**च्या उत्साहाची फार स्तुति केली पण एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल करण्यास कांहीं वेळ लागेल असें सांगितलें. हें ऐकल्याबरोबर **महारबाल्** मोठ्या आवेशानें म्हणाला 'काय करूं, देवता सर्व गुण एकाच व्यक्तीला देत नाहींत असें वाटतें. हे **हानिबाल्,** तुला जय कसें मिळवावे एवढेंच ठाऊक आहे, त्यांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा तें कांहीं इङ्गित तुला ठाऊक नाहीं.'

विचारी **हानिबाल्** हा बरोबर किंवा शूर **महारबाल्** हा बरोबर होता ह्या प्रश्नाचा निकाल कधींच होणें नाहीं. पण असें ह्मणावेंसें वाटतें कीं एवढा चतुर सेनाधिपति कीं जो कमी शूर होता असेंही नाहीं (ह्या **इटली**च्या हल्ल्याइतकें साहसाचें काम कोणतें असेल?) त्याला काय शक्य होतें काय नाहीं हें इतरांपेक्षां अधिक चांगलें समजलेंच असेल. **रोम्**चे मित्र **रोम्**ला सोडीपावेतों जय मिळेल असें त्याला वाटत नव्हतें. आणि त्या गोष्टीची खात्री झाल्याशिवाय तो उगीच पुढें जाण्याचा हिय्या करीत नव्हता. एक पराभव म्हणजे आपला समूळ नाश हें त्याला पक्कें ठाऊक होतें. **रोम्**ला व्यर्थ वेढा घालून बसणें तितकेंच धोक्याचें व अपायकारक होतें हेंही तो जाणून

होता. पण एवढें बरीक खरें कीं कधीं संधि आली ह्मणावयाचें असल्यास ती हीच होती. पुनः कांहीं **रोम्** घेण्याची संधि आली नाहीं. पुढें सांगण्यांत येईलच कीं, तो **रोम्**च्या अगदीं जवळ आला होता, पण तो छाप्यासाठीं, हल्ला करण्यास नव्हे. दोनशें सोळा सालचा भर उन्हाळ्याचा तो दिवस **कार्थे-ज्**च्या भाग्योदयाचा कळस होता असें म्हटलें असतां शोभेल. कारण जर कधीं **कार्थेज्**ला सार्वभौमत्वपद मिळवितां आलें असतें तर त्याच दिवशीं.

भाग अकरावा.

कानीनंतरचा वृत्तांत.

जरी **कानी**च्या लढाईनें **रोम्**वर चालून जाण्याइतकी कुवत आपल्या अंगांत आहे असें **हानिबाल्**ला वाटेना तथापि **कानी**च्या जयाचे परिणाम फार महत्वाचे झाले. ह्यांपैकीं सगळ्यांत मोठा सुपरिणाम म्हटला म्हणजे **इटलींत** दुसऱ्या नंबरचें शहर जें **कापुआ** त्याशीं **कार्थेज्**चा स्नेह जमला. ह्यांत **कापुअन्स्**चें एकमत होतें असें नाहीं. प्रजापक्ष हा **कार्थेज्**चे बाजूचा होता व सरदार व इतर लोक **रोम्**चे पक्षाचे होते. तरी पण ह्या चळवळींत मुख्य भाग घेणारा मनुष्य एक सरदार होता एवढेंच नव्हे तर त्याचें लग्नही **रोम्**च्या प्रख्यात **क्लाडिअस्** वंशांतल्या एका स्त्रीशीं झालेलें होतें. लोक एकदम राजसभेविरुद्ध उठले, तिची सत्ता काढून घेतली, गांवांत असलेल्या व राहावयास आलेल्या **रोमन्** लोकांना त्यांनीं ठार मारलें व **हानिबाल्**ला शहरांत बोलावून आणण्यासाठीं वकील पाठविले. **हानिबाल्** तर मोठ्या हर्षानें यावयास तयार होता; **कापुआ**चें तीस हजारांवर लष्कर होतें, तेव्हां **कापुआ** मिळणें म्हणजे त्यांत दुसरी **कानी**ची लढाई जिंकण्याचें श्रेय होतें. ज्या दिवशीं रात्रीं तो शहरांत शिरणार होता त्या दिवशीं तो मरतां मरतां वांचला; कारण त्याचें आदरातिथ्य करणाराच्या मुलानेंच त्याचा जेवतां जेवतां प्राण घेण्याचा बेत केला होता;

दुसरे दिवशीं तो राजसभेंत आला; त्यानें यथास्थित वचनें दिलीं, त्यांपासून **कापुआ इटली**ची राजधानी होई अशी व्यवस्था करण्याचें अभिवचन राजसभेला त्यानें दिलें. त्याबद्दल **रोमन्** लोकांच्या पक्षानें अतिमेहनतीनें काम करणारा एक मनुष्य आपल्या ताब्यांत मिळावा अशी मागणी त्यानें केली, त्याप्रमाणें त्या मनुष्याला पकडण्यांत आला व **हानिबाल्**नें त्याला **कार्थेज्**ला पाठवून दिलें.

मध्य **इटलीं**तील आणि दक्षिण **इटलीं**तील बहुतेक भागांनीं **कापुआ**चाच कित्ता वळविला. एका जातीशिवाय **सेम्नाईट्स्**च्या सर्व जातींनीं **रोम्**-विरुद्ध बंड केलें; तसेंच **ल्युकानिआ** आणि **ब्रुटाय्** हेंही **रोम्**विरुद्ध उठले. **क्रोटोना** व दक्षिण **इटलीं**तील इतर **ग्रीक्** शहरेंही **कार्थेज्**ला येऊन मिळालीं. जरी हीं शहरें यावेळीं मोठ्या भरभराटींत नव्हतीं तरी पण बऱ्याच वस्तीचीं व महत्त्वाचीं होतीं.

अद्वितीय एकनिष्ठता व धैर्य या गुणांनींच **रोम्**नें टिकाव धरला होता. राजसभेचें धैर्य म्हणून कधींच खचलें नव्हतें; तसेंच लोकही भीतीचा प्रथमावेग नाहींसा झाल्यावर आपल्या राजकर्त्यांना आमरण मदत करण्यास तयार होते. जरी **व्हारो**च्या घाईनें आणि मूर्खपणानें देशावर ही अनिवार्य विपत्ति आली होती तरी पण तो जेव्हां परत आला तेव्हां राजसभेचे सभासद त्याला भेटण्यास सामोरे गेले आणि अद्यापि आपल्या राज्यासंबंधानें तो निराश नव्हता म्हणून जाहीर रीतीनें त्याचे उपकार मानण्यांत आले. आपल्या विरुद्ध मताच्या मनुष्यासही सन्मान देऊन राजसभेनें असें दर्शविलें कीं सर्व **रोमन्** लोकांनीं मग ते कोणच्या कां पक्षाचे असेनात अशा समयास होईल तितकी मदत करण्यास तयार झालें पाहिजे. ज्या ज्या प्रकारांनीं सैन्य उभें करतां येईल असें वाटत होतें ते ते उपाय योजण्यांत आले. लुटारू लोकांना त्यांच्या गतापराधांबद्दल क्षमा करून फौजेंत दाखल करून घेतलें. तसेंच गुलामांनाही फौजेंत दाखल केलें. अशा रीतीनें आठ हजार शिपाई मिळविण्यांत आले. **हानिबाल्**नें सतरा पाउंडाला एक स्वार व दहा पाउंडाला शिपाई वाटेल तर परत न्यावेत म्हणून केलेली प्रार्थना मान्य करण्यांत आली नाहीं. मोठ्या प्रयत्नानें एक सैन्य तयार करण्यांत आलें व त्याचें आधिपत्य **मार्सेलस्**ला देण्यांत आलें; कारण त्या वेळच्या सर्व लोकांत तोच उत्तम शिपाई होता.

हानिबाल्नें आपला भाऊ **मेगो** यास **कानी**च्या रणांतून **कार्थेज्**ला पाठवून दिलें. त्यानें राजसभेंत प्रवेश केल्यावर आपण जें जें **इटली**त केलें होतें, ज्या चार अतिमहत्त्वाच्या लढाया जिंकल्या होत्या, जे दोन हजार लोक धारातीर्थीं पाठविले होते व जे पन्नास हजार लोक कैद केले होते त्या सर्वांचें मोठें सुरेख खुलवून वर्णन दिलें. आपण सांगितलेल्या वृत्ताचें प्रमाण म्हणून बरोबर आणलेली एक आंगठ्यांची कोथळी त्यानें राजसभेपुढें ओतली आणि म्हणाला 'ह्या मेलेल्या **रोम्**च्या शिपायांच्या हातांतील आंगठ्या होत. येथें हेंही पण सांगितलें पाहिजे कीं चांगल्या उच्च कुलांतील **रोमन्** घोडेस्वार काय ते आंगठ्या घालीत असत.' परंतु त्याच्या भाषणाचा मुख्य मथितार्थ काय तो मदत मागण्याचा होता. तत्संबंधानें तो म्हणाला 'जों जों **रोम्** घेण्याचा समय जवळ जवळ येत चालला आहे तों तों तुह्मी तुमच्या सेनाधिपतीला मदत करणें अत्यावश्य आहे. तो घरापासून इतक्या दूर अंतरांवर लढत आहे. त्याच्या सैन्यास पगार देण्यास त्याला पैसा पाहिजे; त्याला अन्नपाण्याचा पुरवठा मिळण्यासही फार संकटें पडत आहेत. जरी त्यानें मोठे मोठे विजय मिळविले आहेत, तरी पण ते कांहीं फुकट मिळाले नाहींत, त्याचें नुकसानही बरेंच झालें आहे; तेव्हां मनुष्यें, पैसा, आणि धान्य तुमच्यापाशीं मागण्याची त्याला जरूर पडत आहे तर त्याला मदत करा.' हें ऐकून लढाईच्या पक्षाच्या लोकांना खूपच आनंद झाला. त्यांपैकीं एकजण प्रतिपक्ष्याचा मुख्य **हानो** याकडे वळून त्याला खोंचून ह्मणाला 'अद्यापपावेतों **रोम्**वर स्वारी केल्याबद्दल आपणास पश्चात्तापच होत आहे काय? **हानो**नें उत्तर केलें 'होय. अझूनही मला पश्चात्ताप होतच आहे व पुनः तह झालेला पाहीतोंपावेतों तो पश्चात्ताप असाच राहील. अद्यापपावेतों तुमच्या अजिंक्य सेनाधिपतीला त्याचा पराभव झाला असतां जितकी मदत मागावी लागली असती तितकी मदत मागावी लागत आहेच. आणि त्याच्यापुढील आशांसंबंधानें मी विचारतों कीं, कोणतें तरी एखादें **ल्याटिन्** शहर त्याला येऊन मिळालें आहे काय? **रोम्**च्या पस्तीस जातींपैकीं एका तरी मनुष्यानें अद्यापपावेतों **रोम्**ची कांस सोडली आहे काय?'

ह्या प्रश्नाला 'नाहीं' शिवाय दुसरें कांहीं उत्तर देण्यास मार्गच नव्हता. **हानो**नें पुनः विचारलें कीं **रोम्**नें तहाची तरी कांहीं गोष्ट काढली आहे काय? **मेगो**ला स्पष्ट 'नाहीं' म्हणून जबाब सांगणें भागच होतें, तेव्हां **हानो** म्हणाला

मग तर आपण **हानिबालनें** पहिल्याप्रथम **इटलींत** प्रवेश केला तेव्हां लढाईच्या शेवटापासून जितकें दूर होतों तितकेंच ह्यावेळेसही दूर आहों. माझें असें मत आहे कीं ज्यापासून आपणास मुळींच कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं असली लढाई लांबविण्यासाठीं पैसा मुळींच देण्यांत येऊं नये.'

अर्थातच ह्या प्रतिसूचनेचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. राजसभेनें चार हजार शिपाई, चाळीस हत्ती आणि कांहीं थोडें द्रव्य पाठविण्याचा निश्चय केला. आणि **मेगोनें स्पेनमध्यें** जाऊन तेथें सुमारें वीस हजार फौज गोळा करून **इटलींतील** आणि तेथील सैन्यांत पडलेली उणीव भरून काढावी असाही एक ठराव झाला. पण सभेंत ठराव झाले एवढेंच कायतें; त्यासारखें कांहींएक करण्यांत आलें नाहीं. ह्या अगदीं आणिबाणीच्या वेळेला **कार्थेज्** सरकारानें मुळींच उत्साह दर्शविला नाहीं. आणि **हानिबाल्ला** बहुतांशीं स्वतःवर अवलंबून राहावें लागलें.

दोनशेंसोळा व पंधरा सालचा हिंवाळा **हानिबाल्नें** आणि त्याच्या सैन्यानें **कापुआ** येथें घालविला. **न्यूकार्थेजहून** निघाल्यापासून आजमित्तीस दोनवर्षांवर सारखे त्याचे शिपाई तंबूंत राहत असत. त्यांना जें छावणींत थोडें अन्न मिळत असे त्यावर संतुष्ट राहावें लागत असे, व **हानिबाल्ची** सक्त शिक्षा पाळावी लागत होती. अर्थातच पुनः ते जेव्हां लढाईस उभे राहिले तेव्हां त्यांच्यांत पूर्वींची शक्ति व उत्साह नव्हता यांत कांहीं संशय नाहीं. पण फक्त **कापुआंतील** एका हिंवाळ्याच्या मौजमजेनें **हानिबाल्चे** शिपाई नासून गेले व ते **हानिबाल्च्या** पराभवास कारण झालें असें म्हणण्यापेक्षां **हानिबाल्च्या** सर्व महान् महान् आशा तुटून जाव्यात याला इतर अधिक महत्त्वाचीं कारणें खचित होतीं असें म्हणावें लागतें.

दुसरे वर्षी कांहीं फारसें ह्मणण्यासारखें झालें नाहीं. **हानिबाल्ला** कांहीं थोडेसे जय मिळाले व कांहीं पराभवही झाले. **काम्पानिआंतील कापुआच्या** खालोखालचें शहर **नोला** घेण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण **मार्सेलसची** चतुराई व उत्साह यामुळें त्याला यश मिळालें नाहीं. एक वर्ष कांहीं एक पाऊल पुढें टाकल्याशिवाय घालविणें ह्मणजेच पाठीमागें हटण्यासारखें होय. तरी पण कांहीं कांहीं ठिकाणीं बरासा रंग दिसत होता.

कार्थेज्शीं वैर संपादल्याशिवाय मोठ्या चातुर्यानें **रोम्**शीं स्नेहभावानें असलेला म्हातारा अनुभवी शहाणा **सायूराक्यूस्**चा राजा **हायूरो** मरण पावला त्याच्या पाठीमागें त्याचा नातू **हायरोनिमस्** गादीवर बसला. तो वयानें लहान व अविचारी होता. त्याला वाटलें कीं ज्या बाजूची सरशी दिसते आहे त्या बाजूला मिळणें चांगलें. असा विचार करून **सिसिलीचें** सार्वभौमत्व कबूल केल्यास आपण मदत करण्यास तयार आहों असें त्यानें **हानिबाल्**ला कळाविलें. **म्यासिडोन**चा राजा **फिलिप्**ही **रोम्**च्या विरुद्धपक्षाला मदत करण्यास तयार असेलसा दिसला. पण ह्या असल्या मदतीनें कांहींएक झालें नाहीं. **हायरोनिमस्**चे पुढें काय झालें तें थोडक्यांत सांगण्यांत येणार आहेच. **फिलिप्**च्या मदतीसही फार अवधि लागला. प्रथम तर त्याचे जासूद **हानिबाल्**च्या छावणींतून परत येत असतांना **रोमन्** लोकांचे हातीं सांपडले. पाठीमागून काय झालें तें बरीक सांगतां येत नाहीं. कसेंही कां असेना ज्यावेळेस त्याची मदत **हानिबाल्**ला फार उपयोगीं पडली असती व **रोम**ला फार अपायकारक झाली असती अशा वेळेस त्यानें कांहीं-एक केलें नाहीं.

उलटपक्षीं त्यांच्या प्रतिपक्ष्यांनीं **सार्डिनिआ**चें बेट जिंकून पूर्णपणें कबज्यांत घेतल्यानें **कार्थेज्**चें फार नुकसान झालें. एकंदरींत दोनशें पंधरा सालच्या अखेरीस जरी **हानिबाल्**चा कोठें समरांगणांत पराभव झाला नाहीं तरी त्याची स्थिति वर्षाच्या आरंभापेक्षां वाईटच होती असें म्हटलें पाहिजे.

दोनशें चवदाचें सालही मागील सालाप्रमाणेंच गेलें. **हानिबाल्**नें **टारन्टम्** घेण्याचा प्रयत्न केला पण फुकट गेला. ह्या शहरांतही इतर शहरांप्रमाणें दोन तट होतेच, एक **कार्थेज्**कडचा व दुसरा **रोम्**कडचा. **रोम्**कडच्या बाजूला दुसऱ्या बाजूचा बेत कळून आल्यामुळें त्यांनीं अशी व्यवस्था ठेविली होती कीं, **हानिबाल्** जों त्यांच्या तटाजवळ येतो तों शहर बचावाचा प्रयत्न करण्यास तयार होतें. कांहीं थोडे दिवस आसपास राहून त्याला निघून जावें लागलें. **इटली**च्या दक्षिण भागांत त्याचें एक मोठें नुकसान जाहलें. त्याच्या एका सरदारानें सुमारें वीस हजार **ल्युकेनिअन्** लोक गोळा केले होते. त्यांचा **रोमन्** सरदार **ग्राकस्**नें एक गुलामांची फौज घेऊन पराभव केला. **हानो**ची सर्व **ल्युसिनिअन्** फौज लढाईत मारली गेली अथवा ते लोक घरीं पळून

गेले असतील. **हानो** बरीक स्वतः आपले हजार **आफ्रिकन्** घोडेस्वारांनिशीं बचावला गेला.

लढाईतील पुढील बिना **हानिबाल्**ला बऱ्याच नफ्याची होती. **टारन्टम्** येथील **कार्थेज्**च्या पक्षाचा पाडाव झाला असें मागें सांगितलेंच आहे. पण तो तेवढ्या वेळेपुरताच होता; त्यांचे आंतून बेत चाललेच होते व त्यांना आपले बेत साधून घेण्यास संधिही सांपडली. शहरांतून कांहीं लोक **रोम्**कडे ओलीस पाठविण्यांत आले होते. त्यांनीं पळून जाण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्यांना कैद करून फांशीं देण्यांत आलें होतें. ह्या निर्दयपणानें शहरांतील लोकांचीं मनें फार क्षुब्ध होऊन गेलीं होतीं. **हानिबाल**शीं त्यांनीं एकदम बोलणें सुरू केलें. ह्यावेळेस प्रजापक्षाचे लोक कांहीं प्रमुख नव्हते; कांहीं सरदारांनीं आपण होऊनच हें करण्याचें मनांत आणलें होतें; बहुतकरून हे सरदार मारले गेलेल्या लोकांचे आप्त वगैरे असतील. **हानिबाल्** सुमारें दहाहजार निवडक फौज घेऊन **टारन्टम्**कडे निघाला; व शहरांतील आपल्या पक्षाच्या लोकांची सर्व तयारी होई तोंपावेतों कांहीं मैलांवर तळ देऊन राहिला. आंतील लोकांनीं सुभेदाराला अडकवून ठेवण्याकरितां एक टोळी पाठविली. हा सुभेदार **लिव्हि-अस्**च्या घराण्यांतील एक **रोमन्** होता. तो ते दिवशीं आपल्या मित्रांना मेजवानी देत होता. मेजवानी झाल्याबरोबर ही टोळी आंत शिरली; त्याच्याशीं हे टोळींतील लोक हंसले, बोलले, खूप थट्टा केली व त्याला अशा वेळेस मोकळा सोडला कीं ज्या वेळेस त्याच्या चौकसपणाचा किंवा दूर-दर्शित्वाचा कांहींएक उपयोग झाला नव्हता. दुसऱ्या एका टोळीनें **हानि-बाल्**ला दरवाजा उघडून आंत घेण्याची तजवीज केली होती. बहुतेक **ग्रीक** शहरांत कबरस्थान शहराच्या बाहेर राखण्याची चाल असे तरी पण **टारन्टम्**चें कबरस्थान शहरांत तटाला लागूनच होतें. जो दरवाजा **हानिबाल**ला खुला करून द्यावयाचा ठरला होता तो ह्या कबरस्थानांतच होता. **हानिबाल्**नें बाहेरून निशाणी दाखल जाळ केल्याबरोबर ही टोळी दरवाज्यांतील रखवाला-वर तुटून पडली; तितक्यांत त्यांच्या मदतीस **हानिबाल्** येऊन पोहोंचला. तिसरी एक टोळी दुसऱ्या एका दरवाजावर गुंतली होती. ह्या टोळींतील लोक पुष्कळ दिवस अगोदर शिकारीला ह्मणून गांवाबाहेर जात असत, परत बरीच रात्र झाल्यावर येत असत; मग रखवाल्याबरोबर शिकारी संबंधानें गप्पा ठोकीत बसत असत व जातांना त्यांना पकडलेल्या शिकारीचा कांहीं अंश

देत असत, त्याविशेष दिवशीं त्यांनीं एक सुंदर रानडुकर पकडून आणलें होतें, जेव्हां ते लोक दरवाजांतून तें न्यावयास लागलें व रखवालदार जनावराची फार उत्सुकतेनें वाखाणणी करण्यांत गुंतले तोंच दडून बसलेले तीस **आफ्रिकन्** शिपाई एकदम त्यांच्यावर धांवले; त्यांनीं त्या सर्वांनां कापून टाकून दरवाजा कबज्यांत घेऊन आपले पुष्कळ लोक आंत घेतले. **टारन्टम्** शहर एकदम ताब्यांत आलें; पण **रोमन्** लोकांनीं हुशारी व जलदी करून किल्ला वांचविला. **टारन्टाईन्** लोकांना बिलकूल इजा करण्यांत आली नाहीं. कोणीही आपल्या घरावर 'हें **टारन्टाईन्**चें घर आहे' असें लिहून ठेविलें कीं मग त्याला कोणी इजा करीत नसे. पण **रोमन्** लोकांचीं घरें वगैरे ज्या भागांत होतीं तो भाग सफई लुटण्यांत आला.

भाग बारावा.

भाग्याचा परिवर्त.

ट्रेबिआच्या लढाईपासून तों **कानी**पावेतों **हानिबाल्च्या** भाग्याचा उदय होत होता असें म्हटलें तरी चालेल. **कानीच्या** पुढें तीन एक वर्षें तें जसेंच्या तसेंच होतें; कारण त्या अवधींत त्याचे विजय आणि पराभव बहुतेक सारखेच जाहले. पण त्याचा खरा अर्थ असा कीं, त्याच्या विजयाचा तितका संभव कमी झाला होता. त्याचें महत्कृत्य अशा स्वरूपाचें होतें कीं त्याचा पराभव न होतां तें जरी अवधींवर पडलें तरी तें त्याला घातकच होतें.

दोनशें बारा सालीं तर लढाईचा रोंख स्पष्ट फिरल्यासारखा दिसूं लागला. **रोमन्** लोकांना **कापुआ**ला वेढा घालण्यापुरती आपणांत शक्ति आहे असें वाटूं लागलें; व त्यांनीं वेढा घातला. शहरांत अन्न व धान्य नसल्यामुळें अगोदरच दुष्काळ पडला होता; कारण **रोमन्** लोक इतक्या जवळ आल्यामुळें **काम्पानिआ**च्या सुपीक जमिनीही करतां आल्या नाहींत. **हानिबाल्नें** आंतील लोकांना धान्याचा पुरवठा करण्याचा एकदा प्रयत्न केला; त्यांत त्याला यश आलें नाहीं. पुनः एकदा त्यानें यत्न केला त्यांत यश आलें; पण थोड्याच मुदतींत सर्व शहर शत्रूंनीं घेरून घेतलें. तीन **रोमन्** सैन्यें शहराच्या भोंवतालीं बसलीं. त्यांनीं शहराभोंवतीं अगदीं सारखा गराडा घातला व आपणाभोंवतीं

एक मजबूत तट बांधून त्याच्या भोंवतालीं मोठा थोरला खंदक खणला. शहरांतील लोकांना या **रोमन्** लोकांवर चालून जाण्याचें सामर्थ्य नव्हतें. ते फक्त **हानिबाल्**कडे जासूदावर जासूद पाठवीत व 'आम्ही मरूं नये अशी इच्छा असल्यास आम्हांस सत्त्वर मदत पाठवा, अशा मोठ्या कळवळ्यानें विनवण्या करीत. कांहीं थोडे महिन वेढा तसाच राहूं दिल्यावर दोनशें अकरा सालाच्या आरंभास त्यानें शहर वांचविण्याचा एक निश्चयाचा प्रयत्न केला. **टारन्टम्** येथील **रोमन्** लोकांनीं अद्याप किल्ला सोडिला नव्हता. तेव्हां **हानिबाल्** एकदम तेथून अगदीं निवडक सैन्य घेऊन बाहेर निघाला. तो **कापुआ**च्याजवळ **टिफाटा**च्या टेंकडीवर सैन्यासह चढून बसला. तेथून त्यानें **कापुआ**च्या लोकांना आपण आल्याची वर्दी पोहोंचविण्याची योजना केली व आपण **रोमन्** लोकांच्या छावणीवर हल्ला करतों तोंपावेतों आंतून तुम्ही चालून येण्याची व्यवस्था करा अशी वर्दी पोहोंचविली. पण ह्या आंतील लोकांच्या चालून जाण्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. शत्रूंनीं त्यांना अगदीं अनायासें हांकून लावलें. **हानिबाल्**च्या हल्ल्याला यश येईल असें बराच वेळ वाटत होतें पण शेवटीं त्याचाही पराभव झाला. त्याचे जे तेहेतीस हत्ती होते त्यांनीं **रोमन्** छावणींत शिरून लोकांना अगदीं घाबरवून सोडलें. व घोडे तर ह्या जनावरांना पाहून घाबरून गेल्यामुळें चहूंकडे पळत सुटले. ह्या सर्व गोंधळामध्यें "अहो शिपाई हो तुम्ही होईल तसें करून डोंगराचा मार्ग सुधरा, आपली छावणी गेली; आतां ज्याचा त्यानें प्राण वांचविला पाहिजे." अशा तऱ्हेच्या आरोळ्या जिकडे तिकडे सैन्यांत ऐकूं यावयास लागल्या. ह्या आरोळ्या **ल्याटिन** भाषेंत व **कॉन्सल्**च्या नांवानें निघत होत्या; पण खरोखर **हानिबाल्**चे लोकच हे असे शब्द उच्चारीत असत. **हानिबाल्**च्या ज्या लढाई जिंकण्याच्या बहुत युक्त्या असत त्यांपैकींच ही एक असे; जरी ही युक्ति मोठी चतुराईची होती तरी पण त्याचा कांहीं-एक उपयोग झाला नाहीं.

मग त्यानें शेवटची एक युक्ति योजून पाहिली. त्यानें **रोम्**वर हल्ला करण्याचा बेत केला. एवढी थोरली फौज वेढ्याकडे गुंतल्यावर **रोम्**च्या संरक्षणाला फारच थोडे लोक असतील व अतित्वरा केल्यास आपला शहराचे आंतसुद्धां प्रवेश होईल असें त्यास वाटलें. निदान एथील तरी कांहीं फौज राजधानीच्या बचावासाठीं तिकडे जाईल. ह्या आपल्या बेताचें सर्व रहस्य

कापुआच्या लोकांना त्यानें कळविलें व ह्या रीतीनें त्यांना टिकाव धरण्यासाठीं उत्तेजन दिलें. उत्तर **काम्पानिआ**च्या द्राक्षाच्या प्रदेशांतून लुटीत लुटीत तो निघाला. **फ्रेजिली** शहराजवळचा **लिरिस** नदीवरचा पूल पडलेला दिसला त्यामुळें तेथें त्याचा बराच विलंब झाला. **लेशिअन्** प्रांतांत जाऊन **अनेग्निआ** शहरांतून **अलिगडस्** पर्वताकडे तो गेला. **टस्क्युलम्** शहर घेण्याचा वृथा प्रयत्न करून तो उत्तरेकडेस चालूं झाला आणि आपला तळ **रोम्** शहरापासून आठ मैलांवर त्यानें दिला. इतक्या अवधींत **फालिविअस्**ही (**कॉन्सल्**) पंधरा हजार सैन्य घेऊन **कापुआ**हून येऊन पोहोंचला. आपल्याला अनुकूल अशा प्रदेशांतून जावयाचें असल्यामुळें व ज्या ज्या शहरावरून तो गेला त्या त्या शहरीं वाटेल तें मिळत गेल्यानें तो **कार्थेजिनिअन्** सैन्याच्या आधीं येऊन पोहोंचला तरी पण शहरांतील लोकांना धाक अतिशय वाटला. बायका देवालयांत धांवून गेल्या व आपले लांब केश मोकळे सोडून संरक्षणासाठीं देवाची आराधना करून त्याचें साहाय्य असावें म्हणून साष्टांग नमस्कार घालूं लागल्या. दुसरे दिवशीं **हानिबाल्** त्याहूनही नजीक आला. **रोम्**पासून तिसऱ्या मैलावर **आनिओ**च्या किनाऱ्यावर त्यानें आपली छावणी उभारली, आणि आपल्याबरोबर दोन हजार घोडेस्वार घेऊन शहराच्या दक्षिण बाजूच्या तटाची टेहेळणी करण्यास चालूं झाला. तिसरे दिवशीं सर्व फौजेसह **आनिओ**नदी ओलांडली आणि लढाई करण्यास सिद्ध झाला; पण शहरांतून लढाईला कोणीच आलें नाहीं. **लिव्हि**नें लिहिलें आहे कीं ते दिवशीं आणि दुसरे दिवशीं सैन्य समरांगणांत उभें राहिल्याबरोबर अशा पावसाच्या सरी आल्या कीं रणांत कोणासही उभें राहणें शक्यच नव्हतें; आणि शिपाई आपल्या छावणींत गेले मात्र तोंच पाऊस अगदीं उघडला एवढेंच नाहीं तर आकाश अगदीं स्वच्छ झालें; त्यावरून **हानिबाल्** मोठ्यानें ह्मणाला 'अशी एकदां वेळ आली होती कीं जेव्हां हें शहर घेणें किंवा न घेणें इच्छेवर अवलंबून होतें आणि आतांच तें दैवाधीन झालें आहे.' तो इतका जवळ असतांना **रोमन्** लोकांना कांहींएक वाटत नसे. याचीं दोन प्रत्यक्ष उदाहरणें पाहून त्याची फार निराशा झाली. पहिली गोष्ट त्याच्या कानावर आली ती ही कीं तो इतका जवळ असतांना शहरांतले शिपाई **स्पेन्**मधील सैन्याला मदत करण्यासाठीं म्हणून भराभर पाठविण्यांत येत होते; दुसरी गोष्ट कीं त्याची ज्या जागेवर छावणी होती त्या जागेला सुद्धां अशा समयीं गिऱ्हाईक सांपडलें. ह्या दोन

उपमर्दासाठीं—कारण त्याच्या मनाला तरी ते उपमर्दसे वाटले—त्यानें शहराबाहेरील सावकाराच्या सर्व दुकानांचा लिलाव करण्याचा हुकूम केला; पण एकंदरीनें त्याचा सर्व बेत फसल्यासारखा झाला; त्यामुळें तो **काम्पानिआ**कडे परत वळला आणि तेथूनही दक्षिण **इटली**कडे चालता झाला.

अशा रीतीनें **कापुआ** अगदीं निराश्रय झाल्यामुळें त्यास **रोम्**ला शरण जाण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. **रोम्**नें त्यांना काय शिक्षा केली त्याची सविस्तर माहिती येथें देण्याची आवश्यकता दिसत नाहीं. उच्च कुलांतील सर्व लोकांना फांशीं देण्यांत आले व इतर लोकांना गुलाम करण्यांत आले. त्यांच्या ह्या दुर्दशेसंबंधानें सुमारें वीस वर्षांनंतर एका नाटकांत अतिगर्ह्य विनोद करण्यांत आला होता. तेथें एक पात्र दुसऱ्या पात्रास एका वाईट हवेच्या प्रदेशासंबंधानें बोलतांना म्हणतें—"तेथें एखादा **सिरिअन्**ही आणि **सिरिअन्** गुलाम अतिशय कणखर असत—सहा महिने सुद्धां राहूं शकत नाहीं" त्याला दुसरा प्रत्युत्तर करतो. "हा वेळपावेतों **सिरिअन्** लोकांपेक्षांही अधिक हाल सोसण्यास **काम्प्यानिआ**चे लोक तयार झाले आहेत."

इटलीसंबंधानें पाहूं गेलें असतां २१० वर्ष फारसें कांहीं महत्त्वाचें नव्हतें. (आतां ह्यापुढें **सिसिली** आणि **स्पेन्**ची थोडीशी हकीगत सांगितली पाहिजे.) प्रत्यक्ष रणांगणांत कंबर बांधून **हानिबाल्**चा पराभव **रोम्**ला कधींच करतां आला नाहीं. त्याच्या समोर उभें राहण्याचीही शक्ति **रोमन्स्**पैकीं एकाला देखील नव्हती. **इटली**च्या ह्या टोंकापासून त्या टोंकापावेतों वाटेल तसा तो फिरत होता, पण त्याला कोणी आड येण्यास सुद्धां समर्थ नव्हतें, हें तर त्यानें प्रत्यक्ष रीतीनें दाखविलें होतें; तो आपल्या सैन्याच्या तुकड्या लूट आणावयास म्हणून प्रत्यक्ष **रोम्**च्या तटापावेतों खुशाल धाडीत असे. पण एक शहर जें त्याच्या पक्षाला आलें होतें तें कांहीं त्याला समयास वांचवितां आलें नाहीं. तेव्हां अर्थातच दुसऱ्या कोणत्याही शहरास त्याच्या पक्षाला मिळण्याची इच्छा कशी व्हावी? **कापुआ**च्या नाशानें फक्त **कापुआ**सारखें बलाढ्य शहर गेलें एवढेंच नव्हे तर त्यानें हवे तितके प्रयत्न केले असतांही त्याला तें वांचवितां आलें नाहीं. ह्या गोष्टीनें त्याच्या अब्रूस मोठा धक्का बसला. त्याच्या अंगीं सेनाधिपत्याचें चातुर्य कितीही होतें—तें तर जशी जशी

लढाई अधिक अधिक जोरानें चालली तों तों अधिकच दिसून येऊं लागलें–तरी पण त्याची शक्तीच कमी होती असें दिसून आलें.

सिसिलींतील वृत्तांचा ओघही **कार्थेज्**च्या विरुद्धच होता. वृद्ध, शहाणा, धूर्त **हायरो** मेल्यानंतर गादीवर बसलेला मूर्ख **हायरोनिमस्** याला **रोम्**च्या पक्षाला सहाय्य करणारानें कोणी ठार मारलें. तदनंतर एकसारखी क्रूर कृत्यांची मालिकाच तेथें सुरू झाली असें ह्मणावें लागतें. येथेंही इतर ठिकाणाप्रमाणें दोन पक्ष होतेच. एक **कार्थेज्**कडचा व दुसरा **रोम**कडचा. ह्या दोन तटांमध्यें मोठा बखेडा सुरू होऊन मोठी लढाई झाली; त्यांत **कार्थेज्**चे पक्षाचा विजय झाला व **सायराक्यूस् कार्थेज्**ला येऊन मिळालें. हें पाहून **रोम्**च्या सैन्यानें त्याला वेढा दिला. **रोम्**चा सरदार **एपिअस् क्लाडिअस्** हा लष्करावर होता व **मार्सेलस्** हा आरमारावर मुख्य होता. ह्या वेढ्याची सर्व हकीगत येथें सांगणें अप्रस्तुत होईल. **आर्किमिडीस्**नें आपल्या चातुर्यानें शहराच्या बचावाचा प्रयत्न किती वेळपर्यंत केला वगैरे सर्व गोष्टी अतिमनोहर आहेत व त्या दुसऱ्या इतिहासांतून सांपडतीलच. **कार्थेज्**चा ह्या नव्या मित्राला बचावण्याचा प्रयत्नही फुकट गेला. **हिमिल्को**च्या हाताखालीं पुष्कळ सैन्य होतें व **रोम्**च्या ताब्यांत आलेल्या शहरांना ज्या क्रूरतेनें **रोम्**नें वागविलें होतें ती क्रूरता पाहून इतर शहरांनींही **हिमिल्को**लाच मदत करण्याचा निश्चय केला. त्यामुळें त्याकडे इतर सैन्यही बरेंच होतें. पण **रोमन्** रांगा कांहीं ह्या सैन्याच्यानें भेदून टाकवल्या नाहींत. तेव्हां **हिमिल्को**नें ह्या **रोमन्** सैन्याला वेढून घेण्याच्या हेतूनें त्यांच्याभोंवतीं आपल्या सैन्याचा तळ ठोकला. पण ह्या **हिमिल्को**च्या सैन्यांत वाखा सुरू झाला. तो इतका कीं त्याठिकाणीं प्रेतांचे ढीगचेढीग पडले व सर्व सैन्य तेथच्यातेथेंच मेलें. **बोमि-ल्कार्**च्या हाताखालील आरमाराचाही कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यांनीं शहर बचावण्याचा प्रयत्न सुद्धां केला नाहीं. जरी एकशें तीस जहाजें त्यांच्यांशीं होतीं, तरी पण **रोमन्स्**वर हल्ला त्यांनीं केला नाहीं एवढेंच नव्हे, तर **सायराक्यूस्**च्या बंदरांत शिरण्याचा प्रयत्न करण्याच्या बदली ते **टारन्टम्**कडे निघून गेले. दोनशें बारा सालीं **मार्सेलस्**नें **सायराक्यूस्** घेतलें.

हानिबाल् सिसिलींची आशा सोडण्यास नाखुष होता तेव्हां त्यानें सैन्याचें आधिपत्य करण्यासाठीं **लिबिफिनिशिअन्** ह्मणजे अर्ध **कार्थेजि-**

निअन् जातीचा **म्यूटिनिस्** नांवाचा मनुष्य पाठविला. **म्युटिनिस्**नें **आग्रिजेन्टम्** आपलें ठाणें केलें व तेथून लुटण्यासवरण्यास टोळ्या पाठवून बरेच महिने लढाई सुरू ठेविली होती. ह्या मनुष्याच्या नेमणुकीनें सेनाधिपति **हानो** व इतर **कार्थेज्**चे सरदार यांस फार राग आला. त्यांनीं ह्याला काढून टाकलें व **हानो**नें आपल्या मुलाला सेनाधिपति केलें ह्या अपमानामुळें **म्युटिनीस्**ची देशपरायणता जागच्या जागींच राहिली व हा त्याचा अपमान पाहून त्याच्या हाताखालील **न्युमिडिअन्** लोकांना फार क्रोध आला. त्यांनीं एकदम **रोमन्** सरदार **लिव्हिनस्** यांशीं बोलणें लाविलें. त्या अनुरूप **आग्रिजेन्टम्**वर एक सैन्य पाठविण्यांत आलें. **न्युमिडिअन्** लोकांनीं दरवाजावरच्या रखवालदारांस ठार मारून दरवाजा उघडून **रोमन्** शिपायास आंत घेतलें. सेनाधिपति बदलण्या वगैरे संबंधानें व्यवस्था करण्यास **हानो** येत होता तों त्याला कांहीं गडबड आहेसें समजलें. **न्युमिडिअन्** लोकांचा कांहीं तरी दंगा असेल असें समजून तो स्थिरस्थावर करण्यास तेथें गेला. इतक्यांत त्याला खरें काय तें समजलें. त्याला आपले प्राण वांचविण्यास कशी तरी संधि मिळाली. **लिव्हिटस्**नें **आग्रिजेन्टम्**च्या मुख्य मुख्य लोकांना ठार केलें व इतरांना गुलाम करून टाकलें. त्यानें **कार्थेज्**ची बाजू घेतलेल्या सहासष्ठ शहरांपैकीं सहा जिंकून घेतलीं; वीस लुच्चेगिरी करून घेतलीं व बाकीचीं आपल्या आपण वश झालीं. दोनशें दहा साल पुरें होण्याच्या अगोदर **सिसिली** बेट सर्वस्वी **कार्थेज्**चे हातचें गेलें.

स्पेन्मध्यें इतक्या थराला गोष्ट येऊन पोहोंचली नव्हती. पण तिकडेसुद्धां दिशा तीच होती. **हानिबाल्**नें आपला भाऊ **हस्ड्रुबाल्** यास सेनाधिपति नेमून तेथें ठेविला होता हें मागें सांगितलेंच आहे. **निअस्** आणि **पब्लिअस् सिपिओ** हे दोघे बंधु व **हस्ड्रुबाल्** यांच्यामध्यें निरनिराळ्या परिणामाच्या पुष्कळ लढाया आज कितीएक वर्षें चालल्या होत्या. **पब्लिअस्** जेव्हां **इटलींत** गेला तेव्हां **निअस्** एकटाच तेथें होता. त्यानें मोठमोठे विजय मिळविले असें **लिव्हि** सांगतो. पण हें येथें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं कीं हे सर्व **रोमन्** इतिहासकार **रोमन्** सरदाराला मोठे मोठे विजय देतात; पण त्या विजयाचे परिणाम कांहींच दृष्टोत्पत्तीस येत नाहींत; यांत दुःखाची गोष्ट ही कीं आपणास दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचा आधार नाहीं; तेव्हां अर्थातच ह्याच इतिहासावरून गोष्ट सांगणें आवश्यक आहे. एवढेंच

कीं जेवढें विश्वसनीय या ग्रंथांतून दिसेल तेवढेंच घेण्याचें आपल्या हातांत आहे. दोनशें अठरा सालीं **इब्रो** आणि **पिरिनीस्** मधील प्रांतावर ज्याचा अंमल होता त्या **हानोशीं नीअस् सिपिओनें** लढाई केली, त्याचा पराभव केला, त्याला कैद केला व त्याच्या सर्व सैन्याचा नाश केला. शिपायांना त्याच्या लष्करांत खूप लूट सांपडली ; कारण **हानिबाल्**ला जें कांहीं बरोबर नेतां आलें नाहीं तें सर्व त्यानें तेथेंच टाकिलें होतें. **हस्ड्रुबाल्** आपल्या मित्राच्या मदतीस धांवला ; पण आपणांस फार उशीर झाला असें समजलें तेव्हां **इब्रो**नदी ओलांडून पुनः परत आला. **टाराको** येथें हिंवाळा घालवून दुसरे वर्षीं **नीअस्**नें **कार्थेज्**चे फौजेचा **इब्रो**च्या मुखाशीं पराभव केला. तदनंतर थोड्याच मुदतींत **पब्लिअस्** परत आला व दोघां बंधूंनीं मिळून पुष्कळ वर्षें लढाई चालविली. पहिल्याप्रथम त्यांनीं **स्यागन्टम्**वर कूच केलें. तेथें **स्प्यानिश्** लोकांनीं **कार्थेज्** सरकाराला ओलीस दिलेले लोक एका किल्ल्यांत ठेविलेले होते. **सिपिओनें** त्या किल्ल्याच्या अधिकाऱ्याला आपल्याकडचा करून घेऊन लबाडीनें कैदी आपल्या ताब्यांत घेतले व त्यांना आपापल्या घरीं पाठवून दिलें. ह्या कृत्यानें त्यांनीं **स्प्यानिश्** लोकांची बरीच प्रीति संपादन केली. दोनशें सोळा सालीं त्यांनीं **इब्रो**च्या कांठावर **हस्ड्रुबाल्** आणि इतर **कार्थेज्**चे सरदारांनीं वेढून घेतलेलें **इलिटर्गिस्** शहर सोडविलें. **रोमन्** लोकांची सोळा हजार फौज होती ; **कार्थेज्**ची साठ हजार होती ; पण **रोमन्** लोकांचाच विजय झाला. **रोमन्** लोकांनीं आपल्या सैन्यापेक्षां अधिक सैन्य मारलें व तीन हजार लोक, तीन हजार घोडे (**लिव्हि** मोठ्या चौकसपणानें संख्या सांगतो!) आठ निशाणें आणि नऊ हत्ती कैद केलें. पुढें **इन्टिबिलस्**कडे जाऊन **सिपिओनें** आणखी एक लढाई केली. त्यांत तेरा हजार लोक मारले, व दोन हजार लोक कैद केले, चाळीस निशाणें हिरावून घेतलीं व नऊ हत्ती पकडून घेतले. ह्या सर्व विजयांचा परिणाम असा झाला कीं सर्व **स्पेन् रोमन्** लोकांच्या ताब्यांत आलें. असा वृतांत **लिव्हीनें** लिहिलेला आहे पण आपणास माहीत आहे कीं **स्पेन्** घेण्यासाठीं दोनशें चौदासालीं **रोम्**ला आणखी दोन मोठ्या लढाया जिंकाव्या लागल्या.

एवढें बरीक खातरीनें सांगतां येतें कीं, ह्या सर्व अवधींत व दोनशें तेरा व बारा सालीं विजयाचा ओघ **रोमन्** पक्षाकडे होता आणि हें **रोम्**चें वर्चस्व **न्यूमिडिअन्** राजा **सिफाक्स्** यानें **कार्थेज्**शीं लढाई मांडल्यामुळें

हस्डुबाल् बार्काला जेव्हां **कार्थेज्**कडे परत बोलावून नेण्यांत आलें तेव्हां तर फारच वाढलें. **सिपोओनें सिफाक्स**कडे वकील पाठवून कळविलें कीं, ह्या वेळेस **कार्थेज्**शीं वैर चालू ठेविलें तर आह्मी आतां मदत करूं व पुढें कांहीं बक्षीस देऊं. त्या वकिलांपैकीं एक **सिफाक्स्**च्या फौजा तयार करण्यास तेथेंच राहिला. **सिफाक्स्**चा शेजारी आणि शत्रु जो राजा **गाला** तो **कार्थेज्**ला येऊन मिळाला. ह्या **गाला**चा **म्यासिनिसा** नांवाचा सतराच वर्षांचा मुलगा होता. तो जरी लहान होता तरी पण विलक्षण बुद्धीचा होता त्यावरून त्याला त्याचे बापाचे सैन्याचा व **कार्थेज्**च्या सैन्याचा सेनाधिपति नेमण्यांत आला. त्यानें **सिफाक्स्**च्या सैन्याचा एकाच लढाईंत पण असा पराभव केला कीं, **सिफाक्स्**ला पुनः डोकें वर करण्यासही शक्ति राहिली नाहीं.

आतां **हस्डुबाल्**ला पुनः **स्पेन्**मध्यें परत यावयास सांपडलें. बरोबर बरीच फौज आणली व हाताखालीं दोन **लेफ्टेनेन्ट्** अथवा मुख्य सरदार, **गिस्को**चा मुलगा **हस्डुबाल्, हानिबाल्**चा सर्वांत धाकटा भाऊ **मेगो** व **म्यासिनिसा,** इतके आणिले. ह्यानंतर युद्धाचा ओघ पुनः फिरूं लागला असें दिसलें. **सिपिओनें स्पेन्**चा विजय पूर्ण करण्याच्या हेतूनें आपल्या सैन्याच्या मदतीला ह्मणून सुमारें वीस हजार **स्प्यानिश्** सैन्य मिळविलें. **कार्थेज्**चीं तीन सैन्यें युद्धाला तयार आहेत असें पाहून आपल्या सैन्याचेही भाग करण्याचें त्यानें योजिलें. **पब्लिअस्** दोन तृतीयांश सैन्य घेऊन **हस्डुबाल् गिस्को,** आणि **मेगो** यांच्याशीं लढणार होता व **नीअस् हस्डुबाल् बार्का**शीं लढणार होता. **पाब्लिअस्**नें जेव्हां शत्रु **स्प्यानिश्** लोकांचें सैन्य गोळा करीत आहेत असें ऐकिलें तेव्हां एकदम शत्रूवर चालून जाण्याचा निश्चय केला. व निघाला इतक्यांतच **म्यासिनिसा**नें आपले हलक्या हत्यारांचे घोडेस्वार घेऊन त्यांवर हल्ला केला. तो जों याशीं सामना करण्यास पाठ फिरवीत आहे तोंच **कार्थेजिनिअन्**नीं त्याच्या पिछाडीवर हल्ला केला. तो स्वतःच लढाईच्या आरंभीं पडला तो मेल्यानंतर त्याचे सैन्यानें पळ काढला; पण **आफ्रिकन्** घोडेस्वार व तितकेच चपळ **कार्थेज्**चे शिपाई पाठलाग करणारे असल्यामुळें त्यांना मुळींच पळून जावयास सांपडलें नाहीं. छावणी व त्याच्या संरक्षणार्थ ठेवलेली फौज बरीक सुरक्षित होती.

नीअस्ही आपल्या भावापाठीमागें फार दिवस वांचला नाहीं; त्याच्या **स्प्यानिश्** दोस्तांनीं शत्रूपासून लांच घेऊन त्याला सोडलें. शत्रूच्या तीन सैन्यांशीं लढण्यास कायतो तो एकटाच होता. त्यानें एक उंचवटा पाहून त्यावर आपलें सैन्य उभें केलें. पण ती जागा रक्षण करण्यास फार कठीण होती; चढण अतिशयच सोपी होती; कांहीं भिंत किंवा अडोसा करण्यास लांकूडफाटेंही जवळ नव्हतें, मातीचे ढीग अडोशासाठीं करावे तर माती सुद्धां नव्हती. शिपायांनीं आपल्या घोड्यांचीं व तट्टांचीं जिनें व इतर सामान याचा थोडासा उंचवटा केला; पण तो कितीवेळ टिकणार? शत्रूंनीं त्याचे लागलीच तुकडे उडवून दिले. बऱ्याच शिपायांनीं दुसऱ्या टोळीच्या छावणींत पळत जाऊन आपला बचाव केला; पण सेनाधिपति बरीक तेथेंच समरांत पडला. तो सारा आपल्या भावाच्या पाठीमागें एकोणतीस दिवस जिवंत होता. त्याच्या खालचा सैन्याचा मुख्य अधिकारी **ल्युसिअस् मार्सिअस्** यानें होतें तें **रोमन्** सैन्य कसें तरी राखून ठेविलें व कांहीं थोडे जुजबी हल्लेही शत्रूवर केले. **क्लाडिअस् नीरो** ह्मणून **रोम्**हून आधिपत्य घेण्यास मनुष्य धाडला होता, पण त्याच्यानें कांहीं फारसें झालें नाहीं. **नीरो** आणि **हस्ड्रु-बाल्** यांच्या संबंधानें **लिव्हिनें** एक चमत्कारिक गोष्ट नमूद करून ठेविली आहे ती अशी:—"एके समयीं **हस्ड्रुबाल्** हा सर्व बाजूनें घेरला गेला व त्याला शत्रूंनीं पकडलें तेव्हां त्यानें **स्पेन्** मोकळें करून देण्याचें कबूल केलें; त्यानें **रोमन्** सरदाराला तहाच्या वगैरे शर्ती बोलून व इतर गोष्टींनीं अगदीं गार करून सोडलें व तेवढ्या अवधींत आपलें सैन्य व आपण बाहेर निघून जाण्याची सर्व व्यवस्था केली. **नीरो** जों तहाचें बोलणें मोडलें ह्मणून पाहा-वयास आला तों छावणींत कोणी नाहीं." दोन्ही **सिपिओ** दोनशें अकरा सालीं मरण पावले असावे.

दुसऱ्याच वर्षी **पब्लिअस्**चा मुलगा ज्यानें आपल्या बापाचा जीव **टिसि-नस्** येथें वांचविला होता असें आपण मागेंच पाहिलें आहे तो **स्पेन्**चा सेनाधिपति होऊन आला. येथील सेनाधिपति होण्यास कोणी इच्छित नसे. जेव्हां **रोम्**मध्यें या जागेच्या संबंधानें निवडणूक करण्यांत आली तेव्हां कोणीही उमेदवार उभा राहिला नाहीं. शेवटीं तरुण **सिपिओ** पुढें आला; त्याचें वय सारें चोवीस वर्षांचें होतें ह्मणजे **रोम्**मध्यें कोणतेंही काम करण्यास तो अद्यापि

योग्य नव्हता. तरी पण लोकांनीं त्याला मोठ्या आनंदानें कबूल केलें. त्याचा मोठा मान, त्याचा मनोहर चेहेरा, शरीराचा नेटस बांधा व त्याची अत्याल्हाद-जनक वागणूक यांहीं तो लोकांस फार पसंत झाला. जेव्हां त्यानें **स्पेन्** तर काय पण **कार्थेज्** सुद्धां जिंकून येतों असें म्हटलें तेव्हां इतर कोणी मनुष्याचें असलें म्हणणें ज्या लोकांनीं थट्टेंत काढलें असतें त्यांनींच ह्या तरुण पुरुषाचें हें म्हणणें मोठ्या आनंदानें स्वीकारलें व तो एकमतानें सेनाधिपति निवडण्यांत आला.

त्यानें आपल्या मोहिमेला आरंभच एक मोठें कृत्य करून केला. तें काय तर **कार्थेज्**ची **स्पेन्**कडील प्रांताची राजधानी **न्यूकार्थेज्** त्यानें घेतली. तो **स्पेन्**मध्यें आला हें समजण्यापूर्वींच तो '**न्युकार्थेज्**च्या' तटाशीं येऊन पोहोंचला. महान् सेनाधिपतीच्या चतुर दृष्टीनें त्यानें तट कोणत्या बाजूनें घेण्यास सोपा आहे तें तेव्हांच ताडलें. एके ठिकाणीं समुद्र अगदीं तटाशीं येऊन भिडतो आहे असें त्यानें पाहिलें. ओहोटीची मध्यवेळ पाहून—कारण मोठा शूर सरदार होण्यास जें भाग्य लागतें तेंही त्याला अनुकूळ होतें-आपलें सैन्य त्यानें समुद्राच्या बाजूनें तटाशीं आणलें. त्यांना फक्त गुडघ्याइतकें पाणी लागलें. व तो आंत शहरांतही शिरला. तेथील सेनाधिपति आंतील किल्ल्यांत शिरला पण तेथेंही टिकाव लागत नाहीं असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां तो त्याच्या स्वाधीन झाला. त्याला प्रांतांत शिरून चार दिवस झाले नाहीं तोंच **कार्थेज्**ची राजधानी घेऊन आपण आपल्या पदवीस योग्य आहों असें त्यानें करून दाखविलें. इतर बाजूंनीं आपला इतिहास ज्यावेळेपर्यंत आलेला आहे त्याच्या पुढें जरी जावें लागत आहे तरी **कार्थेजिनिअन्** अंमलाचा **स्पेन्**मध्यें अंत कसा झाला हें येथेंच सांगणें सोईचें पडेल.

सिपिओनें **न्यूकार्थेज्** ज्या सालीं घेतलें त्या सालाच्या बाकीच्या मुदतींत त्यानें कांहींएक केलें नाहीं. तरी पण तो पुढील तयारीच्या योजनेंत गढून गेला होता असें दिसतें. त्यानें **स्प्यानिश्** सरदारांपैकीं बऱ्याचजणांशीं दोस्ती बांधली. त्याला हें काम सर्वांत अधिक चांगल्या रीतीनें साधलें यांत कांहीं नवल नाहीं, कारण त्याच्या वर्तणुकींत व चालीरीतींत असा कांहीं मोहकपणा असे कीं, त्याच्या पुढें कोणाचें कांहीं चालत नसे. जेव्हां लढाईस त्यानें सुरुवात केली तेव्हां त्याला पुष्कळ **स्प्यानिश्** सरदार येऊन मिळाले. ह्या मोहिमेंत त्यानें **हस्द्रुबाल्**

बार्काशीं एक मोठी लढाई केली. त्यानें याचा पराभव केला असें म्हणतात. पण तो त्याच्या **हानिबाल्**च्या मदतीस **इटलीं**त जाण्याच्या बेताच्या आड आला नाहीं. तेव्हां अर्थातच पराभव कांहीं महत्वाचा होता असें वाटत नाहीं. पुढील वर्षांत विशेष म्हणण्यासारखें कांहींच झालें नाहीं. दोनशेंसात सालीं बरीक **सिलिपआ** येथें **कार्थेजिनिअन्** सैन्याचा असा कांहीं पराभव झाला कीं **स्पेन्**च्या बहुतेक भागाचा **सिपिओ** मालक झाला. फक्त **गेड्स्** काय तें **कार्थेज्**च्या ताब्यांत होतें. 'मी फक्त **स्पेन्**च नाहीं तर **कार्थेज्** सुद्धां जिंकून येईन' असें जें वचन तो बोलला होता तें तो विसरला नव्हता. त्यांतील एक भाग तर बहुतेक बजावल्यासारखा झाला होता व इतक्यांत दुसरा भागही बजावून येण्याची संधि त्याला सांपडली. तो एक फक्त दोन लढाऊ जहाजांनिशीं राजा **सिफाक्स्**च्या दरबारांत येऊन दाखल जाहला. त्याचा बेत **सिफाक्स्**ला **कार्थेज्**ची दोस्ती सोडावयास व **रोम्**शीं बांधावयास लावण्याचा होता. कर्मधर्मसंयोगानें **हस्डुबाल् गिस्को**ही तत्सदृश कामासच आलेला होता. ह्या दोघांनीं बरेच दिवस आनंदांत घालविले व एकमेकांशीं अति उत्तम रीतीनें बोलले चालले. राजा **सिफाक्स्नें** ही दोघांना चांगलीं अभिवचनें दिलीं. **सिपिओ**च्या संभाषणांनीं वगैरे तो अगदीं खुष जाहला व **सिपिओनें** जी **रोम्**शीं स्नेह जोडण्याची इच्छा दर्शाविली त्यालाही त्यानें अभिवचन दिलेंच. पण तो **हस्डुबाल्**ची रूपवती कन्या **सोफोनिस्बा** इच्यावर फारच फिदा जाहला. तिनें याच्याशीं लग्न लाविलें व तिच्या मतानेंच चालल्यानें ह्यानें **कार्थेज्**ला शेवटपावेतों सोडलें नाहीं.

सिपिओच्या गैरहजरींत **स्पेन्**मधील व्यवस्था बरीच बिघडली. अद्यापि **गेड्स्**मध्यें असलेला **मेगो** यानें कांहीं **स्प्यानिश्** जातींना आपल्याकडे वळवून घेऊन **रोम्** विरुद्ध बंड करण्यास लाविलें. ह्या जातींचें बंड त्यास मोडावयाचें होतें. हें बंड मोडलें नाहीं तों तो स्वत: अजारी पडला. त्याच्या अजारांत कांहीं **रोमन्** शिपायांनीं बंड केलें. कारण त्यांचा पगार फार दिवसांचा तुंबलेला होता व **सिपिओ**च्या कडक शिक्षेमुळें त्यांना लूट करून पैसा काढण्याची बंदी असे. पण तो साधारण बरा होऊन स्वत: काम पाहूं लागला तेव्हां त्यानें लोकांना तेव्हांच ताळ्यावर आणलें. आतां बरीक **कार्थेज्**ची **स्पेन्**मधील सर्व सत्ता गेली. **हानिबाल्**चा भाऊ

मेगो यानें राहिलेली फौज **लिगुरिआंत** नेली व **गेड्स्**ही **रोमन्** लोकांच्या ताब्यांत गेलें. ही गोष्ट दोनशेंपांच सालीं झाली.

भाग चौदावा.

विजयाचा शेवटचा प्रसंग.

अद्यापपावेतों **इटलींच्या** रणांत उभें राहून **हानिबाल्‌चा** पराभव कोणींच केला नव्हता. तरी पण त्याची त्यालाच विजयाची आशा फार थोडी वाटूं लागली. दोनशें दहा सालाच्या आरंभीं त्यानें पश्चिम **आप्यूलिआ** प्रांतांत **हर्डोनिआची** लढाई जिंकली. ही लढाई मोहिमेच्या आरंभास ज्या मोठमोठ्या लढाया जिंकल्या त्यांच्या तोडीची होती. **नीअस्‌ फल्विअस्‌** जो मागील वर्षीं **कॉन्सल्‌** होता तो एकदम **हर्डोनिआवर** चालून आला. **कानीच्या** पराभवानंतर ह्या शहरानें बंड केलें होतें व ह्या शहराचा बंदोबस्त बरोबर नव्हता. हें त्या **कॉन्सल्‌ला** ठाऊक होतें. शिवाय **हानिबाल्‌** दक्षिण **इटलींत** आहे असें समजून तो अगदीं निर्धास्तपणें चालून आला. पण **हानिबाल्‌च्या** हेरांनीं त्यास ह्या सर्व गोष्टींची वर्दी पोहोंचविली होती व त्यामुळें तो **कॉन्सल्‌शीं** सामना करण्यास तयार होता. तेव्हां अर्थातच **फल्विअस्‌चे** सर्व विचार फसून त्याचें चातुर्य त्याच्याच अंगावर आलें. त्याचें सैन्य अव्यवस्थित रीतीनें उभें केलें होतें त्यामुळें **हानिबाल्‌चा** निरानिराळ्या ठिकाणचा मारा एकदम त्यांच्यानें सोसवेना. याचा परिणाम असा झाला कीं **रोमन्‌** सैन्याचा अगदीं पराभव झाला; त्यांची छावणीसुद्धां शत्रूच्या ताब्यांत गेली. **फल्विअस्‌** स्वतः लढाईंत

पडला आणि कोणी म्हणतात अकरा हजार, कोणी ह्मणतात सात हजार, **रोमन्** सैन्य रणदेवतेला बळी गेलें. त्या सैन्यावर भयंकर आपत्ति पडली म्हणावयास कांहींएक हरकत नाहीं. सैन्य असें नांवाला सुद्धां शिल्लक राहिलें नाहीं. कांहीं थोडेसे पळालेले शिपाई **स्यामिनम्** येथें **मार्सेलस्**ला जाऊन मिळाले. **मार्सेलस्**नें हा लढाईचा वृत्तांत राजसभेस कळविला. **हर्डोनिआ**च्या लढाईतील एकही सरदार तें वृत्त सांगण्यास शिल्लक नव्हता.

बाकीच्या मोहिमेंत कांहीं विशेष सांगण्यासारखें घडलें नाहीं तरी पण **मार्सेलस् हानिबाल्**शीं एक अनिश्चित परिणामाची लढाई लढला; पण दुसरे दिवशीं शत्रु छावणी सोडून गेले असें पाहून त्याला विजय अशीच संज्ञा दिली. दोनशें नऊ सालीं **हानिबाल्**चें एक जबरदस्त नुकसान झालें. त्याच्या हातचें **टारन्टम्** शहर गेलें. **हानिबाल्**नें जें **ब्रटिअन् ग्यारिसन्** तेथें ठेवलें होतें त्यांच्या मुख्यानें तें शत्रूच्या स्वाधीन केलें. जो ह्मातारा जुना शिपाई आतां आपल्या ऐंशीव्या वर्षी **कॉन्सल्** होऊन आला होता त्यानें आपल्या सर्व मोहिमांचा हें शहर अगदीं शेवटीं घेऊन कळस केला व त्यामुळें त्याला फार आनंद झाला. त्या वृद्ध मनुष्यानें केलेला एक विनोद कांहीं ग्रंथांत नमूद केलेला आहे. **लिव्हिअस्**च्या निष्काळजीपणामुळें जेव्हां **टारन्टम्** शहर गेलें तेव्हां आंतील किल्ला **रोमन्** लोकांच्याच ताब्यांत होता. तो कधींही **कार्थेज्**च्या ताब्यांत गेला नव्हता. **लिव्हिअस्**च्या मनांत आपण किल्ला राखून ठेवला तेव्हां विजयाचा कांहीं अंश आपणासही मिळावा अशी इच्छा उत्पन्न झाली व तो ह्मणाला '**क्विन्टस् फेबिअस्** आपल्याला **टारन्टम्** घेतां आलें त्याबद्दल आपण माझे आभार मानावेत.' **फेबिअस्**नें उत्तर केलें 'हो खरेंच आपण जर शहर घालविलेंच नसतें तर मी परत मिळविलें असतें कोठून?' **हानिबाल्**ला **रोम्**चा रोंख समजला होता व त्यामुळें तो अगदीं गडबडीनें शहराचें रक्षण करण्यासाठीं आला पण त्याला फार उशीर झाला. त्यानें जवळ आपली छावणी कांहीं दिवस ठेविली व नंतर **मेटापेन्टोम्**ला आपल्या मुख्य ठिकाणावर परत आला. आतां **फेबिअस्**ला **टारन्टम्** येथें विजय मिळाला आहे तर तो तसाच **मेटापोन्टम्** येथेंही लढाई करण्यास सहज येईल असें ह्मणून **हानिबाल्**नें त्याला फसविण्याचा प्रयत्न केला. 'शहर आपल्या ताब्यांत करण्यास आह्मी तयार आहों अशा अर्थाचें शहरांतील मुख्य मुख्य लोकांच्या सह्यांचें खोटेंच पत्र **फेबिअस्**कडे पाठवि-

ण्यांत आलें. **फेबिअस्** तें पत्र पाहून फसला खरा पण यज्ञ करतांना कोठें कांहीं अपशकुन झाल्यामुळें हल्ला करावयास त्याचें मन चरकलें. **टारन्ट्** शहर जरी गेलें तरी पण बाकीच्या मोहिमेंत **हानिबाल्** आपलें वर्चस्व राखून होता. **लिव्हिअस्** असें लिहितो खरा कीं **मार्सेलस् हानिबाल्**शीं तीन लढाया लढला; पैकीं पहिलींत त्याचा पराभव झाला ; व दुसरी अनिश्चयात्मक झाली व तिसरींत **हानिबाल्**चा त्यानें पराभव केला. पण बहुतेक वर्षभर सैन्यासह **वेन्युसिआ** शहरांत तो राहिला होता व शत्रूला हवें तसें चहूंकडे लुटूं दिलें असा आरोप पुढें त्याच्यावर आणलेला आहे. तेव्हां त्यानें एखादी तरी लढाई जिंकली कीं नाहीं याबद्दल बरीच शंका वाटते. **रोम्** आतां अगदीं थकून गेल्याचीं चिन्हें दिसत होतीं. तिसांपैकीं बारा **ल्याटिन्** शहरांनीं त्यास मदत देण्याचें नाकारलें आणि **इट्रुरिअन्** लोकही आपल्या राजभक्तींत डळमळीत होत चालले होते.

पुढील वर्ष ह्मणजे दोनशें आठ साल विशेषत: **मार्सेलस्**च्या मृत्यूविषयीं प्रसिद्ध आहे. साहाव्या वेळीं **कॉन्सल्** निवडून आल्यानंतर आपला जोडीदार **क्रिस्पिनस्** याला घेऊन तो **हानिबाल्**वर चाल करून आला. **कार्थेज्**च्या मुख्य सरदाराशीं प्रसंग घडून आल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे. एके दिवशीं दोघेही **कॉन्सल्स्** छावणीच्या बाहेर सुमारें दोनशें घोडेस्वार घेऊन गेले होते. ह्या घोडेस्वारांतले कांहीं **एट्रुरियन्** घोडेस्वारही होते. त्या शहरांनीं एकनिष्ठतेनें वागावें ह्मणून हे लोक बरोबर लढाईंत आणलेले होते. कांहीं **आफ्रिकन** शिपाई एका झाडींत दडून बसले होते. ते यांना कोणासही न समजतां **रोमन्** घोडेस्वारांच्या पिछाडीस येऊन थडकले व एकदम हल्ला सुरूं केला. त्यासरसे **एट्रुरियन्** लोक पळून गेले. बाकीचे **ल्याटिन्स्** होते ते तेव्हांच हटले. **मार्सेलस्** तेथल्या तेथेंच मरण पावला. व **क्रिस्पिनस्**ला अशी कांहीं जबर जखम लागली कीं तो पुढें फार दिवस जगला नाहीं. **हानिबाल्**नें रणांगणांत पडलेल्या आपल्या शूर शत्रूला यथोचित समारंभानें पुरलें. आपण आतां लढाईतील अति महत्त्वाच्या वर्षा पैकीं एका वर्षाला आलों आहों. **हस्ड्रुबाल्** जो **स्पेन्**मधून निघाल्याचे आपण मागेंच ऐकिले आहे तो **इटलीं**त येऊन पोहोंचला. त्याला कांहीं **आल्पस्** ओलांडण्यास मुळींच कठीण गेलें नाहीं. कारण त्या **आल्पस्** मधील पहाडी लोकांनीं मुळींच प्रतिबंध केला नाहीं; कारण हे आपल्याला

कांहीं इजा करीत नाहींत असें त्यांपैकीं बहुतेकांना समजलें होतें. व कांहीं लोक पैसा देऊन वश करून घेण्यांत आले होते. शिवाय **हानिबाल्**नें केलेले पूल रस्ते वगैरे कांहीं कांहीं गोष्टी अद्यापि शिल्लक होत्या त्याही त्याच्या उपयोगीं पडल्या. कशा रीतीनें कां होईना पण **रोमन्** लोकांना वाटलें त्याच्यापेक्षां तो बराच लवकर आला. **रोम्**नें हें नवें भय वारण्यास बरीच तयारी केली. त्यांचें मोठेमोठे शूर सेनाधिपति बरेच मेले होते. **मार्सेलस्** ही मेला होता, **फेबिअस्** ही आतां फार वृद्ध झाला होता; त्यामुळें त्याला कोणतेंही काम होण्यासारखें नव्हतें. **लिव्हिअस्** एक जुना शिपाई, ज्यानें सुमारें बारा वर्षांपूर्वीं चांगलें नांव मिळविलें होतें तो आणि **क्लाडिअस् नीरो** हे **कॉन्सल्** निवडण्यांत आले होते. त्यांच्या हाताखालीं लढण्यास पंधरा लिजन्स् ह्मणजे सुमारें नवद हजार फौज गोळा करण्यांत आली होती. **लिव्हिअस्** हा **हस्ड्रुबाल्**शीं लढणार असें ठरलें. व **नीरो हानिबाल्**च्या सैन्याची पाळत राखीत होता.

रोमन् इतिहासांतील अतिसाहसाच्या व अतिचातुर्याच्या एका कृत्याचें वर्णन करण्याचा आतां समय आला आहे. **हस्ड्रुबाल्**चें त्याच्या भावाला पाठविलेलें एक पत्र **हेरा**च्या हातांत पडलें व तें त्यांनीं **नीरो**कडे आणून दिलें. त्यांत दोन्हीं सैन्यें एक करण्याचा **हस्ड्रुबाल्**चा आशय स्पष्ट कळविलेला होता. तें पत्र **कार्थेजिनिअन्** भाषेंत लिहिलेलें होतें; पण छावणींत तें पत्र वाचून दाखवायाजोगते **कार्थेज्**चे कैदी तेथें होतेच. यावरून त्यानें एक मोठा बाहादुरीचा बेत मनांत रचिला. आपल्या सैन्यांतील उत्तम लोक घ्यावेत व अतित्वरेनें मजल दर मजल करून आपल्या जोडीदाराच्या सैन्याला जाऊन मिळावें व **हानिबाल्**च्या व **हस्ड्रुबाल्**च्या सैन्यांची गांठ पडण्याच्या अगोदरच **हस्ड्रु-बाल्**च्या सैन्याची खोड मोडून टाकावी असा त्याचा मूळ बेत होता. त्यानें आपल्या बरोबर सात हजार शिपाई निवडून घेतले. त्या शिपायांनाही पहिल्या प्रथम हा गुप्त बेत कळविला नाहीं. **ल्युकानिआ** येथील एका फौजेवर छापा घालावयाचा आहे असें त्यांना त्यानें सांगितलें. ते बरेचसे दूर गेले तेव्हां त्यांच्या सेनाधिपतीचा खरा बेत त्यांच्या लक्षांत आला. तो सुरक्षितपणें **लिव्हि-अस्**च्या छावणींत येऊन पोहोंचला आणि तेथें दोन्ही **कॉन्सल्**मध्यें असें ठरल कीं एकदम लढाई द्यावयाची.

काय झालें होतें तें हस्द्रुबाल्च्या चलाख नजरेस तेव्हांच दिसून आलें. रोमन् सैन्य पहिल्यापेक्षां अधिक दिसूं लागलें. त्याच्या हेरांनीं त्याला कळविलें कीं नदीवर पाणी आणण्यास जे लोक आले होते त्यांपैकीं कांहींकांपेक्षां इतर लोक अधिक काळे दिसत होते. शेवटीं हेंही पण त्याच्या लक्ष्यांत आलें कीं रोमन् छावणींत दोनदां तुतारी वाजली तेव्हां अर्थातच दोन्ही कॉन्सल् तेथें होते असें सिद्ध झालें.

त्यानें होईल तर लढाई चुकवावी असा निश्चय केला व तदनुरूप रात्री तेथून छावणी उठवलीही. पण तो दक्षिणेच्या बाजूस निघाला तेव्हांपासून संकटास आरंभ झाला. त्याचा त्या प्रांताचा वाटाड्या निघून गेला आणि त्याला वाटेंतील मेटारस् नदीला उतार कोठें होता तें ठाऊक नव्हतें. त्यामुळें शत्रूंना ठकवून पळून जाण्यानें जो त्यानें वेळ मिळविला होता तो सर्व फुकट गेला, आणि रोमन् सैन्य त्याच्या पाठीवर येऊन पोहोंचलें. तो छावणी देऊन तेथील बंदोबस्त करीत आहे तोंच शत्रु चालून आले व असें पाहून लढाईस सिद्ध झाला. त्यानें हत्ती सर्वांत पुढें ठेविले व त्याच्या पाठीमागें आपल्या डाव्या हाताला अगदीं नवीन गोळा केलेले अतएव दमदार आहेत कीं नाहींत हें माहीत नसलेले गाल् शिपाई ठेविले. होईल तेथपावेतों त्यांना हत्तीच्या संरक्षणाखालीं ठेविलेलें होतें. आपण स्वत: उजव्या बाजूस होता. आपल्या देखरेखखालीं बहुतवेळ विजयी होऊन आलेले चांगल्या अनुभवाचे स्प्यानिश् पायदळाचे शिपाई त्यानें घेतले होते. त्याच्या समोर असलेले रोमन् लोकांचे डाव्या बाजूचे सैन्यावर कॉन्सल् लिव्हिअस् होता. ह्या बाजूस लढाई फारच विकोपास गेली व पुष्कळ वेळ चालली. हत्ती प्रथम आपल्या पक्षास चांगलेच उपयोगीं पडले; पण जेव्हां ते शत्रूंच्या प्रहारांनीं वेडे होऊन गेले तेव्हां मग शत्रु आणि मित्र सर्वांना सारखे तुडवीत चालले. कांहीं वेळानंतर ज्या युक्तींनीं नीरोला हॅनिबाल्शीं लढतां लढतां आपल्या मित्राच्या मदतीस जावें लागलें त्याच युक्तींनीं रोमन् सैन्याच्या उजव्या बाजूचे कांहीं लोक काढून घेऊन त्यांना शत्रूच्या बाजूवर हल्ला करण्यास नेलें. तेव्हां मग बरीक स्प्यानिअर्डच्या लोकांच्यानें हा मारा सोसवेना. गाल् लोक जे दारू यथास्थित पिऊन धुंद झाले होते ते तर जेथल्यातेथेंच कापले गेले; त्यांना हालण्याचालण्याचीही शुद्ध नव्हती. अर्थातच सैन्याचा अगदीं पराजय झाला, व हस्द्रुबाल्ला अशा लाजिरवाण्या पराभवाच्यापुढें जिवंत

सुद्धां राहवेसें वाटेना. तेव्हां त्यानें आपल्या घोड्याला टांच देऊन **रोमन्** सैन्यांत घालविला व तेथें बाहादुरीनें लढत लढत आपला बाप **हिमिल्कार्** व बंधु **हानिबाल्** यांच्या संबंध्यास योग्य अशा रीतीनें मरण पावला. **कार्थेज्**चें छपन्न हजार सैन्य मेलें असेल असें म्हणतात. पण ही अर्थातच अतिशयोक्ति आहे. कारण **हस्ड्रुबाल्**पाशीं इतके लोक असण्याचाच संभव नाहीं. कांहींका संख्या असेना **रोम्**ला निश्चित जय मिळाला यांत तर कांहीं तिळमात्र शंका नाहीं. त्या लढाईपासून असें स्पष्ट सिद्ध झालें कीं दुसऱ्या **प्यूनिक्** लढाईंत **कार्थेज्** नव्हे तर **रोम्** विजयी होणार. दुसऱ्या एका **नीरो**चें वर्णन करतांना ह्या **नीरो**ची जी **हारेस्**नें स्तुति केलेली आहे ती इतकी उत्तम आहे कीं ती येथें दिल्याशिवाय राहवत नाहीं.

'हे **रोम्** देशा, तुजवर **नीरो**च्या कुलांत उत्पन्न झालेल्या पुरुषांनीं काय काय उपकार केले आहेत हें जर समजणें असेल, तर ती प्रसिद्ध **मेटारिस्** नदी तुला तें सांगेल, किंवा त्या नदीच्या कांठांचे समरांगणांत लढतां लढतां पडलेला **हस्ड्रुबाल्** सांगेल, किंवा ज्या दिवशीं सर्व **इटली**भर पसरलेल्या अंधःकारपटलावर भाग्यसहस्ररश्मींचीं प्रथम किरणें पडूं लागलीं व सर्व **लेटिअम्** प्रांताला पुनः आनंद प्राप्त झाला तो भाग्यशाली दिवस सांगेल. ह्यापुढें आतां वणवा जसा अरण्यांत स्वैरगतीनें पेटत जातो किंवा **यूरस्**चा सोसाट्याचा वारा जसा एकदम सर्व **सिसिलिअन्** समुद्रावर पसरतो तसा जो दुष्ट नाशकारक **लिबिअन् हानिबाल्** सर्व **इटालिअन्** शहरांतून स्वेच्छाचारानें नांदत होता तो आतां तसा नांदेनासा झाला; त्यादिवसापासून—कारण त्या दिवशीं **रोम्**च्या लोकांनीं मेहेनतही तशीच केली व त्यांना यशही तसेंच मिळालें—**रोम्**च्या तारुण्याचा बहर सारखा वाढत गेला. **प्यूनिक्** लुटारूंच्या झुंडींनीं जीं देवालयें अगदीं मोडून तोडून टाकलीं होतीं तीं पुनः पूर्वसंभारानें उभारण्यांत आलीं व उघड्या पडलेल्या देवांना पुनः सुखाचीं स्थानें मिळालीं; शेवटीं **हानिबाल्** मोठ्यानें म्हणाला 'खादाड लांडग्यापुढें जशीं हरिणें आपण होऊन बळी पडतात तसें तुम्ही त्या बलाढ्य लोकांशीं कशाला झगडण्यास जाता. ज्या लोकांपासून पळून जाणें हेंच आपणांस सर्वांत मोठें यश आहे त्यांनीं आपणास आजचा दिवस सोडला आहे तर त्याचा उपयोग कां करून घेऊं नये? ज्या जातीची **इलिअम्** शहरीं जळून रांखरांगोळी झाली असतां राहिलेली मंडळी आपलीं प्रिय मुलें लेकरें व पूज्य

वृद्ध मातापितरें व इष्ट गृहदेवतादि या सर्वांस संभाळून घेऊन तुफान **इट्रस्कन्** समुद्रांतून **ॲनसानिअन्**वर कांठावर येऊन थडकली, त्या जातीचे हे शूर व चिकट योद्धे आहेत. **अलिगडस्**च्या उच्च छायावृत शिखरांवर वाढलेल्या ओक वृक्षांच्या सर्व शाखा जर कापून काढल्या तर तो जसा त्या छाटणीनें उत्कर्ष पावतो तसें ज्या तरवारींनीं यांचे प्राण घेतले, त्यांनीं यांना नवा दम आणि उत्साह दिला; **हायड्रा** सुद्धां त्याच्या सर्व शाखा कापून टाकल्यास इतका फोफावून वाढत नाहीं; **अलिसडस्**हीं या वाढीनें थक्क होऊन गेला; भीतिकर **कोल्चिस्** किंवा **इकिओनिअन् थीबस्** यांच्यांत सुद्धां असला प्राणसंहारक कृतांत निपजला नाहीं. अशा ह्या जातीला समुद्रांत बुडवा; आणि बघा ही जात वर बाहेर येईल ती अधिक स्वच्छ आणि तेजस्वी होऊन येईल; त्यांना चहूंकडे विखरून टाका आणि ते आपल्या अजित शत्रूचा चक्काचूर उडवून देतील, व **रोम्**च्या मानी कन्यका पराभूत शत्रूंच्या पुष्कळ कथा सांगत बसतील; आतां गर्वानें कांहीं **कार्थेज्**ला पुनः जासूद पाठविणार नाहीं; माझ्या सर्व आशा **हस्ड्रुबाल्** मेला त्याबरोबर विरल्या; आणि तो येथें जेव्हांपासून नामशेष जाहला तेव्हांपासूनच आमच्या विजयभाग्योदयाचा ताराही नामशेषच होऊन राहिला.'

नीरो आपल्या सैन्याकडे अतित्वरेनें आला आणि **कार्थेजिनिअन्** छावणीच्या बाहेरच्या बाजूस **हस्ड्रुबाल्**चें डोकें टाकून देण्यास आपल्या शिपायास आज्ञा केली. तें **हानिबाल्**च्या शिपायांनीं **हानिबाल्**कडे नेलें व त्यानें तें ओळखलें आणि कळवळ्यानें म्हणाला "**कार्थेज्**चें भाग्य आतां मला समजलें." दुसरे दिवशींच तो **इटली**च्या दक्षिण भागांत गेला.

भाग चौदावा.

अखेरची खटपट.

टारमेस्च्या अनिष्ट परिणामाच्या दिवसापासून पुढें तीन वर्षें **हानिबाल् इटलीं**त होता. पण आतां तो **इटली**च्या अगदीं दक्षिण भागांत राहिला होता. डोंगराळ **ब्रुटी** प्रांत हें त्यानें आपलें फिरण्यासवरण्याचें ठिकाण करून ठेवलें होतें. आणि जरी **रोमन्** सरदार त्यास अगदीं पीडा करीत नसत—कारण तो रणांगणीं कसा असह्य अद्यापि होता हें ते जाणून होते—तरी पण हलके हलके त्याची हद्द त्याला कमी कमी करून घ्यावी लागत असे. ह्यावेळेस त्याचें मुख्य ठिकाण **क्रोटोना** येथें होतें. ह्या जवळच त्यानें **जूनो** देवतेसाठीं ह्मणून एक यज्ञकुंड बांधलें व त्याजवर ठेवण्यासाठीं एक शिला तयार करविली. तिजवर **इटलीं**तील आपल्या सर्व स्वारीची सारांशरूपानें हकीगत, आपण जिंकलेल्या लढाया, आपण घेतलेलीं शहरें, आपण मारलेले शत्रु, हें खोदून ठेवविलें. ह्या वेळच्या त्याच्या कृत्यासंबंधानें **लिव्हि** याची खऱ्या अंतःकरणानें स्तुति करतो. "त्याच्या विजयाच्या वेळेस किंवा पराजयाच्या वेळेस, अभ्युदयाच्या वेळेस किंवा आपत्तीच्या वेळेस त्याची वाखाणणी करणें प्रशस्त होईल हें कांहीं मला समजत नाहीं. स्वदेशापासून अति दूरच्या प्रदेशांत सारखीं तेरा वर्षें त्यानें लढाई चालविली होती आणि तीही आपल्या देशाच्या सैन्याचे साहाय्यानें नव्हे तर सर्व राष्ट्रांतून कसें तरी गोळा झालेल्या

शिपायांचे साहाय्यानें. त्या शिपायांना कायदे रीतिभाती किंवा भाषा यांपैकीं कांहींएक साधारण नव्हतें; त्यांचे पोषाख निराळे, त्यांचीं हत्यारें निराळीं, त्यांच्या भजनपूजनाच्या रीति निराळ्या; फार तर काय पण त्यांचे देवसुद्धां निराळे होते. पण असल्या लोकांनासुद्धां त्यानें अशा कांहीं जुटीनें व एकमतानें ठेविले होतें कीं ते लोक आपसांतही कधीं भांडले नाहींत किंवा आपल्या सेनाधिपतीच्याविरुद्ध कधीं उठले नाहींत; आणि जरी त्याच्यापाशीं त्यांना पगार देण्यास पैसा नव्हता तरीसुद्धां त्या शिपायांनीं एवढी देखील चलबिचल केली नाहीं. **हस्डुबाल्**च्या मरणानंतर जरी तो अगदीं **इटली**च्या एका कोपऱ्यांत कोंडला गेला व त्याला बाहेरही जाण्यास जागा नव्हती तरी पण त्याच्या छावणींतील लोक नेहमींप्रमाणें अगदीं शांत होते.

आपल्या जन्माचें महत्कृत्य ह्मणून हातीं घेतलेले कामाची सर्व आशा सोडण्यास तो अगदीं नाखुष होता. त्याला अद्यापि आशा होती कीं कांहींना कांहीं तरी गोष्ट घडेल व त्यामुळें आपणास आपलें काम तडीस नेण्यास संधि सांपडेल. **रोम्**ला **कार्थेज्**शिवाय जे आणखी शत्रु होते ते सर्व कदाचित् एक होतील असें त्याला वाटत होतें. **सिरिआचा ऑन्टिआकस्** आणि **म्यासिडोनिआचा फिलिप्** हे दोघेही **इटली**चे शत्रु होते. ह्या दोघांनाही **रोम्**शीं लढतांना आणि मागें हटतांना त्यानें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पुढें पाहिलें. त्या दोघांना जर **हानिबाल्**ला आपला पोंच व आपली दूरदृष्टि देतां आली असती व त्या दोघांनाही ह्या उचित प्रसंगीं **रोम्**विरुद्ध एक करतां आलें असतें तर अद्यापि त्याच्या महायत्नास यश आलें असतें. पण त्यांना शहाणपणा कमी ह्मणा किंवा उत्साह कमी ह्मणा किंवा धैर्य कमी ह्मणा ते दोघेही अशा समयास मागें राहिले व त्यामुळें अर्थातच प्रसंग हातचा गेला.

त्याला मदत ह्मणून एक बरीक प्रयत्न करण्यांत आला होता. त्याचा सर्वांत धाकटा भाऊ **मेगो** यानें जेव्हां **स्पेन्**मध्यें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहिलें तेव्हां जी फौज तेथें गोळा करतां आली ती व जी **कार्थेज्**हून त्याच्याकडे आली होती ती अशा दोन्ही फौजा घेऊन तो **लिगुरिआ** प्रांतांत उतरला. त्यानें वाटेनें **मिनोर्का** बेट घेतलें. त्याची साक्ष **पोर्ट मेहोन** (**मेगोचा बे**) अद्यापि देत आहे. त्यानें कांहीं **गाल** लोक आपल्या झेंड्याखालीं आणले, पण त्यानें महत्वाचें असें कोणतेंही काम केलें नाहीं. त्याचा

मुख्य हेतु जो **हानिबाल्**च्या पाठीवर असलेलें सैन्य आपल्यावर ओढून घ्यावयाचा त्यांत तर त्याला मुळींच यश आलें नाहीं.

दोनशें चार सालीं **सिपिओ सिसिलीं**तून **आफ्रिकें**त उतरला. आरंभीं कांहीं त्याच्या हालचालीला फारसें यश आलें नाहीं. त्यानें **युटिका**ला वेढा घातला पण त्यांत त्याला फारसें यश आलें नाहीं. त्याला तो उठवावा लागला. आणि तेथून समुद्रकांठावर छावणी देऊन बसावें लागलें. कारण त्याठिकाणीं त्याच्या आरमाराची त्याला मदत होती. ह्याच ठिकाणीं त्यानें हिंवाळा घालविला व तो दुसरे वर्षाच्या वसंतऋतुच्या आरंभीं लढाईच्या तयारीस लागला. त्याला दोन सैन्यांशीं लढावयाचें होतें. एक **गिस्को**चा मुलगा **हस्डुबाल्** याच्या हाताखालचें सैन्य व दुसरें **सिफ्याक्स्**च्या हाताखालचें सैन्य. उलट पक्षीं त्याच्या स्वतःच्या छावणींत **म्यासिनिसा** होता. जरी त्याचें राज्य गेलें होतें आणि जरी एकदां मोठ्या संकटानें त्याचा जीव वांचला होता तरी पण तो मोठा उपयोगी मदतनीस व मनसबनीस होता.

राजा **सिफ्याक्स्**ला फार आशा होती कीं आपण मध्यस्थी केली असतां **रोम्** आणि **कार्थेज्** यांच्या तहाचें कांहीं जुळेल. त्यानें प्रथम असें सुचाविलें कीं **हानिबाल्**नें **इटली** सोडावी व **सिपिओ**नें **आफ्रिका** सोडावी. **सिपिओ**नें उत्तर पाठविलें ह्या शर्तींवर तह करण्याचें मला कबूल नाहीं पण दुसऱ्या कांहीं शर्तींवर तह व्हावयाजोगता असल्यास मी कांहीं त्याच्याविरुद्ध नाहीं. दोन्ही छावण्यांतून इकडून तहाचें बोलणें करण्याकरितां वकील सारखे जात येत होते. राजा **सिफ्याक्स**ला अद्याप तह होईल असें अगदीं खातरीनें वाटत होतें. **सिपिओ** जे वकील पाठवीत होता त्यांना गुप्त रीतीनें सर्व हेरून येण्याची आज्ञा होती. तो फक्त आपण स्वतःच शोधून काढलेला किंवा अधिक संभाव्य असें दिसतें कीं **म्यासिनिसा**नें सुचविलेला एक बेत अमलांत आणण्याची चांगली संधि पाहात होता. हा बेत म्हणजे शत्रूच्या दोन्ही छावण्याला आग लावून देण्याचा होता. ह्या छावणींतल्या झोपड्या अतिशय जलद जळण्या जोगत्या होत्या आणि फक्त शत्रु गाफील केव्हां राहील एवढीच काय ती मुख्य गोष्ट पाहण्याची होती. ह्या कामांत **सिपिओ**ला बेइमानपणाच्या दोषांतून मुक्त करतां येणें बरेंच कठीण आहे. खरोखर **सिफ्याक्स्** आणि त्याच्यामध्यें तह चालला होता.

जोंपर्यंत तहाचें बोलणें वगैरे चाललें होतें तों पावेतों आपल्यावर हल्ला येईल असें राजाच्या मनांत सुद्धां नव्हतें.

जेव्हां त्याची सर्व तयारी झाली तेव्हां **सिपिओनें** आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल्या. अर्धें सैन्य तो स्वतः घेऊन **कार्थेज्**च्या सैन्यावर चालून जाणार होता व दुसरें अर्धें सैन्य त्याचा मित्र **लिलिअस्** आणि **म्यासिनिसा** यांच्या ताब्यांत ठेविलें होतें. दोन्हीं सैन्यें रात्रींचीं छावणींतून बाहेर निघालीं आणि **लिलिअस्** आणि **म्यासिनिसा** हे **सिफ्याक्स्**च्या छावणीवर चालून गेले. ह्या दोन सैन्यांपैकीं एका सैन्यानें पाठीमागें राहावयाचें व दुसऱ्यानें छावणींना आग लावून द्यावयाची असें ठरलें. बेत तर अतिउत्तम रीतीनें सिद्धीस गेला. **पालिबिअस्**नें लिहिलें आहे कीं जणूं काय ती छावणी आग लावून देण्याकरितांच केली होती. आणि त्यानें हें **लिलिबिअस्**च्या तोंडूनच ऐकलें असेल. ज्वाला जिकडे तिकडे तेव्हांच पसरल्या. सर्वांची अशी अगदीं खातरी होती कीं आग आपल्या आपणच लागली, कांहीं लोक तंबूंतल्या तंबूतच ठार झाले; कांहीं निघण्याच्या गडबडींत आणि धांदलींत मेले. आणि जे म्हणून आगीच्या तडाक्यांतून सुटले त्या सर्वांना **रोमन्** लोकांनीं अगदीं कापून काढलें.

शेजारच्या छावणींतील **कार्थेजिनिअन्** लोकांना त्यांच्या मित्राप्रमाणेंच आग आपल्या आपण दैवयोगानें लागली असें भासलें. त्यामुळें कांहीं लोक आपल्या मित्राच्या मदतीस धांवले व कांहीं लोक कांहीं न सुचल्यामुळें तेथल्या तेथेंच उभे राहिले. शत्रु जवळ आले आहेत याची कल्पना कोणासही नव्हती. त्यामुळें शत्रु जेव्हां त्यांजवर चालून आले तेव्हां ते अगदीं हत्यारापात्याराशिवाय होते. कांहीं थोड्या मिनिटांत दुसऱ्या छावणीचीही तीच स्थिति झाली. **हान्नि-बाल्** कांहीं घोडेस्वारांनिशीं पळून गेला. तसेंच **सिफ्याक्स**नेंही कसा तरी आपला जीव वांचविला पण दोन्हीं सैन्याची अगदीं पुरती विल्हेवाट लागली.

सिफ्याक्स्च्या मनांत **रोम्**शीं तह करण्याचें आलें होतें पण त्याच्या बाय-कोनें तो यत्न सोडून देण्याकडेसच त्याचें मन वळविलें, त्यानें आणखी एक सैन्य गोळा केलें व **हान्निबाल्**ही आपण गोळा केलेलें सैन्य व सुमारें चारहजार

स्पेन्चे भाड्याचे शिपाई घेऊन त्याला येऊन मिळाला. पण लढाई झाली त्यांत **सिपिओ**चाच पुन: जय झाला.

आतां **कार्थेज्**ला काय तो एकच मार्ग मोकळा होता; तो हा कीं, **हानिबाल्**ला आणि **मेगो**ला परत बोलवावयाचें. **मेगो**, ज्याच्या सैन्याचा नुकताच **रोमन्** लोकांनीं पाडाव केला होता, तो हा हुकूम मिळाल्याबरोबर जें शिल्लक होतें तें सैन्य घेऊन परत निघाला. पण देशीं पोहोंचण्यापूर्वींच जखमांच्या असह्य वेदनांनीं तो वाटेंतच मेला. **हानिबाल्**ला बरीक हा परत येण्याचा हुकूम आल्याबरोबर अतिशय क्रोध आला आणि असह्य दुःख जाहलें. निरोप ऐकल्याबरोबर तो जे शब्द बोलला ते तसेच्या तसेच **लिव्हि**नें दिले आहेत. ते खरे आहेत कशावरून हें कांहीं आपणास ठाऊक नाहीं. **लिव्हि**नें खालीं लिहिल्याप्रमाणें लिहिलें आहे "दांत ओठ चावून आणि दुःखाचा एक मोठा उसासा टाकून आपलें आंसू आवरण्यास अशक्य होऊन तो **कार्थेज्**हून आलेल्या वकीलांना म्हणाला आज मला ते प्रत्यक्ष स्पष्ट परत बोलवतात एवढेंच. मला कांहीं एक सैन्य न देऊन व पैसा न देऊन मागेंच त्यांनीं परत बोलाविलें आहे. **हानिबाल्**ला कांहीं **रोमन्** लोकांनीं जिंकलें नाहीं, कारण शेंकडोशें वेळ त्यांचा त्यानें पराभव केला आहे. पण **कार्थेज्**च्या राजसभेच्या द्वेषानें **हानिबाल्**ला जिंकलें खरें. ह्या माझ्या परत फिरण्यानें **सिपिओ**ला जितका आनंद होईल त्याहूनही अधिक आनंद **हानो**ला होईल; कारण दुसऱ्या कोणत्याही रीतीनें माझ्या कुटुंबाचा पाडाव न करतां आल्यामुळें शेवटीं आपल्या देशाला बुडवून तरी तें त्यानें साधलें आहे." **हानो** तहपक्षाचा मुख्य होता हें आपण मागें पाहिलेंच आहे. जरी त्याला अतिशय क्रोध आला तरी पण हुकूम झाल्यावर तो मानण्यास त्यानें अगदीं विलंब केला नाहीं. **लिव्हि**नें म्हटलें आहे कीं "**हानिबाल्**ला आपल्या शत्रूचा देश सोडतांना जें दुःख झालें व जसें कठीण गेलें तितकें दुःख काळ्या पाण्याच्या शिक्षेवर जाणाऱ्या माणसालादेखील आपलें घर आणि मुलेंमाणसें सोडतांना कधीं वाटलें नसेल. पुन्हा पुन्हा तो जो प्रदेश सोडीत होता त्याकडे तो पाही व **कानी**ची लढाई जिंकल्याबरोबर त्याच भिजलेल्या तरवारी घेऊन **रोम्**वर आपल्या शिपयांना नेलें नाहीं ह्मणून आपलें आपल्यालाच सहस्रश: शिव्याशाप देई. शेवटीं तो म्हणाला "**सिपिओ**नें **कार्थेज्**वर हल्ला करण्याचें धाडस केलें आणि मी माझा वेळ **क्यासिलिनम् क्युमि** आणि **नोला** येथें व्यर्थ घालवीत बसलों."

हानिबाल् निघाल्याची बातमी **रोम्**ला जाऊन पोहोंचली मात्र; तेच दिवशीं आनंदाचा व जाहीर उपकार मानण्यासाठीं एक मेळा भरविण्यांत आला. वृद्ध शूर सरदार शिपाई **फेबिअस्** याला देवदारूच्या वृक्षाच्या पानांच्या माळेचा अद्वितीय सन्मान देण्यांत आला. कारण त्यानें मनुष्य तर काय पण सर्व देश दुःख-सागरांतून वर काढला. अतिवृद्धावस्थेंत कांहीं महिन्यानंतर तो वारला. दैव-योगानें **इटली** शत्रूच्या तडाक्यांतून सुटलेला पाहण्याचें त्याला मिळालें व तें पाहून त्याचे डोळे अगदीं थंड झाले.

हानिबाल् सुमारें तीस वर्षें **आफ्रिके**च्या बाहेर होता. त्यानें एकदां आपल्या प्रदेशांत पाऊल टाकल्यानंतर मगचा त्याचा वृत्तांत साद्यंत मुळींच उपलब्ध नाहीं. त्याचाचसा काय पण सर्व **कार्थेज्**च्या राष्ट्राचीही तीच स्थिति आहे. **रोम्** आणि **कार्थेज्** यांजमध्यें एक तह झाला. तो **कार्थेज्**नें मोडला; **सिपिओ**नें **कार्थेज्**ला अनुकूल अशा शर्ती **कार्थेज्**पुढें मांडल्या दोन्ही पक्षांचे सरदार एकमेकांस भेटले व त्यांत कांहीं साधलें नाहीं अशा नाना प्रकारच्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत पण त्यापासून सुसंबद्ध व सुसंगत कथानक मुळींच निष्पन्न होत नाहीं. तेव्हां अर्थातच दुसऱ्या **प्युनीक्** मोहिमेची ज्या लढाईनें अखेर झाली त्या लढाईवरच आपण एकदम जाऊं. ती **झामा** येथें अक्टोबर १९ तारखेस जाहली असें कोणी कोणी ह्मणतात व वसंत ऋतूंत* झाली असें इतर कितीएक ह्मणतात. **सिपिओ**नें आपलें सैन्य नेहेमींच्या **रोमन्** पद्धतीप्रमाणें उभें केलें. फक्त टोळी टोळींमध्यें† बरेंच अंतर ठेविलें व तसेंच रांगेरांगेमध्येंही जरा अधिक अधिक अंतर ठेविलें. त्याचा असें करण्याचा मुख्य हेतु हत्तीचें भय जरा कमी व्हावें असा होता. **लिलि-अस्** व त्याचे **रोमन्** घोडेस्वार डाव्या बाजूला होते व **म्यासिनिसा** व त्याचे **आफ्रिकन्** घोडेस्वार हे उजव्या बाजूला होते. हलक्या हत्याराचें पायदळ सर्वांत पुढें ठेविलें होतें व त्यांना सक्त हुकूम होता कीं हत्तीचा मारा जर सोसेनासा झाला तर मागील पायदळाच्या रांगांमधून त्यानीं मागच्या बाजूस पळून जावें.

---

* **रोमन् क्यालंडर्**च्या अव्यवस्थेमुळें ही विसंगतता दृष्टीस पडते. **रोमन्** ऋतु आणि महिने हे बहुशः जमत नाहींत.

† पहिल्या टोळींतील अंतर दुसऱ्या टोळीनें भरून काढावयाचें व दुसरीचें तिसरीनें.

हानिबाल्नें सर्वांत पुढें आपले ऐशी हत्ती ठेविले. त्या मागें भाड्याच्या शिपायांच्या सर्व टोळ्या उभ्या केल्या व त्या मागें खुद्द **कार्थेज्**चें सैन्य जें पुन्हा एकदां फारा दिवसांनीं समरांगणांत दिसत आहे तें दुसऱ्या ओळींत, व तिसऱ्या ओळींत **इटली**हून आणलेले व अति उत्तम रीतीनें मुरलेले शिपाई, डाव्या हाताला त्यानें **आफ्रिकन्** घोडेस्वार, व उजव्या हाताला **कार्थेजिनिअन्** घोडेस्वार ठेविले.

हत्तीच्या माऱ्यानें लढाईस सुरुवात झाली. ह्या प्राण्यांनीं शत्रूस आणि मित्रास सारखाच अपाय केला. त्यांनीं **कार्थेजिनिअन्** घोडेस्वारांची अशी कांहीं दुर्दशा करून सोडली कीं, **लिलिअस्**ला त्यांचा पराभव करण्यास कांहींच वेळ लागला नाहीं.

दोन्ही सैन्यांच्या मध्यभागांत **हानिबाल्**च्या पक्षाची सरशी होत होती असें दिसलें. **हानिबाल्**चे भाडोत्री शिपाई हे मोठ्या अनुभवाचे व चतुर शिपाई होते व ते अप्रबुद्ध **रोमन्** शिपयांना दाद देण्याजोगे नव्हते. इतर सैन्याच्या भागांनीं जर त्यांच्यासारख्याच नेटानें काम चालविलें असतें तर खचित **कार्थेज्**चा जय झाला असता. पण खुद्द **कार्थेज्**च्या शिपायांच्या टोळीनें मुळींसुद्धां हलण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्यांच्यावर जेव्हां **रोमन्** लोकांच्या पुढच्या पुढच्या टोळ्यांनीं हल्ला केला व **पोलिबिअस्** तर म्हणतो कीं जेव्हां भाड्याचे शिपाई अशा रीतीनें आपल्यास लोक सोडून जातात म्हणून फार रागावले व खुद्द **कार्थेज्**च्या लोकांना मारावयास उठले; तेव्हांच काय ते ते लोक पुढें झाले. पुढें जे गेले ते एकदम अतित्वेषानें गेले एवढेंच नव्हे तर शत्रूला आणि मित्राला सारखेच मारीत सुटले. सगळ्या पराभव झालेल्या बाजूंतील लोक ज्या टोळीच्या मध्यभागीं दडून बसले होते ती **हानिबाल्**ची टोळी अद्यापि तशीच शिल्लक होती. ह्या ठिकाणीं लढाई फारच निकराची झाली व फार वेळ टिकली. योद्धे ज्या ठिकाणीं लढत त्याच ठिकाणीं पडत, कोणीही आपली जागा तिळमात्र सोडीत नसे. पण शेवटीं **लिलिअस्** आणि **म्यासिनिसा** (कारण तो **न्युमिडिआ**चा राजाही आपल्या भागांत यशस्वीच होता) जे **कार्थेजिनिअन्** घोडेस्वारांच्या पाठीस लागले होते ते तेथून परत आले व **हानिबाल्**च्या सैन्याच्या पिछाडीवर तुटून पडून त्यांनीं त्याच्या सैन्याच्या रांगा तोडून टाकल्या. मग बरीक शत्रूची अगदीं दाणादाण झाली.

हानिबाल् कांहीं थोडेसे घोडेस्वार घेऊन **आड्रुमीटम्**ला गेला. बाकीच्या लोकांपैकीं फारच थोडे वांचले. **कार्थेज्**चे वीस हजार लोक लढाईंत पडले व तितकेच कैद झाले. **रोमन्** लोकांचे फक्त पंधराशें शिपाई पडले. **पोलिबिअस्** म्हणतो "**सिपिओ** आणि **हानिबाल्** यांच्यामध्यें झालेल्या लढाईचा अशा रीतीनें परिणाम झाला. ह्या लढाईमुळें सर्व पृथ्वीचें सार्वभौमत्व **रोमन्** लोकांना प्राप्त झालें." **हानिबाल्**नें आपल्या फौजेंतील शिल्लक पांच हजार शिपाई गोळा केले व **कार्थेज्**ला परत आला. **कार्थेज्** सरकारनें तहाचें बोलणें आधींच सुरू केलें होतें. ह्याच वेळेस **सिपिओ**नें मागितलेल्या शर्ती सांगण्यास **कार्थेज्**चे वकील परत आले होते. त्यांपैकीं मुख्य शर्ती खालीं लिहिल्याप्रमाणें होत्या.

१ **कार्थेज्** आपल्या ताब्यांत **आफ्रिके**तील सर्व ठाणीं राखील, तें स्वतंत्र राहील व **रोम्**चें लष्कर राखण्याचा जुलूम त्यांच्यावर करण्यांत येणार नाहीं.

२ सर्व कैदी आणि पळून गेलेले लोक परत दिले जातील.

३ दहा शिवायकरून बाकीचीं सर्व जहाजें व सर्व हत्ती **कार्थेज्**नें सोडून दिले पाहिजेत.

४ **कार्थेज्**नें **आफ्रिके**च्या बाहेर कोणत्याही संस्थानाशीं लढाई करूं नये व आंतील संस्थानांशींही **रोमन्** सरकारच्या परवानगीशिवाय लढाई करूं नये.

५ **कार्थेज्**नें राजा **म्यासिनिसा** याजपासून किंवा त्याच्या वडिलापासून जें कांहीं घेतलें असेल तें सर्व त्यास परत द्यावें.

६ तह नक्की होई तोंपावेतों **रोम्**च्या सैन्याचा सर्व खर्च व पगार **कार्थेज्**नें द्यावा.

७ दंडादाखल दहाहजार ट्यालन्ट् (नाणें) व वर्षाचे दोनशें ट्यालन्ट् खंडणी **कार्थेज्**नें **रोम्**ला द्यावी.

८ **रोमन्** सरदारांनीं निवडलेले शंभर लोक जामीन ह्मणून **रोम्**ला **कार्थेज्**नें एकदम द्यावेत. जेव्हां या शर्ती राजसभेंत वाचण्यांत आल्या तेव्हां एक सभासद बोलावयास उठला. **हानिबाल्**नें त्याला धरलें आणि खालीं बसविलें. ह्यामुळें राजसभेला फार राग आला, तेव्हां **हानिबाल्**

ह्मणाला "जर अज्ञानामुळें राजसभेच्या रीतिविरुद्ध माझ्या हातून आचरण झालें असेल तर मला क्षमा व्हावी. मी नऊ वर्षांचा असतांना हा देश सोडून गेलों आणि आतां वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षीं परत येत आहें. माझ्या अपराधाचें मुख्य कारण पाहूं गेलें असतां माझी आपल्या देशाविषयींची हितबुद्धि होय. ज्या कोणा **कार्थेजिनिअन्**ला ह्मणून खरें खरें ठाऊक आहे त्यानें **रोम्** आपणास इतक्या दयाळूपणानें वागविण्यास तयार आहे असें असतां आपल्या दैवाचे आभार मानण्यास आपण तयार न व्हावें हें पाहून खरोखर मला फार आश्चर्य वाटतें. तुम्ही ह्या शर्तींविषयीं वादविवाद करीत बसूं नका; एकदम कबूल करा व देवाची प्रार्थना करा कीं **रोमन्** राजसभेलाही ह्या शर्ती पसंत व्हाव्या." **रोमन्** राजसभेनें तें वर्ष तसेंच जाऊं देऊन दुसऱ्या वर्षीं तहाच्या शर्ती पसंत केल्या. **हेराल्डस्** (लढाई तह वगैरे शिस्तवार चालविणारे लोक) जेव्हां **कार्थेज्**ला आले तेव्हां बळी द्यावयाचे पशू व प्राणी कापण्यासाठीं ते बरोबर गारगोट्यांचे चाकू घेऊन गेले. हें आपण वाचलें ह्मणजे लोखंड व पोलाद यांचा उपयोग समजण्याच्या अगोदर मनुष्याची स्थिति कशी होती याची कांहीं थोडीशी कल्पना करतां येते. **कार्थेजिनिअन्** लोकांनीं आपलीं सर्व जहाजें, सर्व हत्ती, सुमारें चार हजार लढाईंत कैद केलेले लोक व जे स्वपक्ष सोडून यांच्याकडे आले होते असे इतर लोक एकदम **रोम्**च्या ताब्यांत दिले. लहान मोठीं मिळून सुमारें पांचशें जहाजें तरी निदान असतील. **सिपिओ**नें तीं सर्व समुद्रांच्या कांठावर एकावरएक रचण्यास सांगितलें व व त्याला आग लावून दिली. **लिव्हि**नें म्हटलें आहे कीं, त्या भयंकर ज्वाला पाहून शहरच्या लोकांना आपले शहरालाच आग लागल्यासारखें वाटलें.

जेव्हां दंडाची रक्कम भरण्याचा प्रसंग आला तेव्हां पैसा कोठून आणावा याची अडचण पडली आणि सर्वांना जी घस सोसावी लागणार त्याबद्दल राजसभेंतील लोकांनीं बरीच कुरकुर केली. त्याचसमयीं एका सभासदानें उठून सभेस सांगितलें कीं "**हानिबाल्** स्वतः या आपल्या सर्व विपत्तीचें कारण असून आमचीं संकटें पाहून खुशाल भरसभेंत हंसतो आहे याकडे सभेनें लक्ष्य पोहोंचवावें". हें ऐकून त्या भव्यपुरुषानें उत्तर केलें "जसें माझें रूप स्पष्ट आणि सहज तुह्मांस दिसतें आहे तसेंच जर माझें अंतःकरण तुम्हांस दिसलें असतें तर हें आनंदाचें हंसणें नव्हे तर एका वेडावून गेलेल्या हृदयाचें हास्य आहे असें तेव्हांच तुम्हास समजलें असतें. तरीसुद्धां माझें हंसणें तुमच्या आंसवापेक्षां अधिक

योग्य आहे. जेव्हां तुमचीं जहाजें जाळून टाकिलीं व तुमच्यापासून तुमचीं हत्यारें हिरावून घेतलीं त्यावेळेस तुम्हांस रडूं यावयास पाहिजे होतें. पण नाहीं. जेव्हां तुमचा देश नागवला गेला तेव्हां तुम्ही तें शांतपणानें सोसलें. आणि जेव्हां आतां तुह्माला आपल्या खाजगी पैशांतून खंडणीसाठीं रकमा द्याव्या लागत आहेत तेव्हांबरीक आतां **कार्थेज्**चा निधनाचा समय आला आहे म्हणून रडत आहां; खरोखर तो पहिलाच **कार्थेज्**चा अखेरचा दिवस होता; शिवाय आतां असाही धाक वरचेवर मनाला वाटत आहे कीं आतांशी कायतो **कार्थे-ज्**चे संकटांना आरंभ झाला आहे. सध्याचें संकट हें पुढील येणाऱ्या संकटापुढें कांहींच नव्हे."

भाग पंधरावा.

हानिबाल्चे शेवटचे दिवस.

हानिबाल् या सर्व संकटांचें कारण होता असें जें त्या असंतुष्ट सभासदानें सांगितलें तें अगदीं अक्षरशः खरें होतें. तरी पण तो नेहमीं कोठें कां असेना पहिलाच असावयाचा, असा कांहीं त्याच्या स्वभावाचा गुणच होता आणि तद्नुसारें संस्थान कांहीं दिवस त्याच्याच ताब्यांत बहुशः होतें असें म्हटलें असतां चालेल. हें नवें कामही त्यानें फार चांगल्या रीतीनें बजावलें. **कार्थेज्**च्या न्यायाधीशांनीं अतिशयच सत्ता बळकावली होती. वास्तविक पाहतां कायद्यानें त्यांच्याकडे इतकी सत्ता कधींच येत नव्हती. दरेक मनुष्याचा जीव जिंदगी आणि अब्रू हीं सर्व त्यांच्या ताब्यांत होतीं. आणि ते त्यांची हवी तशी व्यवस्था लावण्यास कधींही मार्गेंपुढें पाहात नसत. **हानिबाल्** हें सर्व बदलून टाकण्याच्या मार्गास लागला; अर्थातच सर्व लोक त्याच्याच पक्षाचे होते. न्यायाधीशाचा हुद्दा वार्षिक करण्यांत आला व लोकांनीं त्याची निवडणूक करावी असें ठरलें. सध्यां आपणास कांहीं असली व्यवस्था पसंत पडावयाची नाहीं पण त्या देशच्या त्या वेळेच्या विशिष्ट स्थितीस तीच व्यवस्था योग्य असेल.

दुसरी एक मोठी सुधारणा **हानिबाल्**नें केली ती जमाबंदीच्या खात्यांत. देशाचा आदा काय व खर्च काय याचा नीट तपास करून त्यानें असें शोधून

काढलें कीं बरीच रक्कम नोकरांच्या गफलतींत जाते व लागलीच हा शोध एका जाहिरसभेंत त्यानें सांगितला. जर वसूल प्रामाणिकपणानें गोळा करण्यांत आला व खर्चांतही कांहीं लबाडी झाली नाहीं तर देशाचा सर्व खर्च भागला जाईल; **रोम्**ची खंडणी देतां येईल व लोकांवरचा करही कमी करतां येईल. असें त्यानें सांगितलें. ह्या असल्या कृत्यांनीं त्याला बरेच शत्रू व्हावेत हें स्वाभाविकच आहे. ज्यांचें ह्या नव्या व्यवस्थेनें प्रत्यक्ष नुकसान झालें ते तर याच्याविरुद्ध होतेच पण इतर कित्येक प्रामाणिक मनुष्यांना देखील याचा धाक वाटे. त्यांना वाटे कीं **हानिबाल्** हा **कार्थेज्**ची सत्ता व संपत्ति वाढविण्यास पाहतो आहे खरा; पण संपत्ति वाढली न वाढली तोंच **रोम्**च्या लढाईंत तो देशाला गुंतवील. कोणी ह्मणतात कीं त्याच्या शत्रूंनीं **रोम्** सरकारापाशीं खोडसाळपणानें त्याची कागाळी केली. **सिरिआच्या आन्टिआकस्**शीं स्नेह बांधून तो लढाई करण्याच्या रंगांत होता असें त्यांनीं त्यांना जाऊन सांगितलें **रोमन** लोक ह्या राजाशीं लढण्याच्या बेतांत होते व आपल्या जुन्या कट्टया दुश्मनावर आळ घालण्यासही तयार होते. **सिपिओनें** विरुद्ध मत दिलें असतांही **हानिबाल्**ची मागणी करण्यास वकील पाठविण्यांत आले. वरकांति **कार्थेज्** आणि **म्यासिनिसा** यांच्यामधील तंटा मिटविण्यासाठीं आपण आलों आहों असें त्यांनीं दाखविलें.

हानिबाल्ला खरें कारण तेव्हांच समजलें आणि त्यानें पळून जाण्याचा निश्चय केला. शत्रूंना आपला बेत समजूं नये ह्मणून त्यानें कोणत्यांही तऱ्हेची भीति दाखविली नाहीं व नेहेमींप्रमाणें रस्त्यावर मोकळें फिरण्याचें ठेविलें. पण एक दिवस रात्रीं तो स्वार झाला व शहराबाहेर पडून समुद्रकांठीं आला. तेथें त्यानें असल्या समयास उपयोगीं पडावें ह्मणून एक जहाज ठेविलें होतें, त्यांत बसून **सार्सिना**स आला. आपल्या पळून जाण्याची गोष्ट दडविण्यासाठीं ह्मणून त्यानें आपण **टायर्**ला राजकारणी वकील ह्मणून जातों असें ढोंग केलें. बंदरावर आला तों व्यापाराचीं जहाजें जिकडे तिकडे दिसलीं; त्यामुळें त्यांना आपण सांपडतों कीं काय अशी भीति त्याला फार वाटूं लागली. ह्मणून त्यानें अगदीं न कळवितां जाण्याचा निश्चय केला. सर्व जहाजांच्या कप्तानांना त्यानें एका मेजवानीला नेलें व तंबू उभारण्याकरितां सर्व जहाजांच्या डोलकाठ्या व शिडें मागून नेलीं. रात्रीची गम्मत व मजा बराच वेळ पावेतों चालली. तें सर्व संपावयाच्या अगोदर **हानिबाल्** पार निघून गेला. ह्या

जहाजांचीं शिडें वगैरे चढविण्यास कितीक तास लागले. **हानिबाल् सर्सिनाहून टायर्**ला गेला तेथें त्याचा लोकांनीं बहुमान केला. तो **टायर्**हून जो निघाला तो **आन्टिआक्** बंदराला आला. **आन्टिआकस्** ती जागा सोडून आधींच **एफिसस्**ला गेला होता. तिकडेच **हानिबाल्** ही गेला.

हा **सिरिआ**चा **आन्टिआकस् सिल्युकस्**च्या चवथ्या पिढींतला होता. **आलेक्झांडर्**च्या मरणानंतर ज्या सरदारांनीं **मासिडोनिया**चें राज्य वाटून घेतलें त्यांपैकीं हा एक होता. कां तें समजत नाहीं, पण त्याला 'महान्' ह्मणत असत. वास्तविक पाहतां जबर महत्त्वाकांक्षेशिवाय दुसरा कांहींएक 'महान्' ह्मणवून घेण्याजोगता गुण त्याच्या अंगीं नव्हता. नामर्दपणामुळें म्हणा किंवा असहनतेमुळें म्हणा त्यानें **हानिबाल्**ला अति मूर्खपणानें वागविलें. त्यानें त्याचा सल्ला घेतला नाहीं व त्याला नोकरीसही ठेविलें नाहीं. **हानिबाल्**नें त्याला एकदम लढाई करण्याची मसलत सांगितली असती. त्यावेळेस (ख्रिस्ती शकापूर्वीं १९५ व्यावर्षीं) **रोम्**ला अतिशय शत्रु होते. **गाल्**चे लोक तर सारखे त्यांच्या पाठीमागें लागून त्यांना त्रास देत असत. अशा वेळेस **आन्टिआकस्**नें जर एकदम **रोम्**वर हल्ला करण्याचें मनावर घेतलें असतें तर परिणाम कांहीं भिन्न झाला असता. पण तो आपला रेंगाळत व खेळत बसला आणि शेवटीं जेव्हां दोन वर्षांनंतर त्यानें हल्ला करण्याचा निश्चय केला तेव्हां समय निघून गेला होता. एकशें ब्याण्णवांत तो **ग्रीस्**मध्यें जाऊन उतरला. तेथें पुढच्याच वर्षीं **थर्मापिली** येथें त्याचा अगदीं पराभव झाला. ह्या स्वारींत **हानिबाल्** नव्हता. त्याला एक आरमार गोळा करण्यास सांगितलें होतें. ह्या योजनेंत कांहीं विशेष विचित्रसें नव्हतें; कारण अगदीं अर्वाचीन कालापावेतों सैन्याचा माणूस आरमारावर खुशाल नेमीत असत. **ऱ्होड्**च्या बेटांतील एका आरमारानें **हानिबाल्**वर हल्ला केला आणि जरी त्याचा स्वतःचा प्रत्यक्ष पराभव झाला नाहीं तरी एकंदर आरमारास मागें फिरावें लागलें.

त्याचवर्षीं १९० सालीं **म्याग्नेसिआ**ची मोठी लढाई झाली. त्यांत **हानिबाल्** हजर होता कीं नाहीं हें कांहीं सांगवत नाहीं. पण त्याची या वेळची एक दंतकथा लोक सांगतात. **आन्टिआकस्**नें **रोमन्** लोकांशीं लढण्याकरितां ह्मणून एक सुमारें साठ सत्तर हजार शिपाई गोळा केले. **ग्रीस्**

आणि **एशिआ** खंडाच्या पश्चिम भागांतून हें सैन्य गोळा केलें होतें. त्यामुळें त्यांचे पोषाख व चिलखतें मोठीं भपक्याचीं व निरनिराळ्या तऱ्हेचीं होतीं. ते सर्व जेव्हां रांगेनें उभे राहिले तेव्हां सोन्यारुप्यानें चकाकणाऱ्या त्या सर्व रांगांकडे मोठ्या अभिमानानें पाहून राजानें **हानिबाल्**ला विचारलें 'कां एवढें **रोमन्** लोकांना बस्स होईल ना.' तेव्हां **हानिबाल्**नें ग्राम्यविनोदानें म्हटलें "हो हो जरी **रोमन्** लोकांसारखें हावरे लोक पृथ्वीवर सांपडावयाचे नाहींत तरी त्यांना सुद्धां एवढें बस्स होईल." अर्थातच **हानिबाल्** लुटीच्या संबंधानें ह्मणत होता. सैन्याच्या कुवतीची गोष्ट त्यानें एका बाजूलाच ठेविली.

हानिबाल्ला वाटलें त्याप्रमाणेंच **म्याग्नेसिआ**च्या लढाईत **सिरिअन्** सैन्याचा अगदीं नाश झाला व **आन्टिआकस्**लाही लोकांनीं तह करण्याचा सल्ला दिला. दोन वर्षानंतर म्हणजे १८८ सालीं तह ठरला. त्यांतील मुख्य शर्त अशी होती कीं 'राजानें ज्या **रोम्**चे शत्रूंना आपल्या संस्थानांत आश्रय दिला असेल त्या सर्वांना **रोम्**चे ताब्यांत द्यावें.' **आन्टिआकस्**नें ही शर्त कबूल केली पण ती करण्याचे अगोदर आपल्या मित्राला पळून जाण्याची संधि दिली.

आन्टिआकस्च्या संस्थानांतून पळून गेल्यावर **हानिबाल्** कोठें गेला याबद्दल नाना तऱ्हेचे तर्क लोकांनीं केले आहेत. कित्येक असें सांगतात कीं तो **क्रीटा**ला गेला. जरी असंभवनीय दिसते तरी पण लोकांना त्याच्या चातुर्याविषयीं काय वाटत होतें, हें स्पष्ट दाखविणारी अशी **क्रीटा** येथील एक दंतकथा सांगण्यांत येत असते. त्याच्यापाशीं जो पैका होता तो **क्रीटा**च्या मनांतून घ्यावयाचा आहे असा त्यास संशय आला. त्यांना फसविण्यासाठीं म्हणून त्यानें उत्तम उत्तम दारूचीं पिपें शिशानें भरलीं व त्याजवर पातळ सोन्या रुप्यांचे पत्र्यांचीं झांकणें करवून तीं पक्कीं बंद केलीं व मोठ्या समारंभानें गांवांतील मुख्य मुख्य लोकांसमोर **डायना**च्या देवालयांत ठेवून दिलीं. इकडे जो खरा खजिना होता तो कांहीं तांब्या पितळेच्या भांड्यांत घालून घराच्या एका कोपऱ्यांत ठेवून दिला. **क्रीटा**हून तो **आर्मिनिआं**त गेला व तेथें **आर्टाक्साटा** शहराची स्थापना केली. शेवटचीं कांहीं वर्षें **बिथिनआ**च्या राजाच्या कचेरींत त्यानें घालविलीं असें खात्रीलायक आधारावरून कळतें. **बिथिनआ**चा राजा **प्रुशिआस्** हा

रोम्चा मित्र **पर्ग्यामस्** देशाचा **युमिनिस्** राजा याशीं लढाई करीत होता. तेव्हां **हानिबाल्**नें त्याला लागलींच मदत केली; एका समुद्रावरच्या लढाईंत **हानिबाल्**नें शत्रूंच्या जहाजावर विषारी सर्प सोडून लढाई जिंकली अशा तऱ्हेची एक कथा लोक सांगतात. पण तिजवर विश्वास ठेवलाच पाहिजे असें कांहीं नाहीं.

ह्या ठिकाणीं कांहीं वर्षें **हानिबाल्** अगदीं स्वस्थ होता, पण एकशेंत्र्यायशीं सालीं **रोमन्** लोकांनीं **प्रुशिआस्** राजाकडे एक वकील पाठविला व त्याकरवीं असें कळविलें कीं **हानिबाल्**ला एकदम आमच्या ताब्यांत द्यावें. राजाला ही मागणी नाकबूल करतां येईना. तेव्हां त्यानें **हानिबाल्**ला पकडण्यास एकदम शिपाई पाठविले. **हानिबाल्**ला परिणामाला असें कांहीं तरी होईल असें वाटतच होतें. त्याला पक्कें ठाऊक होतें कीं आपण जो **रोम्**ला अपाय केला त्याबद्दल आपणास ते कधींही क्षमा करणार नाहींत व त्याला असेंही ठाऊक होतें कीं **रोम्**नें अर्थतः मागणी केल्यावर **बिथिआ**च्या राजाला नाहीं म्हणण्यास संकटच पडेल. त्याच्या अखेरीची ही कथा मोठी चमत्कारिक आहे. असल्या चरित्रांना बहुतकरून कांहीं तरी अंतकालींच्या विचित्र गोष्टी जोडण्याची मनुष्य स्वभावाला गोडीच असते. ही गोष्ट जर खरी मानावयाची असेल तर अशी आहे कीं, त्यानें आपल्या घराला बाहेर जाण्याच्या सात वाटा ठेवल्या होत्या. जेव्हां सातीं द्वारांशीं शिपायांचा गराडा आहे असें त्यानें पाहिलें तेव्हां त्यानें आपल्या प्रसंगासाठीं म्हणून शिलकींत ठेवलेलें विष मागून आणविलें व तें पिऊन देहत्याग केला. कोणी ह्मणतात कीं तो आपल्या आंगठींतच नेहेमी विष ठेवीत असे. योद्ध्यांच्या महत्वाकांक्षेविषयींचा पोकळ अभिमान किती क्षणभंगुर असतो तें दाखविण्यासाठीं **हानिबाल्**चें उदाहरण घेऊन ह्या आंगठीला **कानी**च्या लढाईचा सूड उगवणारी असें **ज्युव्हिनल्**नें म्हटलें आहे. **लिव्हि**नें त्याचे अखेरचे शब्द म्हणून खालीं लिहिलेलीं वाक्यें दिलीं आहेत. "एका वृद्ध मनुष्याच्या मरणाची वाट पाहण्याचा **रोम्**ला कंटाळा आला आहे त्याअर्थीं त्यांची चिंता मी दूर करतों. एखाद्या निरापराधी, निराश्रित मनुष्याला कृतघ्नपणानें पकडून **फ्ल्यामिनिअस्**ला (**रोम्**चा वकील) मोठी कीर्ति अथवा जय मिळेल असें नाहीं. **रोम्**चा स्वभाव कसा व किती पालटला आहे याची हा दिवसच प्रत्यक्ष साक्ष देत आहे व ती पुरीही आहे. ह्याच लोकांच्या आजापणजांनीं **पिऱ्हस्** राजाचीं सैन्यें **इटलीं**त लढत असतां

त्याच्यावर जो विषप्रयोग होणार होता त्याची बातमी वेळेवर त्याला पोहोंचविली आणि आज हेच लोक **प्रुशिआस्**नें आपल्या अभ्यागतास ठार मारावें म्हणून त्याकडे वकील पाठवीत आहेत." तो मेला तेव्हां सुमारें चौसष्ट वर्षांचा होता.

जो मार्ग **कार्थेज्**चे कथानकासंबंधानें आपणास स्वीकारावा लागला तोच मार्ग **हानिबाल्**च्या स्वभावाविषयीं लिहितांनाही स्वीकारावा लागणार आहे. त्याच्या शत्रूंच्या इतिहासावरच बहुतांशीं आपणास अवलंबून राहणें भाग आहे. त्याच्या युद्धचातुर्याविषयीं कोणास संशय सुद्धां यावयास नको. त्यांत त्याला मागें टाकणारा अद्यापि कोणी झाला नाहीं. त्याचें धैर्यही त्याच्या शौर्याच्या तोडीचें होतें. तो आपलें आंग फुकट उघडें पडूं न देण्याविषयीं जी खबरदारी घेत असे त्यासाठींच जरी त्याची विशेष ख्याति आहे तरीपण तो धैर्यवान् कमी होता असें कांहीं म्हणवत नाहीं. त्याच्या सर्व संवयी फार भितरेपणाच्या होत्या हें तर सर्वांना ठाऊकच आहे. मुख्य जे त्याच्या स्वभावांतील दोष म्हणून काढले जातात ते कृतघ्नपणा, निर्दयपणा आणि द्रव्यलोभ हे होत. त्यानें स्वतः साठीं म्हणून द्रव्यलोभ कधींच केला नाहीं, पण ज्याला लढाईच्या लुटींतूनच लढाईचा खर्च चालवावयाचा होता, ज्याला परदेशांत एका अफाट सेनेला अन्नपाणी, कपडालत्ता व पगार द्यावयाचें होतें, ज्याला आपल्या देशांतून फारच थोडा पुरवठा मिळण्याची आशा होती अशा मनुष्याला असल्या कामांत मागें-पुढें पाहणें अशक्यच होतें. निर्दयपणाच्या संबंधानें काय म्हणावयाचें तें समजत नाहीं. जें द्रव्यलोभाविषयीं म्हटलें आहे तें थोडेंबहुत येथेंही लागतें. **हानिबाल्** ज्या परिस्थितींत होता त्या परिस्थितींत कोणासही शत्रूशीं निर्दयपणानें व क्रौर्यानें वागल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कृतघ्नपणाच्या संबंधानें पाहतां **रोमन्** लोकांत '**प्यूनिक** प्रामाणिकपणा' ही संज्ञा अप्रामाणिकपणालाच देण्याची चाल पडली होती आणि **हारेस्**नें तर स्पष्टपणें **हानिबाल्**ला 'अप्रामाणिक' असें म्हटलें आहे. पण वास्तविक ह्या आरोपाच्या पुराव्याला कांहीं फारशीं प्रमाणें सांपडत नाहींत. शिवाय **रोमन्** सरदारांनीं लोकांना नांवें ठेवण्यास हक्क येण्यापुरता तरी प्रामाणिकपणा आपले आचारविचार किंवा व्यवहार यांत ठेविला होता कीं नाहीं याविषयीं शंका घेण्यास बरीच जागा आहे. **सिपिओ** हा सर्व प्रकारें सर्व **रोमन्** लोकांहून आदरास विशेष पात्र आहे पण तहाचें बोलणें चालू असतां त्यानें जो **सिफ्याक्स्**वर हल्ला केला तेवढ्या नीचतेचें

सुद्धां हानिबाल्च्या चरित्रांत कोणतेंही कृत्य दाखवितां येणार नाहीं, मग त्याहून नीचतेचें तर लांबच राहिलें.

भाग सोळावा.

ऱ्हासाचा पूर्व रंग.

हानिबाल्च्या मरणानें **कार्थेज्** कांहीं तरी गडबड करीत असेल हा संशय कांहीं दूर झाला नाहीं. **हानिबाली** तहानें (**झामा** येथील तहाला हीच संज्ञा लोकांनीं दिली होती) **कार्थेज्** अगदीं बसलें असें नाहीं. जरी त्याचा बराच मुलूख गेला तरी व्यापार अद्यापि कायम होता. त्यांचीं लढाऊ जहाजें जरी शत्रूंनीं नेलीं होतीं तरी पण व्यापाराचीं जहाजें कायम होतीं. त्यांच्या खजिन्यांत नवीं नवीं सैन्यें भाड्यानें उभारण्यासाठीं सोनें रगड होतें. तह होऊन वीस वर्षें झालीं नाहींत तोंच पन्नास वर्षांची खंडणी एकदम घेण्याविषयीं **कार्थेज्**चे लोक **रोम्**ची प्रार्थना करूं लागले. पण **रोमन्** लोकांनीं अर्थातच शत्रूला एकदम खंडणी घेऊन मोकळें सोडण्यापेक्षां आपला थोडा थोडा शत्रूवर अम्मल राखण्याचें पसंत केलें. पण **कार्थेज्** किती लवकर सांवरलें हें पाहून त्यांच्या मनांत धाक उत्पन्न व्हावयास लागला. सुमारें दहा वर्षांनंतर जेव्हां **रोम्**नें **म्यासिडोनिआ**शीं लढाई सुरू केली तेव्हां **म्यासिडोनिआ**चे वकील सुनावणीस राजसभेंत आले होते अशी बातमी **रोम्**ला लागली. **म्यासिडोनिआहून** वकील आले होते व त्यांना मदत करण्यास युद्धपक्षाचे कांहीं लोक तयार होते हेंही खरें. पण **कार्थेज्**नें ह्मणजे **रोम्**च्या शत्रूंशीं खलबतें केलीं असें

मानण्यास कांहीं कारण नाहीं. तरी पण एका **रोमन्** सरदाराला ह्या सर्व गोष्टीचा अतिशय संशय येत असे. ह्या **रोमन्** सरदाराचें नांव **मार्कस् पोर्शिअस् केटो** अथवा वडील **केटो** असें होतें. वडील ह्मणण्याचें कारण त्याचा नातू ज्यानें **सीझर्**च्या जुलूमी अंमलाखालीं राहण्यापेक्षां मरण पत्करलें यालाही **केटोच** म्हणत असत. दुसऱ्या **प्यूनिक्** लढाईंतील सर्व स्वाऱ्यांत हा हजर होता. आणि त्यावेळेस अनुभवास आलेल्या सर्व गोष्टी त्याच्या पूर्णपणें ध्यानांत होत्या. **कार्थेज्** आणि राजा **म्यासिनिसा** यांच्यामध्यें उपस्थित झालेल्या लढाईच्या कारणांचा तपास करण्याकरितां त्याला **कार्थेज्**कडे पाठविण्यांत आलें होतें त्यावेळीं त्यानें तेथील भरवस्तीचीं शहरें व चांगल्या रीतीनें वसलेला प्रदेश, सुव्यवस्थित आरमार व तोंडापर्यंत भरलेलीं शस्त्रागारें पाहून तो अगदीं चकित झाला. तो **रोम्**ला परत आला तेव्हां त्यानें तेथील सर्व वृत्तांत राजसभेला कळविला व ह्मणाला, 'हे लोक पूर्वीं कधींही नव्हते इतके बलाढ्य झाले आहेत आणि ते **आफ्रिके**शीं जी लढाई चालवीत आहेत ती तुमच्या लढाईला उपोद्घातरूप आहे.' हे शब्द बोलतांना त्यानें आपल्या झग्यांतील कांहीं पक्के अंजीर राजसभेपुढें ओतले. राजसभेचे सभासद जों त्या फळाची चहा करीत होते तोंच हा ह्मणाला "ज्या देशांत हीं फळें होतात तो देश येथून फक्त तीन दिवसाच्या वाटेवर आहे." तो इतका जवळ आहे कीं त्यापासून आपल्याला भीति बाळगली पाहिजे अथवा तो इतका जवळ आहे कीं त्यावर आपणास आतां चालून जातां येईल, यांपैकीं त्याच्या मनांतून काय सांगावयाचें होतें तें कांहीं सांगवत नाहीं. एवढें बरीक खरें कीं, त्या दिवसापासून आपलें मत दर्शविण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां तेव्हां तो तें दाखविण्याची संधि अगदीं जाऊं देत नसे. सभेंत कोणत्या कां विषयावर मतें घेईनात तें देतांना "आणि माझें असें मत आहे कीं **कार्थेज्** अगदीं नाहींसें करून टाकलें पाहिजे." हें पालूपद तो आपले सर्व मतास जोडीत असे. आणि तितक्याच हट्टानें एक **सिपिओ** (ज्याला '**न्यासिका**' अथवा 'सरळ नाकाचा' असें उपनांव होतें) **झामा**च्या लढाईंतील विजयी वीर पुरुषाचा आप्त आपल्या अभिप्रायाला 'माझें असें मत आहे कीं **कार्थेज्** राखलेंच पाहिजे' असें जोडीत असे.

कार्थेज्ला घरच्या घरींच राजा **म्यासिनिसा** हा मोठा बलाढ्य शत्रु होता. त्यानें पहिल्याप्रथम **हन्निबाल् बार्का**च्या हाताखालीं **स्पेन्**मध्यें नोकरी बजाविली होती. पुढें पक्ष बदलून **झामा** येथील लढाईंत **रोम्**च्या

वतीनें तो **कार्थेज्**शीं लढला होता. त्याबद्दल त्याला बक्षिशीही फार उत्तम मिळाली होती. त्याला त्याच्या बापाचें सर्व राज्य मिळालें होतें व शिवाय **सिफ्याक्स**च्या राज्याचाही बराच भाग मिळाला होता. सुमारें पन्नासांवर वर्षें तो एकसारखी आपली सरहद्द **कार्थेज्**च्या ताब्यांतील प्रांत घेऊन वाढवीत होता व त्याला खातरी होती कीं **रोम्** आपणास प्रत्यक्ष मदत करील. तेवढें त्याच्या हातून न झाल्यास निदान आपल्या करण्यास विरुद्ध तर जाणार नाहींच. **कार्थेज्**ला आपण होऊन **रोम्**च्या संमतीशिवाय **आफ्रिके**तही लढाई करण्याची बंदी होती. यामुळें ह्या सर्व अपमानांचा प्रतिकार **रोम्**ला 'आमचे उपद्रवापासून संरक्षण करा' ह्मणून विनंति करणें एवढाच काय तो **कार्थेज्**च्या हातांत होता. अनेक वेळ **रोम्**हून ह्या फिर्यादीचा तपास करण्यासाठीं म्हणून अधिकारी पाठविण्यांत आले होते. एकदां तर खातरीनेंच पण अधिक वेळही ह्या अधिकाऱ्यांनीं **म्यासिनिसा**च्या विरुद्ध निकाल केला असेल, पण बहुधा ते असल्या प्रकरणांचा पूर्ण निकाल कधींही लावीत नसत; आणि त्यामुळें राजा **म्यासिनिसा**नें हा लुटारूपणाचा प्रकार चालविला होता व बहुश: जें जें तो घेत असे तें तें दाबून ठेवण्याचाही बरोबर बंदोबस्त करीत असे.

एकशेंएकावन सालीं ह्या सर्व भांडणामुळें लढाई झाली. खास **कार्थेज्**-मध्येंही **म्यासिनिसा**ला अनुकूल असा एक पक्ष होता. युद्धपक्ष अथवा लोकमतपक्ष यांतील लोकांनीं शहरांतील बऱ्याच महत्त्वाचे असे चाळीस लोक गांवाबाहेर घालवून दिले व त्यांना पुन: कधींही आंत न घेण्याविषयीं शपथाही घेतल्या; हे हांकून दिलेले लोक राजाकडे पळाले व त्यांनीं त्याला लढाई करण्यास भर दिली. तोही लढाईस तयार होताच, कारण त्याच्या मनांत **कार्थेज्**च्या मुलुखापैकीं एक शहर फार भरलें होतें व तें घेण्याचा त्याचा अगदीं पूर्ण मनोदय होता. पण अगोदर त्यानें आपल्या मुलांपैकीं एक वकील पाठविला. त्या राजपुत्राला आंत तर येऊं दिलें नाहींच पण परत जातांना त्याजवर हल्ला केला. **कार्थेज्**चे लोकांनीं ह्या लोकावर आपला सेनाधिपति **हस्डुबाल्** यास पाठविलें. **हस्डुबाल्**ला **म्यासिनिसा**कडचे दोन सरदार सुमारें सहा हजार स्वार बरोबर घेऊन येऊन मिळाले. कांहीं थोड्याशा जुजबी चकमकी झाल्या; त्यांत **कार्थेज्**चीच सरशी झाली. नंतर राजा **म्यासिनिसा**नें पळ काढल्याची बतावणी केली व आपल्या पाठीवर **हस्डुबाल्**ला येऊन त्याला अशा एका

ठिकाणीं आणून सोडलें कीं जेथें धान्य वगैरेचा पुरवठा मिळविण्यास बरेंच कठीण पडेल. नंतर लढाईस लवकरच सुरवात झाली. वृद्ध राजा–आतां तो सुमारें ऐंशीं वर्षांचा होता–देशाच्या रिवाजाप्रमाणें जीन व रिकाबी शिवाय घोड्याच्या उघड्या पाठीवर स्वार होऊन स्वतः सेनाधिपत्य करीत होता. निश्चित असा परिणाम कांहींच झाला नाहीं; पण एकंदरींत पाहतां राजाचीच सरशी झाली. हा युद्ध चमत्कार पाहणारांत एक तरुण **रोम्**चा सरदार हजर होता. ह्या सरदाराशीं **कार्थेज्**च्या ऱ्हासाचा बराच महत्त्वाचा संबंध पुढें घडला. ह्या सरदाराचें इतिहासांत नमूद असलेलें सगळें नांव **पब्लिअस् कार्निलिअस् सिपिओ एमिलिआनस् आफ्रिकानस् मायनर.** तो **पिड्ना*** येथील लढाईंतील विजयी सरदार प्रख्यात **एमिलिअस् पालस्** याचा मुलगा व **कानी** येथें पडलेला **एमिलिअस् पालस्** याचा नातू होता. **झामा** येथील लढाईंतील विजयी पुरुष **सिपिओ आफ्रिकानस्** याच्या वडील मुलानें त्याला आपण राजनियुक्त कामें करण्यास अशक्त ह्मणून दत्तक† घेतला होता. तो **स्पेन्** येथील **रोमन्** सैन्यांत चाकरीस होता व तेथून हत्ती विकत घेण्यासाठीं ह्मणून **म्यासिनिसा**-कडे आला होता. त्याला टेंकडीवरून खालीं मैदानांत चाललेली लढाई पाहण्याची परवानगी होती. लढाई झाल्यानंतर त्यानें त्या लढाईच्या अपूर्वतेबद्दल बरेंच वर्णन केलें व बऱ्याच लढायांत हजर असतांही ह्या लढाईनें अगदीं अननुभूत आनंद आपणास जाहला असेंही सांगितलें. (ही गोष्ट त्याचा मित्र **पालिबिअस्**नें सांगितली आहे.) तो म्हणाला 'एक लाख माणूस एकमेकांशीं लढण्यांत गर्क झालेलें म्यां पाहिलें. माझ्या अगोदर दोघांनींच असला देखावा पाहिला असेल. एक **झिअस्**नें **ईडा** पर्वतावरून व **ट्रोजन्** लढाईत **पोसिडन्**नें **सामाथ्रेस्** वरून.' **सिपिओ**नें दोन पक्षांमध्यें मध्यस्थी करण्याचें शिरावर घेतलें. **एम्पोरिआ** अथवा **मार्केटस्** भोंवतालचा सर्व प्रदेश, दोनशें ट्यालन्ट् तूर्तचा दंड व आठशें ट्यालन्टूची हप्तेबंदी कबूल केली. पण राजानें जेव्हां पक्ष सोडून गेलेल्या लोकांना परत देण्याची मागणी केली, तेव्हां तहाचें

* पिड्ना येथील मोठ्या लढाईनें (१६९) म्यासिडोनिआच्या राजाचा अंत झाला.

† येथें तरुण वाचकानें लक्ष्यांत ठेवावें कीं दत्तक घराण्याचें नांव त्यानें घेतलें होतें व त्याला आपल्या मूळ घराचें नांव '**आनस्**' प्रत्यय लावून जोडीत असत. जसें–एमिलिअस् एमिलिआनस्. रोमन् लोकांस दत्तकाच्या नांवाचा हाच प्रघात असे.

बोलणें तेथल्या तेथेंच राहिलें. वास्तविक **हस्डुबाल्**नें ह्या वेळेस आपणास जी शक्य होती ती चांगली माऱ्याची जागा धरून ठेवावयाची होती. पण त्यानें तें करण्याची हेळसांड केली. त्याला वाटलें कीं **म्यासिनिसा** आणखी तहाचें बोलणें लावण्यास येईल, अथवा **रोम्** आपल्या तर्फे मध्यस्थी करील. पण ह्या त्याच्या सर्व गोष्टी अवधीवर टाकण्यानें त्याचें फार नुकसान झालें. दुष्काळ आणि तज्जन्य ताप यांनीं त्याच्या सैन्यांतील बहुत लोक मेले. शेवटीं अशा शर्तीवर तह कबूल करणें प्राप्त जाहलें कीं, ज्यामुळें **कार्थेज्**ला खालींच पाहावें लागलें. '**म्यासिनिसा**च्या पक्षाचे जे लोक शहराबाहेर हाकून देण्यांत आले होते त्यांना शहरांत घ्यावें, सर्व पळून आलेले लोक परत देण्यांत यावेत, पांच हजार लोक दंडादाखल देण्यांत यावेत व तो आणि त्याचे शिपाई यांनीं कांहींएक हत्यारपात्यार घेतल्याशिवाय फक्त एकच वस्त्रासहित शत्रूच्या छावणींतून जावें.' राजाच्या एका मुलानें एक घोडेस्वारांची टोळी घेऊन सर्व सोडून गेलेल्या निराश्रित शिपायांवर स्वारी केली व अति क्रूरतेनें त्यांना ठार मारलें. **हस्डुबाल्** व आणखी कांहीं थोडे लोक एवढेच कायते **कार्थेज्**ला परत आले.

पण ह्याहून अधिक विपत्ति तर पुढेंच यावयाची होती. **कार्थेज्** सरकारनें **हस्डुबाल्**ला व इतर ज्यांनीं ज्यांनीं म्हणून लढाईस मदत केली त्या सर्वांना देहांत शिक्षा देण्याचा ठराव केला. पण जेव्हां **रोम्**ला गेलेल्या वकीलांनीं **कार्थेज्**ला दोषमुक्त करण्यासाठीं हा मुद्दा काढला, तेव्हां **रोम्**नें विचारलें, 'मग त्यांना तुह्मी लढाईच्या अगोदर शिक्षा कां दिली नाहींत, पराभवाची कां बरें वाट पाहिली'? ह्याला अर्थातच कांहीं उत्तर देण्याजोगतें नव्हतें. तेव्हां **रोमन्** राजसभेनें ठराव केला कीं **कार्थेज्**चें उत्तर पुरेसें नाहीं. त्यावर त्या हतभागी लोकांनीं विचारलें, 'मग आम्ही काय करावयाचें तें आम्हांस कळवा.' 'तुह्मी **रोमन्** लोकांची मर्जी संभाळली पाहिजे'. असें अस्पष्ट उत्तर त्यांना देण्यांत आलें. हें उत्तर त्यांनीं **कार्थेज्**च्या राजसभेला कळविल्यावर त्यांनीं आह्मांस याहून अधिक स्पष्टरीतीनें काय करायाचें तें कळवा, अशा अर्थाचा निरोप वकीला करवीं पाठविला. त्यावर 'तें तर **कार्थेज्**ला आधींपासूनच ठाऊक आहे' असें उत्तर **रोम्**नें पाठविलें. **केटो**चा क्रूर आशय **रोम्**ला पसंत पडला, व आतां **कार्थेज्** पृथ्वीतलावरून नाहींसें करण्याचा त्यांनीं निश्चय केला. जर त्यांच्या ह्या उद्देशाविषयीं कांहीं संशय

राहिला असेल तर पुढें **युटिका**हून जेव्हां लोक तें शहर **रोम्**च्या स्वाधीन करण्यासाठीं गेले तेव्हां तर तो अगदीं नाहींसा झाला. त्या वर्षाचे दोन अधिकारी **म्यानिलिअस्** आणि **सेन्सोरिनस्** ह्यांच्या बरोबर एक सैन्य व आरमार देऊन त्यांना पाठविण्यांत आलें. **कार्थेज्**चा पुरा नाश झाल्याशिवाय बस्स करावयाचें नाहीं अशी त्यांना सक्त ताकीद खाजगी रीतीनें पोहोंचलेली होती. त्यांच्या बरोबर सुमारें एकलक्ष माणूस होतें. ही स्वारी लोकांना फार आवडली; कारण लोकांना लूट पुष्कळ सांपडेल अशी फार आशा होती. त्यामुळें आपखुषीनें लढणाऱ्या शिपायांची गर्दीच गर्दी उसळून गेली. आरमार **इटली** सोडून निघालें हीच काय ती लढाई सुरू जाहल्याची पहिली निशाणी **कार्थेज्**ला होती.

पूर्ण भिस्त **रोम्**वर ठेवून त्याजला अशरण शरण गेलें असतां अद्यापि तें आपलें रक्षण करील अशी आशा **कार्थेज्**ला होती. हव्या त्या शर्तीवर तह करण्यासाठीं पूर्ण अधिकार देऊन वकील **रोम्**कडे पाठविण्यांत आले. त्यांना खालील उत्तर मिळालें 'जर **कार्थेजिनिअन्**.लोक आपल्यांतील उच्च उच्च कुलांतील तीनशें लोक जामीन देत असतील व तीस दिवसाच्या आंत इतर सर्व शर्ती रुजू करून देत असतील तर **कार्थेज्** आपला प्रदेश आणि आपली स्वतंत्रता कायम राखील.' पण **कॉन्सल्**ला कांहीं झालें तरी पहिल्या हुकुमाप्रमाणेंच कायमचें वागावयाचें असा गुप्त निरोप पाठविण्यांत आला.

इष्टमित्रांचा अखेरचा निरोप घेण्याचा सर्व हृदयद्रावक प्रकार झाल्यानंतर ठरविलेले जामीन पाठविण्यांत आले. अशा रीतीनें शरण जाण्याचा कांहीं उपयोग होण्याची आशा फारच थोड्या लोकांस होती, व ती भ्रममूलक व निरर्थक होती असें थोडक्यांतच स्पष्ट दिसून आलें. शहरांतील हत्यारें देण्यांत यावीत अशी मागणी **कॉन्सलांनीं** केली. तीही **कार्थेज्**चे लोकांनीं मान्य केली; व तदनुसारें दोन लाख निरनिराळ्या प्रकारचीं शस्त्रें, असंख्य बाण, व जाव्हेलिन्स् व दोन हजार धोंडे फेंकण्याचीं यंत्रें एकदम तीर्थार्पण करण्यांत आलीं. यावर **कॉन्सल्** पुन: बोलले 'तुम्ही **कार्थेज्** आम्हास मोकळें करून दिलें पाहिजे. आम्ही ह्या शहराचा नाश करण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही आपलें सर्व सामानसुमान व मालमत्ता येथून अन्यस्थलीं न्यावें व तें स्थल समुद्रापासून दहा मैलाचे आंत नसावें. असा हा निश्चय होण्याचीं कारणें म्हणून जीं

त्यांनीं दर्शविलीं तीं खरोखरच अगदीं थट्टा वाटण्यासारखीं होतीं. ते म्हणाले 'तुम्ही समुद्रापासून दूर असलां म्हणजे तुम्हांस बरें. कारण जवळ असल्यास गत-वैभवाची आठवण होऊन व्यर्थ तुह्मांस वाईट वाटणार; शिवाय समुद्र हा फार भयंकर तत्त्वांपैकीं एक आहे. कारण त्याच्यामुळें तुह्मांसारखीं इतर कित्येक, राष्ट्रें चांगलीं उदयास आलीं आहेत आणि नंतर धुळीसही मिळालीं आहेत. शेतकीचा धंदा याहून सुरक्षितपणाचा व फायद्याचा आहे.' 'शिवाय' ते म्हणाले 'आह्मी यांत **कार्थेज्** स्वतंत्र राहील हें वचन मोडतों असेंही होत नाहीं; शहरांतल्या भिंती आणि इमारती हें कांहीं खरें **कार्थेज्** नव्हे. **कार्थेज्** येथील माणहेंच खरें **कार्थेज्** होय.'

जासूदाच्या परत येण्याकडे सर्वांचे सारखे डोळे लागले होते व लोकही फारच अस्वस्थ झाले होते. जेव्हां ते शहरच्या दरवाज्यांत शिरले, तेव्हां ते त्या अनिवार गर्दीखालीं चिरडून मरतात कीं काय असें वाटलें. शेवटीं कसे तरी ते एकदां राजसभेंत येऊन लागले. तेथें त्यांनीं सर्व हकीगत कळविली. सर्व लोक अगदीं राजमंदिराच्या खिडक्यांतून, दरवाज्यांतून एकसारखे ऐकत होते. जेव्हां त्यांची सर्व हकीगत सांगून संपली, तेव्हां सर्व सभासदांनीं रागानें, भयानें व आश्चर्यानें एकदम हाहाकार केला; आणि त्यासरसे बाहेरील लोक आंत घुसले व मग जिकडे तिकडे दंगा सुरू जाहला. ज्यांनीं जामीन पाठविण्यास आपलें मत दिलें होतें त्यांच्यावर एकदम लोक तुटून पडले. यांच्यांतील कांहींचे तर लोकांनीं फाडून तुकडे तुकडे केले. ज्यांनीं निरोप आणिला त्या वकीलांवर सुद्धां कोणी दया केली नाहीं. वास्तविक त्यांचा दोष काय तो वाईट बातमी कळविण्याचें त्यांच्या नशिबीं होतें एवढाच होता. जे कोणी हतभागी **इटालिअन्** अशा वेळीं कामाधामासंबंधानें शहरांत अडकले होते त्या सर्वांना ह्या लोकांच्या त्वेषाचा सपाटा सोसावा लागलाच; त्यांपैकीं एकालाही लोकांनीं शिल्लक ठेविलें नाहीं. कांहीं कांहीं जे अधिक शहाणे व

* हें सर्व शब्दचापल्य खरोखरच उच्चारण्यांत आलें होतें असें मानणें फार कठीण आहे. ज्या ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांतून हें कॉन्सलचें भाषण उतरून घेतलें आहे त्यानें तें विश्वसनीय **पोलिबिअस्**च्या ग्रंथांतून घेतलें, असें मानण्यास सबल व चांगलीं कारणें आहेत; पण पूर्वीच्या इतिहासकारांना त्यांच्या पात्रांच्या मुखांत भाषणें घालण्याची फार हौस होती आणि ते त्याच्या सत्यासत्यतेबद्दल विशेषशी परवा करीत नसत.

विचारी होते ते होईल तितकी बचावाची तयारी करण्यास झटून मेहेनत करूं लागले; कारण आतां काय तो एकच मार्ग कार्थेजला राहिला होता. राजसभेनें त्याच दिवशीं लढाई पुकारली.

भाग सतरावा.

कार्थेजची वेढा आणि नाश.

कार्थेजिनिअन् सरकारानें झाली तितकी शहराच्या बचावाची खटपट केली. **रोम्च्या** समाराधनासाठीं लोकांनीं ज्या **हस्ड्रुबालला** बळी देण्याची तयारी केली होती त्या **हस्ड्रु-बाल्**ला शहराबाहेरच्या सैन्याचा अधिपति केला व दुसरा एक आंतील सैन्यावर नेमिला. रात्र आणि दिवस बायकामाणसें एकसारखीं हत्यारें घडीत होतीं. देवालयें व इतर पवित्र जागा या सर्व ठिकाणीं सुद्धां हत्यारें घडण्याशिवाय दुसरा धंदाच नव्हता. शंभर ढाली, तीनशें तरवारी व क्याटापुल्ट् नांवाच्या यंत्रानें टाकण्यासाठीं एक हजार ज्याव्हेलिन्स् रोज घडून तयार होत असत. क्याटा-पुल्ट्ला दोर तयार करण्यासाठीं घोड्याचे केस पुरेसे मिळेनात तेव्हां बायकांनीं आपले केशकलाप उतरून दिले असें म्हणतात.

कार्थेज्चे तटाचा परिघ सुमारें अठरा मैल होता. त्याची उंची शें-चाळीस फूट होती व रुंदी चौतीस फूट होती. ही उंची दोन्ही बुरुजांच्या मधील भागाची म्हणजे ज्याला बहुधा तटाचा पडदा असें ह्मणतात तेथील होय. बुरूज मनोऱ्याचे आकाराचे चार मजली व याहून फार अधिक उंच होते. ज्या ज्या ठिकाणीं समुद्र अगदीं तटाला येऊन लागे,—आणि शहर एका द्वीप-कल्पावर बसल्यामुळें तटाचा बहुतेक भाग ह्याच जातीचा होता,—तेथें तेथें

एकच तट पुरेसा वाटल्यामुळें तेवढाच बांधलेला होता. पण जमिनीच्या बाजूला म्हणजे उत्तर आणि दक्षिणेस तिहेरी भिंती होत्या. **एपिअन्‌**नें असें लिहिलें आहे कीं तिन्ही तट सारख्याच उंचीचे व रुंदीचे होते. पण हें अविश्वसनीय वाटतें. कारण ह्या योजनेचा उपयोगच लक्ष्यांत येत नाहीं. एक तट घतला म्हणजे दुसऱ्या तटाचा बचाव करणें अशक्यच व शत्रूंना त्यापासून किती तरी फायदा मिळावयाचा. अशा प्रकारची तटबंदी असल्याचें कांहींच चिन्ह **कार्थेज्‌** येथें किंवा इतर कोणत्याही पुरातन शहरीं दिसत नाहीं. **एपिअन्‌**नें **पोलिबिअस्‌** पासून हा वृत्तांत बहुधा घेतलेला असावा. त्याचा अर्थ असा असूं शकेल कीं एका पाठीमागें एक असे तीन खंदक होते. सर्वांच्या आंतील खंदकाचे आंतल्या बाजूस मुख्य तट बांधलेला असावा. त्याच्या बाहेरील बाजूस ह्यापेक्षां बरीच लहान अशी एक पडभित असेल; आणि त्याच्यापुढें दुसरा खंदक. ह्या दुसऱ्या खंदकाच्या बाहेरील बाजूस चौफर उभे गज मारलेले होते व त्याच्या बाहेर आणखी एक खंदक होता. बरोबर असल्याच जातीच्या तटबंदीच्या खुणा अद्यापि **थ्याप्सस्‌** येथें दृष्टीस पडतात. मुख्य तटाच्या पोटांत एकंदर तीनशें हत्ती, चार हजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ राहण्याची व्यवस्था होती.

बंदरांची व्यवस्था अशी होती कीं जहाजांना एकांतून आल्याशिवाय दुसऱ्यांत येतांच येत नसे. बाहेरील बंदर व्यापारी जहाजासाठीं होतें, व मुख्य समुद्राच्या आणि त्याच्यामध्यें लोखंडी साखळदंड टाकलेले होते. आंतील बंदरांत लढाऊ जहाजें ठेवलेलीं होतीं. ह्या आंतील बंदरांत एक बेट होतें. त्यावर व बंदरावरच्या दोन्ही बाजूंवर सुमारें एकशेंवीस जहाजें राहण्यापुरती जागा होती. ह्या बेटावरच कप्तानाचें घर होतें. तें इतक्या उंचावर होतें कीं तेथून बाहेरील सर्व कांहीं दिसत असे. ह्या दोन बंदरांमध्यें एक भिंत होती. ती इकडून तिकडचें कांहीं न दिसे इतक्या उंचीची होती. बाहेरील बंदराला जावयास शहरांतून निराळा रस्ता होता. आंतील अथवा लढाऊ बंदर फार काळजीनें संभाळलें जात होतें.

म्यानिलिअस्‌नें जमिनीच्या बाजूनें हल्ल्यास सुरुवात केली; व **सेन्सोरिनस्‌**नें दुसऱ्या एका बाजूनें मारा सुरू केला. ह्या बाजूला भरती अगदीं कोटाला येऊन लागत असल्यामुळें कोट एकेरीच होता. बाहेरच्या बाजूची

तटबंदी थोडी बहुत **म्यानिलिअस्**च्या सैन्यानें पाडून टाकली, पण फारसें कांहीं त्यांच्या हातून झालें नाहीं. कारण **हस्द्रुबाल्** व त्याच्या हाताखालील **हिमिल्को** नांवाचा हुशार सरदार हे दोघे आपल्या हुशारीनें वरचेवर फालतू टोळ्यांवर हल्ला करून वेढणाऱ्या लोकांचें चांगलेंच नुकसान करीत होते.

जेव्हां **सेन्सोरिनस्**नें तट पाडण्याचे दोन मोठे मोठे घण ओहोटीच्या वेळेस आणून तटावर सुरू केले, तेव्हां कांहीं जरा लढाईला रंग आल्यासारखा जाहला. एका घणाला सहा हजार शिपाई व दुसऱ्या घणाला सहा हजार खलाशी लागले होते. याच्या या जोराच्या मारानें तटाचा कांहीं भाग पडला; पण तो रात्रीच्या रात्रींच पुनः **कार्थेजिनिअन्** लोकांनीं बांधून घेतला. हें नवें काम अर्थातच जुन्याइतकें मजबूत नव्हतें. नंतर वेढलेल्या लोकांनीं शत्रूवर एक जोराचा हल्ला केला; त्यांच्या सर्व किल्ला पाडण्याच्या सामानाला आग लावून दिली; व त्यामुळें कांहींवेळ तरी तीं सर्व साधनें निरुपयोगी करून सोडलीं. दुसरे दिवशीं **रोमन्** लोकांनीं दुरुस्त न केलेल्या तटाच्या भागावरून हल्ला करून पाहिला; पण त्यांत त्याचें फारच नुकसान जाहलें.

सेन्सोरिनस्ला आतां असें आढळून आलें कीं भर उन्हाळा असल्यामुळें आपल्या लोकांना तेथील हवा सोसत नाहीं. तेव्हां त्या समुद्रकांठावरून आंत समुद्रांत त्यानें आपले सर्व लोक गलबतावर नेले. तेथेंही **कार्थेजिनिअन्** लोकांनीं वारा जेव्हां जेव्हां अनुकूळ असे तेव्हां तेव्हां जळतीं जहाजें यांच्या जहाजांत सोडण्यास कमी केलें नाहीं. त्यामुळें **रोमन्** लोकांचें बरेंच नुकसान जाहलें.

रोमन् सेनाधिपतींनीं आपलीं कामें जेमतेम चालू ठेविलीं होतीं. त्यांच्यांत चातुर्य आपलें बेताचेंच होतें व त्यांना यशही तितक्याच बेताचें येत होतें. ज्यावेळेस त्याची मदत फार उपयोगीं पडली असती अशा वेळेसच राजा **म्यासिनिसा** वारला. तो आणि त्याचे **रोमन्** मित्र यांच्या स्नेहांत जरा शिथिलता आल्यासारखें झालें होतें; कारण राजाच्या मनांत असें आलें होतें कीं **कार्थेज्** हा वास्तविक आपला वांटा, तो **रोम्**नें अन्यायानें आपल्याकडे ओढून घेतला; व असें करण्यांत **रोम्**नें आपला फारच अपमान केला. तरी पण समयीं जेव्हां **रोमन् कॉन्सल्**नीं त्याची मदत मागण्यास पाठविलें,

—जेव्हां तुम्हांस लागेल किंवा तुम्ही मागाल तेव्हां मी मदत करीन असें त्यानें वचन दिलें होतें—तेव्हां तो मदत करावयास शिल्लकच नव्हता. बाकी **रोम्**चे सरदारांनीं आपल्याच ताठ्यांत बराच वेळ त्याची मदत मागितली नाहीं. हा राजा आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षीं मेला व शेवटपावेतों त्याची बुद्धीची स्थिरता व शरीरांतील धमक अगदीं कायम होती. दुसरा **कार्थेज्**चा कट्टा शत्रु वृद्ध **केटो** हाही थोडे दिवसांपूर्वीं मरण पावला होता. **सिपिओ** जो या लढाईच्या कामांत बरेंच चातुर्य दाखवून पुढें पुढें येत होता त्याच्यावर या वृद्ध राजाच्या तीन मुलांमध्यें राज्य व संपत्ति वाटून देण्याचें काम सोपविण्यांत आलें होतें. ह्या तिघांतील **गुलुसा** ह्मणून एक होता, तो एकदम **रोम्**चा दोस्त झाला व तो व त्याचे हलक्या हत्याराचे घोडेस्वार **फ्यामिआस्**चे हल्ले माघारे फिरविण्यांत विशेष उपयोगीं पडले. कांहीं थोडे दिवसांनीं **फ्यामिआस्**लाच **सिपिओनें** आपल्या तर्फेस वळवून घेतलें.

म्यानिलिअस् आणि **सेन्सोरिनस्** हे दोघे बदलून त्यांच्या बदला **पिसो** आणि **म्यान्सिनस्** हे मुख्य सरदार आले. पण यामुळें कांहीं वेढ्याच्या स्वरूपांत किंवा निस्सत्वपणांत एवढा सुद्धां फरक पडला नाहीं, उलटा वेढा अखेर सोडून देण्यांत आला व या नव्या सेनाधिपतींनीं आसपासच्या शहरांवर हल्ले करण्याचेंच काय तें मनावर घेतलें. **हिपो** (सध्याचें **बिजर्टा**) येथें **काल्पर्निअस्** यास मुळींच यश आलें नाहीं. शहरच्या लोकांनीं मध्येंच हल्ला करून सर्व त्याच्या वेढ्याच्या सामानसुमानाचा व इतर तयारीचा अगदीं नाश करून टाकला.

जों जों **रोम्**ची निराशा होत चालली तों तों **कार्थेज्**ला विशेष उत्साह व आशा वाटूं लागली. **गुलुसा**चे कांहीं घोडेस्वार **रोम्**ला सोडून **कार्थेज्**ला येऊन मिळाले, आणि **म्यासिनिसा**चे दुसरे दोन मुलगे तर नामतः **रोम्**च्या बाजूचे होते, तरी सर्व प्रकरणाचें काय होत होतें तें ते उदासीन राहून स्वस्थपणें पाहत होते. **कार्थेज्**चा जर नाश झाला तर पुढें लागलीच तुमच्यावर पाळी येणार आहे, असें या दोघांना व **मूर** लोकांना समजावून सांगण्यासाठीं **कार्थे-ज्**नें त्यांजकडे वकील पाठविले. **म्यासिडोनिआ**चा राजा जो ह्या समयासच **रोम्**शीं लढत होता त्याच्याशींही **कार्थेज्**नें बोलणें सुरू केलें. कर्मधर्मसंयोगानें शहराच्या बाहेरच्या सैन्यावरील मुख्य **हस्ड्रुबाल्** याला त्याच्या नामकऱ्याची जागा

पटकावण्याची फार हाव उत्पन्न झाली व त्यासाठीं **गुलुसा**चा आणि त्याचा आप्तपणा आहे ही गोष्ट लक्ष्यांत आणून त्याच्यावर विश्वासघातकीपणाचा आरोप केला. तो तर हा चमत्कारिक आरोप ऐकून बिचारा घाबरला व थक्क झाला; त्याला ह्या स्थितीमुळें मुक्त होण्याचा उपाय सुद्धां चांगलासा सुचेना; व त्या हतभागी प्राण्याला राजसभेंतच लोकांनीं मारला. सभासदांनीं त्याला मोडक्या तुटक्या बाकांच्या फळ्यांनीं व तुकड्यांनीं सुद्धां मारण्यांत कमी केलें नाहीं.

रोम्मध्यें तर दरेक जणाला वेळ्याचा तडक फडक निकाल होईल असें वाटत होतें, व हा दीर्घ विलंब पाहून लोकांचीं मनें फारच क्षुब्ध व अस्वस्थ व्हावयास लागलीं. सर्व लोकांचे डोळे अधिकार व अंमल गाजविण्याचें खरें सत्त्व ज्याच्या अंगीं होतें अशा एका मनुष्यावर लागलेले होते. विशेषत: असें होण्याचें कारण त्याच्या नांवाचा महिमा तसाच होता. **हानिबाल्**च्या स्वाऱ्या परिणामास लावल्या त्या **सिपिओ**नेंच, व त्यानें आरंभिलेलें काम निकालास लावून **कार्थेज्**चा नाशही एक **सिपिओ**च करणार होता. हा शिपाई **इडाईल्** होण्यासाठीं ह्मणून—वास्तविक काय होणार तें त्याला बहुतेक ठाऊकच होतें—**रोम्**ला गेला होता. लोकांनीं त्याला **कॉन्सल्** निवडला. जुन्या **कॉन्सल्**नें अध्यक्षाच्या नात्यानें ह्या निवडणुकीस हरकत घेतली. कारण **सिपिओ**चें वय फक्त सदतीस वर्षांचें असल्यामुळें तो असल्या कामास कार्यांत आलेला नव्हता; तरी पण लोकांनीं ह्या कामांत अगदीं हट्टच धरला. त्यांनीं असा मुद्दा काढला कीं निवडणुकीचा सर्व हक्क लोकांकडेसच आहे, व ते पाहिजे त्यास निवडूं शकतील. अध्यक्षांनीं संमति न दिल्यास त्यांना हाकून दिलें जाईल अशी जेव्हां धमकी लोकांनीं त्यास दिली, तेव्हां त्या बिचाऱ्यानें आपला हट्ट सोडला. तसाच दोघा निवडलेल्या **कॉन्सल्**मध्यें कोणचा भाग कोणी घ्यावा हा प्रश्न निघाला. तेव्हां **सिपिओ**च्या जोडीदारानें आपला हक्क आपण होऊन सोडला. बहुतकरून ह्या गोष्टीचा निकाल चिठ्या टाकून करीत असत. पण ह्या वेळेस तर लोकांनीं असा ठराव केला कीं **आफ्रिका** **सिपिओ**कडेसच राहावी व त्याप्रमाणें व्यवस्थाही झालीच.

ह्या नव्या सेनाधिपतीचें पहिलें कृत्य आपला **म्यान्सिनस्** ज्या व्यूहांत अडकून पडला होता त्यांतून त्याला सोडविणें हें होतें. आपली मुदत संपावयाच्या अगोदर कांहीं तरी आपण करून जावें असें मनांत येऊन तटाच्या एका निर्बल

भागावर त्यानें हल्ला केला व तो आंतही शिरला. पण त्याच्यापाशीं पुढें जाण्यापुरतें सैन्य नव्हतें; पण मिळविलें होतें तेंच स्थळ जेमतेम करून तो संभाळून होता. त्यानें आपला जोडीदार यास मदतीस बोलाविलें पण तो आला नाहीं. **सिपिओ**ला **युटिका** येथें ह्या स्थितीची बातमी लागली. तो एकदम त्या ठिकाणीं चालून आला व **म्यान्सिनस्** व त्याचें सैन्य या सर्वांस त्यानें सोडवून नेलें. तदनंतर थोड्याच दिवसांनीं दोघेही जुने **कॉन्सल् रोम्**ला परत आले व नंतर शिपायांची शिस्त, कवाईत व इतर एकंदर तयारी जी मागील **कॉन्सलां**च्या कारकीर्दींत अगदीं ढिली पडली होती ती पुनः स्थापन करण्यास त्यानें सुरुवात केली. **रोमन्** छावणींतून त्यानें फुकट भटकणारे व इतर लुटारू लोक सर्व हाकून दिले व अगदीं कामास येतील असे निवडक व आज्ञाधारक असे लोक मात्र पलटणींत शिल्लक ठेविले. शहराचा **मेगारा** नांवाचा जो भाग त्यावर त्यानें पहिल्याप्रथम हल्ला करण्यास सुरवात केली. बहुतेक श्रीमंत लोकच त्या भागांत राहत असत. **सिपिओ**नें आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या करून हल्ल्यास सुरुवात केली, व एकीवर आपण स्वतःच मुख्य झाला. दोन्ही टोळ्यांपैकीं एकीलाही भिंतीवर चढून जातां येईना; पण अशावेळीं एका खाजगी घराचा मनोरा त्यांच्या फार उपयोगीं पडला. हा मनोरा तटापेक्षां उंच होता व तो अशा समयीं भलत्याच ठिकाणीं राहूं देण्यांत फारच मूर्खपणा झाला होता. कांहीं **सिपिओ**चे लोक मनोऱ्यावर चढून तेथून तटावरून उतरून तेथून **मेगारां**त उतरले. तेथें जाऊन आंतून त्यांनीं एक दरवाजा उघडला आणि **सिपिओ** सुमारें हजार लोक बरोबर घेऊन आंत शिरला. पण शहराच्या त्या भागांत राहणें त्याला फार गैरसोयीचें व धोक्याचें वाटूं लागलें. कारण जिकडे तिकडे बागा फार; त्यांचीं कुंपणें व जिकडे तिकडे सर्व बाजूस खेळविलेलें पाणी यामुळें ती जागा सैन्याला पुढेंमागें हलण्यासवरण्यास फार संकोचाची व गैरसोयीची होती. तरी पण एवढ्याच कृत्यानें त्याचें बरेंच काम झालें. शहरा बाहेरील सैन्याला शहर शत्रूच्या ताब्यांत गेलें असें वाटून ते लोक आपली छावणी सोडून **बिर्सा** अथवा शहराच्या वरच्या भागाकडे वळले.

हस्डुबाल्ला शत्रूंच्या ह्या सरशीनें फार क्रोध आला व त्यानें आपल्या हातांत जे कैदी होते त्यांच्यावर हा सगळा राग काढला. त्या हतभागी लोकांना त्यानें तटावर आणिलें व त्यांचे अतिक्रूर रीतीनें हाल हाल करून

त्यांना तटावरून ढकलून दिलें. असें हें घोर कृत्य झाल्यानंतर मग बरीक शहरांतील लोकांना शत्रूकडून क्षमा होण्याची फारशी आशा राहिली नव्हती.

आतां ह्या वेढ्यानें सर्व बाजूंनीं घेरून घेतल्यासारखें जाहलें. शत्रूंनीं भयभीत होऊन सोडून दिलेली छावणी **सिपिओनें** जाळून फस्त केली. व **कार्थेज्** ज्या भूशिरावर होतें त्या भूशिराचें नाकच तो धरून बसला. तेव्हां अर्थातच जमिनीच्या बाजूनें धान्य वगैरेचा पुरवठा होणें अशक्यच झालें. समुद्राचा पुरवठा फारच अनिश्चित व अनियमित असे. व नुसता समुद्राचा पुरवठा पुरेसाही नव्हताच. आतां बंदर बंद करण्याच्या योजनेकडे **सिपिओ** वळला. त्यानें एक भली उंच भिंत बांधली. पहिल्याप्रथम जेव्हां शहरच्या लोकांनीं ह्या भिंतीची लांबी रुंदी उंची वगैरेचें प्रमाण ऐकिलें तेव्हां तर त्यांना असली भिंत अशक्यच असें वाटलें. पण जेव्हां त्यांनीं रोज रोज जमीन चढतांना व **रोमन्** लोकांना रात्रंदिवस भिंतीचें काम करतांना पाहिलें, तेव्हां बरीक शहरचे लोक घाबरले. तरीपण ते स्वतःही कांहीं वेढणाऱ्या लोकांपेक्षां कमी नेटानें काम करीत होते असें नाहीं. त्यांनीं बंदरांतून समुद्रांत जाण्यास नवी खाडी काढली व हें काम तयार होत तोंपावेतों पन्नास लढाऊ जहाजेंही त्यांनीं तयार केलीं. जरी वेढणाऱ्या लोकांना सारखा घणांचा शब्द ऐकूं येत होता, तरी पण आंत काय चाललें होतें याचा त्यांना कांहीं पत्ता नव्हता. पण जेव्हां अगदीं अदृष्टपूर्व अशा बंदरांतून, ज्याच्या अस्तित्वाविषयीं मनांत कल्पना येणें सुद्धां अशक्य होतें—कारण नुकतीं त्यांचीं सर्व जहाजें जाळून टाकलीं होतीं—असें एक जहाज नव्हे तर पन्नास जहाजांचें आरमार मुख्य समुद्रांत दिसलें तेव्हां तर त्यांना अतिशयच आश्चर्य वाटलें. **कार्थेजिनिअन्** लोकांनीं आपलीं जहाजें अगदीं हरखून गेल्यासारखें करून एक दोन वेळ शत्रूंच्या समोर जहाजें फिरविलीं मात्र. वास्तविक त्याच वेळेस त्यांनीं जर **रोमन्** लोकांचे जहाजांवर हल्ला केला असता तर त्यांना **रोमन्** लोकांचें खूप नुकसान करतां आलें असतें. कारण **रोमन्** लोकांचीं जहाजें अगदींच उघडीं होतीं व त्यांजपाशीं बचावाचीं साधनें ही कांहीं एक नव्हतीं. पण **कार्थेज्**चे लोक आपल्या करामतीची नुसती बतावणी करून संतुष्ट झाले, व लागलीच बंदरांत परत आले. ग्रहदशाच अशी आली होती कीं काय कोण जाणें, कीं **कार्थेज्**चा नाशच व्हावा. नाहीं तर असें कां बरें झालें असतें? अशी संधि पुनः कधींही आली

नाहीं. असाच कांहीं योग आला होता कीं, **कार्थेज् रोम्**च्या ताब्यांत जावें. दोन दिवसांनंतर दोन्ही आरमारांची लढाई झाली पण तो वेळपावेतों **रोम्**ची तयारी झाली होती. त्यामुळें लढाईचा परिणाम निश्चयाचा असा कांहींच झाला नाहीं. पुन: दुसरे दिवशीं लढाई झाली त्यांत **कार्थेज्**चा अगदीं बींमोड झाला.

बंदराच्या बाजूनें शहर कबज्यांत घेण्याचा प्रयत्न आतां शत्रूनें मोठ्या निकरानें सुरू केला. लढाईचे घण तटावर चालू केले व त्यांनीं कोटाचा बराच भाग पाडून टाकला. इकडे **कार्थेज्**चे लोक अतित्वेषानें शत्रूवर बाहेर चालून आले, ते त्या समुद्रकांठावर हातांत बिनपेटवलेल्या मशाली घेऊन उघडेनागडे कोटावरून धडाधड उड्या मारून पडले. कोणी कोणी थोड्या पाण्यांतून धांवले, कोणी पोहले, अशा रीतीनें सर्व कांठाला लागल्यावर सर्वांनीं आपल्या मशाली पेटाविल्या, व शत्रूंच्या किल्ला पाडण्याचे सामानावर धांवले. ह्या लोकांपैकीं बहुत लोक मारले गेले. कारण एकापाशींही हत्यार किंवा ढाल कांहींएक नव्हतें. तरी पण ते जे एकदां वेगानें आले होते ते कांहीं केल्या हटेनात; तेव्हां अर्थातच **रोमन्** लोकांचा गोंधळ होऊन ते पळून गेले. किल्ला पाडण्याचीं हत्यारें घण वगैरे सर्व पार **कार्थेजिनिअन्** लोकांनीं जाळून टाकलीं. जे पळून जातील त्यांना छाटून टाकण्यांत येईल अशी धमकी जरी **सिपिओ**नें आपल्या सैन्याला दिली होती तरी पण ते भयभीत होऊन पळून गेलेच. त्या दिवशीं तरी निदान शहरच्या लोकांना पूर्ण जय मिळाला.

जेव्हां हिंवाळ्याचा थंड आणि हुशारीचा वारा सुरू जाहला तेव्हां ज्या प्रांतांतून व ज्या रस्त्यानें **कार्थेज्**ला धान्याचा पुरवठा होत असे त्या प्रांताकडे व रस्त्याकडे आतां **सिपिओ** वळला. त्याच्या हाताखालचा सरदार **लिलिअस्** आणि **गुलुसा** या दोघांनीं मिळून **कार्थेज्**चे **आफ्रिके**तील दोस्तांचे सैन्याचा अतिमोठा पराजय केला. (बाकी सत्तर हजार लोक मेले व वीस हजार कैद केले असें जें लिहिलें आहे, त्याच्या खरेपणाविषयीं संशय येतो.) आतां शहरचा धान्याचा पुरवठा अगदींच बंद पडला, कोठूनही धान्य मिळेनासें झालें. पण **हस्द्रुबाल्**पाशीं, फौजेला कांहीं दिवस चाले इतका पुरवठा होता. बाकीच्या लोकांना कडकडीत उपास जाहला.

एकशें शेचाळीस सालच्या आरंभीं वरचें शहर आणि आरमाराचें बंदर यांजवर हल्ला करण्याची तयारी **सिपिओनें** केली. बंदर फारच लवकर घ्यावयाला सांपडलें. कारण **कार्थेजिनिअन्** लोक कांहीं फार नेटानें त्या स्थलाचा बचाव करीत नव्हते. बंदरांतून तो शेजारच्या चव्हाट्यांत शिरला. तेथें **अपोलो** देवाचें सुंदर देवालय होतें. त्याची अगाध संपत्ति पाहून हपापून गेलेल्या शिपायांना **सिपिओ**च्यानें लुटतांना बंद करतां येईना. देवालयांतून ह्या लोकांनीं जवळ जवळ हजार सोन्याचे ट्यालन्टस् निदान लुटले असतील.

आतां वरचे शहरावर हल्ला करण्याचें बाकी होतें. चव्हाट्यावरून तिकडे तीन रस्ते होते; व तिन्ही रस्त्यांच्या दुतर्फा सहा सहा मजल्यांच्या इमारती होत्या. शहरवासी लोक व लष्कर या घरांतून दडून बसून शत्रूवर वरचेवर व जोराचा मारा करीत होते. शत्रूंनीं एकापाठीमागून एक घरें घेण्याचा सपाटा चालविला. शत्रूंच्या अधिक बळामुळें व चांगल्या कवाईतीमुळें शहरच्या लोकांचें त्यांच्यापुढें कांहीं चालेना. शिवाय तिन्ही सडकांत लढाया चालल्या होत्या त्या निराळ्याच. तेथेंही लढाया **रोमन्** लोकांचा वरचे शहरांत प्रवेश होण्यासाठींच होत्या. आंत **रोमन्** लोकांचा प्रवेश झाल्याबरोबर **सिपिओनें** ह्या तिन्ही रस्त्यांना आग लावून देण्याचा हुकूम केला. तदनंतर जो मरणाचा अत्यंत भीतिप्रद देखावा सुरू जाहला, तो पाहण्यास देखील कठीण होता. कांहीं लढाईत काम करण्यास असमर्थ अशी मंडळी वृद्ध पुरुष बायका व मुलें मोठमोठ्या थोरल्या वाड्यांत जमून बसलीं होतीं. ह्या वाड्यांस आग लागली तेव्हां कांहींकांनीं शत्रूच्या संगीनीवर उड्या टाकल्या. कांहीं कांहीं तर तेथल्या तेथेंच जळून गेले; कांहींकांनीं खिडक्यांतून रस्त्यांत उड्या टाकल्या; व जळून खाक होऊन पडलेल्या माती विटांच्या ढिगाखालीं तर अतिशय लोक चिरडून मेले. कारण रस्ता साफ करण्यासाठीं ह्मणून जे शिपाई नेमिलेले होते ते आपलें काम करतांना मनुष्यांच्या जीवाची वगैरे बिलकूल काळजी करीत नसत.

सहा दिवस आणि सहा रात्री अशा रीतीनें ही भयंकर कत्तल सारखी चालू होती. व ती एका प्रत्यक्ष पाहिलेल्या मनुष्यानें म्हणजे प्रसिद्ध इतिहासकार **पोलिबिअस्** यानें लिहिली आहे; व **एपिअन**नें त्याच्याच इतिहासावरून तें वर्णन घेतलें आहे, याविषयीं मुळींच शंका नाहीं. शिपाई पाळीपाळीनें लढत

असत. **सिपिओ** बरीक एकसारखा लढाईंत हजर होता. तो मुळींच निजत नसे व वेळेवर मिळेल तसल्या घासभर अन्नावर पुनः मिळेपावेतों वेळ काढीत असे. सातवे दिवशीं कांहीं लोक किल्ल्याच्या शिखरावर असलेल्या **इक्युलापिअस्**च्या देवळांतून **सिपिओ**ला विनंति करण्यासाठीं आले. त्यांनीं "आतां राहिले आहेत तेवढ्यांचे तरी जीव वांचवा" अशी नम्रतापूर्वक मागणी केली. जे पक्ष सोडून विश्वासघातानें दुसऱ्यास जाऊन मिळाले असतील त्यांना मात्र क्षमा होणार नाहीं बाकीच्यांना जीवदान दिलें आहे असें **सिपिओ**नें कळविलें. त्याबरोबर पन्नास हजार बायका आणि पुरुष यांनीं ह्या अनुग्रहाचा स्वीकार केला. विश्वासघाती लोकांनीं बरीक आपणांस देवळांत कोंडून घेतलें. त्यांत सुमारें नऊशें **रोमन्** लोक, **हस्ड्रुबाल्** व त्याची बायको आणि दोन मुलगे एवढे होते. ते अशा जागेंत होते कीं शत्रूंचा त्या ठिकाणीं कदापि रिघाव होऊं शकला नसता. पण क्षुधेपुढें कोणाचेंच कांहीं चालत नसल्यामुळें ते अगदीं निराश होते.

हस्ड्रुबाल्नें आपल्या मित्रांस युक्ति करून तेथल्या तेथेंच सोडून आपण आपला जीव वांचविण्यासाठीं **सिपिओ**च्या हातापायां पडून अतिनम्रपणानें विनंति केली. त्यानें ती मान्य केली व **हस्ड्रुबाल्**ला ज्या मित्रांना तो सोडून आला होता त्यांच्या नजरेस येईं अशा रीतीनें उभा केला. ते सर्व देवालयाच्या शिखरावर उभे राहिले व त्यांनीं **हस्ड्रुबाल्**ला पुष्कळ नांवें ठेविलीं व शेवटीं निराश होऊन त्या देवालयालाच त्यांनीं आग लावून दिली. जव्हां देवालय चोहोंकडून पेटून अग्नीचा भडका सुरू जाहला तेव्हां **हस्ड्रुबाल्**ची बायको देवळाच्या पुढच्या भागावर येऊन उभी राहिली. तिनें अति उत्तम पोषाक करून अति उत्तमोत्तम अलंकार घातले होते. तिच्याजवळ तिचीं दोन मुलें उभीं होतीं. पहिल्याप्रथम **सिपिओ**कडे ती वळली आणि ह्मणाली "हे **रोमन्** मनुष्या, तुजवर देवाचा कोप व्हावा अशी प्रार्थना ईश्वराची मी कदापि करणार नाहीं, कारण युद्धांत जें न्याय्य तेंच त्वां केलें आहेस. पण हा **हस्ड्रुबाल्** ज्यानें स्वदेशाशीं व आपल्या बायकामुलांशीं देखील विश्वासघात करण्यास अगदीं कमी केलें नाहीं, त्यावर ईश्वराचा क्रोध होवो व तो तुझ्या हातानें होवो अशी त्यास मी प्रार्थना करतें." असें म्हणून ती मग आपल्या नवऱ्याकडे वळून ह्मणाली "हे क्रूरा, नीचा, विश्वासघातक्या, भित्र्या, मी आणि माझीं मुलें यांना अग्निनारायण आश्रय देईल. पण

तूं जो **कार्थेज्**चा बलाढ्य सरदार त्या तुला शत्रूच्या विजयाचें चिन्ह ह्मणून **रोमन्** लोकांच्या पाठीमागें जेथें तेथें फिरत जावें लागेल." नंतर तिनें आपलीं मुलें ठार मारून अग्नींत टाकलीं व मागाहून आपण त्यांत प्रवेश केला.

अशा रीतीनें सात शतकें वैभव भोगून शेवटीं **कार्थेज्** पडलें. त्या विजयी **सिपिओ**नें जेव्हां त्या भयंकर देखाव्याकडे दृष्टि फेंकली तेव्हां त्यानें अश्रु ढाळले. आणि एकामागून एक कितीएक राष्ट्रांची अशी दशा जाहली आहे व एके दिवशीं आपल्याही राष्ट्राची होईल असा विचार मनांत येऊन **हेक्टर्**नें ज्या कवितांमध्यें **ट्रॉय**च्या परिणामाचें भविष्य सांगितलेलें आहे त्या **होमर्**च्या कविता आपल्याशींच तो ह्मणाला.

शहर लुटावयाला शिपायांना पूर्ण मुभा देण्यांत आली होती. फक्त त्यांनीं देवालयांतील दागदागिने व इतर मौल्यवान् पैका व सोनें रुपें लुटूं नये, असा निर्बंध केला होता. शिपायांना निरनिराळीं कटकें व भूषणें **सिपिओ**नें खूप दिलीं. फक्त **आपोलो**च्या लुटींत जे जे लोक होते त्यांना कांहींएक मिळालें नाहीं. आपलें जें जें काय **कार्थेजिनिअन्** लोकांनीं गेल्या शें दीडशें वर्षांत लुटून नेलें होतें तें सर्व **सिसिलिअन्** लोकांना परत नेतां यावें म्हणून **रोम्**नें **कार्थेज्**च्या नाशाची वर्दी त्यांना कळविली. **आग्रिजेन्टम**ला आपला प्रख्यात **फ्यालेरिस्**चा बैल मिळाला; व **सेजेस्टा**ला आपला **डायना**चा पुतळाही परत मिळाला. **सिसिलिअन्** लोक **आफ्रिकानस् सिपिओ**च्या ह्या प्रामाणिकपणाच्या कृत्याबद्दल त्याच्या नांवाला फार दिवस मान देत होते. पण शंभर एक वर्षांच्या आंतच त्यांनीं परत मिळविलेलें हें सर्व जावयाचें होतें. तें शत्रूच्या लुटींत बरीक नव्हे तर एका **रोमन्** सुभेदाराच्या चोरींत जावयाचें होतें.*

कार्थेज्चें शहर अगदीं जमीनदोस्त करून टाकण्यांत आलें व पुन: जो कोणी तें बांधण्याचा किंवा बसविण्याचा प्रयत्न करील त्याजला जबरदस्त शाप देण्यांत आला. तरी पण वीस एक वर्षांतच पुन: धाकट्या **ग्र्याकस्**नें सुमारें सहाहजार लोकांच्या वस्तीचें शहर वसविण्याची सूचना पुढें आणली पण ती सूचना कधींच अमलांत आली नाहीं. सुमारें ऐशीं वर्षांनंतर **ज्यूलि-**

* **व्हेरास्** हें या सुभेदाराचें नांव होतें. त्याच्या वर्णनाबद्दल **रोम्**ची गोष्ट पहा.

अस् सीझर्‌नें केलेला बेतही असाच फसला. पण **आगस्टस्‌नें** एक **रोमन् कार्थेज्** स्थापन केलें व तें लवकरच चांगल्या भरभराटीस आलें. तथापि आपल्या कथानकाशीं त्याचा मुळींच संबंध नाहीं. आपली **गोष्ट** **रोम्**‌चा बलाढ्य **फिनिशिअन्** शत्रु पडला तेव्हांच संपली.



परिशिष्ट पहिलें.

कथानकांतील प्रसिद्ध पुरुषांचीं त्रोटक चरित्रें.

अगॉथॉक्लीस्—एका कुंभाराचा मुलगा. सिसिलींत आणि आफ्रिकन् ग्रीक लोकांचा त्याच्याहातून पुष्कळ वेळ पराभव झाला. अखेरीस त्याला हार खावी लागली. त्यानें सर्व सैन्य आफ्रिकेंतच सोडून दिलें.–सैन्याचें बंड आणि त्याच्या मुलाला ठार मारणें हीं त्याच्या पश्चात् आफ्रिकेवर झालीं. अठ्ठावीस वर्षे कारभार पाहून इ. स. पू. २९० सालीं वयाच्या बाहात्तरावें वर्षी तो वारला.

अर्कागेथस्—अगॉथॉक्लीस्‌चा मुलगा. हा त्याजबरोबर आफ्रिकेंत गेला होता. सैन्याच्या बंडांतून कसा तरी वांचला. अगॉथॉक्लीस् ग्रीस्‌कडे वळला तेव्हां हाच सेनापति होता. पहिल्याप्रथम त्याला कांहीं जय आले. पण पुढें तीन चार वेळ त्याचा अगदीं पराभव झाला.

क्याम्बोसिस्—सायरस्‌चा सर्वांत ज्येष्ठ मुलगा व गादीचा वारस. त्यानें मेम्फीस् शहर घेऊन तेथें राज्याची स्थापना केली व तेथून तीन मोठ्या मोहिमा करण्याचा विचार केला. त्यांपैकीं एक कार्थेज्‌वर येणार होती पण पुरवठा वगैरे नसल्यामुळें त्यांस तें सोडून देणें प्राप्त झालें.

काटुलस्—इ. स. पू. २४२ सालीं मुख्य न्यायाधीश होता. ड्रेप्यानम्‌च्या लढाईंत जखमी झाल्यामुळें त्याला कार्थेज्‌शीं एक हंगामी तह करावा लागला होता. तेवढ्या मुदतींत त्यानें आपलें सैन्य कवाईत वगैरे देऊन उत्तम तयार केलें व अति मोठा विजय मिळविला.

क्वाडिअस् एपिअस्—दोनशें चौसष्टांत तो कान्सल् झाला. मामर्टाइन् लोकांच्या मदतीस पाठविलेल्या सैन्याचा हा मुख्य होता. त्यानें हायरोचा आणि कार्थेजिनिअन् लोकांचा पराभव केला आणि मेसानाचा वेढा उठवला.

गिस्को १— हाय्मेराच्या लढाईत मरण पावलेल्या हामिल्कार्चा मुलगा. ह्याच्या मुलानें ग्रीक् लोकांचा अगदीं पराभव केला.

गिस्को २— बंडखोर लोकांना समजाविण्यासाठीं पाठविलेल्या सरदारांपैकीं एक मुख्य, त्याला स्पेण्डिअस् आणि मेथो यांनीं ठार मारविलें.

ग्याकस् टायबेरिअस् सेम्प्रोनिकॉन्—२१३ सालीं कॉन्सल् झाला. त्यानें गुलामशिपायांची एक फौज जमा केली व तीस आचरणानें, नियमितपणानें व शौर्यानें नांवारूपास आणलें.

गुलुसा—मासिनिसाचा दुसरा (मधला) मुलगा—ह्याला कार्थेज्चे वकीलाची मासिनिसाच्या पुंडाव्याविषयीं समजूत घालण्यासाठीं त्यानें रोमूला पाठविलें होतें. सिपिओनें ह्याला तह आणि लढाई आपल्या अधिकारावर करण्याची सत्ता दिली. कार्थेज्चे वेढ्याच्या वेळेस हा हजर होता. ह्यानें मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला पण तो शेवटास गेला नाहीं.

जेलन्—हिपॉक्रेटस्च्या मरणानंतर जेलाचा मालक झाला आणि ४९१ त सायराक्यूसचाही मालक झाला. त्याच्या महत्कृत्यांपैकीं एक म्हटलें म्हणजे हायमेरा येथें ह्यामिल्कार् याचा पराभव होय. त्यानें आपला अधिकार फारच मितपणानें चालविला होता. आणि त्यामुळें त्याला लोकांत मान फार असे. त्याच्या थडग्यास लोक देवाप्रमाणें पूज्य मानीत असत.

टाय्मोलिअन्—कॉरिन्थ येथील अत्युच्च घराण्यांपैकीं एक होता. तो चातुर्य आणि शौर्य याविषयीं फार विख्यात होता. त्याला स्वतंत्रतेची इतकी जबर आवड होती कीं, जुलूम करूं इच्छिणाऱ्या त्यानें आपल्या अति आवडत्या अशा भावाला ठार मारलें. ह्या कृत्यानंतर तो इतका उदासीन झाला कीं, तो कोणालाही तोंड दाखवीत नसे. सिसिलींतील शहरांनीं जेव्हां कॉरिन्थूला मदत मागितली तेव्हां त्यांनीं याला थोडेसें सैन्य देऊन

पाठविलें. ऱ्हीजिअम् येथें आल्यावर आपल्या पाळतीवर लोक आहेत असें त्यास समजलें. त्यानें त्यांस अतिचातुर्यानें चुकविलें व तो टारामिना येथें येऊन पोहोंचला. त्यानें बरेच विजय मिळविले. सिसिलींतील बहुतेक शहरें त्याच्याकडे आलीं. त्यानें त्या सर्व शहरांना स्वतंत्रता दिली व डायोक्लीसूच्या धर्तीवर त्यांस कायदे करून दिले. हें सर्व झाल्यावर कोणत्याही तऱ्हेच्या अधिकाराची अपेक्षा न करितां आपल्या घरीं परतला. टायूमोलिअन् वृद्धपणीं अंध होता तरी पण त्याला लोक नेहमीं सभेंत बोलावीत असत व त्याच्या सूचना सर्वानुमतें पसंत होत असत. जेव्हां त्याच्या युद्धकौशल्याचें त्याजपुढें वर्णन करीत असत तेव्हां सायराक्यूसच्या शहराला स्वतंत्रता दिल्यानें त्याला मोठा आनंद वाटत असे. तो ३३७ त मेला.

डायोनिसिअस् (४३०–३६७) तो प्रथमतः अगदीं हलका कारकून होता. हेमाक्रीटसूच्या सायराक्यूस् घेण्यांत ह्याला अति जबर जखम लागली. त्यांतून तो कसा तरी वांचला. पुढें कार्थेजूनें जी साय्राक्युस् येथें गडबड उडवून दिली त्यांत त्यानें सर्व सायराक्यूस्चे सरदार हांकून देण्याचें जमवून आणलें व आपण फौजेचा मुख्य अधिकारी झाला. वाख्याच्या उपद्रवामुळें कार्थेज्कडून अनुकूल असा तह त्यानें मिळविला. नेक्सास् काटाना आणि लिआन् ही शहरें त्यानें लढून घेतलीं. त्यानें कार्थेज्वर हल्ला करण्यासही सोडलें नाहीं. पेलापेनिशिअन् लढाईत त्यानें स्पार्टाचा पक्ष घेतला होता.

डायोनिसिअस्—(धाकटा) ३६७ त गादीवर बसला. त्याला हांकून देण्यांत आलें होतें. संधि पाहून त्यानें पुनः गादी बळकाविली. शेवटीं टायूमोलिअनूनें त्याला हांकून दिलें.

डायडो—पुस्तकांत सर्व हकीगत आली आहेच. व्हर्जिल आणि जस्टिन् यांच्या इच्या संबंधानें हकीगती भिन्नभिन्न आहेत. हिची कार्थेज्मध्यें लोक पूजा करीत असत. जूनो सिलिस्टिस् देवता व ही ह्या एक असाव्यात अशी समजूत बरेच लोकांची आहे.

डीनॉक्रेटिस्—प्रथमतः अगॉथॉक्लीस्चा मित्र होता. पण पुढें जे सायराक्यूसूचें लोक हद्दपार करण्यांत आले होते त्यांचें प्रमुखत्व घेऊन तो अगॉथॉक्लीसूच्या

विरुद्ध उठला. अगॉथॉक्लीस् परत आल्यावर हा बराच बलाढ्य झाला आहे असें त्यास दिसलें तेव्हां त्यानें ह्याजशीं ह ाचें बोलणें लाविलें. पण हा ऐकेना. लढाई झाली त्यांत डीनॉक्रेटीस्चा पराभव झाला व त्यास शरण जावें लागलें.

डेक्सिपस्—जेला येथील राहाणारा. हानिबाल्नें चारशेंसहांत जेव्हां जेलावर हल्ला केला तेव्हां आग्रिजेन्टाइन्स्ला त्यानें मदत केली. त्याच्यावर लांचलुचपत खाल्याचे आरोप ठेवण्यांत आले व त्याला हांकून देण्यांत आलें.

थेरान्—आग्रिजेन्टम्चा मुख्य. तो मुख्य कसा झाला याविषयीं आपणांस मुळींच माहिती नाहीं. जेलन्च्या कारकीर्दीत तो सायूराक्यूस्ला अनुकूल होता; पुढें प्रतिकूळ झाला.

पोलिबिअस्—कार्थेज्चा इतिहास लिहिणार, त्याच्या हकीगतीविषयीं प्रस्तावनेंत पहा.

बोमिल्कार्—कार्थेज्चा एक सरदार. त्यानें कार्थेज्ची धांदल पाहून कार्थेज् घेण्याचा प्रयत्न केला होता. प्रतिपक्ष्यासही साहाय्य करीत होता. शेवटीं त्याला पकडून मारून टाकण्यांत आलें.

मेगो (१)—कार्थेज्चा राजा ही संज्ञा त्यास होती. त्यानेंच कार्थेज्चें सैन्य वगैरे नांवारूपास आणलें व कार्थेज्ला कायदे दिले.

मेगो (२)—हिमिल्को जेव्हां डायोनिसिअस्वर ३९७ सालीं चालून गेला तेव्हां हा आरमारावरचा कप्तान होता. त्यानें लेप्टाईनिसचीं १०० जहाजें काटानाजवळ बुडविलीं. हिमिल्को आफ्रिकेंत गेल्यावर मेगोनें सामोपचारानें कांहीं शहरें मिळविलीं व कांहीं फौज गोळा करून डायोनिसिअस्वर चालून गेला पण त्याचा पराभव झाला. त्यानें आणखी कांहीं प्रयत्न केले. तेही निष्फळ झाले. शेवटच्यांत तो स्वत: पडला.

मेगो (३)—हानिबाल्चा भाऊ व हामिल्कार् बार्काचा मुलगा. लहानपणींच त्यानें शौर्य, साहस इत्यादि गुण दाखविण्यांत कमी केलें नाहीं. पो नदी आपल्या रिसाल्यासह तो पार उतरून गेला. ट्रेबिआ आणि कानी या

दोन्ही लढायांत तो हजर होता. तेथून तो कार्थेज्‌ला परत गेला तेथें फौज जमा करून तो निघाला तो स्पेन्‌ची गडबड त्यानें ऐकिली, तेव्हां तो स्पेन्‌कडे वळला. तेथें बहुतांशीं तो आपला भाऊ हस्ड्रुबाल्‌ याच्या हाताखालींच असे. तो बालेआरिक्‌ बेटांत नवी कुमक आणण्यासाठीं ह्मणून गेला. सिलिपआ येथें दोनशेंसहा सालीं त्याचा अगदीं पराभव झाला. तदनंतर तो गेड्स्‌ येथें गेला. नंतर कार्थेज्‌ला परत जात होता. इतक्यांत 'न्युकार्थेज्‌' वांचविण्याचा प्रयत्न त्यानें केला. तो निष्फळ झाल्यावर तो लिगुरिआ प्रांतांत गेला, तेथें कांहीं जय मिळविले. पण व्हारोनें अखेरीस त्याचा अगदीं पराभव केला. तो कार्थेज्‌ला परत येत असतांना वाटेंतच मरण पावला.

मेगो (४)—शेतकीवर अतिविख्यात ग्रंथ लिहिणारा. त्याच्या ग्रंथाचे अठ्ठावीस भाग होते. रोमन्‌ लोकांनीं कार्थेजिनिअन्‌ लोकांचीं पुस्तकालयें आफ्रिकेच्या राजांना विकलीं. पण हा ग्रंथ त्यास अपवादभूत आहे. ज्याला शेती करणें आहे त्यानें आपलें शहरांतील घर प्रथम विकून टाकावें असा उपदेश या ग्रंथांत प्रथम केला आहे.

मेथो—बंडखोर भाडोत्री शिपायांचा मुख्य. त्यानें गिस्कोला ठार मारविलें व तो अगदी कार्थेज्‌ घेण्याच्या बेतांत होता. पण हामिल्कार बार्का आल्यावर त्यानें या सर्वांस पाणी पिण्यास लावलें. मेथोला शेवटीं कैद करण्यांत आलें.

म्यासिनिसा—न्युमिडिअन्‌ लोकांचा राजा. त्याला राजपद फारच लहान असतांना प्राप्त झालें. त्यानें प्रथम सिफ्याक्सवर स्वारी केली व त्याला अगदीं जेरीस आणलें. कांहीं दिवसपावेतों तो कार्थेज्‌चे पक्षानें लढत होता. मेगो वगैरेंचा पराभव झालेला जेव्हां त्यानें पाहिला तेव्हां त्यानें पक्ष बदलला, व अखेरपावेतों तो रोमूचा अत्युत्तम साहाय्यकर्ता होता. त्याला कार्थेज्‌ आपणास मिळेल अशी फार आशा होती. पण त्याची निराशा होत चालल्यामुळें तिसऱ्या प्यूनिक्‌ लढाईचे वेळेस तो कसा तरी रोमूच्या पक्षाचा होता एवढेंच. त्याच्या मरणानंतर सिपिओनें त्याचें राज्य तिघां मुलांस वांटून दिलें

रेग्युलस् (आटिलिअस्) दोनशेंसदुसष्टांत व दोनशेंछपन्नांत असा दोन वेळ कॉन्सल् निवडला गेला. एक्नोमस्ची अतिविख्यात समुद्रावरची लढाई त्यानें जिंकली. तेथून तो कार्थेज्मध्यें गेला; व खुद्द कार्थेज्वरच हल्ला केला. कार्थेज्चे सरदार अगदींच कमकुवत असल्यामुळें पराभव झाला. शेवटीं झान्टिपस नांवाचा एक मनुष्य येऊन त्यानें रेग्युलस्चा अगदीं पराभव केला व त्याला कैद केलें. आपापले कैदी आपण परत घ्यावेत अशा अर्थाचा निरोप त्याच्याबरोबर कार्थेज्नें रोमला पाठविला होता. प्रथम तो सभेंतच येईना; आल्यावर ही तो बोलण्यास अगदीं नाखुष होता. शेवटीं मोठ्या आवेशाचें भाषण करून त्यानें तहाचें मोडून काढलें. तो कार्थेज्ला परत गेला तेव्हां त्याला एका पेटींत ठेवण्यांत आलें. त्या पेटीला आंतून सर्व बाजूंनीं खिळे ठोकलेले होते. त्या पेटींतच तो मेला. मरण-समयीं त्याचे अतिशयच हाल झाले.

लिलिअस्—सिपिओ आफ्रिकानस् याचा सोबती. त्यानें न्युकार्थेज् घेतलें. तो दोनशेंपस्तीसांत जन्मला; एकशेंशहाण्णवांत प्रोक्टर् झाला. त्याच्या मरणाचें साल आपणांस बरोबर माहीत नाहीं.

लिलिअस् (२)—धाकट्या सिपिओचा दोस्त; तो शूर विशेषसा नव्हता. पण अति विख्यात राजकारणी पुरुष होता. त्याचें मन फारच प्रबुद्ध होतें. मनांत येई तितकें सर्व याच्या हातून घडून येत नसे. त्यामुळें हा ग्याकस् अथवा टायबेरिअस् ह्याच्या खालच्या प्रतींत होता म्हटलें तरी चालेल.

लेप्टाइनिस्—डायोनिसिअस्चा भाऊ. मोठ्याच्या लढाईत हजर होता मोठ्या गेल्यावर काटानाचे बाजूस आरमारावर होता. तेथें त्याच्या उतावीळपणामुळें त्याचा खासा पराभव झाला. क्रोनिअम् येथील लढाईत तो मेला.

सिपिओ—(पब्लिअस् कॉर्नेलिअस सिपिओ) थोरल्या आफ्रिकानस्चा बाप. हानिबाल्शीं पहिल्याप्रथम लढाई दिली. दोनशेंअठरांत तो कॉन्सल् झाला. त्यानें मसिला (मार्सेल्स्) येथें हानिबाल्ची गांठ घेण्याचा प्रयत्न केला. पण हानिबाल्नें त्याला चुकविलें. नंतर आपला भाऊ नीअस यास स्पेन्मध्यें ठेऊन तो इटलींत आला. पो नदीच्या कांठीं टिसिअस् येथें त्याचा अगदीं पराभव झाला, व त्याला एक जबर जखम लागली.

त्याच्या मुलानें त्याचा प्राण वांचविला असें ह्मणतात. त्याचा जोडीदार सेम्प्रोनिअस् याचा पराभवही त्यानें डोळ्यांनीं पाहिला. पुढें तो स्पेन्मध्यें गेला. येथें कांहीं थोडेसे लहानसहान विजय मिळविले. शेवटीं दोघेही बंधु एका मित्राच्या विश्वासघातकीपणामुळें हस्‍ड्रुबाल्च्या हातीं सांपडले व प्राणास मुकले.

सिपिओ (२) (पब्लिअस् कार्नेलिअस्)—**आफ्रिकानस्**—टिसिनस्, ट्रिबिआ, व कानी ह्या तिन्ही लढायांत हजर होता. तह करावा असें म्हणणाऱ्या पुष्कळ सरदारांशीं वादविवाद केला. स्पेन्मधील फौजेचें आधिपत्य मिळविण्याविषयीं वयाचे चौविसावे वर्षीं अर्जी केली. सर्वानुमतें त्यास ती जागा मिळाली. आरंभींच त्यानें न्यूकार्थेज् फार चातुर्यानें घेतलें. तेथें त्याला खजिना व इतर लूटही पुष्कळ सांपडली. त्याच्या सुस्वभावामुळें, विशेषतः त्याच्या सुरूपतेमुळें व रसाळ वाणीमुळें भोंवतालचीं पुष्कळ संस्थानें त्याला येऊन मिळालीं, व त्यानेंही त्यांचा उत्तम प्रकारें उपयोग करून घेतला. ग्वाडाल्क्विवर जवळ त्यानें हस्‍ड्रुबाल्ला गांठलें. पण निश्चयाची लढाई झाली नाहीं. कारण हस्‍ड्रुबाल् इटलीकडे जाण्यास निघाला होता. दुसरे वर्षीं त्यानें शत्रूंचा पराभव करून त्यांना गेड्सपावेतों पळवून लावलें. तेथून तो सिफ्याक्स्कडे गेला व तेथें आफ्रिका घेण्याचा व्यूह त्याचे मनांत आला. म्यासिनिसाकडेही तो गेला. स्पेन्मधील दंगा ऐकून तो लागलीच परत आला. तेथून कॉन्सल्ची जागा मिळविण्यासाठीं तो रोमला चालता झाला व ती जागा मिळविली. इतक्यांत हस्‍ड्रुबाल् हा मेटारस्चे कांठीं पडला व हानिबाल् दक्षिण इटलींत बहुतेक कोंडल्या सारखाच होता, हें पाहून ह्यानें लढाई आफ्रिकेंत करण्याचा निश्चय केला. त्याला माणसांची मुळींच वाण पडली नाहीं. तो २०४ सालीं निघाला व युटिकाजवळ उतरला. कार्थेज्ला एकदम सिफ्याक्स्ची मदत मिळाल्यामुळें तेथून त्याला जरासें दूर जावें लागलें. पुढले वर्षीं आणखी दोन विजय मिळवून झामाची लढाई जिंकून तह करण्यांत आला. ह्या तहानें कार्थेज्ची स्वतंत्रता गेली. ह्या दुसऱ्या प्यूनिक् लढाईनें रोम्, स्पेन् आणि सिसिलीचें मालक झालें व उत्तर आफ्रिकेवरही थोडीबहुत सत्ता त्याची चालूं लागली. त्याला रोमूमध्यें अतिशयच मान व अपार संपत्ति मिळाली. पण त्यांपैकीं कांहींएक त्यानें घेतलें नाहीं. पुढें त्याच्या भावानें व त्यानें मिळून

म्याग्नेसिआ येथें आन्टिआकस्‌चा पराभव करून त्याला शरण आणला. पुढें त्याच्यावर लांच घेतल्याचें किटाळ लोकांनीं उभें केलें. त्यांतून तो पार पडला. व शेवटीं आपखुषीनें जाऊन विदेशीं मेला. प्रख्यात ग्र्याकी हे त्याच्या मुलीचीं मुलें होत.

सिपिओ (३) (पब्लिअस् कार्नेलिअस्) **आफ्रिकानस् धाकटा**—अमेलिअस् पालस्‌चा मुलगा. त्याला सिपिओनें दत्तक घेतलें. १४१ सालीं स्पेन्‌मध्यें फार अंदाधुंदी होती, तेव्हां त्यानें अत्युत्तम प्रकारें चाकरी करून आपल्या बापाप्रमाणेंच नांव मिळविलें. १४९ त लढाई सुरू जाहली. कांहीं वर्षें लढाईला यावें तसें यश आलें नाहीं. तेव्हां याला तिकडे नेमण्यांत आलें. दोन वर्षें सारखीं लढाई सुरू होती. शेवटीं कार्थेज्‌च्या लोकांना शत्रूला शरण जावें लागलें. सतरा दिवस शहर जळत होतें. सिपिओ परत आल्यावर कांहीं विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं त्यांजवर नानाप्रकारचीं किटाळें उत्पन्न केलीं. त्यांतून तो आपल्या अद्वितीय वक्तृत्वानें फारच उत्तम तऱ्हेनें वांचला. तो १२९ सालीं मेला.

सोफोनिस्बा—कार्थेजिनिअन् सरदार हस्ड्रुबाल याची मुलगी. पहिल्यांदा म्यासिनिसा यास देण्याचें ठरलें होतें. पुढें कांहीं राजकारणानिमित्त सिफ्याक्स् यास देण्यांत आली. त्यामुळें सिफ्याक्स् हा शेवटपावेतों कार्थेज्‌चा दोस्त राहिला. सिफ्याक्स्‌ला शेवटीं कैद करून रोम्‌ला पाठविण्यांत आलें. तेथून सेनेट्‌नें त्याला आल्बा येथें पाठविलें.

स्पेण्डिअस—दोनशेंएकेचाळीसाचे बंडखोरांचा एक प्रमुख. तो क्याम्पानिआचा होता. तो रोम्‌चा गुलाम असतांना पळून गेला होता. क्षमा मिळण्याची मुळींच आशा नसल्यामुळें तो अति साहसानें बंडांत शिरला होता. त्याचा खिळे ठोकून प्राण घेण्यांत आला होता.

हस्ड्रुबाल् (१)—हस्ड्रूबाल् याचा खरा उच्चार अस्ड्रुबाल. याचा अर्थ अनुत्सेकी असा आहे. मेगोचा मुलगा. त्यानें कार्थेज्‌ला नांवारूपास आणण्यास बरीच मेहेनत केली. तो अकरा वेळ मुख्य अधिकारी निवडण्यांत आला होता. त्याची हानिबाल्, हस्ड्रुबाल् आणि साफो नांवाचीं तीन मुलें होतीं.

हस्ड्रुबाल् (२)—क्रिमिसस् नदीच्या कांठीं टायमोलिअन्नें ज्या कार्थेजिनिअन् फौजचा पराभव केला त्या फौजेंतील एक सेनाधिपति.

हस्ड्रुबाल् (३)—पहिल्या प्यूनिक् लढाईतील कार्थेज्कडचा सरदार. त्यानें आपल्या मूर्खपणामुळें कार्थेज् अगदीं बुडविलें होतें. तरी पण त्याला कांहीं शिक्षा झाली नाहीं. पुनः त्यास सिसिलींत पाठविण्यांत आलें. तेथें त्यानें बराच वेळ घालविला व शेवटीं प्यानोर्मस् येथें लढाई झाली तींत त्याचा पराभव झाला.

हस्ड्रुबाल् (४)—हामिल्कार् बार्काचा जांवई. तो मोठा राजकारणी पुरुष होता. व्यवसायाच्या सदृशत्वामुळें हामिल्कार् बार्काची आणि त्याची जोडी जमली. न्युमीडिअन् लोकांवर त्यानें बऱ्याच मोहिमा केल्या. दोनशें एकोणतीसांत हामिल्कार् मेल्यावर तोच सेनाधिपति झाला. त्यानें आपल्या मधुर भाषणांनीं व चांगल्या चालीरीतींनीं सर्व स्पेन् आपलेसें करून घेतलें व एका स्प्यानिश् राजकन्येशीं त्यानें लग्न लावलें. हस्ड्रुबाल्नें 'न्यूकार्थेज्' नांवाचें शहर वसविलें व तीच स्पेन्ची राजधानी केली. फेबिअस् हस्ड्रुबाल्विषयीं असें म्हणतो कीं, त्यानें कार्थेज् एथें एकछत्री अम्मल सुरू करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत यश न आल्यामुळें तो स्पेन्कडे वळला. व तेथें जवळ जवळ राजाप्रमाणें अम्मल गाजविला.

हस्ड्रुबाल् (५)—हानिबाल्चा भाऊ. त्यानें त्याला दोन्ही सिपिओशीं लढण्याकरितां ह्मणून स्पेन्मध्यें पाठविला होता. कानीच्या लढाईनंतर तो इटलीकडे वळला. दोनशेंबारा सालीं नीअस्सिपिओ आणि पब्लिअस् सिपिओ दोघेही लढाईत मेले. तदनंतर नीरोसिपिओ नेमण्यांत आला. त्यानें न्यूकार्थेज् घेतलें तें घेतल्यावर हस्ड्रुबाल् इटलीकडे वळला. तेथें त्याच्या सैन्याचा मेटारस् येथें अगदीं पराभव झाला व तोही मेला. त्याच्या मरणानें हानिबाल्च्या मनाला असा जबरदस्त धक्का बसला कीं त्याच्या सर्व आशा जेथच्या तेथेंच राहिल्या. त्याच्या शत्रूंनीं सुद्धां हामिल्कार् आणि हानिबाल् याच्या तोडीचा तो वीर होता असें म्हटलें आहे.

हस्ड्रुबाल् (६)—गिस्कोचा मुलगा. त्याचा स्पेन् काबीज करून घेण्याचा फार मोठा प्रयत्न होता. तो हस्ड्रुबाल् आणि मेगो यास मदत करण्याकरितां स्पेन्मध्यें आला होता. तो अतिशय गर्विष्ठ होता. त्याच्या त्या स्वभावामुळें सर्व स्पेन्चे

लोक त्यावर उठले. पुढच्या हिवाळ्यांत तो गेड्स्कडे गेला. तो पुन: एकदां फौज उभारून लढाईस तयार झाला. पण त्यांतही त्याला यश आलें नाहीं. तेव्हां तो आफ्रिकेकडे गेला. तीस हजार शिपाई व तीन हजार घोडा त्याच्या हाताखालीं देण्यांत आला. सिफ्याकस्ही त्याच्या मदतीस आला. दोघांनीं मिळून सिपिओला वेढा उठविण्यास लावलें. परंतु पुढें सिपिओ आणि म्यासिनिसा ह्यांच्या युक्तींनीं छावणी जळून गेल्यामुळें तो फसला गेला. पुढच्या हकीगतीविषयीं खात्रीलायक माहिती कांहीं नाहीं. पोलिबिअस् म्हणतो कीं, तो एकटाच लढाई करण्यास निघाला. पराभव झाला तेव्हां लोकांनीं त्याला फांशीची शिक्षा दिली. शिक्षा ऐकल्याबरोबर त्यानें आपणास कोंडून घेतलें व विष खाऊन आत्महत्त्या करून घेतली.

हस्ड्रुबाल् (७)—अखेरच्या लढाईतील कार्थेजिनिअन् लोकांचा एक सरदार. आरास्कोपाच्या लढाईंत त्याचा असा पराभव झाला कीं, त्याला शत्रूच्या फौजेस शरण जावें लागले, व आपलीं हत्यारें शत्रूंना द्यावीं लागलीं. ह्या त्याच्या पराभवामुळें त्याला हद्दपार करण्यांत आलें. त्यानें ग्रीशिअन् लोकांची वीस हजार लोकांची फौज गोळा केली व कार्थेज्चा परिणाम काय होतो तें पहात स्वस्थ उभा राहिला. फारच दुर्दशा झाली तेव्हां कार्थेज्नें त्याला परत बोलाविलें. त्यानें कांहीं वेळ शत्रूंशीं चांगलीच टक्कर दिली व त्यांना शहराला वेढा घालूं दिला नाहीं. त्यानें म्यानिलस्ला आपले जाग्यावरून हांकून लावलें. ह्या त्याच्या जयामुळें तो इतका चढून गेला कीं त्यानें आपलें वजन खर्च करून आपला जोडीदार हस्ड्रुबाल् ह्याला अधिकारावरून दूर करविलें. सिपिओ जेव्हां मेगारांत शिरला तेव्हां त्याला हस्ड्रुबाल्ला अडवितां आलें नाहीं. शत्रूंनीं सर्व शहर घेरलें तेव्हां १४६ सालीं त्याला बिर्सा येथें आपली फौज जमा करावी लागली. अति निकराची लढाई झाली तरी पण शेवटीं रोमच विजयी झाले. बहुतेक लोक शत्रूंच्या स्वाधीन जाहले. जे शत्रूकडे गेले नाहींत ते एका देवळांत दडून राहिले. हस्ड्रुबाल् आपल्या बायकापोरांसहित तिकडेच गेला. पण शेवटीं आपण एकटा सिपिओच्या स्वाधीन झाला व त्यानें आपले बाकीचे दिवस परस्वाधीनपणांत घालविले. पोलिबिअस्नें त्याची फारच निंदा केली आहे. कोणी कांहींहीं म्हणो तो अगदीं निराश होईपावेतों एकसारखा लढत होता.

हस्द्रुबाल् (८)—आंतील फौजेवर मुख्य (६) तील हस्द्रुबाल्नें ह्याच्यावर गुलुसाशीं खलबतें केल्याचा आरोप आणला होता. त्यावरून त्याला काढून टाकण्यांत आलें होतें.

हानिबाल् (१)—गिस्कोचा मुलगा. हा आग्रिजेन्टम् येथील आरमारावरचा कप्तान होता. म्यामर्टाइन बंडांतील हानिबाल् व हा एकच असतील असें वाटतें. जवळ मोठीथोरली फौज असूनही तो हानोच्या फौजेची वाट पाहत होता. पुढें त्यानें लढाई देण्याचा प्रयत्न केला त्यांत त्याला यश आलें नाहीं. लिपारा येथें त्यानें कांहीं युक्तींनीं जय मिळविला. त्याचा मायूली येथें अगदीं पराभव झाला. कार्वी कीं जीं जहाजावर चढून जाण्यासाठीं रोमन् लोकांनीं शोधून काढलीं होतीं त्यानें हा अगदीं घाबरला.

हानिबाल् (२)—लिलिबिअस्च्या वेढ्यांत असणारा हामिल्कार्चा मुलगा. पहिल्या प्यूनिक् लढाईंत लिलिबिअमला शत्रूंनीं दोनशेंपन्नास जहाजांनिशीं वेढा दिला तेव्हां आपल्या पन्नास जहाजानिशीं आग्युरस येथें निघून आला. तेथून चांगलासा वारा पाहून तो शत्रु लढाईस तयार होण्याच्या आधींच येऊन पोहोंचला. २४९ सालच्या वेढ्यांत त्याचें नांव कोठेंही नाहीं.

हानिबाल् (३)—बंडखोरांचा हानिबाल्. हानोनंतर हा नेमण्यांत आला होता. मेथोनें त्याचा अगदीं पराभव केला.

हानिबाल् (४)—हामिल्कार् बार्काची सिसिली येथें नेमणूक झाली तेव्हांच ह्मणजे २४७ सालीं त्याला हानिबाल् नांवाचा मुलगा झाला. तो आणि त्याचे दोघे भाऊ यांस (सिंहशाव) असें नेहमीं ह्मणत असत. त्यानें आपले वयाचे नववे वर्षींच सैन्याबरोबर स्पेन्मध्यें येऊं देण्याची परवानगी मागितली. तेथें तो बापाच्याच शिक्षेखालीं होता. हत्यारें चालवण्यांत व इतर या सारख्या गोष्टींत तो अगदीं तरबेज झाला. त्याचा बाप ज्या लढाईंत मेला त्या लढाईंत तो हजर होता. त्यावेळेस त्याचें वय फक्त एकोणीस वर्षांचें होतें. मरणोत्तर हस्द्रुबाल् हा सेनाधिपति होता. ह्याच्या कारकीर्दींत हानिबाल्ची कीर्ति चहूंकडे पसरली. हस्द्रुबाल् मारला गेला तेव्हां ह्याची जागा पत्करेसा हानिबाल् शिवाय कोणीही सैन्यांत हजर नव्हता. सेनापति

झाल्यावर त्यानें लागलेंच स्पेन् घेतलें. दोनच मोहिमांत त्यानें इब्रोच्या दक्षिणचें सर्व स्पेन् सर केलें, नंतर त्यानें स्यागन्टम्‌कडे नजर फिरविली. ह्या शहरानें त्याला बराच वेळ दाद दिली नाहीं. हानिबाल्‌नें हिंवाळा न्युकार्थेज् येथें घालविला; मध्यंतरीं रोम्‌कडून आलेल्या प्रतिनिधींना त्यानें अगदीं झिडकारून टाकलें, व इटलीकडे त्यानें आपली दृष्टि फेंकली. इटलीवर जाण्याची त्यानें तयारी केली. त्याजपाशीं चांगलें कसलेले शिपाई होते व खजिनाही प्रथम भरपूर होता. त्यानें आपलेबरोबर नव्वद हजार पायदळ तीस हजार घोडा व सदतीस हत्ती घेतले. स्पेन् आणि गाल् यांजमधील घाटांची नाकेबंदी करण्यासाठीं हानोला दहा हजार पायदळ व हजार घोडेस्वार बरोबर देऊन पुढें पाठविले. त्यानें पिरिनीस पर्वत ओलांडला, व ऱ्होन् पावेतों कांहींएक अडचण आल्याशिवाय गेला. रोम्‌मध्यें हा वेळ-पावेतों कांहींएक करण्यांत आलें नव्हतें. शेवटीं पब्लिअस् सिपिओ मार्सेल्स् येथें धाडण्यांत आला. तेथें त्याची आणि हानिबाल्‌ची गांठच पडली नाहीं. त्यानें रुक्मारी येथें ऱ्होन् नदी ओलांडली. मग डाव्या कांठानें व्हालेन्स्‌पावेतों गेला व तेथें आल्प्स्‌च्या चढाला लागला. लिटल् सेन्ट् बर्नार्ड म्हणून जागा आहे तेथून तो आल्प्स् चढला. व एओ-स्टाच्या दरींत गेला. त्याच्या जरी प्रवासाचा एक समग्र ग्रंथ होऊं शकेल तरी पण एवढी गोष्ट खरी आहे कीं तो दोन्ही जागा चढून गेला. दहा चढावयास व पांच उतरावयास असे एकंदर पंधरा दिवस त्याला फक्त आल्प्स्‌मध्येंच लागले. जेव्हां तो इटलींत उतरला तेव्हां फक्त वीस हजार पायदळ व सहा हजार घोडेस्वार त्याजवळ होते. इटलींत त्यानें कितीएक लढाया जिंकल्या, त्या सर्व येथें सांगत बसत नाहीं. कानी ट्र्यासुमेन्नस ट्रेबिआ इत्यादि सुप्रसिद्धच आहे. पुढें त्याला परत बोलावण्यांत आला. तो हुकूम त्याला क्रोटोना येथें मिळाला. तेथून निघण्यापूर्वीं त्यानें आपल्या मोहिमांचा व लढायांचा सर्व वृत्तांत ग्रीक् व प्यूनिक् भाषेंत लिहवून ठेविला. तो आफ्रिकेंत आल्यामुळें लोकांस बरीच हुषारी वाटली. पण झामा येथील लढाईत त्याचा अगदीं पराभव झाला. तेथपासून पुढें तो निरनिराळ्या ठिकाणीं भटकत गेला. कोठें कांहीं मोठासा विजय त्यानें मिळविला नाहीं. शेवटीं विदेशींच मरण पावला. ग्रीक आणि रोमन् लोक त्याजवर अनुक्रमें लोभीपणाचा व निर्घृणतेचा आरोप आणतात. पण तो कालमानाप्रमाणें

फार लोभी किंवा अतिनिर्दय होता असें म्हणवत नाहीं. रोमन् सरदारांनीं अनेकवेळा त्याच्या तोडीचा किंबहुना अधिक निर्दयपणा दाखविला आहे. त्याच्या मितपणाची करावी तितकी स्तुति थोडीच.

हानो—ह्या नांवाचे चवदा सरदार आपल्या कथानकांत व इतर ठिकाणीं दिलेले ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं बहुतेकांच्या विषयीं आपणास एक एक दोन दोन मुद्यापलीकडे कांहीं माहिती नाहीं. तेव्हां त्यांचीं चरित्रें लिहून ग्रंथ फुगविण्यांत अर्थ नाहीं. त्यांपैकीं एक हामिल्कार् बार्काचा व हानिबाल्चा प्रतिस्पर्धी हा तर फारच प्रसिद्ध आहे. त्याला 'ग्रेट' 'मोठा' अशी संज्ञा होती. तो बंडखोरांच्या पुंडाव्याच्या वेळीं हामिल्कार् बार्काच्या हाताखालीं होता. पण त्या दोघांचे बनेना. हामिल्कार् बार्कानें स्पेन्मध्यें पाऊल ठेवल्यापासून तों तहत हानिबाल् परत जाईपावेतों तो सारखा ह्या कुटुंबाच्या सर्व मंडळीचा द्वेष करीत असे, व त्याच्या प्रत्येक प्रयत्नाच्या आड येत असे. तो कार्थेज्चे लोकांना इतका आवडत असे ह्याचें मुख्य कारण तो आफ्रिकन् लोकांचा मनापासून द्वेष करीत असे. इतर हानोच्या वृत्तांताविषयीं ज्या त्या ठिकाणीं पाहावे.

हामिल्कार्—ह्या शब्दांतील मिल्कार् हीं अक्षरें मेल्कार्थ देवतेची दर्शक होत. ही देवता युद्ध वगैरे प्रकरणीं मुख्य होती. त्यामुळेंच हामिल्कार् ह्या नांवाचे फार सरदार प्रस्तुतचे इतिहासांत दिसतात.

हामिल्कार् (१)—४८० सालीं सिसिलींत जें सैन्य पाठविण्यांत आलें होतें त्यावरचा मुख्य. ह्याच्या बापाचें नांव हानो होतें असें हेरोडोटस् म्हणतो. जास्टिन्च्या लिहिण्यावरून ह्याच्या बापाचें नांव मेगो होतें असें वाटतें. ह्याला कोणी 'राजा' असें ह्मणत असत. ही संज्ञा मुख्य सरदारास असे असें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तो आपल्या सैन्यानिशीं प्यानोर्मस् येथें उतरला. तेथून हायमेरा येथें चालू झाला व तेथें त्यानें थेरान्ला वेढून घेतलें. त्याचा सासरा जेलन् हा थेरान्च्या मदतीस आल्यामुळें हामिल्कार्चा अगदीं पराभव झाला. कोणी ह्मणतात मरणोत्तर लोक (कार्थेजिनिअन्) त्याची पूजा करीत असत, पण ही गोष्ट विश्वसनीय वाटत नाहीं; कारण त्याच्या मुलाला हद्दपार करण्यांत आलें होतें.

हामिल्कार् (२)—३३९ सालीं टायमोलिअननें ज्या सैन्याचा अगदीं पराभव केला त्या सैन्याचा एक प्रमुख. तो त्याच लढाईंत पडला.

हामिल्कार् (३)—अगॉथॉक्लीस् आपला अम्मल ज्या वेळीं सिसिलींत बसविण्याचा प्रयत्न करीत होता त्या वेळचा सिसिलींतील एक सरदार. तो प्रथम अगॉथॉक्लीस्च्या विरुद्ध पक्षाचा होता. पण पुढें त्यानें त्याला बरीच मदत केली. कारण त्यास वाटलें कीं अगॉथॉक्लीस् कार्थेज्ला साहाय्य करील. हामिल्कार्नें आग्रिजेन्टमचे लोक, जेलाचे लोक व मेसानाचे लोक ह्या सर्वांशीं अगॉथॉक्लीस्चें उत्तम बनवून दिलें. ही सर्व हकीगत कार्थेज् एथें समजली. तेव्हां त्याला परत बोलावून आणलें. पण वाटेंतच तो मेला.

हामिल्कार् (४)—अगॉथॉक्लीस्शीं लढाई सुरू जाहली तेव्हां हामिल्कार् नांवाचा सेनापति नेमण्यांत आला होता. त्यानें एकदम सैन्य गोळा केलें व अगॉथॉक्लीस्चा पराभव केला. नंतर अगॉथॉक्लीस्नें जेला येथें त्याचा पराभव केला. ह्या पराभवानंतर हामिल्कार् भोंवतालचे लोक आपल्याकडचे करून घेण्यांत गुंतला होता. मध्यंतरी आपला भाऊ अन्टन्डर यास सिसिलींत ठेवून अगॉथॉक्लीस् आफ्रिकेंत गेला. इकडे हामिल्कार्नें सायराक्यूस्ला वेढा दिला. सर्व सिसिली आपल्या ताब्यांत घेतलें व एका शकुनाच्या आधारें सायराक्यूस्वर हल्ला करण्याचें ठरविलें. त्यांत त्याचा पराभव झाला व शत्रूंनीं त्याला कैद केलें. पुढें त्यांतच त्याचा अंत झाला.

हामिल्कार् (५)—पहिल्या प्यूनिक् लढाईंतील तिसऱ्या वर्षीचा सेनापति. तो हानोनंतर सेनापति झाला. पहिलीं कांहीं वर्षे तो विजयी होता. त्यानें रोमन् लोकांचा थर्मा येथें पराभव केला; तेथून तो सर्व सिसिलीभर मिरवीत गेला. त्यानें ड्रेप्यानम् येथील किल्ला दुरुस्त केला. दोनशें सत्तावनांत तो एक अनिश्चित परिणामाची लढाई लढला. दोनशें छपन्नांत अटिलिअस् रेग्युलस् आणि म्यानलिअस् यांनीं त्याचा अगदीं पराभव केला. त्याचीं तीस जहाजें जाळलीं व चौसष्ट काबीज करून घेतलीं. त्याला परत बोलावण्यांत आलें. पुन: तो व हस्द्रुबाल् याचा पराभव झाला तेव्हां त्याला न्युमिडिआकडे पाठविलें असें कित्येक ह्मणतात. व शेवटच्या

पराभवानंतर रेग्युलस्च्या बायकोला तो ओलीस म्हणून देण्यांत आला होता असेंही कित्येक ह्मणतात.

हामिल्कार् (६)—हामिल्कार् बार्का हानिबाल्शिवाय सर्व कार्थेजिनिअन् सरदारांत श्रेष्ठ होता. 'बार्का' ह्याचा अर्थ 'वीज' असा आहे. दोनशें सत्तेचाळीस सालापासून तो प्रख्यातीस आला. प्रथमतः तो एका लहान टोळीचा मुख्य होता. लाक्री आणि क्यूमी यांजवर तो वारंवार हल्ले करीत असे. शेवटीं तो 'अर्क्टा' अथवा 'हर्क्टा' येथें तळ देऊन बसला. त्याचें सैन्य ह्मणजे नुसती एक भाडोत्री शिपायांची टोळी होती; पण ह्याचेच पुढें त्यानें अत्युत्तम शिपाई बनविले. तीन वर्षें तो ह्या ठिकाणीं होता. पण त्याजवर कोणी हल्ला करूं शकले नाहींत. पुढें त्यानें आपखुषीनें आपलें ठाणें बदललें आणि एरिक्स् पर्वताकडे तो वळला. एरिक्स्च्या किल्ल्यावर रोम्ची छावणी होती तरी सुद्धां दोन वर्षें त्यानें अत्युत्तम रीतीनें तळाच्या खेड्यांत टिकाव धरला. एगेट्स्च्या लढाईबरोबरच पहिली प्यूनिक् लढाई संपली तेव्हां ल्युटेटिअस् यानें त्यांस हत्यारें वगैरे घेतल्याशिवाय निघून जाण्याचें सांगितलें पण तें त्यानें ऐकलें नाहीं. शेवटीं विजयी सैन्याप्रमाणें तो आपलें सैन्य आफ्रिकेंत घेऊन गेला. भाडोत्री शिपायांचें बंड मोडण्यासाठीं त्याला नेमिला होता. पहिल्याप्रथम हानोचें आणि त्याचें जमत नसल्यामुळें त्यास चांगलेंसें यश आलें नाहीं. पण जेव्हां शेवटीं सैन्यानें हामिल्कार्लाच निवडलें तेव्हां तो आणि हानिबाल् सर्वतो विजयी झाले. न्युमिडिअन् लोकांचें बंड मोडण्यासाठीं त्याला पश्चिम किनाऱ्याकडे पाठविण्यांत आलें होतें. तेथें त्यानें बरेचसे विजय मिळविले व तेथेंच त्याच्या मनांत स्पेन्कडे कार्थेज्चें राज्य वाढवावें असें आलें व तदनुरूप कोणास न कळवितां व कार्थेज्लाही खबर न देतां तो एकदम स्पेन्मध्यें गेला. त्याच्या मनांत विशेषतः असें आलें कीं सिसिली गेलें त्याबदला स्पेन् मिळवावें ह्मणजे झालें. पुढें रोम्वर चालून जाण्यापर्यंत सुद्धां त्याच्या कल्पनेची मजल पोहोंचली होती, व हें सर्व करण्यास तो समर्थही होता. पण दैवयोग असा विचित्र होता कीं, त्यानें प्रयत्न आरंभून त्यांत त्याला थोडेसें यश आलें मात्र कीं लागलींच त्याला मृत्यूनें गांठलें. त्याला २२८ सालीं कोणी तरवार भोंसकून मारलें असा बहुतेकांचा समज आहे. कित्येकांचा अभिप्राय तो

लढाईंत पडला असा आहे. येथें दिले आहेत त्याशिवाय आणखी दहा हामिल्कार् कार्थेज्चे इतिहासांत प्रसिद्ध आहेत. पण त्या सर्वांचीं चरित्रें देण्याइतकें ते प्रसिद्ध नाहींत.

हायूरो—सायराक्यूस्चा राजा. पिऱ्हस् गेल्यानंतर सायराक्यूसन् लोकांच्या लक्षांत हायूरोचें शहाणपण व कवाइतीचें चातुर्य येऊन त्यांनीं त्याला आपल्या फौजेचा मुख्य नेमिला. पुढें म्यामर्टाइन् लोकांशीं जी त्यानें पहिली लढाई दिली तींत त्याचा पराभव झाला. पुढें म्यामर्टाइन् लोकांनीं रोमूची मदत मागितली व हायूरोनें कार्थेज्ची मदत मागितली. एपिअस् क्लाडिअस्नें त्याचा पराभव केल्यामुळें तो सायूराक्यूस्ला पळून गेला व तेथपासून त्यानें रोम्चा पक्ष स्वीकारला. त्यानें पहिल्या प्यूनिक् लढाईंत रोम्ला अत्युत्तम तऱ्हेची मदत केली. पण रोम्ला सिसिलीची हाव फार असल्यामुळें रोमनें त्याला सिसिलीचा एवढा सुद्धां तुकडा बक्षिसादाखल ह्मणून दिला नाहीं. त्याला दोनशें चौसष्ट सालीं राजा ही पदवी देण्यांत आली होती. तो अति साधा मनुष्य असे. त्यानें कधींही मुकुट घातला नाहीं किंवा स्वसंरक्षणासाठीं शिपाईही ठेविला नाहीं अशी त्याजविषयींची आख्या आहे. त्याचा पोषाख अगदींच साधा असे.

हायूरॉनिमस्—तो दोनशें सोळा सालीं हायरोनंतर गादीवर बसला. तो लहानपणींच दुर्बल मनाचा भासल्यामुळें त्याच्या आजानें पंधराजणांचें काउन्सिल नेमिलें. पण आन्ड्रोनोडोरस् ह्याच्या उपदेशावरून त्यानें आपल्या हातांत राज्यसूत्रें घेतलीं. सिसिली देत असल्यास आपण तुह्मांस मदत करूं अशा अर्थाचा निरोप कार्थेज्कडे पाठविला व त्यांना थोडीशी मदतही केली. डीनामिनिस् व इतर कांहीं मारेकऱ्यांनीं मिळून त्याला रस्त्यांत गांठलें व तेथेंच ठार केलें.

हिमिल्को—हामिल्कार् आणि हिमिल्को हीं एक असावींत अशी कल्पना बऱ्याच लोकांची आहे. ह्या नांवाचेही पुष्कळ पुरुष कार्थेज्मध्यें होते. त्यांपैकीं एकाचेंच चरित्र येथें देतों. हा हानिबाल्बरोबर सेनापति होता. हानिबाल् आणि हा हे दोघे चुलतभाऊ होते. आग्रिजेन्टमूच्या वेळ्यांत

त्यांनीं कांहीं थडगीं वगैरे उकरून टाकल्यामुळें त्यांत त्यांचा पराभव झाला. हानिबाल् लढाईंत मेला. पुढें यज्ञयागादींच्या अर्पणानें देवता संतुष्ट झाल्या. कारण ड्याफ्निअस् मदतीस येऊन पोंहोचला. पुढें त्यानें आग्रिजेन्टम्, जेला, क्यामारिना हीं शहरें भराभर घेतलीं. शेवटीं तह करण्यांत आला. पुन: लढाई सुरू जाहली, तेव्हां हिमिल्को मोठी फौज घेऊन निघाला. त्यानें सिसिलीच्या किनाऱ्यावर पाय ठेवला मात्र कीं सर्व लोक भराभर त्याला जाऊन मिळूं लागले. डायोनिसिअस् फौज घेऊन आला; पण पराभव झाल्यामुळें त्याला सायूराक्यूस्ला जावें लागलें. हिमिल्को त्याचा पाठलाग करीत करीत सायूराक्यूस्च्या दरवाज्यापावेतों गेला. पण त्याच्यानें प्रत्यक्ष शहरावर एकदम हल्ला करवेना. भोंवतालचा मुलूख त्यानें पुष्कळ लुटला. शेवटीं फौजेंत ताप सुरू जाहला. ही विपत्ति पाहून डायोनिसिअस्नें हल्ला केला. हिमिल्कोनें एक गुप्त तह केला व आपण खुद्द कार्थेज्चे कांहीं मुख्य सरदार घेऊन आफ्रिकेंत निघून गेला. तेथें फार लाज वाटल्यामुळें त्यानें आपणांस घरांत कोंडून घेतलें व अन्नपाण्याशिवाय मेला.

परिशिष्ट दुसरें.

शकावली.

	खिस्ती शकाच्या पूर्वी.
डायडोच्या हातून कार्थेज्‌ची स्थापना	८५०
माल्कस्‌च्या स्वाऱ्या	५५०
अलेलिआची लढाई	५३६
रोम्‌शीं पहिला तह	५०९
हायूमेराची पहिली लढाई	४८०
रोम्‌शीं दुसरा तह	४४०
हानिबाल्‌चा सिसिलीवर हल्ला	४१०
रोम्‌शीं तिसरा तह	४०५
आग्रिजेन्टम्‌ स्वाधीन करून घेतलें	४०६
कार्थेज्‌ आणि डायोनिसिअस्‌ यांच्या मधील तह	४०५
लढाईची पुन: सुरुवात	३९७
हिमिल्कोचा सायराक्यूस्‌चा वेढा	३९६
हिमिल्कोचें आफ्रिकेंत परत येणें	३९६
मेगोचें सिसिलीवर चालून जाणें	३९३
डायोनिसिअस्‌शीं तह	३९२
लढाईस पुन: सुरुवात	३८३
डायोनिसिअस्‌ कार्थेज्‌वर हल्ला करतो	३६८
डायोनिसिअस्‌चा मृत्यु	३६७
हानोचें गुप्त खलबत	३४०

	इ. स. पूर्वी.
क्रिमेससूची लढाई	३३९
टायमोलिअन्चा मृत्यु	३३७
अगॉथॉक्लीस्चा हायमेरा येथें पराभव	३१०
तो आफ्रिकेवर हल्ला करतो	३१०
तो सिसिलीस परत येतो	३०७
पिऱ्हस् सिसिलीवर हल्ला करतो...	२७८
तो सिसिली सोडतो	२७६
पहिल्या प्युनिक् लढाईचा आरंभ	२६४
कार्थेजिनिअन् आरमाराचा मायूली येथें ज्युलिअसूच्या हातून पराभव...	२६०
रेग्युलसूचा एक्नोमस् येथें जय	२५६
रेग्युलसूचें आफ्रिकेंत जाणें	२५६
रेग्युलसूचा झ्यान्टिपसूकडून पराभव	२५५
लिलिबिअमूच्या वेढ्यास आरंभ...	२४९
क्लाडिअस्च्या हाताखालील रोमन् आरमाराचा ड्रेपानम् येथें पराभव	२४९
हामिल्कार् बार्का सिसिलींत येतो	२४७
हानिबाल्चा मृत्यु	२४७
कार्थेजिनिअन् आरमाराचा काटालसूच्या हातून एग्युसा येथें पराभव	२४१
पहिल्या प्युनिक् लढाईची अखेर	२४१
भाडोत्री शिपायांचें बंड	२४१–२३६
हामिल्कार् बार्का स्पेनूवर हल्ला करतो	२३६
हामिल्कारूचा मृत्यु	२२९
हस्ड्रुबालूला मारेकरी घातले	२२१
हानिबालूनें सागन्टम् घेतलें; दुसऱ्या प्यूनिक् लढाईस आरंभ ...	२१८
टिसिनस् आणि ट्रेबिआच्या लढाया	२१८
ट्र्यासुमेन्नसूची लढाई...	२१७
कानीची लढाई	२१६

	इ. स. पूर्वी.
हानिबाल् कापुआ येथें हिंवाळा घालवितो...	२१५
रोमन् लोकांनीं सायराक्यूस् जिंकून घेतलें...	२१२
हानिबाल् टारन्टम् घेतो	२१२
सिपिओचा स्पेन् येथें पराभव आणि मृत्यु...	२१२
हानिबाल् रोमवर चाल करतो—कापुआचा नाश	२११
पब्लिअस् सिपिओ स्पेन्मध्यें जातो	२११
तो न्यूकार्थेज् घेतो	२१०
मार्सेलस्‌चा मृत्यु	२०९
हस्ड्रुबाल् इटलींत शिरतो	२०८
त्याचा मेटारस् येथें पराभव	२०७
सिपिओ आफ्रिकेंत जातो	२०६
हानिबाल् कार्थेज्‌ला परत येतो	२०४
झामा येथील पराभव व तह	२०३
दुसऱ्या प्यूनिक् लढाईची अखेर...	२०२
हानिबाल्‌चा मृत्यु	२०१
कार्थेज् येथें रोमच्या वकीलाचें येणें	१८३
तिसऱ्या प्यूनिक् लढाईस आरंभ...	१७४
कार्थेज्‌चा ऱ्हास	१४९
	१४६

परिशिष्ट तिसरें.

प्रश्नावली.

पुस्तक पहिलें.

भाग पहिला.

एलिसा राणी कोण होती ?
तिला घर सोडण्याचें काय कारण झालें ?
तिनें कार्थेज्‌ची स्थापना कशा रीतीनें केली ?
तिचा अंत कसा झाला ?
व्हर्जिल्‌नें लिहिलेल्या एलिसाच्या कथेचा गोषवारा द्या.
दंतकथेंतील व त्यांतील फरक सांगा.

भाग दुसरा.

व्हर्जिल्‌च्या गोष्टींतील विसंगतता दाखवा.
फिनिशिअन् लोक कार्थेज्‌ची स्थापना करण्यास विशेष योग्य होते हें सध्याच्या व त्या वेळच्या उदाहरणांनीं सिद्ध करून दाखवा.
'कार्थेज्' या शब्दाचा काय अर्थ संभवतो ?
कार्थेज्‌ची स्वाभाविक् संपत्तिमत्ता दाखवा.
कार्थेज्‌च्या इतिहासांतील आरंभीच्या दोन शतकाच्या इतिहासाची काय स्थिति आहे ?

माल्कस्‌संबंधीं तुम्हास काय माहिती आहे?
म्यागो कोण होता?
पांचशें छत्तीसांतील लढाईचें वर्णन द्या. ती कोणाकोणामध्यें झाली? व तिचा परिणाम काय झाला?
पांचशें नऊ सालीं झालेल्या तहाच्या शर्ती सांगा.
तो कोणाकोणामध्यें झाला? दुसरे कांहीं तह त्या दोघांमध्यें झाले काय?
ह्या वेळचा कार्थेज्‌च्या राज्याचा विस्तार सांगा.
क्याम्बेसिस् मोठा महात्वाकांक्षी होता, खरें काय?

पुस्तक दुसरें.

भाग पहिला.

सिसिलींतील संस्थानें कोणी व कशीं स्थापिलीं तें सांगा.
हामिल्कार्‌ला कोणी मदत केली व ती कां?
हायूमेराच्या लढाईचें वर्णन द्या.
जेलन्‌शीं झालेल्या तहाचीं कलमें सांगा.
पुनः सिसिलीशीं लढाई कारण्याचें कारण काय झालें?
सेलिनस्‌च्या लढाईचें वर्णन द्या.
हायूमेराची लढाई कार्थेज्‌चे लोकांना सेलिनस् इतकी सोपी गेली काय?
नंतर हानिबाल्‌नें काय केलें?

भाग दुसरा.

४०६ व ४०५ सालीं लढाईचें कोणाकडून व काय झालें?
हानिबाल्‌चा जोडीदार कोण होता?
सिसिलींत पाय ठेवावयाच्या अगोदर ह्यांना कोणी अडविलें?
आग्रिजेन्टम्‌नें हल्ला फिरविण्याची तयारी काय केली होती?
लढाईचें समग्र वर्णन द्या.
हानिबाल् कशानें मेला?
डाफ्निअस्‌नें काय केलें तें सांगा.

जेलाच्या हल्ल्याचें वर्णन करा.

डायोनिसिअस् कोण होता व त्यानें काय केलें?

हिमिल्कोनें लढाई पुढें सुरू कां ठेविली नाहीं?

डायोनिसिअस्शीं तह कोणत्या शर्तींवर झाला?

भाग तिसरा.

सिसिलींतील संस्थानें पुनः कार्थेज्च्या हातून जाण्यास कोणतीं कारणें झालीं?

मोट्या किल्ल्याचें वर्णन द्या.

कार्थेज्नें डायोनिसिअस्शीं लढण्यास कोण पाठविले व त्यानें काय केलें?

डायोनिसिअस्नें लढाई कोणत्या युक्तीनें जिंकली?

मोठ्या डायोनिसिअस्ला राखतां आलें काय?

मेसाना शहर हिमिल्कोला सहज कां घेतां आलें तें सकारण सांगा.

दुहेरी लढाई जाहली त्या दोहोंचेही परिणाम सांगा.

काटानाच्या लढाईचें वर्णन द्या.

ही लेप्टाइनिस्च्या मूर्खपणानेंच गेली असें स्पष्ट करून दाखवा.

नंतर हिमिल्को कोठें गेला?

त्याच्या सायराक्यूस् येथील पराभवाचें मुख्य कारण काय?

हिमिल्कोच्या हातून वीर पुरुषास अगदीं अनुचित अशा तऱ्हेची वर्तणूक कोणती झाली?

हिमिल्कोचा परिणाम कोणत्या तऱ्हेनें झाला?

त्यानें सोडल्यावर फौजेची काय व्यवस्था जाहली?

कार्थेज्विरुद्ध आफ्रिकन् लोक उठले होते त्यांचें काय झालें?

भाग चवथा.

सिकेल्चे लोक मूळचे स्नेही असतांना कार्थेज्नें त्यांस कां व कसें सोडलें तें सांगा.

पुढें लढाई डायोनिसिअस्नें उकरून काढली तें कसें?

ह्या लढाईचा परिणाम व्हावा असाच झाला असें तुह्मांस वाटतें काय?

वास्तविक कार्थेज्नें तह कां केला?

पुनः कधीं डायोनिसिअस्नें लढाई केली काय?

त्याच्या मरणाचा लढाईवर काय परिणाम झाला?

भाग पांचवा.

टायमोलिअन् कोठील कोण होता व त्याचा सायूराक्यूस्कडे येण्याचा संबंध काय?

क्रिमेससच्या लढाईचें वर्णन द्या व एखाद्या चतुर सरदाराच्या युक्तीनें विजय कसा मिळतो तें दाखवा.

पुढें झालेला तह हा क्रिमेससच्या लढाईचाच परिणाम होता काय? त्या तहाच्या शर्ती द्या.

भाग सहावा.

टायमोलिअन्नें सायराक्यूस्ला स्वतंत्रता दिली. मग ती कोणी काढून घेतली? व त्या काढून घेण्यानें काय झालें?

दुसऱ्या हायमेराच्या लढाईत ग्रीक् लोकांचा पराभव झाला त्याचीं कारणें द्या.

अगॉथॉक्लीस्ची कल्पनाशक्ति फार अचाट व विचित्रही होती असें दाखवा.

त्याच्या आरमाराला काय काय अडचणी होत्या व त्या कशा दूर झाल्या तें सांगा.

आपल्या लोकांना उत्तेजन यावें व त्यांनीं आवेशानें लढावें म्हणून आफ्रिकेंत आल्यावर त्यानें काय काय केलें?

अगॉथॉक्लीस्नें बरेच जय आफ्रिकेंत मिळविले त्याची साधारण व विशिष्ट कारणें द्या.

बोमिल्कार्विषयीं तुह्मास काय माहिती आहे?

अगॉथॉक्लीस्च्या हल्ल्याची विल्हेवाट काय झाली?

पिन्हस् कोण होता? त्याचे काय काय बेत होते व ते सिद्धीस कितपत गेले?

पुस्तक तिसरें.

भाग पहिला.

कार्थेज्चे लोक मोठे व्यापारी होते व त्यांनीं पुष्कळ प्रदेश शोधून काढले हे हानोच्या वृत्तांतावरून सिद्ध करून दाखवा.

हिमिल्कोनें असाच एक वृत्तांत लिहिला आहे, त्यावरून त्यानें प्रवास केला असेल असें तुह्मांस वाटतें काय?

भाग दुसरा.

कार्थेज्च्या राज्यव्यवस्थेसंबंधानें अरिस्टाटल्चें काय मत आहे?

'राजे' आणि 'सरदार' हे कोण असत व त्यांचा अधिकार काय असे?

सध्याचें इग्लंडचें 'पार्लमेन्ट्' व 'क्याबिनेट' यासारख्या संस्था कार्थेज्मध्यें कोणत्या होत्या?

'पेन्टार्कीस्' ह्मणजे काय?

कार्थेज् येथील सरदारवर्गाचें स्वरूप सांगा.

'राज्यांतील सर्व हुद्दे बिनपगारी होते' याचा अर्थ काय?

'साधारण भोजन' कार्थेज्मध्यें होतें कीं नाहीं?

कार्थेज्चा धर्म व देवता याविषयीं तुह्मांस काय माहिती आहे तें सांगा.

भाग तिसरा.

कार्थेज्च्या वसुलाच्या बाबी कोणकोणत्या होत्या?

कार्थेज् युरोपांत काय काय जिन्नसा खपवीत?

आफ्रिकेच्या लोकांना कोणत्या जिन्नसांची आवड फार असे व त्या त्यांना कशा मिळत?

कार्थेज्च्या नाण्याचें वर्णन द्या.

कार्थेज्चा ग्रंथसमूह अलीकडच्या शोधकांच्या हातीं कां लागला नाहीं?

कार्थेज्चे लोक ऐषआरामी होते असें तुम्हांस वाटतें काय?

पुस्तक चौथें.

भाग पहिला.

रोम्चा व कार्थेज्चा संबंध सिसिलींत कोणत्या तऱ्हेनें झाला?

हायूरो कोण होता? त्यास पक्ष बदलण्यास काय कारण झालें?

आग्रिजेन्टम्च्या लढाईचा शेवट कसा झाला? यामुळें रोम्ला सिसिली घेणें शक्य वाटलें काय?

रोमन् लोकांनीं आपलें आरमार कसें तयार केलें?

रोमन् लोकांनीं जहाजांत काय सुधारणा केली व त्यामुळें कार्थेज्चे लोकांशीं ते समुद्रावरही टक्कर देण्यास तयार कसें झाले तें सविस्तर सांगा.

एक्नोमस्च्या लढाईंत सरदार कोण कोण होते? लढाईचें वर्णन द्या.

भाग दुसरा.

हामिल्कार्चा रेग्युलस्नें पराभव केला तो त्याच्याच बिनअकलेमुळें हें सिद्ध करून दाखवा.

झान्टिपस् कोण होता? त्याचें सरकारांत कसें वजन पडलें? तो आल्यानें लढाईच्या स्वरूपांत काय बदल झाला तें सांगा.

झान्टिपस्च्या लढाईचें वर्णन द्या.

रेग्युलस्नें रोम्चे लोकांना केलेल्या उपदेशाचा गोषवारा द्या.

भाग तिसरा.

लिलिबिअम्, ड्रेप्पानम् व प्याकिनस् याविषयीं तुम्हांस काय माहिती आहे?

हर्क्टा येथें हामिल्कार्ला चहूंकडे रोमन् सरदार असतांना टिकाव कसा धरतां आला?

एगेट्स्च्या लढाईनें पहिली प्युनिक् लढाई शेवटास गेली ह्याला मागील लढाया व वेढे कारणीभूत होते असें दाखवा.

भाग चवथा.

भाडोत्री शिपायांच्या बंडाचीं कारणें द्या.

स्पेण्डिअस् आणि मेथो हे कोण होते? ह्यांचीं बंडांत फार चळवळ करण्याचीं कारणें सांगा.

ग्यास्कोच्या मध्यस्थीचा परिणाम सांगा.

हानो युटिकाच्या टोळीवर चालून गेला होता त्याचा परिणाम काय झाला?

हामिल्कार्च्या शत्रूंनीं वाटा बंद केल्या तेव्हां त्यानें बाहेर निघण्याची काय युक्ति काढली?

बंडखोर लोकांनीं सर्व बंदिवान मारले त्याचें कारण काय?

ह्या बंडांत हायरो आणि रोम् हीं कार्थेज्शीं मित्रभावानें वागलीं असें ह्मणतात. खरें कां?

भाग पांचवा.

हामिल्कार् बार्का स्पेन्कडे वळला त्याचीं कारणें व हेतु सांगा.

नऊ वर्षें त्यानें स्पेन्‌मध्यें घालविलीं त्याचा उपयोग काय?

हस्द्रुबाल्‌नें हामिल्कार्‌च्या कामास कशी व किती मदत केली?

हस्द्रुबाल् कशानें मेला?

हानिबाल् मोठा सरदार होण्यास योग्य होता असें त्याच्या नित्यकृत्यावरून व संवयीवरून सिद्ध करून दाखवा.

सागन्टम् कधीं व कसें घेतलें तें सांगा.

रोम्‌हून वकील आले होते त्याचा हानिबाल्‌नें व राजसभेनें कसा काय स्वीकार केला?

भाग सहावा.

कार्थेज्‌मध्यें व रोम्‌मध्यें कोणत्या सारखेपणाचा भास झाल्यामुळें हानिबाल्‌नें रोम्‌वर हल्ला करण्याचें योजिलें?

हल्ला सुरू करण्याचे पूर्व रात्रीं हानिबाल्‌ला काय स्वप्न पडलें?

हानिबाल्‌नें ऱ्होन्‌नदी कशी ओलांडली त्याचें वर्णन द्या.

आल्प्स्‌च्या पायथ्यापावेतों हानिबाल्‌ला कोणी पोहोंचविलें?

पब्लिअस् कार्नेलिअस् सिपिओ याला हानिबाल्‌च्या येण्याची बातमी केव्हां व कशी लागली व त्यानें काय केलें?

हानिबाल् कोणच्या रस्त्यानें चढला तें सांगा.

तो इटलींत उतरला तेव्हां त्याजपाशीं किती फौज शिल्लक होती?

भाग सातवा.

ट्रेबिआच्या लढाईत सरदार कोण होते? त्या लढाईचें सविस्तर वर्णन द्या.

भाग आठवा.

हानिबाल्‌ला एट्रुरिआंत शिरण्यास कोणता मार्ग स्वीकारावा लागला व त्यापासून त्याचें काय नुकसान झालें?

ट्र्यासुमेन्नस् सरोवराचें वर्णन द्या. तेथील हानिबाल्‌नें ठेवलेली सैन्याची व्यवस्था सांगा.

फ्लामिनिअस् कसा मेला?

ही लढाई जिंकल्यानंतर हानिबाल् कोठें गेला?

कार्थेज्कडे निरोप पाठविण्याचा हानिबाल्चा काय हेतु असेल बरें ?

फेबिअस्ची लढाई चालविण्याची काय तऱ्हा होती? ती रोमला कितपत हितावह झाली ?

फ्यालर्निआच्या मैदानांत जेव्हां हानिबाल् चारी बाजूनें घेरला गेला तेव्हां त्यानें बाहेर निघण्यास काय युक्ति केली ?

फेबिअस्ची लढण्याची तऱ्हा लोकांना अगदी अवडत नसे. ह्यांतील खरें कारण काय ?

मिन्सिअस् कोण होता ? त्याविषयीं तुह्मांस काय माहिती आहे ?

लढाईच्या पक्षाचा जय झाल्यावर सेनाधिपति (कॉन्सल्) कोण झाले ? त्या दोहोंचा मतभेद कोठें होता तो सांगा.

भाग दहावा.

कानीचा विजय हा सर्वांत श्रेष्ठ होता असें त्याच्या वर्णनावरून दाखवा.

महार्बाल्चें हानिबालास काय ह्मणणें होतें ?

तें त्यानें ऐकलें असतें तर बरें झालें असतें काय ?

भाग अकरावा.

कानीच्या लढाईचे अप्रत्यक्ष परिणाम थोडक्यांत सांगा.

रोम्नें जो कार्थेज्शीं इतका वेळ टिकाव धरला तो कशामुळें असें तुह्मांस वाटतें ?

सर्व लोकांना आश्वासन येण्यासाठीं रोम्नें काय केलें ?

हानिबाल्नें आपला भाऊ मेगो याच्या हातीं काय निरोप पाठविला ?

हानोनें त्याला सभेंत काय विचारलें ?

सभेंत प्रश्नांचा निकाल काय झाला ? त्याप्रमाणें व्यवस्था झाली काय?

कापुआ येथें मौजमजेंत दिवस घालविल्यामुळें तर हानिबाल्वर विपत्ति आली नसेल ना ?

दोनशें चवदा व पंधरा साल हानिबाल्ला फारसें इष्टही नाहीं व अनिष्टही नाहीं अशा तऱ्हेचें गेलेंसें दाखवा.

हानिबाल्नें टारन्टम् कसें घेतलें तें सांगा. किल्ला त्यांना कां घेतां आला नाहीं ?

हानिबाल्ला पडती कळा लागली असें केव्हां स्पष्ट व्हावयास लागलें ?

कापुआ वांचविण्यास हानिबाल्नें काय काय प्रयत्न केले ?

कापुआच्या लोकांना रोमूनें काय शिक्षा दिली? ती भूतदयेला कितपत अनुसरून होती?

सिसिली कार्थेजूच्या हातून परस्पर मत्सरामुळें कसें गेलें तें दाखवा. रोमूचा एक मनानें काम करण्याच्या निश्चयामुळें झालेला नफा व कार्थेजूचे मत्सरामुळें झालेलें नुकसान यांची तुलना करा.

हस्डुबालूनें नीअस् व पब्लिअस् सिपिओ यांच्या विरुद्ध बराच चांगला टिकाव धरला होता असें दाखवा.

सिफ्याक्स् व म्यासिनिसा यांचा या वेळच्या स्पेनूमधील लढायांत काय संबंध होता?

पब्लिअस् व नीअस् मेल्यावर स्पेनमध्यें कोण आला? त्याच्या स्वभावाचें थोडेंसें दिग्दर्शन करा.

त्यास स्पेन् इतक्या लवकर कसें घेतां आलें तें सांगा.

भाग चौदावा.

हर्डोनिआच्या लढाईत सरदार कोण होते व त्यांचा परिणाम काय झाला?

टारन्टम् हानिबालूच्या हातचें कसें गेलें?

दोनशें आठ सालीं महत्त्वाच्या गोष्टी काय झाल्या?

मेटारसूची लढाई कोणत्या युक्तीनें रोमन् सरदारांनीं जिंकली तें सांगा.

दक्षिणेच्या कोपऱ्यांत जाऊन बसल्यावर तो (हानिबाल्) कोणच्या आशेवर इटली धरून बसला होता?

सिपिओ आफ्रिकेंत कोणत्या सालीं उतरला व त्यानें उतरल्याबरोबर काय केलें तें सर्व सांगा. हा विश्वासघातकीपणा रोमन् सरदाराला योग्य होत काय?

झामाच्या लढाईचें वर्णन द्या.

पुढील झालेल्या तहाच्या सर्व शर्ती द्या. ह्या तहानें कार्थेजूची कितपत मानहानि झाली तें सांगा.

भाग पंधरावा.

हानिबाल् लढाईत जितका शूर होता तितका किंबहुना अधिक राज्यव्यवस्थेंत चतुर होता असें दाखवा.

हानिबाल्ला कार्थेज्हून पळून जाण्यास काय कारण झालें?

आन्टिआकस्च्या दरबारीं हानिबाल्ची कशी काय संभावना झाली?

पुढें हानिबाल् कोठें गेला?

त्याचा अंत कसा काय झाला?

हानिबाल्चें सर्व कृत्यांचें थोडक्यांत निरूपण करा व थोडक्यांत त्याचें जन्मचरित्र लिहा.

भाग सोळावा.

कार्थेज् आणि म्यासिनिसा यांचे बखेड्याचें थोडक्यांत वर्णन करा.

कार्थेज्नें तह करून घेण्यासाठीं काय काय खटपटी केल्या व त्याचें पर्यवसान काय झालें तें सर्व सांगा.

भाग सतरावा.

कार्थेज्च्या उद्योगपरतेची करावी तितकी स्तुति थोडीच हें सोदाहरण सिद्ध करून दाखवा.

कार्थेज्चा तट व बंदर यांचें थोडक्यांत वर्णन द्या.

म्यानिलिअस् व सेन्सोरिअस् यांनीं काय केलें तें थोडक्यांत सांगा.

सिपिओनें कार्थेज् कसें घेतलें त्याला तें करण्यास किती दिवस लागले; मध्यें आपल्या हुषारीनें कार्थेज्नें जय कसे मिळविले हें सर्व सविस्तर सांगा.

शहरांत जी लूट सांपडली तिची व्यवस्था सिपिओनें कशी काय केली?

परिशिष्ट चौथें.

सूची.

अ

आ

इ

ए

क

ग

च

ज

झ

ट

ड

थ

द

न

प

फ

ब

म

य

र

ल

व

स

ह

समाप्त.

शुद्धिपत्र.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	११७	१०	१०४
५	१४	१६५–१७०	१७१–१७७
२२	२०	सिलिअन्	सिसिलिअन्
४०	११	येण्यासठिा	येण्यासाठीं
४३	२३	नोकरात	नोकरींत
४६	३०	२३	२३०
४६	३०	२७५	२७५०
५२	१२	कार्थेजिअन्	कार्थेजिनिअन्
७५	८	असे.	असे
७७	२६	प्लीनो	प्लीनी
७८	५	अल्हेनिअस्	अव्हेनिअस्
८०	१७	ह्मणत	ह्मणून
९०	४	मा	म्यां
९६	१९	पुस्तकांत	पुस्तकांचा
९७	१४	निघृण	निर्घृण
९८	५	पा	रा
१०३	५	समारंभ	संरम्भ
११६	१९	कदा एक	एकदा एका
१२०	१	समाना	सामना
१२२	९	फौ	फौज
१२६	१२	उगवन	उगवून
१२८	७	टयुनिअस्	टयुनिस्
१३६	१२	शत्रूकडे	शत्रूकडे तर

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१३६	१३	बचावासारखा	बचावासाठीं
१३८	४	पाहिज	पाहिजे
१४१	७	आवडलें	आडवलें
१४५	६	ढीगाला	ढिगाला
१५१	२९	रिसाल्यावर	रिसाल्याचा
१५२	२४	ट्रेबिआनेच्या	ट्रेबिआच्या
१५५	१८	भावती	भोंवती
१६०	३०	पर्व	पूर्व
१७६	२०	नव्हता	नसता
१९५	२	हिमिल्कार	हामिल्कार्
१९७	१	टारमेस	मेटारस्
२००	११	लिलिबिअस्	लिलिअस्
२११	१९	आपल्या	असल्या
२१२	१२	भितरेपणाच्या	मितपणाच्या
२१६	३७	येऊन	घेऊन
२२०	८	माण	माणसें

वाचकांसाठीं दोन शब्द.

श्रीमंत गायकवाड सरकारांकडून ग्रंथप्रसिद्धीचे कामीं होत असलेले प्रयत्न.

प्रस्तुत वाचकांपुढें येत असलेलीं पुस्तकें **श्रीमंत गायकवाड सरकारांच्या** हुकुमानें तयार झालीं आहेत, याकरितां भाषाभिवृद्धीचे कामीं महाराजांकडून जे प्रयत्न चालले आहेत, ते लोकांस महशूर होणें इष्ट दिसल्यावरून खालीं सांगण्यांत येत आहेत :—

१ पुस्तक चांगलें असल्यास त्यास आश्रय देण्याचे नियम शाळाखात्याकडून ठरले असून त्याप्रमाणें तो देण्यांत येत असतो.

२ श्रीमंत महाराजांची स्वारी कडीप्रांतीं गेली असतां पट्टण येथील संस्कृत ग्रंथसंग्रह त्यांचे पाहण्यांत आला. तेव्हां त्यांतील उपयुक्त पुस्तकांची निवड व्हावी; व जीं चांगलीं ठरतील त्यांचे तरजुमे झाल्यानें ज्यांस संस्कृत येत नाहीं अशा लोकांस त्यांतील ज्ञानाचा लाभ सहज व्हावा या हेतूनें तीन मुख्य विषयांवर चांगलीं संस्कृत पुस्तकें घेऊन तीं मराठींत लिहिण्याविषयीं हुकूम देण्यांत आला. त्याअन्वयें तीं तयार झालीं असून पुढें जास्त पुस्तकांचे तर्जुमे करण्याचें काम चालू आहे. श्रावणमासदक्षिणेसारख्या संस्थेंतून नवीन पुस्तकें व निबंध तयार होण्याची तजवीज झालेली वाचकांस महशूर असेलच.

३ संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांचे उपयोगी पडणारीं पुस्तकें परभाषेंतून तरजुमे करून किंवा नवीन तयार करून छापण्यांत येत आहेत, व पुढें आणखी अशींच तयार करण्याविषयीं हुकूम देण्यांत आले आहेत.

४ नियमरूपानें छापविण्यांत येत असलेलीं पुस्तकें निरनिराळ्या खात्याकरितां केलीं आहेत, तथापि त्यांचाही मुख्य उद्देश असा आहे कीं त्यांच्या योगानें लोकांस शिस्तीनें काम करण्याची संवय लावावी. अशा प्रकारें शिस्तवार काम करण्याची संवय आपणांस किती कमी आहे हें सांगावयास नकोच. सरकारवाड्यासंबंधीं झालेल्या पुस्तकांचा तरी उद्देश असाच आहे.

५ सेक्रेटरींच्या मार्फत जीं पुस्तकें आश्रयासाठीं येतात, त्यांपैकीं कित्येकांस सवडीनुसार खानगी खात्यांतून आश्रय देण्यांत येत असतो.

६ ह्याप्रमाणें निरनिराळ्या खात्यांच्या नियमांअन्वयें तयार होत असलेल्या पुस्तकांशिवाय श्रीमंत महाराजसाहेब वेळोवेळीं विशेष हुकुम देऊन व नवीन सूचना करून स्वतःच्या देखरेखीखालीं जवळ असलेल्या लोकांकडून पुस्तकें लिहवून छापवीत असतात. अशा प्रकारें हल्लीं भाषाविषय, इतिहास, शास्त्रीयविषय, पाकशास्त्र, गृहशास्त्र, कायदे, क्रीडाशास्त्र, व अश्वकला, वगैरे विषयांवर पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा क्रम चालू आहे. सामान्य विषयांवर उपयुक्त माहितीचे ग्रंथ **महाराष्ट्र ग्रंथमाला** नामक मालेंत प्रसिद्ध होत असून आणखी **राष्ट्रकथामाला** नांवाची दुसरी एक ऐतिहासिक ग्रंथांची माला प्रसिद्ध होत आहे. इंटर्नॅशनल साएन्टिफिक् सीरीज नामक मालेंतील इंग्रजी पुस्तकांच्या धर्तीवर निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर सोपीं सोपीं पुस्तकें त्या त्या विषयांत प्रवीण अशा गृहस्थांकडून लिहविण्याचें काम बडोद्यांतील कलाभवन नामक शिल्पशाळेचे मुख्य गुरु यांजकडे सोंपलेलें आहे. या निमित्त एक मोठी रक्कम खर्च करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे. त्याचप्रमाणें पाकशास्त्रावरही देशीभाषेंत ग्रंथ लिहिण्याचा क्रम सुरू आहे. या विषयावरील ग्रंथमालिकेंत मराठी, हिंदुस्थानी, फारशी, मद्रासी, व इंग्रेजी वगैरे पाकक्रियांवरील ग्रंथांचा

समावेश केला आहे. आपले राष्ट्रीय खेळ प्रचारांतून जाऊं नयेत ह्मणून त्यांच्या माहितीचें एकीकरण करून उपयुक्त इंग्रजी खेळांच्या संग्रहासहित तें छापलें आहे. उर्दू भाषेंतीलही कित्येक ग्रंथ छापण्याचेंही काम चालू आहे. हीं सर्व पुस्तकें गुजराथी व मराठी ह्या दोन्ही भाषांत प्रसिद्ध करण्याविषयीं सरकाराचा हुकूम आहे. ह्यावरून महाराजांची समदृष्टि किती आहे व प्रत्येक उपयुक्त विषयांचें लोकांस शिक्षण देण्याकडे व भाषेची अभिवृद्धि करण्याकडे त्यांचें किती लक्ष आहे हें व्यक्त होत आहे.

महाराज सरकारांस द्रव्याची अनुकूळता असल्यामुळें असलीं कामें करण्याचा हुकूम देण्याचाच कायतो अवकाश, ह्या पलीकडे स्वतः महाराज साहेबांस श्रम नाहींत, असा कोणाचा ग्रह असेल तर तो फार चुकीचा आहे. कोणीही मनुष्य एकादें काम स्वतः अंगावर घेऊन करूं लागला ह्मणजे त्यांत शेंकडों भानगडीचे प्रश्न कसे निघतात हें त्याचा तोच जाणे. महाराज सरकारचे हे हेतु आज फार दिवसांचे असून ते सिद्धीस नेण्याच्या कामीं त्यांच्याकडून पुष्कळ श्रम होत आहेत, तरी ते अद्याप व्हावे तसे फलद्रूप झाले नाहींत. महाराज साहेबांचा वेळ अत्यंत अमोलिक असल्यामुळें अशा विषयांकडे ते इतकें लक्ष पुरवितात हें विशेष आहे. महाराजांच्या ह्या उद्योगाचा उपयोग सर्वत्रांनीं करून घेतला असें त्यांस कळलें ह्मणजे आपल्या श्रमाचें व पैशाचें सार्थक्य झालें असें ते मानतील.

ह्या उद्योगाबद्दल जास्त लिहून वाचकांचा वेळ घेणें बरोबर नाहीं. त्यांतील गुणदोष पाहण्याचें काम वाचकवर्गाचें आहे, तें त्यांनीं प्रांजलपणें बजाविल्यास महाराजांस फार समाधान वाटेल.

सरकार हुकुमानें तयार होत असलेल्या वर दर्शविलेल्या कित्येक पुस्तकांची यादी सोबत देण्यांत येत आहे.